
अरण्यगर्भ
डॉ. व्हि. टी. इंगोले

# अरण्यगर्भ



डॉ. व्ही. टी. इंगोले

ऋचा प्रकाशन
९, गजानननगर, नागपूर - १५

ISBN 81-86461-94-9

अरण्यगर्भ

*ARANYAGARBHA*

प्रकाशक / मुद्रक

प्रदीप मुळे

ऋचा प्रकाशन,

९, गजाननगर, नागपूर-१५

फोन नं. (०७१२) २२५१८७८

© डॉ. व्ही.टी. इंगोले

१०४, मानस गनेडीवाल ले-आऊट, कॅम्प,

अमरावती-४४४६०२

vtingolec gmail.com

प्रथम आवृत्ती

१९/७/२००९

संगणक

रश्मी कम्प्युटर्स

नागपूर.

मूल्य - १९५/- रु.



## अर्पण

आमच्या आईस

व

स्व. हरिभाऊ पुरोहीत

यांच्या स्मृतीस.

# मनोगत

माझी सुरुवातीपासूनच रुची विज्ञान व अभियांत्रिकी विषयात होती. पुढे याच विषयात मी पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले व याच विषयात संशोधन केले. नंतर मुंबईच्या विद्युत यंत्रे तयार करणाऱ्या 'क्रॉम्पटन' या नावाजलेल्या कंपनीत मी संशोधन व डिझायनिंगचे काम सुरू केले. त्या विषयाची आवड असल्यामुळे, कंपनीच्या आवश्यकतेप्रमाणे अनेक यंत्रे डिझायनिंग करण्यात मला यश मिळाले. काही कालावधीतच त्या संस्थेत मुख्य अभियंता म्हणून मी जबाबदारी सांभाळू लागलो. या शिवाय मुंबईतील काही उद्योजकांच्या विनंतीवरून आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातल्या समस्या सोडवण्याचे कामसुद्धा मी करू लागलो. हे करीत असताना माझ्या मनाचा एक कप्पा मात्र निसर्गप्रेमाने व्यापलेला राहायचा. त्यामुळे वेळ मिळेल तसा निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन निसर्गाचा आस्वाद घेण्याचा मी प्रयत्न करीत होतो. त्यावेळी मुंबई ही आजच्याप्रमाणे गजबजलेली नव्हती, त्यामुळे निसर्गभ्रमणाला सहज जाता येत असे. मला वाचनाची आवड आहे. मला आवडलेली पुस्तके मी संग्रही ठेवतो. त्यांचे अनेकदा वाचन होते. त्यात निसर्गाबद्दल पुस्तके भरपूर आहेत. वाचनामुळे मनातला तो कप्पा जपला जात होता. एक दिवस ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व डॉ. सलीम अली यांची भेट झाली. त्या भेटीने मी भारावून गेलो आणि मनात निसर्गअभ्यासाची ऊर्मी निर्माण झाली. कालांतराने मुंबईतील गजबजाट वाढतच होता. त्या गर्दीत मन रमेनासे झाले व गावी परत जावे, असा विचार मनात आला आणि तो मी अमलात आणला. अमरावतीला सहकुटुंब परत आलो. येथे आल्यावर बडनेऱ्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य सुरू केले. तेथे मला निसर्गअभ्यास करणारे प्राध्यापक व विद्यार्थी निशिकांत काळे आणि किशोर रिठे भेटले. हे दोघे अमरावती निसर्गसंरक्षण संस्थेचे पदाधिकारी व क्रियाशील कार्यकर्ते होते. तेव्हा त्यांच्यासोबत मेळघाटात भटकंती होऊ लागली आणि माझ्या मनाच्या कप्प्यात अनुभवाची साठवण होऊ लागली.

अमरावतीपासून ७-८ कि.मी. अंतरावर पोहऱ्याच्या जंगलाच्या परिघावर



आम्ही सर्व मित्र हरीभाऊसोबत



श्री. पी. एम. लाडसोबत (निवृत्त मुख्य वनसंरक्षक) लेखक चर्चा करताना



तलावावरील बेटावर पाणकावळ्याची वस्ती



मेळघाटातील प्रकाश उत्सर्जित करणारा किटक

डोंगराच्या मेळात एक तलाव आहे, इंदला तलाव! त्याच्या काठावरच्या परिसरात काही घरे बांधली आहेत. मी अमरावतीला आल्यावर एका मित्राने माझी आवड लक्षात घेऊन, तलावाच्या काठावरील एक घर विकाऊ आहे म्हणून दाखविले. घराच्या गच्चीवरून पाहिले की समोर पसरलेला तलाव दिसतो. त्याच्या काठावर शिंदीची उंच झाडे आहेत. तिन्ही बाजूंनी टेकड्या आहेत. त्यावर अनेक प्रकारची झाडे आहेत. मागच्या बाजूने विरळ जंगल आहे. घरापासूनच दोन ओढे वाहत जाऊन तलावाला मिळतात. मी ते घर विकत घेतले. या भागाला 'वृंदावन' असे नाव आहे. येथे असणाऱ्या घरात कुणी कायमस्वरूपी राहत नव्हते. पण, याला एक घर मात्र अपवाद होते. दाट उंच वृक्षांनी वेढलेल्या त्या घरात एक निसर्गवेडी व्यक्ती राहत होती. त्यांचे नाव हरिभाऊ पुरोहित! अमरावतीचे राहणारे गृहस्थ, पण त्यांच्या मनावर आचार्य रजनीशांच्या विचारांचा प्रभाव पडला व त्यांनी संन्यस्थ आश्रमीय जीवनाचा अंगीकार केला आणि तेथे निसर्गाच्या सान्निध्यात ते राहू लागले. पहिल्या भेटीतच मी त्यांचा चाहता झालो. पुढे वारंवार आमच्या भेटी होऊ लागल्या. ते त्यांचे भ्रमंतीचे अनुभव सांगत. या चिंतनशील व्यक्तीसोबत होणारी चर्चा अगदी अविस्मरणीय असायची. या सर्व कथांच्या संदर्भात स्व. हरिभाऊ पुरोहित यांची मैत्री कारणीभूत आहे. त्यामुळे हे सर्व लेख त्यांना समर्पित केल्यास वावगे होणार नाही. दुर्दैवाने आज ते हयात नाहीत, परंतु त्यांची अनुभवाची शिदोरी आम्ही सांभाळत आहो.

एके दिवशी सुप्रसिद्ध साहित्यिक व व्यंगचित्रकार श्री. मनोहर सप्रे, हरिभाऊंना भेटायला आले. येथेच त्यांची व माझी भेट झाली. आमचे विचार जुळले. अनादिकालापासूनचे मित्र आहेत असे वाटले. याच मैत्रीमुळे मी त्यांना या पुस्तकाला प्रस्तावना लिहून मागितली आणि त्यांनी चिंतनशील, दीर्घ अशी प्रस्तावना अगत्याने लिहून दिली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

असेच पुढे अनेक मित्र भेटत गेले. या मित्रांसोबत अनेक अभयारण्यांमध्ये भटकंतीची संधी मिळत गेली. त्या भटकंतीत, निसर्ग, पशू-पक्षी, वृक्ष, फुले, वनस्पतींची भरपूर छायाचित्रे घेतलीत. तो मनाचा कप्पा हळूहळू भरू लागला तेव्हा आपण आपले अनुभव शब्दबद्ध करावे काय? असा प्रश्न मनात आला. मित्रांच्या आग्रहामुळे त्याचे होकारार्थी उत्तर आले आणि त्याचे पर्यवसान अनुभवरूपी पुस्तकात झाले. माझे अनेक आवडते लेखक आहेत, तरीपण मला

विशेष आवडते ते सुप्रसिद्ध लेखक जिम कार्बेटचे लिखाण. त्यांची, वाचकांना आपल्या सोबत घेऊन जाणारी कथालेखनाची शैली मला खूप भावली. म्हणूनच माझे अनुभव वाचकांसमोर ठेवतांना मी त्या शैलीचे अनुसरण करण्याचा प्रयत्न केला.

माझे अनुभव निसर्गकथांच्या रूपात शब्दबद्ध करण्याचा हा एक प्रयास आहे. माझ्या मित्रपरिवाराबद्दल तसेच त्यांच्यासोबत केलेल्या भटकंतीबाबत लिहिल्या शिवाय मनोगत अपुरे राहील. अमरावती निसर्गसंरक्षण संस्थेने अमरावतीला 'विदर्भ पक्षिमित्र संमेलन' आयोजिले होते व निसर्ग भटकंती मेळघाटात सेमाडोहच्या अभयारण्यात आयोजित केली होती. तेथे मला वरूडचे हे तीन पक्षिमित्र भेटले- पद्माकर लाड, डॉ. मनोहर खोडे व शिरीषकुमार पाटील. माझी निसर्गतृष्णा पाहून त्यांनी मला वरूडजवळच्या महेन्द्री जंगलात भटकंतीकरिता येण्याचे निमंत्रण दिले. तशातच एके दिवशी माझ्या कारने त्यांच्याकडे जाऊन पोहचण्याचा प्रसंग आला. हे तीन मित्र वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत होते, तरी भटकंतीच्या ओढीने एकत्र आले व जिवलग मित्र झाले आणि आता त्यामध्ये माझा अंतर्भाव झाला. महेन्द्री हे जंगल सातपुडा पर्वताचाच भाग आहे. त्यात उंच टेकड्या, घळी, दाट जंगल आणि अनेक तलाव आहेत. पक्षांकरिता हा आदर्श अधिवास आहे. जंगलात एका टेकडीवर एक वनविश्रामगृह आहे. इंग्रजांच्या काळातील बांधकामाच्या धाटणीची ही इमारत सुबक व सुरेख आहे. सभोवतालचा निसर्ग एकान्त मनाला अंतर्मुख करणारा आहे. जवळच नयनरम्य असा पंढरी तलाव आहे. त्यामुळे हा भाग मला प्रथमदर्शनीच आवडला. या मित्रांनी, त्यांच्या निर्व्याज, मनस्वी स्वभावामुळे तसेच त्यांच्यात असलेल्या निसर्गाच्या आत्यंतिक ओढीमुळे मला आपलेसे केले. वनविश्रामगृहाचा खानसामा ज्ञानेश्वर खोब्रागडेच्या अगत्यशील स्वभावामुळे तसेच तेथील म्हातारबुवा गोष्टीवेल्हाळ गोंड चौकीदार शंकरराव मरकाम यांनी माझ्या मनात घर केले.

माझ्या पेशामुळे व वृत्तीमुळे कुणी उत्कंठावर्धक प्रश्न विचारले तर मला आवडतात. त्यामुळे विचारचक्राला गती मिळते. त्या प्रश्नांची उत्तरे देण्यात मला खूप आनंद होतो. या तीन मित्रांमध्ये, पद्माकर लाड हे गंभीर स्वभावाचे पक्षीअभ्यासक, डॉ. मनोहर खोडे उत्कृष्ट निसर्ग छायाचित्रकार आणि शिरीषकुमार पाटील हे निसर्ग, साहित्य, संगीत अशा अनेक विषयांचा व्यासंग असलेले. या

तिघांच्याही मनात अनेक प्रश्न रुंजी घालत असत. रात्री महेन्द्री वनविश्रामगृहाच्या व्हरांड्यात चर्चा करीत बसलो असताना अनेक प्रश्न चर्चेत यायचे. या मित्रांना माझ्याकडून उत्तरे मिळालीत, की त्यांच्या चेहऱ्यावर मला समाधानाची झलक दिसायची. या मित्रांच्या सहवासात माझी अवस्था 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी व्हायची. मी वारंवार या मित्रांकडे येऊ लागलो, तर कधी त्यांना घरी किंवा मेळघाटात भटकंतीकरिता बोलावू लागलो. मध्यंतरीच्या काळात किशोर रिठे यांनी निसर्ग संरक्षणाच्या कार्याला पूर्णवेळ वाहून घेतले. त्यांच्या कार्यातील धडाडीमुळे त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यता मिळाली. मी आणि मित्रांनी किशोर रिठे सोबत काही अभ्यास दौरे केलेत, त्यात प्रामुख्याने छत्तीसगड-बस्तरमधील अभयारण्याचा दौरा होता. जिप्सीने भटकंती करीत सात-आठ दिवस बस्तरच्या जंगलाचा अनुभव आम्ही घेत होतो. या प्रवासात दोन नवीन मित्र मिळाले. एक म्हणजे कुंदन हाते, हे निसर्ग छायाचित्रकार व दुसरे मिलिंद पाटणकर हे उत्कृष्ट व्हिडीओग्राफर होते. या प्रवासाचा वृत्तान्त 'बस्तरच्या निबिड अरण्यात' या कथेत वाचायला मिळेल.

किशोर रिठेसोबतच्या एका अभ्यासदौऱ्यात मेळघाटातील रायपूरच्या जंगलातील दुर्मिळ घुबडाचा अभ्यास आणि ताडोबा अभयारण्यातील आयोजित शिबिराचा समावेश होता. रायपूरच्या जंगलात अभ्यासादरम्यान घुबडावर आम्ही एक माहितीपट तयार केला आणि तो ताडोबाच्या निसर्गशिबिरात दाखवला. त्या वेळी अनेक वनाधिकारी उपस्थित होते. त्यांनी, एक चांगला माहितीपट म्हणून त्याची वाखाणणी केली.

'पक्षिवेड' या कथेत निसर्ग अनुभवाच्या सुरुवातीच्या काळाचे शब्दांकन केले आहे. रायपूरला आढळलेला उतुक (घुबड) 'रायपूरचा डब्बू' मध्ये साकारला आहे. माझ्या महेन्द्रीच्या भेटी सुरूच होत्या. त्याकाळात वरूडच्या आयुर्विमा कार्यालयात मारोडकर पती-पत्नी अधिकारी म्हणून बदली होऊन आले होते. हे जोडपे खूप निसर्गवेडे. मोटारसायकलने दोघेच जंगलात आणि तलावावर भटकत राहायचे. हे आमच्या संपर्कात आले आणि आमचेच होऊन गेले तसेच ते आमच्या भटकंतीत सामील होऊ लागले. महेन्द्रीच्या जंगलात किशोरसोबत जिप्सीतून रात्रीची भटकंती करीत असताना मारोडकरद्वय आमच्या सोबत होते. त्या रात्री दिसलेला बिबट आणि त्याचा तो क्रुद्ध अवतार तसेच आमची उडालेली गाळण अनेकदा

आठवते. तो बिबट 'महेन्द्रीचा ठिपकेवाला' वाचताना वाचकाला भेटतो.

आम्ही पेंच अभयारण्य, नवेगाव, नागझिराचा कार्यक्रम आखला. आमचे एक मित्र अनिल महाजन हे म.रा.वि.म. मध्ये कोराडीला अभियंता म्हणून कार्यरत होते. ते चित्रकार, उत्तम निसर्ग छायाचित्रकार व पक्षीअभ्यासक आहेत. ते वरूडला कार्यरत असताना पद्माकर लाड यांचे पक्षिनिरीक्षणतील गुरू होते. त्यांनीच हा दौरा आयोजित केला होता. या प्रसंगी खूपच चांगली व्यवस्था आणि आदरातिथ्य त्यांनी केले. नवेगावला तलावावर पौर्णिमेच्या रात्री चंद्र डोक्यावर आल्यावर तलावाच्या मध्यावर होडीत बसून आम्ही मित्रांनी अनुभवलेले क्षण आणि त्यावर पसरलेला अद्‌भुत चंद्रप्रकाश तसेच चंद्रकिरणांचा पाण्यातील खेळ आठवला म्हणजे अजूनही अंगावर रोमांच येतात. महाजनांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने व दिलखुलास स्वभावाने ते मला खूप आवडले. मला एक चांगला मित्र मिळाला. एक मित्र आणखी मिळाले, ते निसर्गसंरक्षण संस्थेने आयोजिलेल्या सातपुडा बचाव अभियानामध्ये. ज्ञानेश्वर दमाहे आय.टी.आय.मध्ये इन्स्ट्रक्टर आहेत. उंचपुरे व घिप्पाड व्यक्तिमत्त्व असलेल्या या व्यक्तीच्या अंगी अनेक कलागुण आहेत. ते साहित्यिक आहेत, चिकित्सक आहेत, वृत्तपत्रांतून विनोदी कथा लिहितात. विनोदी किस्से सांगण्यात आणि नकला करण्यात पटाईत! तसेच खूप चांगले बल्लव (कूकसुद्धा) आहेत. आमच्या मित्रांच्या वर्तुळात यांच्या येण्याने भटकंतीमध्ये, प्रवासामध्ये, मैफिलीत एक वेगळीच रंगत आली तसेच चविष्ट जेवणही मिळायला लागले. यांच्या खट्याळ स्वभावाने यांच्यात व कुमार पाटलांमध्ये सतत रंगत असलेला कलगीतुरा वातावरण हलकंफुलकं करून शीण घालवू लागला.

यानंतर काही वर्षांकरिता मला पुण्याला जावे लागले. तेथे पी.आय.सी.टी. या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून माझी नेमणूक झाली. त्यामुळे येथील निसर्ग आणि मित्रमंडळीपासून मला दूर जावे लागले. तरीपण मधूनमधून वेळ काढून मी इकडे येऊन निसर्गात व मित्रमंडळात रमून, मनाला आलेले औदासीन्य दूर करीत होतो. एकदा या मित्रांना पुण्याला बोलावून घेतले व माझे क्रॉम्प्टनमधील मित्र सतीश राणे यांना सोबत घेऊन भीमाशंकर तसेच रेहकुरी अभयारण्याची सफर करवली. अशा प्रकारे सातपुडा निवासीयांची सह्याद्रीशी भेट घडवून आणली. भीमाशंकरचा नागफणी पॉईंट पाहून सर्वजण दिङ्मूढ झाले.

'पी.आय.सी.टी.' या महाविद्यालयात खूप बुद्धिवान विद्यार्थी प्रवेश घेतात.

त्यामुळे महाविद्यालयातील परीक्षेचा निकाल व प्रगती नेत्रदीपक असते. पदवी परीक्षा पास झाल्यावर बरेचसे विद्यार्थी मोठमोठ्या कंपनीत नोकरीला लागतात व काही विद्यार्थी उच्च शिक्षणाकरिता देशातील व परदेशातील नावाजलेल्या शिक्षण संस्थेत प्रवेश घेतात. मी विद्यार्थ्यांच्या कलात्मक वृत्तीला उत्तेजन दिले आणि शिक्षणासोबत कलेच्या क्षेत्रात सहभागी व्हायचा सल्ला दिला. तशी अनुकूलता निर्माण केली. त्यामुळे उत्साहित होऊन विद्यार्थ्यांतून एकाने लिहिलेले नाटक बसवले. त्यांचा प्रयत्न इतका यशस्वी झाला की, त्या नाटकाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे टप्पे पार करीत प्रथम पुरस्कार, पुरुषोत्तम करंडक आणि हर्डीकर करंडक जिंकला. ज्या वेळी ते विद्यार्थी मला भेटायला आले त्या वेळी त्यांना आनंदाचे उधाण आले होते. माझे डोळेसुद्धा आनंदाश्रूंनी भरून आले होते. असं ते कॉलेज व असे ते विद्यार्थी असूनही माझं मन इकडे ओढ घेऊ लागलं. पुणे सोडून पुन्हा मी अमरावतीला आलो आणि पूर्वीच्याच महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू झालो. या मध्यंतरीच्या काळात पद्माकर लाड व कुमार पाटील. अमरावतीला राहायला आले. तसाच आणखी एक निसर्गवेडा मित्र आमच्या मित्रवर्तुळाला मिळाला त्यांचं नाव प्रदीप हिरूरकर. हा तरूण राज्यशासनाच्या माहितीखात्यात कार्यरत आहे. त्यांनी मेळघाटात खूप भटकंती केलेली आहे. त्या अनुभवाचे लिहिलेले लेख अनेक वृत्तपत्रांत तसेच पुस्तकांच्या स्वरूपात प्रकाशित झाले आहे. आमचे मित्रांचं वर्तुळ लहान असताना (चार जणांचं) कुठे जायचं म्हटलं की कारने जाता येत असे. पण, मित्रांची संख्या वाढल्यामुळे प्रवासाकरिता आम्ही मारूती व्हॅनचा बंदोबस्त केला. तिच नाव ठेवलं 'भ्रमरी'. या भ्रमरीमध्ये सर्व आवश्यक साहित्य असते. जसे स्वयंपाकाची सामग्री, राहण्याकरिता तंबू, गॅसची शेगडी, पाण्याची मोठी कॅन, बायनॉक्युलर, कॅमेरे, स्टॅंड, जी.पी.सी. वगैरे या गाडीचे सर्वेसर्वा आहेत शिरीषकुमार पाटील. डोंगर कपारीतल्या अत्यंत अवघड रस्त्याने गाडी नेताना त्यांच्या ड्रायव्हिंगचे कौशल्य पणाला लागते. प्रवासाला निघताना सर्वांच्या आवडीची एक गोष्ट घेणे आवश्यक असते ती म्हणजे आईच्या हातची शिदोरी. त्यात श्रीखंडाच्या वड्यांच्या आकाराच्या तयार केलेल्या पिठल्याच्या वड्या, भाकरी आणि हिरव्या मिरचीचा ठेचा असतो. या शिदोरीला अमृताची चव असते. प्रवासात आम्ही ती पुरवून पुरवून खात असतो. नव्वदीच्या वर गेलेली माझी आई सर्व मित्रांवर पुत्रवत् प्रेम करते. प्रवासाला निघताना प्रत्येकाच्या पाठीवरून तिचा

प्रेमळ हात फिरतो. घरासमोर व्हॅन तयार असते, सर्व मित्र घरी आलेले असतात, मने उचंबळून आलेली असताना, सर्वांना घेऊन 'भ्रमरी' निघते तेव्हा आम्ही आमच्या डोक्यातील जगव्यवहाराची कवाडं बंद करून घेतो आणि निसर्ग सफरीत रममाण होतो.

आमचे सर्वांत जवळचे भटकंतीचे ठिकाण म्हणजे वृंदावनातील जंगलातील घर! इथल्या इंदला तलावावर अनेक पक्षी वास्तव्याला असतात. हिवाळ्यात स्थलांतरित पक्ष्यांचा मेळा इथे असतो. या जंगलात नीलगाय, चितळ, काळविट, कोल्हे, बिबट आहेत. येथे आम्ही बिबटाने केलेली शिकार व प्रणयात रमलेली बिबटाची जोडी पाहिली. तो अनुभव 'पोहऱ्याचा पहारेकरी' या कथेत शब्दबद्ध केलेला आहे. तलावावर गरुडाने शिकार करून, ती आकाशात असताना गिळताना पाहिली. एकदा एका अजगराने आमचा रस्ता अडवला व आमची तारांबळ उडाली. तसेच एकदा आम्हाला हुलून एक नर चितळ आपल्या डोक्यावरील शिंगाचा पसारा सावरीत दिमाखात धावत जाताना पाहिला. तसेच एकदा एक तनसांबर क्षणभर दिसले व दुसऱ्या क्षणी जंगलात लुप्त झाले, पण लांडोर मात्र तिच्या पिल्ल्यासहित आमचा कॅमेरा क्लिक होईपर्यंत थांबली. वृंदावनातल्या एका ओसाड घरात दुर्मिळ अशी वटवाघुळे आम्ही बघितली. तो अनुभव 'दुर्मिळ वटवाघूळ' या लेखात संकलित केला आहे.


आमचे मेळघाटातील आवडते ठिकाण आहे बेलकुंड. अमरावतीपासून १४० कि.मी. अंतरावर सातपुडा पर्वतात आकोटहरिसाल मार्गावर बेलकुंड आहे. मेळघाटातील गुगामल राष्ट्रीय उद्यानाच्या अतिसंरक्षित भागाच्या सीमे वरून हा रस्ता जातो. या रस्त्याने प्रवास करताना नद्या, पर्वत, दऱ्याखोऱ्यांचं विलोभनीय दर्शन होतं. या रस्त्याला लागूनच बेलकुंडच जुन्या बांधणीचं सुंदर विश्रामगृह आहे. हा भाग उंच डोंगरांनी आणि दाट जंगलाने वेढला आहे. विश्रामगृहापासून काही अंतरावर गडगा आणि मदनघन या नद्यांचा संगम आहे. येथेच गडगा नदीवर दगडात बांधलेला कमानीचा एक उंच प्रेक्षणीय पूल आहे. नदीच्या प्रवाहात कुंड आहेत व भोवताली दाट जंगल आहे. खडकामधून वाहात जाऊन नदीचा प्रवाह कुंडात कोसळतो त्यामुळे वातावरणात खळखळाटाचा आवाज गुंजत असतो. निसर्गाच्या हिरव्या पाचूच्या कोंदणात हिरा बसवल्यासारखे हे विश्रामगृह दिसते. इथे गूढ अनाकलनीय शांतता विलसत असते आणि तीच मनाला ओढ लावते.



पिलांसोबत लांडोर



--



झांजरी-मांजरीतील रानकूटी



झांजरी-मांजरीतील सकाळ

श्री. देवराव सोळंके येथे खानसामा आहेत. हे चाळीसएक वर्षांपासून येथे राहतात. तीन-साडेतीन तासांचा प्रवास करून येथे आल्यावर सोळंके भेटले की मित्रभेटीचा आनंद होतो. आम्ही येथल्या जंगलात पौर्णिमेच्या रात्री पिठूर चंद्रप्रकाशात भटकंती केली. तसेच अमावास्येच्या करकरीत रात्री गडद अंधार अनुभवला. घो घो कोसळत असलेल्या पावसात भटकलो. कडाक्याच्या थंडीत शेकोटीभोवती बसून रात्र जागवली. वसंत ऋतूत पळसफुलांनी आणि अमलताशच्या फुलांनी फुललेलं रान पाहिलं. शरद ऋतूत रानकापूस, रानभेंडी, कळलावी, झेनिया, भुमका अशा अनेकरंगी फुलांनी शोभिवंत झालेला निसर्ग डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठविला. रात्रीच्या वेळी रानकोंबडे, भेकर, सांबर यांचे आवाज ऐकले आणि दूर जंगलात उठलेली वाघाची गर्जना ऐकून रोमांचित झालो. विश्रामगृहाच्या जवळून वाहणाऱ्या मदनधन नदीच्या प्रवाहाने केलेली भटकंती हा सर्वांत चित्तथरारक अनुभव. या भटकंतीत नदीच्या प्रवाहाची अनेक रूपे दिसतात. एका धबधब्यात हा प्रवाह परिवर्तित होतो. धबधब्याच्या मागे खडकात एक मोठी गुहा आहे. वाघिणीला तिच्या पिलांच्या संगोपनाकरिता हे आदर्श ठिकाण आहे. तेथे मधूनमधून तिचे वास्तव्य असते. असे हे बेलकुंड!

येथील एका मुक्कामात मधमाश्यांच्या आक्रमणाचा थरारक प्रसंग घडला. तो 'बेलकूंडची बखर' मध्ये शब्दांकित केला आहे.

मेळघाटातून वाहणाऱ्या तापी नदीच्या काठावरील रंगुबेली या ठिकाणी जायचं ठरलं. जाताना हरिसालवरून जाव लागतं. तेथे वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून श्री. मेंढे साहेब होते. त्यांना भेटल्याशिवाय पुढे जाणं अशक्यच! त्यांना भेटल्यावर आपला सहोदर भेटल्यासारखं वाटतं इतकं त्यांचं वागणं अगत्यशील असतं. एखादा वधूपिता वराकडील लोकांची जशी सरबराई करतो तसं आमचं तिथं आदरातिथ्य होतं. रंगुबेलीच्या विश्रामगृहाचं आरक्षण आम्ही केलं होतं. तेथे आम्ही दुपारी पोहचलो. रंगुबेली गावापासून विश्रामगृहाकडे जाणारा रस्ता खूपच नादुरुस्त होता. विश्रामगृहाची स्थिती शोचनीय होती तसेच भिंतीत जागोजागी भेगा पडल्या होत्या. वनपाल आले, त्यांनी सांगितले की अडीच-तीन वर्षांपासून तेथे कुणी मुक्कामाला राहिलेले नाही. विश्रामगृहाच्या साफसफाईकरिता ते मजूर आणायला गेले. आम्ही विश्रामगृहाच्या पायऱ्यांवर बसलो असतानाच भिंतीच्या भेगेतून एक काळा नाग निघाला व तो पायऱ्यांकडे येऊ लागला. आम्ही धडपडत उठलो. त्याला आमच्या

अस्तित्वाची जाणीव झाली आणि तो थांबला. त्याने फणा काढून आमच्याकडे पाहिलं. एक दोन वेळा फूर फूर जीभ बाहेर काढली. कोण हे आगंतुक येथे धडपडले, असे त्याला वाटले असावे आणि विषाची परीक्षा कशाला द्या! असे वाटून तो वेगाने परत फिरला आणि भिंतीच्या दुसऱ्या भेगेत लुप्त झाला. वनपालाने मजुरांकडून साफसफाई केली. कंदिलाच्या प्रकाशात आम्ही दोन रात्री तेथे मुक्काम केला. तेथल्या मुक्कामादरम्यान एक थरारक अनुभव आला, तो प्रसंग 'रंगुबेलीचा रंगदार' या कथारूपाने व्यक्त केला आहे.

जगातील घुबडाची एक जात 'फॉरेस्ट स्पॉटेड आऊलेट' (एथीनी ब्लेविटी) अनेक वर्षांपूर्वी (इ.स. १८८६) नामशेष झाली, यावर शिक्कामोर्तब झाले होते. पण, हाच पक्षी सातपुडा पर्वतात मेळघाटातील चौराकुंड जंगलात दिसला आणि त्याची ओळख पटली. जगभरातील पक्षीसंशोधक इकडे धाव घेऊ लागले, संशोधन करू लागले. या पक्षासोबत, एक नाव जोडल्या गेले ते म्हणजे फालतू छोटेलाल कासदेकर! हा चौराकुंड वनपरिक्षेत्र कार्यालयात वनमजूर आहे. याची व त्या पक्ष्याची टेलिपॅथी अशी काही जुळली की, हा सोबत असला की (याच्या चौफेर शोधक नजरेमुळे) तो पक्षी हमखास दिसतो. आम्ही चौराकुंडला जाऊन या पक्ष्याचा शोध घेतला, तो वृत्तान्त 'शोध रानपिंगळ्याचा' या कथेत आला आहे. मेळघाटातील एका व्याघ्र सेंससच्या वेळी आम्ही जंगलातल्या दूरवरच्या, परंतू रस्त्यालगतच्या पाणवठ्याजवळील वृक्षावरील मचाणावर रात्री बसलो होतो. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जंगलाला एकाएकी आग लागली. हा वणवा वेगाने जंगलात इतरत्र पसरायला लागला. त्यावेळची परिस्थिती, वणव्याचे रौद्र स्वरूप वणव्याचा वन्यजीवावर होणारा परिणाम या घटनांची मालिका 'वणवा' या कथेत विदित केली आहे.

ढाकणा परिसर हासुद्धा आकर्षक परिसर. डोलार नदीच्या काठावर ढाकण्याचे वनविश्रामगृह आणि जंगल आहे. तेथे नदीचे पात्र पसरट आहे. पात्रात मोठमोठे खडक आहेत. या खडकांना कवेत घेत डोलारचा प्रवाह वाहतो. सूर्यास्ताच्या वेळी नदीच्या प्रवाहात पाय टाकून खडकांवर बसून जंगलाचं आणि नदीचं रूप डोळ्यात साठवण्यात एक वेगळाच आनंद असतो. लगतच गाव असल्याने गावातील बाया, मुली, मुले नदीवर कपडे धुवायला, आंघोळीला येतात. लहान लहान मुली नदीचं पाणी कळशीत किंवा गंजात भरून नेतात. हे दृश्य फारच

विलोभनीय असते. त्यातील दोन निसर्गकन्यांचे छायाचित्र म्हणजे या पुस्तकाचे मलपृष्ठ!

सेमाडोहवरून रायपूरकडे जाणारा रस्ता दाट जंगलातून जातो. या रस्त्याने जातांना लहान नद्यांचे प्रवाह लागतात. कुठे ते रस्त्याला समांतर, तर कुठे आडवे येतात. स्फटिकासारखं सलिलाचं ते खळखळतं रूप पाहून त्या प्रवाहात मनसोक्त डुंबायचा मोह आवरत नाही आणि आम्ही तो सहसा टाळीत नाही. पाण्याचे ते तुषार अंगावर घेतांना स्वअंगी रिझवल्यासारखे वाटतं. आम्ही खूप दिवसांपासून शोधत असलेल्या 'मलबार पाइड हॉर्नबिल' या दुर्मिळ पक्ष्याचं अचानक दर्शन याच रस्त्याने झालं होतं.

चौराकुंड ते रंगुबेली या कच्च्या रस्त्याने गेल्यावर 'जामूदा पाडाव' हा जंगलाचा भाग लागतो. हे जंगल एवढं घनदाट आहे की, वाघोबाची स्वारी रस्त्यावर केव्हाही अवतीर्ण होईल, असं वाटायला लागतं. 'जामूदा पाडाव'च्या जंगलात रस्त्याला लागूनच एक झोपडी आहे व भोवताली प्रशस्त अंगण आहे. रस्ता ओलांडून जंगलात जाणाऱ्या पायवाटेवर एका ठिकाणी कूपनलिका आहे. शेजारीच कृत्रिम पाणवठा तयार केला आहे. या पाणवठ्याजवळ प्रशस्त असे 'वॉचिंग टॉवर' आहे. आम्ही 'जामूदा पाडाव'ला पोहचलो त्या वेळी रात्रीचे १० वाजले होते. तेथील झोपडीत वनविभागाचे बरेच वनमजूर मुक्कामाला होते. चुलीवर त्यांचा स्वयंपाक सुरू होता. आम्ही पाणवठ्यावर जाऊन आमच्या शिदोऱ्यांचा यथेच्छ आस्वाद घेतला आणि वॉचिंग टॉवरवर झोपायची तयारी केली. जंगलात सर्वत्र पाणी असल्याने पाणवठ्यावर वन्यप्राणी येण्याची शक्यता नव्हती. जंगलातून उठणारे विस्मयकारी आवाज ऐकत कधी निद्राधीन झालो ते कळलेच नाही. त्या रात्री मला अशी काही गाढ व शांत झोप लागली की, तेव्हापर्यंत अशी झोप मी अनुभवली नव्हती. या जंगलात माहूलच्या वेली खूप आहेत. या वेलींना शमीच्या पानांसारखी, परंतु आकाराने त्यापेक्षा बरीच मोठी अशी पाने असतात. स्थानिक आदिवासी माहूलच्या पानात भाजलेली भाकरी खातात. पिठाची किंवा कणकेची भाकरी करतात, त्या भाकरीला थोडे तेल माखून माहूलच्या दोन पानांत ठेवून भाकरीच्या भोवतालची कडा बांबूच्या शिलकेने शिवून टाकतात. ती भाकरी खवखवत्या निखाऱ्यांवर भाजतात. पाने करपत करपत जळतात व भाकरी भाजली जाते. त्या भाकरीला माहूलच्या पानाची चव व गंध असा काही असतो की एक वेळा खाल्लेल्या

भाकरीची चव कायम स्मरणात राहते. आमच्या सकाळच्या जेवणासाठी वनमजुरांनी केलेल्या माहूलच्या भाकरी आम्ही मिटक्या मारीत जेवलो.

चौराकुंडपासून जामूदा पाडावच्या विरुद्ध दिशेला 'झांजरी-मांजरी' नावाचे ठिकाण आहे. 'खापरा नदीच्या' थडीवर वेळू आणि लाकडापासून तयार केलेली दोन मजली वनकुटी तेथे आहे. या कुटीकडे जाताना पाताळात उतरल्यासारखे खूप खोल खोल जावे लागते, तेथून नदीचे पात्र आणखी खोल आहे. त्या अरुंद पात्रात 'झांजरी-मांजरी' नावाचे दोन डोह आहेत. जेव्हा उन्हाळ्यात नदीचं पाणी सुकून जातं त्या वेळी या डोहात पाणी असतं. या भागातील वन्यप्राण्यांना केवळ हाच पाणवठा उपलब्ध असतो. त्यामुळे वन्यप्राणी पाणी प्यायला येथे येतात. आणि त्यांचे नदीच्या उंच काठावर बसून निरीक्षण करता येते. नदीच्या दोन्ही तीरांवर कहूची उंचच उंच झाडे आहेत. आम्ही त्या कुटीत मुक्काम केला होता ते थंडीचे दिवस होते. कुटीसमोर अंगणात शेकोटी पेटलेली होती. त्या शेकोटीत मोठी लाकडे धगधगत होती. त्यामुळे उबदार वातावरण तयार झाले होते. तेथे वनपाल व बरेच वनमजूर मुक्कामाला होते. ते सर्व आदिवासी कोरकू होते. आमच्या आग्रहाने त्यांनी शेकोटीभोवती पारंपरिक नाचाचा फेर धरीत कोरकू गाणी म्हटली, त्यातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन झाले. कोरकू आदिवासी वाघाला 'कुलामामा' म्हणतात. किती प्रिय नातं त्यांनी वाघाशी जोडलं आहे! या नात्याच्या संबोधनाने आपल्याला कोरकूंची वाघाबद्दलची खरी भावना कळते. 'झांजरी-मांजरी'ची ती रात्र! आणि सकाळच्या धुक्यातील सूर्योदय व सर्पगरुडाने कर्णमधुर शिळेसारखी दिलेली साद अजूनही आठवते...

कोकटूचं विश्रामगृह आणि जंगल अतिसंरक्षित भागात येतात. त्यामुळे तेथे जायची परवानगी मिळत नाही. कोकटूकडे जाणारा रस्ता बोरी या ठिकाणापासून जातो. हा भाग संरक्षित भागात असल्यामुळे तेथे जाता येते. आकोट, धारगड मार्गे आम्ही बोरीला पोहचलो. पूर्वी या ठिकाणी बोरी हे गाव होते, ते दुसरीकडे विस्थापित करण्यात आले. आता तेथे वनकर्मचाऱ्यांची चार-पाच घरे आहेत. जवळच एका टेकडीवर पाणीपुरवठ्याची टाकी व लहानसे मंदिर आहे. दुसऱ्या टेकडीवर उंच, प्रशस्त असा निरीक्षण मनोरा आहे. या मनोऱ्यावरून भोवतालच्या जंगलात वावरत असलेल्या वन्यप्राण्यांचे निरीक्षण करता येते. गावात जो रस्ता जातो तेथे एक ओढा आहे, त्याला लागूनच कूपनलिका आहे. जवळच मोठे

टाके असलेला कृत्रिम पाणवठा आहे. पाणवठ्याच्या थोडे समोर जाऊन रस्ता उजवीकडे वळतो व कोकटूकडे जातो. तेथे एक मोठे गेट आहे. गावच्या सीमारेषेभोवताल उंच गवत असलेले विस्तृत कुरण आहे. त्यात मधूनमधून झाडेझुडपे दिसतात. निरीक्षण मनोऱ्यापासून पाणवठा लांब आहे, म्हणून पाणवठ्यापासून तीन-चारशे फुटावरील उंच सखल जागेवर झोपायची कल्पना सर्वांसमोर मांडली. कुणीही या विचाराला विरोध केला नाही. जंगलात रात्र फार लवकर जाणवते. आम्ही आमची जेवणं उरकून सायंकाळी सात वाजता पथाऱ्या जमिनीवर टाकून लवंडलो. आमचे डोळे मात्र पाणवठ्यावर रोखलेले होते. चांदण्याच्या प्रकाशात पाणवठ्याचा परिसर धूसर दिसत होता. वातावरण शांत होते. जंगलाचा एक विशिष्ट आवाज (जंगल जसं श्वासोच्छ्वास करीत आहे असा) वातावरणात भरून गेला होता. सहा रानगव्यांच्या महाकाय आकृती पाणवठ्यावर आल्या, पाणी पिऊन थोडावेळ ते घुटमळले आणि हळूहळू कुरणात विरून गेले. तास-दोन तासांच्या अंतराने गव्यांचे असे लहान-मोठे कळप पाण्यावर येत व पाणी पिऊन निघून जात. अशा प्रकारे साठ ते सत्तर रानगवे आपली तृष्णा भागवून निघून गेले. रात्री दोन वाजता मात्र पाणवठ्यावर ओढ्याच्या पलीकडच्या काठावर हिंस्र प्राण्याची गुरगुर ऐकू आली. आम्ही डोळ्यात तेल घालून इकडे तिकडे पाहू लागलो, पण काहीचं दिसलं नाही. रात्री अडीचनंतर मात्र पाणवठ्यावर प्राणी येणं बंद झाले होते. उत्तररात्रीचा प्रहर सुरू झाला होता. आमच्या डोळ्यांवर झोप अनावर झाली होती. आम्ही केव्हा निद्राधीन झालो ते कळलेच नाही. सकाळी उजाडल्यावर जागे झालो तेव्हा पाहिले तर सर्व मित्र सकुशल पाहून हायसं वाटलं.

भारतातील विविध अरण्यांमधे एक ठिकाण जगप्रसिद्ध आहे, ते म्हणजे केरळमधील सायलेंट व्हॅलीचे कुंवार अरण्य (व्हर्जिन फॉरेस्ट)! या अरण्यातील अनेक भूभाग अजूनही मानवी हस्तक्षेपापासून अस्पर्शीत व अनाघ्रात आहे. आम्ही इतर अरण्यामध्ये फिरताना आमच्या मनात या अरण्याविषयी नेहमीच जिज्ञासा असायची. कसे असेल ते जंगल? कसे असेल ते अरण्य? कसा असेल तो भूभाग आणि निसर्ग? आपण त्या अस्पर्श अरण्य गर्भामध्ये जाऊ शकू काय? वसुंधरेने आपल्या मर्मबंधात ही ठेव कशी जपली असेल? हे बघण्याची अपार उत्कंठा होती; आणि म्हणूनच गूढतेचे वलय असलेला हा अरण्यगर्भ आयुष्यात एकदा तरी बघावा, अशी तीव्र इच्छा होती. तशी सुवर्णसंधी चालून आली. ती अविस्मरणीय भेट 'अरण्यगर्भ' या कथेत शब्दबद्ध केली आहे.

आम्ही मेळघाटातात अनेक वर्षे भटकंती करूनसुद्धा वाघाचे दर्शन झाले नव्हते, याची मनाला सतत खंत असायची. ती दूर करण्याकरीता आम्ही कान्हा, बांधवगड व पेंच (म.प्र.) या अभयारण्याला भेटी दिल्या. तेथील अविस्मरणीय अनुभव 'वाघाच्या नंदनवनात' या कथेत शब्दबद्ध केला आहे. नागपूरचे सुप्रसिद्ध निसर्गप्रेमी श्री. अर्जुन धनवटे यांनी या प्रवासाचे उत्कृष्ट आयोजन केले होते व ते स्वतः आमच्या सोबतीला होते.

मेळघाटातील एका प्रवासात सेमाडोह तसेच कोलकास येथे रात्रीच्या मुक्कामात जमिनीवर काजव्यासारखा प्रकाश दिसला पण तो उघडझाप होईना, तेव्हा जवळ जाऊन पाहिले, तो अडीच ते तीन इंच लांबीचा किडा होता. त्याच्या पार्श्वभागावर दोन टोके होती व ती सतत प्रकाशीत होत होती. दोन्ही प्रकाशांचा मिळून निळसर पांढऱ्या प्रकाशाचा एक ठिपका भासायचा. आम्ही त्या किड्याला जपून सोबत नेले व त्याच्याबद्दल माहिती मिळवली. तो 'ग्लोवर्म' नावाचा किडा होता. मादीला आकर्षित करण्याकरिता तो असा प्रकाश उत्सर्जित करतो असे कळले. हा किडा ओळखण्यात अमरावती विद्यापीठाचे प्राणिशास्त्रज्ञ डॉ. वानखडे सरांनी तसेच डॉ. जयंत वडतकर यांनी बहुमोल सहकार्य केले. अमरावती येथील आमचे पक्षिमित्र व निसर्गअभ्यासक राजू कसंबे हे सातत्याने भटकंती करीत असतात. त्यांना काही विशेष आढळल्यास आम्हाला सांगतात. मालखेड तलावावर त्यांनी दुर्मिळ रोहित (फ्लेमिंगो) पक्षी बघितले व लगेच आम्हाला कळवले. त्या तलावावर रोहित पक्ष्यांच्या थव्याचे सुंदर व दुर्लभ दृश्य बघायला मिळाले. त्यातील काही छायाचित्रे या पुस्तकात दिली आहेत.

प्रसिद्ध छायाचित्रकार व निसर्गअभ्यासक मध्यप्रदेशचे निवृत्त मुख्य वनसंरक्षक श्री. पी. एम. लाड यांच्या भेटीची खूप उत्सुकता होती आणि आमच्या सुदैवाने तसा प्रसंग चालून आला. त्यांची भेट अविस्मरणीय ठरली. या भेटीत त्यांच्यासोबत 'मेळघाटातील समस्या' याविषयी प्रदिर्घ चर्चा झाली. याचे विवरण 'मेळघाट अवलोकन' या लेखात वाचायला मिळेल.

कथा जिवंत अनुभविण्यासाठी निगडित असलेली लेखकाने घेतलेली तसेच काही इंटरनेटवरील छायाचित्रे कथे सोबत दिलेली आहेत. माझं हे सारं लिखाण, माझ्या व माझ्या मित्रांच्या आनंदासाठी तसेच हा आनंद वाचकांना वाटण्यासाठी म्हणून झाले आहे. अनेकांच्या मनात इच्छा असूनही त्यांना जंगलभ्रमंती करता

येत नाही. आमच्या या कथा वाचून ते थोडा जरी आनंद घेऊ शकले, तर माझा लेखनप्रपंच सार्थकी लागला असे समजेन.

आमच्या मित्रवर्तुळातील मित्रांनी वरचेवर माझा उत्साह वाढवला तसेच एक मित्र पद्माकर लाड यांनी मला लेखनिक म्हणून सहकार्य केले. या जिवलग मित्राचे आभार न मानण्यातच आनंद असतो. पुस्तकातील कथा शब्दांकित करतांना शिरीषकुमार पाटील आणि सुनील काळबांडे यांनी जे अथक परिश्रम घेतले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पुस्तकातील सर्व कथा प्रा. सत्येश्वर मोरे सरांनी तपासून योग्य त्या दुरुस्त्या केल्या, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या पुस्तकातील अनेक लेख अमरावती येथील दैनिक हिंदुस्थानमध्ये प्रसिद्ध झाले होते. त्याबद्दल श्री. विलासराव मराठे यांचा मी आभारी आहे. ऋचा प्रकाशनाचे प्रकाशक श्री. प्रदीप मुळे (गजानननगर, नागपूर) यांनी सर्वांगसुंदर असे हे पुस्तक अल्पावधीत प्रकाशित केल्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

माझी भटकंती व लिखाण, माझी पत्नी डॉ. सौ. इंदिराच्या उत्स्फूर्त पाठिंब्याशिवाय शक्यच नव्हते. माझी मुले आशुतोष, पारितोष आणि स्नुषा सौ. वृषाली व सौ. ऋता यांचा हट्ट हे सर्व अनुभव शब्दबद्ध करण्यास कारणीभूत झाले. मनोगतात उल्लेखिलेल्या सर्व व्यक्तींचे मी आभार मानतो. हे पुस्तक, माझी आई गं.भा. त्रिवेणीबाई तसेच माझे स्वर्गीय मित्र हरिभाऊ पुरोहित यांना अर्पण करतो.

मनोगतात शेवटी माझ्या अंतरीची इच्छा त्या विश्वशक्तीजवळ प्रगट करताना, संत ज्ञानेश्वरांच्या 'पसायदाना'चा आधार घेतो. संत ज्ञानेश्वरांचे गुरू संत निवृत्तिनाथ यांच्या आज्ञेवरून त्यांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ पूर्ण केल्यावर ते निवृत्तिनाथांना म्हणतात- ''गुरुमाउली, आपल्या प्रसादामुळे हा ग्रंथ समाप्त झाला. माझ्या पूर्वजन्मीचे फळ मला प्राप्त झाले. आपल्या कृपादृष्टीने हे धर्मरूप कीर्तन सांगतेस आले. आता या वाग्यज्ञाने संतुष्ट होऊन मला प्रसाद द्यावा.

**आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।**
**तोषोनि मज द्यावे। पसायदान हे ।।**

दुष्टांचा दुष्टपणा जावा, त्यांची सत्कर्माची आवड वाढावी, सगेसोयऱ्यांच्या सहवासात चंद्राच्या शीतलतेचा सुखस्पर्श मिळावा, तो चंद्र कलंकरहित असावा, सहवासात सूर्याची विकासगामी ऊर्जा मिळावी, पण भस्म करणारी दाहकता नसावी.

या अवनीवर अखिल मांगल्याचा वर्षाव करणाऱ्या भगवद् भक्तांच्या समुदायाची सदोदित भेट व्हावी. ते मनुष्यरूपी कल्पवृक्ष आहेत, चिंतामणीचे गाव आहेत. हा ग्रंथ त्यांचे उपजीवन होईल व ते इहलोकी आणि परलोकी सर्वकाळ सुखी होवो!' निसर्गसंवर्धनाच्या दृष्टीने माझ्या मनातील पसायदान असे होईल -

वन्यजीवांची शिकार करणारे, वृक्षतोड करून जंगल नष्ट करणारे, आपली गुरे जंगलात चरण्याकरीता पाठवून जंगलाला गंभीर हानी पोहचविणारे यांच्यातल्या दुष्टप्रवृत्ती लयाला जाऊन त्यांच्या मनात वन्यजीवांबद्दल, जंगलाबद्दल प्रेम निर्माण व्हावे तसेच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' ही भावना निर्माण व्हावी. वन्यप्राणी, जंगलात राहणारे आदिवासी व वनव्यवस्थापन करणारे वनाधिकारी, कर्मचारी यांच्यात एकमेकांविषयी प्रेम निर्माण व्हावे, त्यांच्यात निखळ प्रेम असावे व निसर्गाला हानी पोहचेल अशा प्रवृत्ती नष्ट व्हाव्यात. निसर्गाविषयी प्रेम असणारे पर्यटक आणि जंगलाच्या संवर्धनाकरिता आत्मीयतेने काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटना तसेच निसर्गाविषयी ज्यांच्या मनात प्रेमाचा पाझर आहे असे लोक एकमेकांना सहकार्य करोत. वरील सर्व वसुंधरेला सुजलाम् सुफलाम् करणारे घटक आहेत. शासन आणि सर्वांच्या प्रयत्नाने ही अवनी अनंतकालपर्यंत स्वर्गसमान राहो. अस्तु!

डॉ. व्ही. टी. इंगोले.

# प्रस्तावना

माणूस निसर्गापासून किती दूर गेलाय हे पुनः पुनः सांगण्याची आज गरज उरलेली नाही, इतके याचे दुष्परिणाम आपण क्षणोक्षणी भोगतो आहोत. तरी मुंबईसारख्या जागी राहून अखेर वैतागून चिखलदऱ्याच्या आपल्या मायकुशीत परतणाऱ्या विजय इंगोलेसारख्या एका निसर्गवेड्याच्या शब्दातून ही वेदना बाहेर पडते तेव्हा ती नव्यानं जिव्हाळी लावते. जसं आपला अनुभव सांगताना ते म्हणतात- ''मुंबईच्या सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात वर दृष्टी गेलीच तर आमच्या नशिबी येतं ते घराचं छत, ऑफिसचं छत आणि पावसाळ्यात छत्रीचं छत! बाकी फावल्या वेळात लोकलची वाट बघताना दोन्ही प्लॅटफॉर्ममधलं जेवढं काही आकाश नजरेत येत असेल तेवढाच काय तो निसर्गाशी संबंध! इतर वेळी पायी केलेला प्रवास हा इतरांच्या धडकेपासून स्वतःला वाचवण्यात जातो. प्लॅटफॉर्मवरच्या उपाहारगृहातला वडापाव पळवणारा कावळा किंवा फोर्टमधली कबुतरं याखेरीज पक्षी-निरीक्षणाला वाव विरळाच.''

निसर्गापासून पूर्णपणे तुटल्यानं एखाद्या दिवंगताप्रमाणे तो आता नाहीच, या थाटात अळ्यांच्या पुजक्यातलं जे जीवन जगतोय् ते समुदायापुरतंच मर्यादित झालं आहे, याचा स्पष्ट पुरावा साहित्यातनं मिळतो. जसं १९३० पर्यंतच्या कुठल्याही भाषेतल्या कथा-कादंबऱ्या घ्या. त्यातल्या कथानकाची सुरुवातच निसर्गवर्णनानेच व्हायची. आपण निसर्गाचाच एक भाग आहोत, हे भान त्यातनं सतत राखलं जायचं. आताच्या साहित्यात त्यासाठी लंगोटीएवढीही जागा नसते. मानवापलीकडे जगच नाही, या संकुचित समजामुळे निसर्ग माणसांबाहेर हाकलला गेल्यानं आजच्या महत्तम समस्या निर्माण झाल्यात, हे गावीही नसणं ही समकालीन शहरी जीवनाची शोकांतिका आहे. अशात केवळ निसर्गाच्या ओढीपायी आपला स्थिरावलेला व्यवसाय सोडून गावी परतणारा इंगोलेसारखा एखादा मत्सर वाटायला लावतो.

त्याचीच उत्पत्ती या नात्यानं, मानव निसर्गाचा एक भाग असल्यानं त्या उभयतांत अनादि-काळापासून माय-लेकराचं नातं कायम राहिल्याचा इतिहास आहे. या अर्थानं रूसोनं मानवाला निसर्ग-बालक म्हटलेलं आहे. पालक-पाल्य असं हे नातं टिकत आलं ते जवळपास अठराव्या शतकापर्यंत. तोवर माणूस निसर्गानंच दिलेल्या हातापायांच्या आधारानं हवं ते त्याच्यापासून मिळवत गेलेला. फक्त उत्क्रांतीच्या दरम्यान त्यानं हातानं वापरण्याजोगी नवनवी हत्यारंच काय ती

शोधली. मात्र, त्याचा उर्जास्रोत ज्याला Human battery म्हणता येईल, ते शरीर हेच राहिलं. जिला खऱ्या अर्थानं मानवबाह्य ऊर्जा म्हणता येईल असं काही हस्तगत करण्याची त्याची धडपड मात्र सुरूच राहिली. याचंच फळ म्हणजे १६२९ मध्ये एका इटालियन हरहुन्नरी माणसानं ओबडधोबड (Crude) का होईना, वाफेवर चालणारं यंत्र तयार केलं. त्यातून ही बाब शक्यतेच्या कोटीत असल्याचं आश्वासन तेवढं मिळालं. त्याच परंपरेत मग जेम्स वॅटनं १७७६ मधे व्यवहार्य असं वाफेचं इंजीन सिद्ध केलं. इथूनच संपूर्ण मानवी इतिहासातल्या एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. तीतच ते निसर्गाच्या कलाकलानं घेण्याऐवजी त्याला आज्ञापालन करायला भाग पाडणाऱ्या पुढल्या मगरुरीची बीजं होती. नंतरच्या केवळ दोन शतकात मानवी तंत्रज्ञानानं निसर्गाला गुलाम करण्याइतपत मजल मारली. अधिकाधिक उत्पादनाच्या लोभापायी मानवी जमातीनं निसर्गाची जी लांडगेतोड केली आणि यातून निसर्गरचनेत जे फेरफार केले त्याचा परिणाम म्हणून निसर्गही आता आपल्याशी शत्रुवत् वागू लागल्याची चिन्हं दिसू लागली आहेत.

निसर्गाच्या सामर्थ्यासमोर माणूस कस्पटासमान असल्यानं, या असमतोल लढाईत अखेर सारी मानवजातच नष्ट होण्याची भीती इतिहासात प्रथमच निर्माण झाली आहे. या मानवी शोकांतिकेवर भाष्य करताना Auden या कवीनं म्हटलं आहे की, ''प्राण्यांच्या अनेक उपजाती दैववशात नष्ट झाल्यात, पण स्वतःवर नष्टचर्य ओढवून घेणारी एकच!'' '(Fate succumbs many a species, but one alone jeopardises itself!'

निसर्ग आणि मानव यांच्या पूर्वापार सामंजस्याचं वर्णन करताना हेरमन हेस आपल्या एका कथेत म्हणतो– ''आदिमानवालाही निसर्गावर सत्ता गाजवून त्याला अंकित करायचं होतं, पण समान ध्येय असूनही त्याचे मार्ग आजच्या माणसापासून भिन्न होते. नंतरच्या शास्त्रज्ञांप्रमाणं निसर्गापासून अलिप्त राहून, त्याच्यावर जुलमी आक्रमण करून त्याला नमवण्याची त्याची सत्तापिपासू इच्छा नव्हती. याला निसर्गाविषयी कधीही वैर वाटलं नाही. आपण स्वतः त्या निसर्गाचाच भाग आहोत याचं त्याला सतत भान असल्यामुळेच त्याला निसर्गाची चांगली ओळख पटली असेल व त्याच्या वागणुकीत जास्त समंजसपणा आला असेल.'' निसर्गप्रेमी माणसानं आपल्या "The lost world of kalahari" या आपल्या पुस्तकात दिलेला हा वृत्तांत आहे. त्यात तो बुशमेनविषयीच्या आस्थेनं म्हणतो– ''शिकारीतलं प्राण्यांबरोबरचं त्यांचं नातं केवळ शिकारी आणि शिकार एवढंच नव्हतं, तसंच झाडं, झुडपं, कीटक यांचं ज्ञान फक्त खाद्यान्नापुरतंच सीमित नव्हतं, बुशमेनची

जाण व्यवहारी असली तरी तिला माझ्या समकालीन जीवनात अभावानंच आढळणारा असा एक आगळा आयाम होता. त्यांची वस्तुमात्रांची जाण त्यांच्या जीवननिष्ठेशी परिपूर्णतः निगडित होती, आणि गरजाही निसर्गाशी पूर्ण ताळमेळ राखणाऱ्या होत्या. ते आणि पशू-पक्ष्यांसह सभोवतालचा सगळा निसर्ग परस्परात इतके सहभागी असत, की तो अनुभव गूढच (mystical) वाटावा!'' या एकाच कारणानं बुशमेन करीत असलेली शिकारही वाघानं भुकेपुरती करावी अशीच असायची; आणि तीही करताना त्याला खंतच वाटायची म्हणून भक्ष्यावर बाण मारताना पुटपुटत त्याची क्षमा मागण्याचा त्यांच्यात सार्वत्रिक परिपाठ होता.

वरीलप्रमाणे बुशमेन हे समंजस असूनही त्यांना केवळ द्विपाद पशू मानून त्यांची अक्षरशः शिकार करून गोऱ्यांनी त्यांचा वंशविच्छेद केला. अशात बाकी उरलेल्या मूठभर बुशमेन विषयीच्या आस्थेपायी हा व्हान देर पोस्त त्यांच्या शोधार्थ वणवणत कलाहारीच्या अति दुर्गम भागात पोहचलेला. आपल्या तृप्त भेटीच्या अखेरी निरोपक्षणी या जमातीच्या रक्तात निसर्गाचं अध्यात्म किती खोलवर मुरलेलं आहे, याचा एक हेलावून टाकणारा पुरावा त्यानं नोंदवला आहे. भेटीअंती बुशमेनचा तो छोटाशा जत्था पाण्याच्या थेंबासाठी आणि अन्नाच्या कणासाठी शेकडो मैल रणरणतं वाळवंट अनवाणी पायांनी तुडवणार असता त्यातलं एक जराजर्जर जोडपं कसं टिकाव धरेल, ही शंका त्यानं व्यक्त केली तेव्हा जत्थ्यातला एक तरणा उत्तरतो- ''जमेल तोवर ते आमच्या सोबत चालतील, पाऊल उचलणं अशक्य होईल तेव्हा थांबतील. तिथं थांबून आम्ही त्यांना आमच्या जवळचं चिमूटभर अन्न नि थेंबभर पाणी देऊ. रात्री बिबट्यानं वा तरसानं त्यांना खाऊ नये म्हणून आम्ही त्यांच्याभोवती काटक्यांचे कुंपण उभारू आणि नंतर मागं वळून न बघता पुढे चालते होऊ. अर्थात, दिवसा दोन दिवसांतच श्वापदं त्यांचा फन्ना उडवतील।'' या हकीगतीनं सुन्न होऊन व्हान देर पोस्त विचारतो, ''अरे, हे सारं त्यांच्या समोर सांगत असता त्यांना काय वाटेल?'' यावर तो पोरग उत्तरतो ''काय वाटायचं?'' आपल्या तरणेपणी खुद्द त्यांनीही हेच केलं की!'' वाट्याला आलेल्या खडतर भोगासह आयुष्यासह मृत्यूच्या अखेर वास्तवाला तेवढ्यात कठोर धीरानं सामोरी जाणारी ही धारणा आजच्या कुठल्या अध्यात्मापेक्षा कमी आहे? बुशमेनच्या आदिम तृप्ततेच्या तुलनेत समकालीन जगातला जवळपास प्रत्येक माणूस सुखसाधनांनी कितीतरी पट समृद्ध असता, का असमाधानी आणि संचित असावा? त्यांच्यासारख्या पाषाणयुगीन अडाण्यांनी निसर्गाचं जन्म-मृत्यू चक्र साभार स्वीकारून धीरानं जगावं आणि आम्ही तथाकथित सुधारलेल्यांनी चिंतेत मरावं, मग यातलं मोठं कोण?

सगळ्याच आदिम समाजात निसर्ग-तादात्म्याचा समान धागा आढळतो, तीच धारणा आढळते. जशी दक्षिण अमेरिकेतल्या पावसाळी अरण्यातली म्हणजे Rain Forest मधली देसाना ही बुशमेनसारखीच जमात. जी रक्तात मुरवून जे जगतात आणि मरतातही अशी ज्यांची एक धारणा आहे. ती नुसार, विश्वात सगळ्या जिवातून प्रवाही होणाऱ्या उर्जेचं एक ठराविक प्रमाण (quantum) सदैव कायम असतं आणि ते तसेच परिपूर्ण राहावं म्हणून प्रत्येक जन्मानं एक मृत्यू घडवून आणणं आणि मृत्यूनं एक नवा जीव जन्माला घालणं अनिवार्य असतं. या श्रद्धेला अनुसरून हे लोक जेव्हा शिकारीला जातात तेव्हा त्या प्रत्येकात विश्वास असतो की, शिकारीत मारल्या गेलेल्या प्रत्येक प्राण्याच्या मृत्यूनं विश्व-चैतन्याला छिद्र पडतं आणि नंतर ते शिकाऱ्याच्या म्हणजे मारणाऱ्याच्या मृत्यूनं भरून निघतं. कुणीच मानव जर मेला नाही तर पशू, पक्षी वा कुठलेच अन्य प्राणी निर्माणच होणार नाहीत. देसानांची ही धारणा कितीही ओबडधोबड (Crude) आणि Primitive वाटत असली तरी तीत प्रत्येक मृत्यूनं नव्या जन्माला जागा करून द्यावी, आणि प्रत्येक नव्या जन्मानं भावी जिवांसाठी मरणाची तयारी ठेवावी, या जन्म-मृत्यूच्या या निसर्गचक्राची प्रौढ जाण आहे. आश्चर्य म्हणजे या कल्पनेत गृहीत असलेला जैविक अविनाशत्वाचा नियम आधुनिक पदार्थविज्ञानातल्या पदार्थांच्या अविनाशत्वाच्या नियमाशी (law of the conservation of energy) खूपच जुळता आहे. पुनर्जन्माच्या कल्पितातून जन्ममरणांच्या नैसर्गिक फेऱ्यांच्या वास्तवाचं प्रतिपादन करणारी भारतीय श्रद्धा तरी यापेक्षा काय वेगळी आहे?

बॅटरीचं आयुष्य जसं चार्जिंग सोर्सवर अवलंबून असतं तसं सारं मानवी जीवन निसर्गावर अवलंबून असणं ही त्याचीच योजना आहे. महात्मा गांधींच्या एका प्रसिद्ध वचनानुसार माणसाच्या मूलभूत गरजा भागवण्याइतकी पुरेपूर तरतूद निसर्गाजवळ आहे. तरीही माणूस कायम अतृप्त आणि असंतुष्ट का, हा प्रश्न पडतो. नेमका हाच प्रश्न रसेलनं आपल्या 'Conquest of Happiness' या पुस्तकात आरंभीच विचारला आहे. तो म्हणतो- "पुरेसं अन्न आणि धड आरोग्य असल्यास पशू सुखी होतात तर माणसानं का असू नये?" याचं साधं उत्तर तो पूर्णतः पशू नाही हे आहे. इतर सगळ्या प्राण्यांपासूनच त्याच वेगळेपण त्याच्या बुद्धिवैभवात साठवलेलं आहे आणि यामुळेच त्याची बहुतांश दुःखं त्याच्या मानसिकतेशी निगडित असतात. स्वतःच विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना रसेल नेमकं हेच म्हणतो की, "सुसंस्कृत समाजातले बव्हंशी लोक दैनंदिन जीवनात ज्या दुःखात चूर असतात त्याची कारणं जगाविषयीचा चुकीचा दृष्टिकोन, सदोष नीती, विपरीत

सवयी हे आहेत. त्यामुळे जीवनातला नैसर्गिक उत्साह आटतो आणि ज्यावर सुख अवलंबून असतं त्या संभाव्यतांपासून (possibilities) ते दुरावतात.'' या सगळ्यांना पायाभूत असलेली एकमेव सदोष धारणा म्हणजे ''सुख हे पैशांच्या म्हणजेच साधनांच्या प्रमाणात वाढतं'' ही! आजच्या भोगवादाचं हे ब्रीदवाक्य एकदा मान्य केलं की त्यातून सगळ्या समकालीन समस्या क्रमप्राप्त होतात. जसं अधिक सुखी व्हायचं असेल तर अधिक सुखसाधनं वाढवा, त्यासाठी जीवघेणी चढाओढ करा आणि तंत्रज्ञान विकसित करा. म्हणजे वेगळ्या शब्दांत निसर्गाची जमेल तेवढी लूटमार करा! टीव्ही वरच्या समस्त जाहिरातीतून हाच मंत्र अहर्निश आपल्या कानी-कपाळी ओरडला जातोय्. वृत्तपत्रांतून वारंवार झळकणाऱ्या अति-श्रीमंतांच्या कौतुकभरल्या याद्यांतूनही श्रीमंतीचा म्हणजे नैसर्गिक साधनांच्या बेलगाम वापराचा 'आदर्श' आपल्या गळी उतरवला जातो. या साऱ्या प्रचारी तंत्रातून फक्त श्रीमंतच अधिक सुखी असतात, हा गैरसमज उगवत्या पिढीत पद्धतशीरपणे रुजवला जात आहे. साहजिकच श्रीमंती मिळवण्याचे सगळे बरे-वाईट मार्ग नैतिकदृष्ट्या क्षम्य ठरले आहेत. आणि समाज सामंजस्यानं म्हणजे परस्पर सहकारातून वाढतो, हे सनातन सत्य बाजूला पडून तो केवळ चढाओढीतून विकसित होतो, ही विकृती सर्वमान्य झाली आहे. यानं पर्यावरण समस्यांसोबत 'आहे' आणि 'नाही' यांच्यातली दरी वाढून त्या दुभंगलेल्या स्थितीतून दहशतवादी हिंसा आणि असुरक्षितता हे नवंच अपत्य जन्माला आलं आहे. या सगळ्यांचा एकत्र परिणाम म्हणून एकूण मानव प्रजातीचं अस्तित्वच धोक्यात आलं आहे. निकट येत चाललेल्या या धोक्याची सप्रमाण पूर्वसूचना देताना सर मॉर्टिन रीज हे वैज्ञानिक आपल्या 'Our Final Hour' या पुस्तकात म्हणतात ''विज्ञान कधी नव्हतं एवढं प्रगत होतं आहे, जैविक, सायबर, अवकाश तसेच नानो या तंत्रज्ञानातून एक नवंच भवितव्य साकारतंय् पण त्यालाही काजकडा आहेच! त्यातून केवळ व्यक्तीलासुद्धा महा-दहशतवादी बनण्याचं बळ आलेलं आहे. एखादी निरागस (Innocent) चूकही महाप्रलयकारी होण्याची संभाव्यता निर्माण झाली आहे. एकविसाव्या शतकातल्या तंत्रज्ञानातून उत्पन्न होणाऱ्या अमानवी दबावात (inhuman pressures) भूकंप, ज्वालामुखी, उल्कापात या परंपरागत संकटांपेक्षाही अनेक पटींनी मोठी संकट निर्माण करण्याची क्षमता आहे.'' पस्तीस वर्षांइतक्या अगोदर याचा पूर्व अंदाज घेऊन Desmond Morris म्हणाले होते - "Unfortunately we tend to forget that we are animals with certain specific weaknesses and certain specific strenths. We think of ourselves as blank sheets on which anything can

be written. We are not. We come to the world with a set of basic instruction and we ignore or disobey them at our peril."

चंगळवादाच्या भस्मासुरामुळं आम्हा सान्यांचं भवितव्यच नव्हे, तर अस्तित्वच धोक्यात आल्याचं आम्हाला समजलेलं नाही असं नव्हे नि आम्हाला ते मान्य नाही असंही नव्हे. पण, तरीही आपण त्यावर उपाययोजना करू नये याची दोनच कारणं असू शकतात, ती म्हणजे एकतर ही उपाययोजना काय हे आम्हाला ज्ञात नसावं किंवा ज्ञात असूनही आम्हाला ती अशक्यप्राय वाटावी एवढी अवघड जात असावी. माझ्या मते ज्ञात नसण्याइतके आम्ही काही अडाणी नाहीत. अर्थव्यवस्था ज्यांच्या हातात ते सारे उद्योगपती आणि राजकीय पुढारी सुशिक्षित जाणकार आहेत. म्हणजे सारं काही उमजूनही आम्ही हतबल झालो आहोत, हेच यातलं सत्य. म्हणूनच उपाय सांगण्यापूर्वी याच्या कारणांचा शोध घ्यायला हवा.

चंगळवादाचं अन्य सान्या व्यसनागत आहे. म्हणजे व्यसनापूर्वी ते लावावं वा न लावावं याचं स्वातंत्र्य असतं, मात्र एकदा का लागलं की नंतर इच्छा झाली तरी ते तुम्हाला सोडत नाही. यात चंगळवादामागची प्रचारी विचारधारा कशी फोल, विकृत आणि अहितकारी आहे एवढंच सांगून चालणार नाही, तर तिच्या विरुद्ध निरोगी, आकर्षक आणि शक्य होणारी पर्यायी विचारधारा सांगावी लागेल, म्हणजेच मानवी सुखाचा नवा स्रोत दाखवावा लागेल. चंगळवादाला नकार म्हणजे फकीर होऊन भौतिक सुखाला नकार असा सर्वसाधारण अर्थ घेतला जातो. म्हणून हा पर्याय सकारात्मक असण्याचं सिद्ध करावं लागेल. वस्तुतः हा पर्याय नवा नाहीच. बुशमेन व देसानासारख्या आदिम लोकांनाही तो ज्ञात आहे. शतकानुशतकांपासून तो सगळ्या धर्मातून आणि अध्यात्मातून सांगितला गेला आहे. त्यातही व्यवहारी अर्थशास्त्र आजच्या इतकंच गृहित आहे, पण चंगळवादापेक्षा वेगळ्या अर्थानं. चंगळवादातलं सुखसमाधान सुखसाधनांशी समकक्ष असतं तर त्याच्या पर्यायातलं सुखसमाधान न्यूनतम साधनांशी जोडलेलं असतं. त्यात कमीतकमी साधनांनिशी महत्तम सुखसमाधान साधण्याचं आव्हान आहे. ते पेलण्यासाठी प्रयोग अपरिहार्य होतात. त्यात येणार अपयशही प्रायोगिकतेचाच भाग असतो. अन्यत्र अपयश ही खचवणारी बाब असली, तरी सृजनशील प्रयोगातलं यश आव्हानाला धार आणतं. या रीतीनं ईप्सित साधण्याची सगळीच प्रक्रिया आनंददायी ठरते. अत्यल्प साधनातून त्यांच्या मूल्याच्या कितीतरी पट आनंद होतो तो यान्च कारणानं. कलेतला आनंद यातलंच उदाहरण! शिवाय जीवनातले कितीतरी आनंद शून्यखर्ची असतात. निसर्गप्रेमाचा बिनखर्ची आनंद यातलाच मोठा आणि महत्त्वाचा!

न्यूनतम साधनातून महत्तम सुख साधण्याचं कसब आम्ही आधुनिकांनी खरं तर आदिम माणसांपासून शिकायला हवं, अथवा त्यांचीच प्रतिकृती असलेल्या घरोघरीच्या बालकापासून तरी! जन्मतः प्रत्येक बालक हे आदिमानवाचंच रूप असतं. कुठल्याही बालकाकडे बघा, ते सदैव काही ना काही करण्यात सदा व्यस्त असतं. ही तर मनुष्यप्राण्याची जन्मजात exploratory instinct! जिथं साधनं उपलब्ध नसतात तिथं त्याचा निसर्गाशी खेळ सुरू होतो. यात त्याला दगड, माती, वाळू, पाणी काहीही पुरे होतं. चिखल तुडवणं, पाणी उडवणं, फुलपाखरामागं धावणं, झाडावर चढणं, झुल्यावर झुलणं यात त्यानं सहजतेनं रमावं यातून बालक हे मुलतः निसर्ग-बालक असल्याचं सिद्ध होतं. प्राणीमात्रांविषयी त्याला असलेलं आकर्षणही तेवढंच नैसर्गिक असतं. डिस्ने यच्चयावत बालकात पराकोटीचा लोकप्रिय असणं हा याचा पुरावा. मात्र आधुनिक जीवनाचं वैशिष्ट हे की, वडीलधारे त्याला पुढल्या चढाओढीत सक्षम करण्यासाठी योजनाबद्ध रीत्या त्यांच्यातलं बालक मारत नेतात आणि अखेरी निसर्गाशी त्याची असेलेली नाळ पूर्णपणे तुटल्यावरच थांबतात. या पातळीवर त्याच्यातली निसर्गदत्त तृप्ती संपून त्या जागी एक कायम अतृप्ती आलेली असते. जी कदापि पूर्ण होणार नाही अशा सुखाच्या मृगजळी कल्पनेमागे त्याला कायम धावत ठेवणं ही एकमेव प्रेरणा तीत असते. अशांच्या बेरजेतून साकारलेला समूह मग आपल्याजवळ आणि आपल्यात काय आहे हे विसरून नसल्याच्या पाठलागात जगतो आणि अखेर संपतो. यातून स्वतःच स्वतःच्या दुःख-वेदनांना कारणीभूत होणं ही माणसाची शोकान्त नियती बनते. त्याची साता जन्माची आजची असफळ अपूर्ण कहाणी हीच!

अनादि काळापासून धर्मश्रद्धा ही कोणत्या ना कोणत्या रूपात मानवी स्वभाव आणि आचरण यांचं नियमन करत आल्याचा आजवरचा इतिहास आहे. ती हितकारक होती म्हणूनच आजवर टिकली आहे. या धर्मश्रद्धेचं कर्मकांडात्मक रूपं, स्थळ, काळ आणि समुदायानुसार वेगवेगळी असली तरी त्यातल्या भूमिकेचा समान धागा संयमाचा म्हणजे कुठलाही अतिरेक टाळण्याचा आहे. त्यात त्याला सद्गुणाचा दर्जा दिलेला आहे. पुढं तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे अनंतइच्छापूर्तीच्या लोभापायी संयमाचे लगाम माणसा हातून सुटले आणि तो अनिर्बंध झाला. यातून 'शुभ-लाभ' यांच्यातलं बरोबरीचं सनातन नातं संपून लाभच शुभ होऊन बसला. या अतिरेकातून मानव-मानव तसेच निसर्ग-मानव या दोन्ही पातळ्यावरचं सौहार्दपूर्ण संतुलन ढळलं आणि अधःपतनाची सुरुवात झाली. कुठलीही धर्मभावना ही जीवनातल्या शुभाचा संकेत (Symbol) असते म्हणूनच ती विश्वव्यापी ठरते. तिचा

मानवी आनंद आणि सुख यात मोठा वाटा असतो. असल्या कल्याणकारी श्रद्धेचा गौरव करून तिला विश्वव्यापी करण्यातून माणूस अधिक सुखी होऊ शकतो. नेमकं हेच सांगतांना ओशो रजनीश म्हणतात, ''तुम्हाला अद्‌भुताचं (Wonder) अप्रूप वाटत असेल, तुम्ही भयादरानं (awe) अवाक्‌ होत असाल तरच तुही खरे श्रद्धाळू. माथ्यावरचं भरगच्च तारांगण बघून तुमच्यात नृत्याची लय जागत असेल, संगीताचे झंकार फुलत असतील तरच तुम्ही आस्तिक! केवळ मंदिर वा चर्चमध्ये जाण्यानं वा उसन्या प्रार्थना उगाळल्यानं कुणी आस्तिक होत नसतो, कारण या बुद्धीशी निगडित बाबी आहेत, हृदयाशी त्यांचा काही एक संबंध नाही.''

आजच्या वेगानं जीवनाचं अमानवीकरण (dehumanization) करणाऱ्या झंझावातात आम्हाला निकडीनं हवा तो निसर्गाशी समरूप असणारा निखळ विश्वव्यापी मानवधर्म. माझ्या मते तारामंडळासह हे विशाल विश्व बघताना त्यातल्या अणुरेणूपेक्षाही लहान असणाऱ्या आपणाला हे नवल बघण्याची चेतना मिळाली. जीवनाच्या अद्‌भुत मंचावरचं सुख-दुःखाचं नाटक बघून त्यातल्या भूलभुलैयानं चकित होण्याची संधी मिळाली, ती केवळ निसर्गकृपेनं ही समज येणं म्हणजेच खरी श्रद्धा, जीवनातल्या महानंदाचा स्रोत!

वरील पार्श्वभूमीवर विजय इंगोलेंचं निसर्गोपनिषद्‌ ही त्यांनी आपल्यातलं बालक जिवंत राखण्यासाठी सातत्यानं केलेल्या प्रयोगाची बखर म्हणून फार मोलाची आहे. सुदैवाने ते व्यावसायिक लेखक नसल्यानं आपल्या साध्या, सोप्या आणि प्रवाही भाषेत त्यांनी मांडलेला आपला वन आणि वन्य-प्राण्यांबरोबरचा संवाद जिवंत आणि प्रत्ययकारी वाटतो. त्यात प्रकटपणे कुठलंही जीवनवादी अध्यात्म मांडलं नसलं, तरी ते कळत-नकळत वाचकांच्या मनात उमटून यावं असं लाघव आहे. याचा पुरावा म्हणून त्यांचा वृत्तान्त वाचून झाल्यावर माझ्या मनात मेर्कोलेच्या खालील ओळी सहजतेनं उमटल्या : " I asked for all things, so that I can enjoy! I was given life, so that I can enjoy all things."

निसर्गाच्या उपकृतपणाची एवढी प्रांजळ पावती कुठली?

**मनोहर सप्रे**
सरकारनगर, चंद्रपूर
भ्रमणध्वनी : ९३७०३२०१२०

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | पक्षीवेड | २ |
| २. | पोहऱ्याचा पहारेकरी | ११ |
| ३. | बेलकुंडची बखर | १८ |
| ४. | महेन्द्रीचा ठिपकेवाला | ३२ |
| ५. | वणवा | ३८ |
| ६. | शोध रानपिंगळ्याचा | ५४ |
| ७. | रंगुबेलीचा रंगदार | ६१ |
| ८. | रायपूरचा डब्बू | ६९ |
| ९. | चरैवेती चरैवेती/निसर्गाचे प्रवासी | ७८ |
| १०. | मेळघाट अवलोकन | ९२ |
| ११. | दुर्मिळ वटवाघूळ | १०० |
| १२. | वाघाच्या नंदनवनात | १०५ |
| १३. | बस्तरच्या निबिड अरण्यात | १११ |
| १४. | अरण्यगर्भ | १२५ |

# २

# पक्षिवेड

बालपणी पक्ष्यांची ओळख, काऊ-चिऊच्या गोष्टीपासून होते, तर शेवट आमच्या पालकांचा उत्साह मैना-कबुतरापर्यंत येऊन थांबतो. शाळा सुरू झाल्यानंतर 'डी' फॉर 'डाँकी'च्या ऐवजी 'डी' फॉर 'डक' या पलीकडे पक्ष्यांचा उल्लेख क्वचितच होतो. एक नेहमीची ओळख म्हणजे उडणारे मोठे पक्षी म्हणजे घार, पिंजऱ्यात असतो तो पोपट, कधीकाळी खेड्यात गेलो तर कोंबडा-कोंबडी, बाकी सर्व चिमण्या. या सर्व चिमण्यांत काही लाल चिमण्या, काही पिवळ्या चिमण्या, काही काळ्या चिमण्या. जणूकाही हे सगळे पक्षीविश्व या काही मोठ्या चिमण्यावजा पक्ष्यांतच सामावलेले आहे. सहाव्या इयत्तेत जेव्हा लार्कवर कविता वाचायचो आणि तसेच गानसम्राज्ञी लताला नायटिंगेल म्हटल्याचे समजले तेव्हा या सगळ्यांची रूपं चिमण्या कावळ्यातच बघत असू. पक्षी हे फक्त गोड गळ्याचेच असतात, हा भ्रम प्राणिसंग्रहालयात मोराचा सुंदर पिसारा बघितल्यावर दूर झाला व पक्ष्यांत सौंदर्यही असतं हे कळलं.

मुंबईत नवीन नवीन पक्ष्यांचे दर्शन हे प्राणिसंग्रहालयातील वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवलेल्या पिंजऱ्यापर्यंतच मर्यादित होते. अर्थात, त्यामध्ये काही विदेशी पक्ष्यांचाही समावेश होता. मित्रांच्या गप्पागोष्टीत जेव्हा विविध पक्ष्यांच्या जाती, रंग व आवाजांची वर्णने कानावरून जायची तेव्हा विश्वास बसत नसायचा. त्या पक्षी-पंडितांसमोर आमची अवस्था बालकमंदिरातील एखाद्या बालकासारखी होत होती. एकदा त्यांच्याबरोबर रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्यात जायचे


ठरले. तेथील दाट जंगलात एक छान विश्रामगृह आहे आणि समोरच्या डोंगरावर, महादेवाच्या पिंडीत जसे लिंग दिसते तसा एक उंचच उंच काळा दगडी सुळका आकाशाला भिडत असलेला दिसतो. ते दृश्य फारच विलोभनीय होते. जेव्हा कळलेकी, आपले स्वातंत्र्यवीर वासुदेव बळवंत फडके यांचे इंग्रजांच्या तगाद्याला कंटाळून केलेले ते आश्रयस्थान होते, तेव्हा शरीरात एक शिरशिरी उठून गेली. पक्षी-निरीक्षणाला निघाल्यानंतर आमची मित्रमंडळी झाडावर, झुडपात जेव्हा बघायला लागली तेव्हा आम्हाला जरा आश्चर्यच वाटले आणि मला प्राणिसंग्रहालय आठवले. मी त्यांना नवख्यासारखे व सहज विचारणा केली की, "इथे पक्ष्यांचे पिंजरे कुठे दिसत नाहीत?" त्यांचे हसणे ऐकल्यावर थोडा खजील झालो आणि कळले की इथे पक्षी स्वच्छंद विहार करीत असतात. आपल्याला त्यांना शोधावं लागतं आणि या शोधण्यातच खरी गंमत असते राव. तेव्हा प्राणिसंग्रहालयातील मर्यादित निश्चितता आणि रानाचे सुंदर रूप व पक्षी-शोधाची अमर्याद अनिश्चितता यामधला फरक समजला व पक्षी-निरीक्षणाचे गमक कळले.

प्राणिसंग्रहालयातील चाकोरीतील आनंदापेक्षा या वनातील पक्षी-दर्शनातील अनिश्चिततेत गुरफटलेला निर्भेळ आनंद काही औरच असतो. तेव्हा स्वतःचे बायनॉक्युलर नसल्याने त्यांच्याइतका आनंद मी घेऊ शकलो नाही, परंतु आम्ही मात्र या छंदाच्या आहारी गेलो. सत्तरच्या काळात भारतात पक्षी-निरीक्षणासाठी मिळणाऱ्या दुर्बिण दुर्मिळच. त्यामुळे मित्राकरवी बाहेर देशातून एक चांगली दुर्बीण मिळवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. आमच्या, मुंबईतील तिसऱ्या माळ्यावरील गॅलरी समोर एक जुने वाकलेले गुलमोहराचे झाड होते. एक दिवस सकाळी एका लयबद्ध टकटकने आमचे लक्ष वेधून घेतले. बघतो तर काय, अगदी दहा फुटावर एक चिमणीपेक्षा किंचित मोठा पूर्ण हिरव्या रंगाचा शेपूट नसलेला, परंतु चोचीवर सुंदरसे लाल पीस असलेल्या पक्ष्याने लक्ष वेधून घेतले. त्याला आता मी बघायचो. तो रोज तेथे यायचा व त्या झाडाच्या वाकड्या खोडावर बीळ करायचा. इतका सुंदर व आगळा वेगळा पक्षी मी प्रथमच पाहत होतो. वाटले, पक्ष्यांच्या माहितीचे एखादे पुस्तक जरूर असावे. लिबर्टी थिएटरजवळील पुस्तकाच्या एका दुकानात पुस्तक विकत घ्यायला गेलो. त्यांनी मला एक पुस्तक दाखवले. मी ताबडतोब त्या पक्ष्याला त्यात शोधले आणि त्या सुंदर पक्ष्याचे चित्र मला त्यात दिसले. त्याचे नाव 'बार्बेट' (तांबडा) आहे, हे कळल्यावर छान वाटले. हा माझ्या पक्षीनिरीक्षणाचा श्रीगणेशा!

त्या पुस्तकाचे नाव होते 'बर्डस ऑफ इंडिया ऍन्ड पाकिस्तान'.

त्यात डोळ्यावर चष्मा व गळ्यात दुर्बीण, डोक्यावर कॅप घातलेल्या एका दाढीवाल्या व्यक्तीचा फोटो दिसला व सोबत लेखकाचे नाव लिहिले होते सलीम अली. दुकानदार बरा होता. त्याने माझ्या हालचालीवरून ओळखले की हा नया पंछी आहे. तो म्हणाला, हें पुस्तक भारतीय पक्ष्यांचे बायबल आहे आणि या पुस्तकाचे थोर लेखक मुंबईतच राहतात. मला पक्ष्यांइतकीच त्या प्रभावी व्यक्तीला पाहण्याची ओढ लागली. योगायोग म्हणजे बांद्रा पश्चिमेला पाली मार्केटहून पाली हिलच्या टेकड्यावर जो वळणाचा रस्ता जातो त्या रस्त्यावरची ही गोष्ट. सायंकाळचे पाच वाजले असतील. प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर रहेजाच्या बिल्डिंगजवळ पोहचत नाही तोच समोरून पायात स्पोर्टशूज, खाकी हाफपॅन्ट त्यात तत्सम खोचलेला शर्ट, गळ्यात दुर्बीण, खांद्यावर बॅग, पांढरी दाढी व मिश्या, डोळ्यांवर चष्मा आणि डोक्यावर स्पोर्टस् कॅप घालून एक व्यक्ती जाताना दिसली. किरकोळ बांध्याची पाचसव्वा पाच फूट उंचीची मूर्ती बघून मी जागच्या जागी खिळलो. पुस्तकातील फोटोशी मिळणारे व्यक्तिमत्त्व बघून मी ताबडतोब ओळखले हे तर आपले सलीम अली. त्यांना लवून नमस्कार केला. त्यांनी हॅलो म्हटले आणि त्यांच्याबद्दलचे आदराचे दोन-तीन शब्द बोलल्यावर ते हासले आणि ते आपल्या मार्गाला लागले. पंढरीच्या वारकऱ्याला विठोबा दिसला. मनातून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. एवढ्या मोठ्या व्यक्तीचे अकस्मात दर्शन झाले होते. त्यांचे साधेपण आणि स्वभावातील विनम्रता माझं मन जिंकून गेली आणि माझी दुर्बीण मिळवण्याची तळमळ अजूनच वाढीला लागली. पक्ष्याचे खरे सौंदर्य आणि सूक्ष्म निरीक्षण हे दुर्बिणीनेच होऊ शकते, याबद्दल दुमत नाही. सुदैवाने जेव्हा माझ्या मित्राच्या मर्चेन्ट नेव्हीतील मित्राने पेन्टेक्स कंपनीची एक अतिसुंदर दुर्बीण दिली तेव्हा माझा आनंद गगनात मावेना. तो आमच्या पक्षी-निरीक्षणाच्या छंदाचा तोरण!

अमरावतीला आल्यावर एकटाच दुर्बीण घेऊन जंगलात फिरत असायचो. जरी अमरावतीत पूर्ण बालपण गेलं असलं, तरी या चकव्या द्विजगणांच्या वास्तव्याची ठिकाणे माहीत नसल्याने नेहमी निराशा व्हायची. माझ्या पक्षी-निरीक्षणात योग्य व माहितगार साथ्याची उणीव भासायला लागली. दिवस निघून जात होते परंतु अशा योग्य पक्षी वेड्या मित्रांसाठी केलेली प्रतीक्षा वाया गेली नाही. आधी



आमचे प्रेरणास्थान डॉ. सलीम अली



टोकटोकीने आसमंत जागवणारा तांबट



दूर्मिळ काळे करकोचे



अमरावतीजवळील मालखेड तलावावर दूर्मिळ फ्लेमिंगो

निशी (प्रा. निशिकांत काळे) आला. या निर्भय व अतिउत्साही मित्राबरोबर पोहरा जंगल व त्यातले सगळे तलाव पिंजून काढले. खूप नवीन नवीन पक्षी व त्यांची ठिकाणे बघायला मिळालीत. नंतर किशोर (प्रा. किशोर रिठे) आला, आणि आम्ही निसर्ग-संरक्षण संस्थेचा एक छोटा भाग झालो. कॉलेजच्या जबाबदाऱ्या वाढत होत्या, तरी कुठेही असलेले पक्षिमित्र संमेलन सोडत नव्हतो. आणि अशाच एका संमेलनात कुबेराचा खजिना पण कमी पडेल असा मित्रसमूह मिळाला. तो खजिना म्हणजे पद्माकर लाड, मनोहर खोडे (डॉ.) आणि कुमार (शिरीषकुमार पाटील) हा पक्षिवेडा मित्रत्रय. या मित्रांचे वय व व्यवसाय जरी वेगवेगळे असले तरी छंद मात्र एकच. वन व पक्ष्यांवरील अतीव प्रेम, निसर्ग निरीक्षणात लागणारा उत्साह व जिद्द व त्याच्या जोडीला असलेली प्रखर जिज्ञासा, हे सर्व गुण प्रबळ होते. आम्हा चौघांच्या चौकटयाचे लवकरच पांडव व्हायला ज्ञानेश्वर दमाहे नामे एक आगळेवेगळे भीमकाय व्यक्तिमत्त्व येऊन मिळाले. त्यानंतर आम्ही पाच जणांनी वडाळी, मेळघाट, सालबर्डी, वर्धा नदीचे पात्र, महेन्द्री, छत्तीसगढमधील बस्तर, नवेगाव, नागझिरा, पेंच, भीमाशंकरचे जंगल, रेहकुरी अभयारण्याच्या वाटा पायाखालून घातल्या व निसर्गाचा एक भाग झालो.

आमच्या या वेडापायी अनेक टीका ऐकल्या व ऐकतो. जसे ''यात काय मिळते? या उन्हातानातून फिरताना कंटाळा येत नाही काय?, नेहमीच काही नवीन दिसेल तर मग हा वेळेचा व पैशाचा अपव्यय कश्यांसाठी?'' आणि त्यात कहर म्हणजे ''जंगलातील पशुप्राण्यांनी तुम्हाला खाल्ले तर? वाचकहो हसू नका. आई ताई व घरच्या मालकिणीपासून दोस्त मंडळी, एवढेही नच पुरे तर रस्त्यावर भेटलेला एखादा पादचारी वेड्यांकडे बघावा तसा दृष्टिक्षेप टाकायला मागेपुढे पाहत नाही. जीवनाकडे केवळ भौतिकवादाच्या चष्म्यातून बघणारे आम्ही या चिन्मयानंदाला खरंच पारखे तर होत नाही ना? संगीत, चित्रकला, वाचन, खेळ वगैरे यातून काय मिळतं? खरंच कशात काय मिळतं? याचं उत्तर म्हणजे एक निर्भेळ आनंद आणि त्याचे वर्णन शब्दापलीकडचे आहे. ते केवळ अनुभवायचे.

या छंदापायी नवीन नवीन पक्षी बघितले, नवीन पक्ष्यांच्या शोधात अनेकदा खूपखूप भटकलो. त्यातील काही अविस्मरणीय घटना खालील प्रकरणात देत आहे.

# काळा करकोचा (ब्लॅक स्टॉर्क)

अमरावतीच्या परिसरात अनेक तळ्यांवर पांढरी मान व काळे अंग असा पारध्यागत शांत उभा असलेला पक्षी तुम्ही कधी बघितला असेल. हे बरेचदा एकटे किंवा जोडीने तळ्याच्या काठावर शांत बसलेले असतात. तो पक्षी म्हणजे पांढऱ्या मानेचा करकोचा. क्वचित पिवळी चोच, पिवळे पाय असलेला, पांढऱ्या रंगाचा व पंखांवर तांबड्या, काळ्या, व निळ्या रंगाचा छिडकावा असलेला असा रंगीत करकोचा बघाल. हा आपल्याकडे हिवाळी पाहुणा म्हणून येतो. हे पक्षी ४-५ च्या थव्याने राहतात. चिखलातील भक्ष्ये शोधतात व हिवाळाभर आपल्या भागातील तलावावर वास्तव्य करतात व उन्हाळ्याची चाहूल लागताच मायदेशी निघून जातात. परत पुढील वर्षी आल्यावर आपल्या जुन्या ठिकाणीच नेमके मुक्काम करतात, असे डॉ. मनोहरला आढळले. तो दरवर्षी नियमित या पक्ष्यांचे निरीक्षण करतो. त्यांना आढळलेली माहिती फार रंजक आहे. वरूडजवळील सातनूर तलावावर या पक्ष्यांचा एक थवा, गंमत म्हणजे त्यातील एक करकोचा एका पायाने लंगडा आहे, दरवर्षी दिसतो. त्यावरून त्याने निदान काढले की, काही पक्ष्यांचा थवा एखाद्या विशिष्ट तलावावरच दरवर्षी वास्तव्य करतो.

महेन्द्रीच्या जंगलाचा इतर लेखांमध्ये वारंवार उल्लेख येतो. त्यातील पंढरी तळे हे डोंगराच्या राईत मनुष्यवस्तीपासून वेगळे, डोंगरकपारीत दूरपर्यंत लांबच लांब पसरलेले आहे. अशा या विशिष्ट रचनेमुळे वेगवेगळ्या पक्ष्यांना चांगली लपण मिळते. डिसेंबर-जानेवारीत जेव्हा तलावाचं पाणी ओलितासाठी सोडले जाते तेव्हा तळ्याच्या काठाने साचलेला चिखल उघडा पडतो आणि चिखलातले किडे खाणाऱ्या अनेक पाणपक्ष्यांचे आवडीचे ठिकाण बनते. त्यात चक्रवाक, पिनटेल, सँडपायपर, प्लावर, काळ्या डोक्याच्या स्टिल्ट, ग्रे हेरॉन असे अनेक रंगरूपाच्या व आकाराच्या पक्ष्यांनी तलाव गजबजून जातो. तलावाच्या पाण्यात नकटा, धनवर, पणडुब्बी, पाणकावळा, रेड क्रेस्टेड पोचार्ड इत्यादी पक्षी तलावाची शोभा वाढवतात. त्यात काठावर व्हाईट नेक्ड स्टॉर्क हा नेहमीचाच पाहुणा. इतक्या विविध पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेल्या या तळ्याने आम्हा पक्षिवेड्यांना आकर्षित न केले तरच नवल! अमरावती जिल्ह्यातील वाढत्या तलावाच्या संख्येने म्हणा की आमच्या वाढलेल्या भेटीमुळे म्हणा दरवर्षी येथे आम्हाला काहीतरी वेगळे बघायला मिळते.



दूर्मिळ मलबार पाईड हॉर्नबील



पिवळ्या पायाची टिटवी (येलो वॅटल्ड लॅपविंग)



सर्पगरुड



बहिरी ससाण्याचे द्वंद्व

१९९७ च्या पंढरीभेटीत जेव्हा मी बांधावर पोहोचलो तेव्हा पंढरीचा काठ काही वेगळ्या पाहुण्यांनी भरलेला होता. काळ्या रंगाचा तीन-एक फूट उंचीचा करकोचाच्या जातीचा पक्ष्यांचा एक थवा आम्हाला दिसला. तो मोजला असता त्यात सतरा पक्षी होते. दुर्बिणीतून निरीक्षण केल्यावर सुंदर लाल पाय, पूर्ण काळे शरीर पण पोट मात्र पांढरे स्वच्छ, लांब जाडसर लाल रंगाची चोच असलेला एक रुबाबदार व देखणा पक्षी बघून आम्ही अचंब्यातच पडलो. भराभर पुस्तके बाहेर निघाली व या पक्ष्याची जात शोधायला सुरुवात केली. एकंदरीत माहितीवरून वा चित्रावरून ते पक्षी ब्लॅक स्टॉर्क आहे हे कळले. आम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. जेव्हा 'पॉकेट गाईड टू बर्ड्स ऑफ इंडियन सबकॉन्टिनेन्ट बाय रिचर्ड ग्रिमेट' हे पुस्तक बघितले तेव्हा अजूनच विस्मित झालो. कारण, कळले की, या पक्ष्याच्या नोंदी अमरावतीतच काय, पण विदर्भातसुद्धा आतापर्यंत झालेल्या नाहीत. आमचा आनंद गगनात मावेना. कारण ही नोंद म्हणजे एक नवीन शोध होता. 'इंडियन एक्सप्रेस' या दैनिकाने त्याला योग्य प्रसिद्धी दिली व आमचा उत्साह अजून वाढला. त्यानंतर मात्र हा पक्षी हळूहळू अमरावती सभोवतालच्या तलावात दरवर्षी दिसायला लागला. मुख्यत्वेकरून इंदला व शेवती तलावावर.

अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक शेती मुख्यतेकरून कोरडवाहू. वर्धा व पूर्णा या बारमाही नद्या सोडल्या तर इतर नद्या मुख्यत्वेकरून पावसाळी. पूर्वी दाभेरीचा नैसर्गिक तलाव व अमरावतीच्या आजूबाजूचे काही बांधलेले तलाव सोडले तर पाणवठ्याचा दुष्काळच, त्यामुळे येथे हिवाळी स्थलांतरित पक्ष्यांच्या नोंदी कमीच आढळल्या. परंतु, स्वातंत्र्यानंतर अनेक लघुसिंचन प्रकल्प यायला सुरुवात झाली व हळूहळू अमरावती जिल्हा छोट्या, छोट्या धरणाच्या पाणसाठ्याने भरून गेला.

पाणी हे जीवन! या जीवनदायी जलातूनच छोट्या ते मोठ्या कीटक-प्राण्यांची शृंखला सुरू होते हे ज्ञात आहेच. या नवीन जलाशयांतील विपुल नैसर्गिक खाद्य निर्मितीमुळे हळूहळू उत्तरेकडील स्थलांतरित पक्षी आपल्या दक्षिणेकडील भागाकडे आकर्षित होऊ लागले असावेत व हळूहळू त्यांच्या संख्येत वाढ व्हायला लागली असावी. ज्या पाणसंचयामुळे निसर्गातील एवढ्या मोठ्या शृंखलेचा उदय होतो. अशा या निसर्ग उपयोगी पाणसंचयासाठी उभारल्या जाणाऱ्या धरणांना जेव्हा निसर्ग संरक्षणाची मक्तेदारी करणारी मंडळी व तथाकथित संस्था पर्यावरणाच्या

संरक्षणाच्या नावाखाली विरोध करतात किंवा आडकाठी टाकतात, तेव्हा हसावे की रडावे हेच कळत नाही.

## रोहित (फ्लेमिंगो)

फ्लेमिंगोचे थवे शिवडीच्या दलदलीत जेव्हा मुंबईला आम्ही पाहिले, तेव्हा मुंबईच्या प्रदूषणाबद्दल सतत हाकाटी ऐकणाऱ्या मुंबईकरांना सुखद धक्का बसला. हजारोंच्या संख्येत पाण्यात डोके बुडवून त्यांच्या, अल्गी खातानाच्या हालचाली बघून मुंबईकर मोहित न झाला तरच आश्चर्य! या सुंदर पक्ष्यांनी कच्छच्या रणात गाळामातीनी बनवलेल्या घरट्यांत वीण करण्याची आवडती जागा आहे. त्यांच्या सखोल अभ्यासाच्या नोंदी सलीम अलींनी केल्या आहेत. ओरिसातील चिल्का तलावातल्या वास्तव्यानंतर हे पक्षी विणीसाठी कच्छच्या रणात स्थानांतर करतात. त्या स्थलांतराच्या वेळेस बरेचदा बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या खाऱ्या पाण्यातील ब्लू ॲल्गी आवडीने खायला हा पक्षी उतरल्याच्या नोंदी आहेत. परंतु, अमरावती परिसरात हा पक्षी आढळल्याच्या नोंदी अजून नव्हत्या.

आमचे, मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह म्हणून की बर्डवॉचर म्हणून, सतत फिरतीवर असणारे मित्र श्री. राजू कसंबे यांनी दिलेल्या माहितीवरून आम्ही अमरावती–चांदूर रेल्वे रस्त्यालगत दक्षिणेकडे सावंगा विठोबा या गावाजवळील तलावाला भेट द्यायचे ठरवले. विस्तीर्ण व पसरट अशा या मालखेड तलावाचा बांध पूर्व दिशेला असून पश्चिम दिशेला हे गाव वसलेले आहे. दलदलीचा भाग नेमका पश्चिम दिशेला पसरला आहे. या विशिष्ट परिस्थितीमुळे फोटोग्राफीला उत्तम वेळ दुपारनंतरच योग्य. त्यामुळे दुपारी जायचे ठरवले.

गावाला वळसा घालून गेल्यावर जेव्हा तलावाचा काठ दिसायला लागला तेव्हा चारेक फूट उंचीचे वरकरणी पांढरे स्वच्छ दिसणारे, परंतु पंखाच्या कडेला लालभडक पीस असणारे फ्लेमिंगो जातीचे पक्षी एका मोठ्या थव्यात दिसले. ते दृश्य पाहून आमचे भानच हरपले. इंग्रजी S आकाराची लांबच लांब मान व त्यापुढे वरच्या बाजूला लाल व खालच्या बाजूने नांगराच्या फाळेप्रमाणे दिसणारी काळे टोक असलेली चोच, चोचेच्या वरच्या बाजूला पिवळे लाल डोळे, पाण्यात अर्धे बुडालेले पाय असे हे ग्रेटर फ्लेमिंगो.

हा तलाव बराच पसरट असल्याने काठावर चांगलीच फसण तयार होते. फोटोग्राफीसाठी आम्ही हळूहळू फसणीतून पक्ष्यांजवळ जाण्याचा प्रयत्न केला. पक्षी आम्हाला पाहून उडून जाऊ नये म्हणून बसूनच हळूहळू सरकणे क्रमप्राप्त होते. हातात जड कॅमेरे, ट्रायपॉड आणि बायनॉक्युलर्स नेताना बरीच दमछाक होत होती. पुढे जाणे अधिकच कठीण होत गेले. कारण पाय दलदलीत अधिकच रुतू लागले होते. शेवटी पुढे जाणे अशक्य झाल्याने ट्रायपॉडवर कॅमेऱ्याची जुळवाजुळव सुरू केली. या नवीन उपलब्धीमुळे म्हणा, की पक्ष्याच्या अनिश्चित हालचालीने म्हणा, आमचा जीव धडधडत होता. परंतु, त्यांनी आम्हाला निराश केले नाही. ते सहज लिलयेने आपल्या लांबचलांब मानेने अनेक मोहक हालचाली करीत होते. त्यांचे आपसातील खोड्या, चेष्टा, मस्कऱ्या व खेळणे अविरत सुरू होते. या इतक्या सुंदर दिसणाऱ्या पक्ष्यावरून आमची नजर हटत नव्हती. त्यांचे सहज पाण्याखाली जाणारे डोके व चोचींच्या विशिष्ट हालचाली विस्मयचकित करणाऱ्या होत्या. मान वर करून जेव्हा ते पंख फडफडवीतात तेव्हा पंखाखालील लालभडक रंग व काळी किनार बघून याला मराठीत 'अग्निपंख' व इंग्रजीत 'फ्लेमिंगो' का म्हणतात हे समजायला वेळ लागत नाही. निरीक्षणात वेळ कसा गेला कळलेच नाही. सूर्य केव्हाच मावळतीला लागला होता, अंधार पडायला सुरुवात झाली होती. अंधारातून चिखलातून वापस जाणे कठीण झाले असते म्हणून नाइलाजास्तव परतीचा मार्ग धरला.

हा क्वचित येणारा पाहुणा परत कधी दिसेल का? याची हुरहुर लागली होती, त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी परत यायचे ठरवले. त्यांचा सतत ओरडण्याचा हॉंक हॉंक असा आवाज कमी होत गेला आणि आम्ही गावाजवळ पोहोचलो. या भेटीच्या अनुषंगाने अजून एक घटना सांगावीशी वाटते. सावंगीला अवधूत पंथाचे एक कृष्णाजी महाराज यांचे एक जुने समाधिवजा देऊळ आहे. मंदिराच्या बाहेर जत्रेसारखे वातावरण नेहमीच दिसेल. अनेक दुकानदार पूजेचं सामान-नारळ, फुले, उदबत्त्या विकताना दिसतील. मंदिराच्या आतून नगाऱ्याचे व झांजेचे लयबद्ध आवाज येत होते. उत्कंठेपोटी आम्ही आत शिरलो. एका ५० फूट लांबी-रुंदीच्या परकोटा आत एक २० फूट लांबी-रुंदीचा सभामंडप दिसला. मंदिराला लागूनच पन्नास-साठ फुटाचे उंचच उंच असे दोन खांब दिसले. त्यामधील अंतर चारेक फूट असावे. ते पूर्ण कपड्याच्या लांबच लांब खोळीने झाकलेले होते. या उंच खांबांच्या संदर्भातील

माहिती फार वेगळी आहे. जुनाट खांब कधीकाळी बदलावे लागतात तेव्हा मंदिराचे पुजारी जंगलांत फिरून योग्य अश्या सागाच्या झाडांची निवड करतात. विधिवत पूजापाठनंतर तोडलेले ते उंच खांब वाजतगाजत मंदिरातील जुनाट खांबाजागी रोवतात. या उंच खांबांवरील एकसंघ लांबच लांब कापडाच्या खोळी दरवर्षी समारंभात बदलतात. एक माणूस त्या दोन खांबांच्या आधारे जुन्या खोळी गुंडाळत वर जातो व खाली येताना नवीन खोळी घालत येतो. या ५०-६० फूट उंचीच्या खांबांवरील आधाराशिवाय चालणारी ही कसरत बघायला जत्राच जमते. मंदिराच्या मागील बाजूंना गज लावलेल्या दारापलीकडे महाराजांची समाधी व पूजास्थान आहे. अनेक व्यक्ती नगाऱ्याच्या व झांजेच्या लयबद्ध आवाजात तेवढ्याच लयेने डोलताना व घुमताना दिसल्या आणि बहुतेक मंडळींची समाधी लागलेली दिसत होती. या सगळ्या प्रकाराने आम्ही विस्मयचकित झालो. नगारा व झांजीच्या लयबद्ध व घुमणाऱ्या आवाजामुळे हा सगळा मोहनिद्रेचा प्रकार असावा की देवळातले वातावरण! कळले नाही. ते सगळे दृश्य डोळ्यांत साठवून आम्ही हळूहळू काढता पाय घेतला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तेथे पोहोचल्यावर फ्लेमिंगोसोबतच आयबीस, येलोवॅटल लॅपविंग असे अनेक देखणे पक्षी तलावावर वावरताना दिसलेत. आता सूर्य समोरून असल्याने छायाचित्रण अवघड होते. एकाएकी फ्लेमिंगोनी पाण्यावरून धावता धावता मान जमिनीला समांतर ठेवून एकत्र उड्डाणे भरली. लांब केलेली मान, पंखाखालील भडक लाल रंग व त्याची काळी किनार असलेला हा पांढरा शुभ्र पक्षी जेव्हा थव्यात उडतो तेव्हा भान हरपून जाते. तलावाभोवती दोनतीन चकरा मारल्यावर तो थवा परत उतरून जुन्याजागी स्थिरावला. जूनचा महिना होता. पावसाला अजून सुरुवात झाली नव्हती. अजून चांगले प्रखर ऊन्ह होते. विणेसाठी आक्टोबर ते मार्चपर्यंत हे पक्षी कच्छच्या रणात राहतात. नेहमी न दिसणारे हे पक्षी या विशिष्ट वातावरणात स्थलांतर करताना वऱ्हाडी आदरातिथ्य उपभोगण्यासाठी तर येथे विसावले नव्हते ना? या, अग्निपंखानो केव्हाही या, तुमचे मनःपूर्वक स्वागत असो!

•••

२

# पोहऱ्याचा पहारेकरी

कल्पना करा, दिवसभर जंगल फिरून तुम्ही आपल्या राहुटीला येता व शेकोटीवर केलेली खिचडी मिरच्यामिठा सोबत खाता व आपल्या तंबूत निद्राधीन होता. रात्री अचानक माकडांचा कोलाहल होत असतो व काही दिवसांपूर्वी बघितलेली झाडावर टांगलेली शिकार, दचकून उठल्यावर तुमच्या दृष्टीसमोर येते, तेव्हा धडधडणारे हृदय मुठीत घेऊन तुम्ही बसता.

अशाच एका रात्रीची ही घटना आहे. आम्ही आमच्या टेंटमध्ये झोपल्यावर एकाएकी माकडांचे वार्निंग (भीती सूचक) कॉल कानावर पडले. तेव्हा थकल्या भागल्या शरीराला जाग आली. पौर्णिमेची रात्र होती, रात्रीचे अकरा वाजले होते. हवेत एक कुजकट वास पसरला होता. टेंटच्या समोरच्या जाळीतून बघितल्यावर दोन-तीनशे फुटावरील एका झाडावर माकडांच्या टोळीची अस्पष्ट हालचाल दिसत होती. त्या टोळीतील म्होरक्या नर हे वार्निंग कॉल देत असावा. तंबूतून आम्ही बाहेर आलो व त्या दिशेने जायचं की नाही, याचा विचार करू लागलो. पूर्वानुभवावरून, माकडाचे हे कॉल, एकतर मांसभक्षी प्राणी पाहिल्यावर किंवा एखादा विषारी साप दिसल्यानंतर होतात हे आम्हाला माहीत होते. पण, आठवड्यापूर्वीच्या पूर्वस्मृती व अनुभव डोळ्यासमोर उभे राहिले व त्यामुळे जायचं की नाही, याचा निश्चय करता आला नाही.

पौर्णिमेच्या आधीचे दिवस आणि रात्री आम्हा सगळ्यांना अरण्यओढ लागलेली असते व तेव्हा हमखास अरण्यवाचन केल्याशिवाय राहवत नाही. असेच एकदा अमरावतीजवळील पोहरा मालखेड जंगलामधे परिक्रमा करण्याचे ठरले.

पोहरा मालखेडचे जंगल हे अमरावतीच्या पूर्वेकडे स्थित आहे. ते अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाला पूर्व-पश्चिम असे पसरले आहे. तसेच बडनेरापासून ते तिवसा-चांदूर रेल्वेपर्यंत लांब असे व्यापलेले आहे. यात चिरोडीच्या डोंगर-टेकड्यांचा समावेश होतो. या शुष्क पानगळीच्या जंगलात साग, चारोळी, जांभूळ, मोह, पळस इत्यादी अनेक प्रकारचे वृक्ष आहेत, गवताची कुरणे आहेत व बांबूच्या रांजी आहेत. या जंगलाच्या क्षेत्रात अऱ्हाड-कुऱ्हाड, मालखेड, बासलापूर, घाटखेड, इंदला, शेवती, भिवापूर असे तलाव आहेत. या जंगलात बिबट, लांडगे, कोल्हे, कोकरी, तडस, चितळ, नीलगाय, ससे असे वन्यप्राणी आढळतात. मोर येथे मोठ्या संख्येने आहेत. या भागातील तलावावर पाणकावळे (कारमोरंट), छोटा मराल (लेसर व्हिसलिंग टिल), पांढऱ्या मानेचे करकोचे व बगळे हे पाणपक्षी नेहमी आढळतात; तर हिवाळ्यात स्थलांतरित पक्ष्यांचा वावर या तलावांवर आढळतो.

जानेवारी महिन्याच्या सकाळच्या गुलाबी थंडीत इंदला तलावाकडे आम्ही वाटचाल सुरू केली. रस्त्याने सात-आठ फूट उंचीचे गवत माजलेले होते. त्यातून अंदाजे वाट काढीत आम्ही तलावाचा किनारा गाठला. वाट नेहमीचीच असल्यामुळे विशेष त्रास झाला नाही. एके ठिकाणी मात्र गवत जमिनीवर पडलेले दिसले. येथे कोणत्यातरी वन्य प्राण्याने लोळण घेतली होती. तेथे थोडा उग्र वास जाणवला व मनात बिबट्याबद्दल शंका डोकावल्या. आम्हाला ऐकीवात होते की, पोहऱ्याच्या जंगलामध्ये बिबट आहे, पण आतापावेतो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष त्याची कुठलीच मुलाखत झाली नव्हती, पण या लोळणानं सगळ्यांना मनात उत्तेजना निर्माण झाली.

तलावावर पोहोचलो तेव्हा सूर्य बराच वर आला होता, हवेत बरीच ऊब आली होती आणि तलावावर पक्ष्यांचा वावर सुरू झाला होता. तलावाच्या पाण्यावर पातळसा धुक्याचा पडदा अजूनही रेंगाळत होता. तलावात असलेल्या बेटावर तीन-चार पानकावळे बसले होते. अजूनही त्यांची पाण्यात उतरायची तयारी नसावी. लेसर व्हिसलिंग टील (छोटा मराल) पक्ष्यांचा थवा अलीकडच्या काठाजवळील पाण्यात बुडी मारून भक्ष्य शोधण्यात मशगूल झालेला होता. उजव्या बाजूकडील काठावरील पाण्यात तीन चार चक्रवाक पक्षी फिरत होते व जोडीलाच तीन-चार बगळे काठावर मासे शोधीत होते. दूरवर तलावात एक स्पॉटबील डक (धनवर पक्षी) संथपणे पोहत होता. बाजूच्या डोंगरावरून मोरांची म्याऽऽउ म्याऽऽउ अशी

आर्त साद आली. आम्ही तलावावरील पक्ष्यांची छायाचित्रे घेतलीत. इतक्यात धरणाच्या भिंतीकडून आकाशातून पक्ष्यांचा एक थवा उडत आला व तलावावर एक गिरकी घेऊन तलावाच्या पाण्यावर फड्फड् आवाज करीत उतरला. त्यांची पाण्यावर उतरण्याची तऱ्हा व इतक्या वेगाने येऊनही पाय व पंखांनी क्षणार्धात स्थिर होण्याची कला कुठल्याही कुशल वैमानिकाला लाजवेल अशीच होती. मनसोक्त छायाचित्रण केल्यावर आम्ही मंडळी जंगलाच्या अंतर्भागात जायला निघालो. कॅमेऱ्यात फार थोडी फिल्म शिल्लक राहिली होती.

दाट रायमुनियाच्या झुडपांमधून वाट काढत आम्हाला जावे लागत होते. त्यामुळे कितीतरी दूरपर्यंत ओणवेच जावे लागले. काटेरी झुडपे आम्हाला ओरबाडीत होती. पुढे रस्त्याने एक ओहोळ लागला, तो ओलांडून आम्ही पुढे गेलो. इतक्यात वाऱ्याची एक झुळूक आली, त्या झुळूकेबरोबर मृत प्राण्याचा वास नाकात शिरला. आमचे बोलणे एकदम बंद झाले. हळूहळू कुजबुजत आम्ही जवळपास मारा (हिंस्र प्राण्याने शिकार करून मारलेला प्राणी) असावा काय, अशी आपसात चर्चा केली. जंगलातील आजवरच्या अनुभवाने अत्यंत सावकाशपणे त्या दिशेने आम्ही चालू लागलो, हृदय मात्र धडधडत होते. काही मित्रांच्या कपाळावर थंडीतही घर्मबिंदू चमकायला लागलेत. समोरील एका झाडावर कुठलातरी प्राणी झोपल्यागत दिसत होता. काही वेळापूर्वी गवतात पाहिलेल्या लोळणाची आठवण झाली व आम्ही तेथे स्तब्ध झालो. एक एक सेकंद मिनिटासारखा वाटत होता. पुढे जावे की नाही या संभ्रमात किती वेळ गेला कळले नाही. सगळ्यांचे कान सूक्ष्म आवाजाचा वेध घेत होते. त्या झाडावरील आकृती निश्चल होती. कुठल्याही हालचालीचा अभाव व आम्ही संख्येने इतके जण, त्यामुळे त्या झाडाजवळ जाण्याचा निर्णय आम्ही घेतला. आवाज न करता हळूहळू त्या झाडाजवळ गेल्यावर ती आकृती दृष्टिपथात आली तेव्हा हृदय थरारलं.

ते एक मृत चितळ होते, त्याचे चारही पाय फांदीवरून लोंबत होते व डोके शाबूत असून ते एका बाजूला झुकले होते. कुणी केली असावी ही शिकार? असा प्रश्न आमच्या मनात आला. तेव्हा बिबट्यानेच ही शिकार केली असावी, यात काही शंकाच नव्हती. कारण, बिबटच त्याने केलेली शिकार इतर मांसभक्षी प्राण्यांपासून (तडस, लांडगे, कोल्हे, कुत्रे) वाचवण्यासाठी झाडावर नेऊन ठेवतो. निश्चिंत होऊन, भूक लागल्यावर आवश्यकतेप्रमाणे खातो. मांजरवर्गातील

प्राण्यांपैकी फक्त मांजर आणि बिबटच झाडावर चढू व उतरू शकतो.

कारण, त्याच्या मागील पायांचे पंजे १८० अंशाच्या कोनात फिरतात व त्यामुळे झाडावरून उतरताना मदत होते. बिबटाने चितळाची शिकार करून इतर मांसभक्षी प्राण्यांपासून ती शिकार सुरक्षित राहावी म्हणून त्या चितळाला झाडावर नेऊन ठेवले होते.

सडलेल्या मासांचा वास आता जास्त तीव्र वाटत होता. इकडे तिकडे तीक्ष्ण नजर टाकीत आम्ही एकदाचे सुखरूपपणे झाडाखाली पोहोचलो. खाली जमिनीवर मऊ मातीत बिबट्याचे पगमार्क उमटलेले दिसत होते. ते बहुतेक चोवीस तासांपूर्वीचे असावेत. फटाफट कॅमेरे सज्ज झाले व त्या झाडावरील दुर्दैवी प्राण्याचे भरभर छायाचित्रण करताना कॅमेऱ्यातील रोल केव्हा संपला हे कळलेच नाही. त्यावेळी एका प्रसिद्ध छायाचित्रकाराने केलेल विधान आठवले, ते हे की, "छायाचित्रकारासाठी सगळ्यात स्वस्त गोष्ट म्हणजे फिल्मरोल्स, ते लागोत की न लागोत, ते मुबलक संख्येने जवळ असावेत." आमच्याजवळ रोल नव्हते. पश्चात्ताप जरूर झाला, पण उपाय नव्हता. एका बिबट्याने केलीली शिकार व तीही झाडावर ठेवलेली, आणि अकस्मात आम्हाला ती दिसावी असा योग क्वचितच येतो. तो आमच्या बाबतीत यावा याबद्दल आम्ही स्वतःला धन्य मानले व परतीची वाट धरली.

दुपारचे दोन वाजून गेले होते, उपाशीपोटी आणि खरचटलेलं अंग अशा स्थितीत आम्ही जंगलात तलावाकाठी असलेलं मोडकडीस आलेलं घर गाठलं. घर दुमजली होतं व भोवताली हिवराची, चारोळीची, शिंदीची, पळसाची झाडं होती. आम्ही थकल्याभागल्या अंगाने त्या घरात शिरलो. सोबत आणलेले जेवणाचे डबे व वॉटरबॅग्ज घेऊन वर मच्चावर पोहोचलो. सकाळपासून फिरण्याने शरीर आपला संदेश देत होते. जेवण केल्यावर जानेवारीच्या थंडीतील हव्याहव्याशा वाटणाऱ्या उन्हामध्ये केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. आम्ही वामकुक्षी घेत असताना आमच्यातील एकाला जाग आली व तो खाली जायला निघाला, पण खाली पोहोचायच्या आधीच वर पळत आला. त्याने आम्हा सगळ्यांना हलवून व ओठावर बोट ठेवून खुणा करीत सगळ्यांना जागं केलं व हाताच्या खुणेने काही दृश्य सांगण्याचा प्रयत्न केला. त्याच्या चेहऱ्यावरील भाव व हालचाली बघून आमची झोप कुठल्याकुठे पळाली. त्याने हातानेच दिशानिर्देश केला व आम्ही



सावध हरिणी



वृक्षावर टांगलेली चितळाची शिकार



प्रणयातून बिबट



वाट अडवणारा अजगर

जमिनीवर लेटूनच रांगत रांगत जाऊन गच्चीच्या कडेवरून जेव्हा खाली नजर टाकली तेव्हा आमचा थरकाप उडाला. खाली हिवराच्या झाडाखाली बिबट्याची एक नरमादीची जोडी पुढील पाय समोर लांबलेले व मागील पाय मागे लांबलेले अशा स्थितीत समांतर पोटावर पहुडले होते. ते आपल्या मस्तीत डोळे मिटून पहुडले होते.

आता आम्हाला हिवाळ्याचे कोवळे उन्हही बोचायला लागले होते व घामाने अंग भिजून गेले होते. कल्पना करा, जमिनीपासून दहा फूट उंचीवरील गच्चीत तुम्ही आहात व तेथून तीस फूट अंतरावर एक मदमस्त बिबट्याची जोडी पहुडली आहे व तुम्हाला पळून जाण्याचा कुठलाच मार्ग नाही. अशा वेळेस तुमची जी स्थिती होईल तशी आमची झाली होती. तशाही परिस्थितीत एक मित्र रांगत रांगत मागे गेला व त्या जोडीचे छायाचित्र काढण्याची त्याने तयारी केली. पण हाय! एकही फिल्म शिल्लक नव्हती. त्या बिचाऱ्याला आमच्याकडून नंतर काय काय बोलणी खावी लागली हा विषय वेगळा!

पण, आम्ही सर्व एका दुर्मिळ छायाचित्राला मुकलो होतो. थोड्या वेळाने उत्तेजितपणाची जागा भीतीने घेतली व या परिस्थितीमधे ती रात्र तेथेच काढावी लागेल काय, या शंकेने मन ग्रासले. एकाएकी एका मित्राची नजर रिकाम्या वॉटरबॅगकडे गेली व त्याने खुणेनेच आम्हाला इशारा केला की, आपण या बॅगा वाजवू व मोठ्याने ओरडू, असे सूचित केले. ''मरता क्या न करता''

सगळ्यांनी तयारी केली व आपआपल्या वॉटर बॅग आपापल्या हातात घेतल्या व वाजवायला सुरुवात केली. एकाएकी होणारे थडथड आवाज व बेंबीच्या देठापासून आम्ही केलेल्या बोंबा हे ऐकून ते जोडपं क्षणभर दचकलं व उठलं व दुसऱ्याक्षणी आमच्याकडे पाहत जवळच असलेल्या रायमुनियाच्या तटबंदीत विलीन झालं! आमचे वाजवणे व बोंबा बऱ्याच वेळपर्यंत सुरू होत्या. जेव्हा ते जोडपं जवळपास नसण्याची मनाची खात्री पटली. (खोटी का असेना!) तेव्हा आपापले चंबूगबाळे आवरीत भीतीग्रस्त मनाने व धडधडत्या हृदयाने इकडे तिकडे बघत आम्ही परतीचा रस्ता धरला. मनात एक आनंदयुक्त भीती अनुभवत परतीचा प्रवास करताना तेव्हा मनात अनेक विचारतरंग उठत होते. त्यात आतापर्यंत शुष्क समजल्या जाणाऱ्या या पोहऱ्याच्या जंगलात बिबट्याने केलेली शिकार बघायला मिळावी व एकच काय, पण बिबट्याची जोडी- तीही प्रणयधुंद अवस्थेत बघायला

मिळावी, याच्या आनंदाचे भरते येत होते. आणि अजून जंगल जिवंत आहे, याची साक्ष पटून मन उल्हसीत झाले होते.

काही महिन्यांनंतर वृत्तपत्रात एक बातमी आली की, पोहऱ्याच्या जंगलात 'वाघमाय'जवळ कुठल्यातरी वाहनाने बिबट्याचा बच्चा चेंगरला गेला. ही बातमी वाचताक्षणी प्रणयाने धुंद त्या मस्तवाल बिबट्याची जोडी डोळ्यापुढून सरकली. 'हेचि फळ काय मम तपाला' या भावनेतील ती बिबट्याची मादी आठवली. पोहऱ्यातील एक पहारेकरी कमी झाला होता.

वरील घटना घडल्यानंतर पाच-सात दिवस उलटून गेले होते. त्या रात्री आम्ही जंगलातील दुसऱ्या भागात मुक्कामाला होतो. रात्रीचे अकरा वाजले होते. चंद्र पूर्वेकडील डोंगराआडून बराच वर आला होता. रात्रीचे अकरा वाजले होते आणि आम्ही त्या वानराच्या झाडाच्या दिशेने वाटचाल सुरू केली होती. एकदम मनात विचार आला, आपण मागील वेळी घराच्या गच्चीवरून त्यांना बघितलं होतं. आता या वेळेस रात्रीच्या अंधारात तेथे पोहोचणे किती योग्य ठरेल! जर तेथे माकडांना तो पोहऱ्याचा पहारेकरी दिसला असेल आणि तो तिथे शिकार करायच्या तयारीत असेल किंवा शिकार खात असेल तर आमच्या तिथे जाण्यामुळे तो बिचकेल व त्याची शिकार साधायची संधी हुकेल किंवा शिकार खात असेल. तर पुढ्यात शिकार असूनसुद्धा भुकेल्या पोटी त्याला तेथून निघून जावे लागेल. त्याच्या राज्यात आम्हा आगंतुकांमुळे त्याच्या नित्याच्या कामात व्यत्यय येईल. तसे आम्ही एकदा त्याच्या प्रणयात व्यत्यय आणल्याने अपराधी होतोच, त्यामुळे आम्ही विचार बदलला व तेथे सकाळी जायचे ठरवले. तंबू उचलून सुरक्षित जागी ठेवला व धडधडत्या अंतःकरणाने केव्हा झोप लागली ते कळलेच नाही.

सकाळच्या प्रहरी पक्ष्यांच्या किलबिलाटाने जाग आली व रात्रीचे आवाज आठवले सकाळच्या कोवळ्या सोनसळी उन्हात त्या झाडाकडे आगेकूच सुरु केली. झाडावर माकडांचे नामोनिशाण नव्हते. पण, एक कुबट वास तेथे पसरला होता.

झाडाखाली नुकत्याच वखरलेल्या शेतीच्या मातीत बिबट्याचे पगमार्क एकाएकी आमच्या निदर्शनाला आले आणि मनात विचार आला, बरं झालं रात्री आलो नाही. त्या पगमार्कचा मागोवा घेत आम्ही जवळच असलेल्या नाल्याजवळ पोहचलो. तेथे दोन गाई मरून पडल्या होत्या. बाजूलाच एक नीलगाय मरून

पडली होती. तिचा बराचसा भाग खाल्ला होता व हाडे व चामडी याचा सांगाडा शिल्लक राहिला होता. दोन्ही गायींची पोटे फुटून आतील भाग बाहेर आला होता. त्या अवशेषातून प्लॅस्टिकच्या बॅगांचा गोळा बाहेर आला होता व त्या इतस्तः विखुरल्या होत्या. या प्लॅस्टिकच्या बॅगांमुळे पर्यावरणच काय, पण पाळीव प्राण्यांवरसुद्धा किती भयानक परिणाम होतात, याचे एक जिवंत प्रमाण दिसत होते. वाटलं, या प्लॅस्टिकपायी या गायींचा अकाली मृत्यू अटळ होता. त्यामुळे प्रशासनाने प्लॅस्टिक बॅगवर घातलेली बंदी सयुक्तिक वाटली.

एकदम इतके प्राणी मृत झालेले पाहिले आणि मनात विचार आला की, एकावेळी एवढे प्राणी बिबट मारू शकत नाही व कुठेही झटापटीच्या खुणा नव्हत्या. मग हे प्राणी कशाने मेले असावे? असा प्रश्न मनात आला. त्या प्राण्यांच्या अवशेषांच्या बाजूने एका कोरड्या नाल्यामध्ये पाण्याचा एक जिवंत स्रोत होता व त्यातून एक डबके तयार झालेले होते. चौकशीनंतर असे कळले की, त्या परिसरात जंगली प्राण्यांना व गुरांना पाणी पिण्यासाठी तेच एक ठिकाण होतं आणि कोणत्यातरी नराधमाने वन्य प्राण्यांच्या शिकारीसाठी त्या डबक्यातील पाण्यात युरिया टाकला होता व ते पाणी प्याल्यामुळे त्या पाळीव गुरांसोबत एका सुंदर नीलगाईचापण मृत्यू झाला होता. मन खूप हळहळलं. त्या प्रकाराची तक्रार वनखात्यात नोंदवली.

बिबट्याच्या एका पिलाचा मृत्यू व निष्पाप नीलगाईचे असे मरण हे पाहून जंगलाचं विध्वंसापासून रक्षण करणाऱ्या पोहऱ्याच्या पहारेकऱ्याचं सुंदर जोडपं कुठवर कार्यक्षम राहू शकेल, हा विचार मनात आला व मन विषण्ण झालं. माणसाने आपली स्वार्थी व संधिसाधू वृत्ती बदलावी व या विराण जंगलाला त्याचं पूर्वरूप यावं, अशी अपेक्षा ठेवण्याशिवाय आपण काय करू शकतो?

●●●

## ३

# बेलकुंडची बखर

मेळघाट हा परिसर अमरावती जिल्ह्याच्या उत्तर-पश्चिम दिशेला व तापी नदीच्या दक्षिणेकडे पसरला आहे. उंचच उंच पर्वत, त्यावर चिखलदरा, माखला ही थंड हवेची ठिकाणे, आदिवासींची छोटी छोटी गावे, अनेक खोल निर्जन खोरे व त्यात वाहणारे पावसाळी नद्या-नाले आणि सर्वदूर पसरलेली घनदाट जंगले. या जंगलांत विविध झाडे व वनस्पती असल्या, तरी इंग्रजांनी मूळ जंगल तोडून लागवण केलेली सागाची झाडे सर्वदूर पसरलेली दिसतात. असे म्हणतात की, इथल्या विशिष्ट वातावरणामुळे येथे अत्यंत उच्च प्रतीच्या सागाची निर्मिती होते. अशी उत्कृष्ट प्रतीची लाकडे, इंग्रज आपल्या आरमारासाठी वापरायचे. इंग्रजांनी नैसर्गिक वनांची कतल करून सागाची लागवड १५० ते २०० वर्षांपासून करायला सुरुवात केली आणि मेळघाटातील पर्यावरणाच्या ऱ्हासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या झाडाची फळे कुठलाच पक्षी खात नाही. या झाडाची पाने कुठलाच प्राणी खात नाही. झाडांची लागवड उभ्या व आडव्या सरळ रेषेत केल्याने वन्यप्राण्यांना घड लपतासुद्धा येत नाही. अशा या पर्यावरणाला मदत न करणाऱ्या व्यवसायी झाडाच्या अतिक्रमणामुळे मेळघाटातील तृणभक्षी प्राणी, पक्षी व त्यावर अवलंबून असणारे इतर प्राणी आज ओघाओघाने कमी दिसतात यात काही नवल नाही. आजही जेथे जेथे नैसर्गिक वने शिल्लक राहिलीत तेथे मेळघाटातील खरे सौंदर्य बघायला मिळते.

आमचे मित्रमंडळ म्हणजे श्री. पद्माकर लाड (विद्युत मंडळात अभियंता), डॉ. मनोहर खोडे (जिल्हा परिषदेत आरोग्य विभागात), श्री. शिरीषकुमार पाटील

(विद्युत उपकरण दुरुस्तीचा स्वतंत्र उद्योग) व श्री. ज्ञानेश्वर दमाहे (व्यवसाय शाळेत प्रशिक्षक). आमच्या व्यवसायात जरी अशी विसंगीत असली, तरी सर्वांना एकत्र आणायला निसर्गावरील निःस्पृह प्रेम हाच एक प्रबळ दुवा. पद्माकर, टिपणे नोंदवणे व लिखाणात वाकबगार, तर मनोहर छायाचित्रणात तरबेज, कुमार अत्यंत चिकित्सक व कामसू, तर दमाहे म्हणजे हास्य आणि शीघ्र कवी, लेखक व पट्टीचा कथाकार. तरीही अशा या विविध व्यक्तिमत्त्वात निसर्गनिरीक्षणात हवी असलेली वैशिष्ट्ये शिगोशिग भरलेली आहेत.

चंद्राच्या ओढीमुळे पौर्णिमेला जशी समुद्राला भरती येते, तशीच पौर्णिमा जसजशी जवळ येते तसतसे जंगलाच्या ओढीमुळे आम्हा पाचांच्या उत्साहाला उधाण येते. बाकी पौर्णिमेच्या रात्री जंगलाचं सौंदर्य काही औरच! वनश्री जशी प्रियकराच्या भेटीसाठी नटली सजलेली षोडसी, चंद्र प्रतिबिंबांना आपल्या अपरिमित पानांवर कवटाळण्यासाठी आतुर!

पावसाळा नुकताच संपला होता आणि ऑक्टोबर महिन्यातील पौर्णिमेच्या मुहूर्तावर आम्ही बेलकुंडचा मार्ग धरला. तसे बेलकुंडला जायला तीन मार्ग आहेत. पहिला दर्यापूर-आकोट-बेलकुंड, तर दुसरा परतवाडा-घटांग-हरिसाल-बेलकुंड आणि तिसरा परतवाडा-परसापूर फाटा-अंबापाटी ते बेलकुंड. अंबापाटीवरून जाणारा रस्ता मेळघाटचे डोंगर आणि पठार यामधून जातो. या मार्गावरील एका छोट्या टेकडीवरून जाताना समोर नजर खिळवून टाकणारं दृश्य दिसतं. सरळ दोन हजार फूट उंचीच्या पर्वत रांगा, चिखलदऱ्याची ओळख सांगणारे वायरलेस टॉवर आणि तेथील थोडी फार अंधुक दिसणारी घरे. थोडे उजवीकडे बघितले की, डोंगराच्या कपारीवर स्वतःचा तोल सांभाळीत उभा असलेला गाविलगड किल्ल्याचा परकोट आणि या सर्वांकडे दिमाखात बघणारी व नजर खिळवणारी वास्तू म्हणजे राणीचा महाल. सायंकाळच्या सोनेरी किरणांत या वास्तूचे सौंदर्य काही औरच! जणू तांबड्या-पिवळ्या वेषातली मेळघाटची राणी! रस्त्याच्या वळणा-वळणावर गवळी व कोरकूंची अनेक सुंदर गावं लागतात. त्या गावातील विशिष्ट शैलीतील ती घरे जणू गाविलगडचा इतिहासच सांगून जातात! गवताने शाकारलेल्या अशा दोन खोल्यांचं टुमदार घर, समोर एक ओसरी, ओसरीवर जातं, दगडाचे उखळ व भिंतीला हमखास उभं असलेलं एक लाकडी मुसळ. पाय उरी घेऊन बसलेलं एक पिकलेलं आयुष्य, शेणानं सारवलेल्या समोरील अंगणात

तेवढीच शेणानं माखलेली तिची ती नातवंडे. खोल पोटी आधुनिक संकल्पनांना दाद न देणारी त्यांची अनवाणी पावलं. आपल्याच तालात बागडणारी ती मुलं बघून त्यांच्यासारखी सुखी तीच, ही भावना मनाला चाटून जाते व थोडी असूया वाटते. स्वच्छंद जीवनाची खरी परिभाषा आम्हा सुसंस्कृतापेक्षा या चिमुकल्यांना जणू कळली आहे!

मार्ग पुढे सरकतो. जाताना गाई-गुरांचे कळप व अनेक सामाजिक कुत्री या रस्त्यावर सहज उभी असलेली आढळल्यावर गाडीतील लोकांना त्याची चीड येणे स्वाभाविक आहे. परंतु, गाडीच्या एका हॉर्नवर रस्ता मोकळा करण्याची त्यांची प्रवृत्ती बघितल्यावर ती बिचारी जनावरे किती संवेदनशील आहेत हे जाणवतं. याउलट रस्ता कायमचे अडवणारे व कशालाही दाद न देणारे आम्ही.

अंबापाटी हे गाव ओलांडल्यावर चढावाचा घाट लागतो व त्यासोबत या अतिविशाल मेळघाटच्या वनराईची झलक दाखवणारं घनदाट जंगल. इथे नाल्यांना पुलाऐवजी केवळ खोलगट रपटी आहेत. त्यावरून झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहात गाडीला आपोआपच आंघोळ होते. हा घाट पुढे आकोट-हरिसाल मार्गाला मिळतो. येथून उजवीकडे वळल्यावर खरा डोंगररस्ता सुरू होतो. हा मार्ग तसा समतलच पण खूप नागमोडी आहे. या मार्गाला लागल्यावर आम्ही सायंकाळी अंदाजे सात वाजता बेलकुंड वनविश्रामगृहाला पोहोचलो.

इंग्रजांच्या व्यापारी दृष्टीने म्हणा किंवा विलासी वृत्तीने म्हणा, अख्खे मेळघाटच सुंदर सुंदर वनविश्रामगृहांनी भरलेलं आहे. जसे रायपूर, चौराकुंड, रंगुबेली, कोकटू, चिखलदरा, माखला, तारूबांदा, कोलकास, ढाकना, गुल्लरघाट वगैरे. ही सर्व वनविश्रामगृहे इंग्रजांनी वनसंपत्ती प्रशासनासाठी जरी बांधलेली होती, तरी त्यातली विलायती झाक आजही सहज दिसून येते. या सगळ्यांत अत्यंत आगळे--वेगळे दिसणारे विश्रामगृह म्हणजे बेलकुंडचे! तेव्हाच्या पी.डब्ल्यू. डी. ने आकोट ते हरिसाल रस्त्याचे बांधकाम १९व्या शतकाच्या शेवटी शेवटी म्हणजे १८८० च्या आसपास 'गडगा' नदीच्या काठाकाठाने पहाड खणून तयार करायचे योजिले. त्या काळातच या विश्रामगृहाची पायाभरणी झाली असावी. हरिसालचा हा रस्ता अत्यंत ठिसूळ व सरळसोट असे डोंगर कापून तयार केला आहे. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर दरडी कोसळण्याच्या अनेक घटना घडतात. त्यामुळे बरेचदा हा रस्ता वाहतुकीला बंद असतो. आकोट ते हरिसाल हे अंतर जवळपास



विलायती झांक असणारे विश्रामगृह (बेलकुंड)



एका कमानीचा सुंदर पूल (बेलकुंड)



रात्रीला ओरडणारे सांबर



रस्त्यात भेटलेला रानगवा

७६ कि. मी. आहे आणि या दोन्ही गावांच्या बरोबर मध्ये हे बेलकुंडचे विश्रामगृह आहे. विश्रामगृहाजवळच बेलकुंडचा नाला गडगा नदीला मिळतो. ही जागा इंग्रजांनी अशा खुबीने निवडली आहे की, मुख्य रस्त्यापासून जरी ती २००-३०० फुटावर असली, तरी माहितगाराला विचारल्याशिवाय तुम्हाला ही वास्तू दिसरणारच नाही! वनविश्रामगृहाच्या तिन्ही बाजूने उंचच उंच सरळ अशा पर्वतरांगा व पूर्वेस २५० ते ३०० फूट उंचीचा डोंगर. या डोंगरा पलीकडे गडगा नदीला समांतर गेलेला मुख्य रस्ता आहे. अशामुळे इंग्रजी 'G' सारखी रचना येते. डोंगराच्या घळीतून विश्रामगृहाकडे जाणारा छोटा रस्ता या 'G' मध्ये प्रवेश करतो.

'बेलकुंड' हे नाव कदाचित या परिसरातील नदी व नाल्यातले अनेक कुंड व सोबतीला वाढणाऱ्या बेलांच्या झाडांवरून पडले असावे. विशेष म्हणजे या परिसरात सागाची झाडे औषधालाही मिळणार नाही! विश्रामगृहाच्या बाजूने वाहत येणारा नाला व गडगा नदी जेथे मिळतात तेथे गडगेचा धबधबावजा प्रवाह एका खोल ६० ते ७० फूट व्यासाच्या कुंडात पडतो. हे गोल कुंड बरेच खोल आहे व बाराही महिने त्यात पाणी असते. त्यामुळे वन्यप्राण्यांचे आवडीचे ठिकाण. गडगा नदी पुढे याच पर्वतांच्या खोऱ्यातून वाहत जात तापी नदीला मिळते.

बेलकुंडचे वनविश्रामगृह हे पूर्ण दगडांचे असून १८९१ साली बांधल्याचा दगड इमारतीवर अजूनही स्पष्ट दिसतो. अशी ही भरभक्कम वास्तू चार-पाच फूट उंचीच्या जोत्यावर उभी असून उत्तरमुखी आहे. तिच्या उजव्या बाजूला म्हणजे पूर्वेला वाहणारी गडगा पुढे वळसा घेऊन पश्चिमेकडे वाहत जाते. मुख्य रस्त्यावर विश्रामगृहाच्या थोडे पुढे एका कमानीचा जवळपास ५० फूट उंचीचा सुंदर व मजबूत असा पूल त्याच काळात म्हणजे १८८६ मध्ये बांधला असा माहितीवजा ओतीव लोहपट अजूनही उत्तम स्थितीत आहे. पावसाळ्यात गडगा नदीचा भक्कम प्रवाह जेव्हा पुलाच्या कमानीखालून वाहतो तेव्हा त्याचा गडगडाट (!) त्या खोऱ्यात मावत नाही. अशा या निसर्गरम्य व नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीत वसलेलं हे बेलकुंड आमच्या जंगलभेटीतील अत्यंत आवडतं ठिकाण. नसेल तरच नवल!

विश्रामगृहाच्या मागेच एका कुणाची तरी मजार आहे. जरी बेलकुंडपासून २५ कि.मी. च्या परिसरात कोणतीही मनुष्यवस्ती नसली, तरी तेथे अनेक हिंदू-मुस्लीम भाविक आवर्जून दर्शनाला येतात. भाविकांना मार्गदर्शन व इतर सोपस्कार

करण्यासाठी एक प्रसन्न व्यक्ती आहे. पांढरेस्वच्छ धोतर, सदरा व टोपी. गुळगुळीत दाढीमिशा केलेली, गंभीर चेहऱ्याची व सदैव मदतीस तयार असणारी, ही वयाच्या साठीतील व्यक्ती म्हणजे श्री. गणपतराव सोळंके. जंगलातल्या जडीबुटींचा व औषधी वनस्पतींचा यांचा गाढा अभ्यास आहे. वर्षातल्या एका विशिष्ट दिवशीच ते औषधी वनस्पती गोळा करतात. वेडसर बाया व इतर व्याधीने ग्रस्त मंडळी इलाज करण्यासाठी या व्यक्तीकडे येतात. जडीबुटीबरोबरच मंत्र-तंत्राने ते उपचार करतात व त्यावर लोकांचा गाढा विश्वास. त्यापैकी किती बरे होतात देव जाणे!

रीतसर रिझर्वेशन केल्यानंतर जेव्हा जेव्हा आम्ही बेलकुंडला पोहोचतो तेव्हा गणपतराव जर दिसले नाहीत तर चुकल्यासारखं वाटतं. जणूकाही ते बेलकुंडचे एक अविभाज्य अंग! सुदैवाने या विश्रामगृहाच्या बाहेर हापसी असल्यामुळे पाण्याचा प्रश्न कधीच भेडसावत नाही. परंतु, आज रात्री मात्र विश्रामगृहाचा खानसामा बाजारात गेल्यामुळे जेवणाचा प्रश्न उभा राहिला. प्रवासातील अनेक अनुभवामुळे भांडीकुंडी, शिधाआटा आम्ही नेहमीच बरोबर बाळगतो. स्वयंपाकासाठी टॉर्चच्या प्रकाशात काटक्या आणल्या व तीन दगडावर खिचडीचं भांडं ठेवलं. विश्रामगृहाच्या पूर्वेकडील डोंगरावर चंद्र डोकावयाला लागल्यानंतर मात्र हायसे वाटलं. कारण जंगलाच्या अंधारात चिमुकल्या टॉर्चला अनेक मर्यादा असतात. टिपूर चांदण्यात आता खिचडी छान शिजत होती. सोबतच उद्याच्या कार्यक्रमाची आखणी केली आणि बेलकुंड व त्याच्या परिसरात पक्षीनिरीक्षणाचा बेत निश्चित केला.

विश्रामगृहात आमचे एकाच कक्षाचे आरक्षण असल्यामुळे बाकी मंडळींनी बाहेर तंबू लावून झोपायचे ठरवले. आम्ही आमचा तंबू उभारून व त्याला व्यवस्थित बंद करून झोपायच्या तयारीला लागलो. तंबूच्या जाळीतून बाहेरचा पिठूर चंद्रप्रकाश व त्यात न्हाऊन गेलेले जंगल बघता बघता केव्हा झोप लागली कळलेच नाही. अचानक मध्यरात्री सांबराच्या पाँऽऽग पाँऽऽग अशा ओरडण्याने जाग आली. सर्व बाजूच्या उंच डोंगरांमुळे तो आवाज चांगलाच घुमत होता. असे आवाज विरत नाही तोच दुसऱ्याच क्षणी वाघाच्या डरकाळीचा आवाज ऐकू आला. आम्ही पटकन उठून बसलो व घड्याळ पाहिले, रात्रीचा एक वाजला होता. झोप पार उडाली आणि ह्रदयाची धडधड वाढली. तोंडातून शब्द फुटत नव्हते. सांबराचा आवाज आता अजून वाढायला लागला, त्यावरून

सांबर तंबूच्या दिशेने येत असावे असे वाटले. आमचा अंदाज खरा ठरला. ते सांबर धावत धावत येऊन तंबूपासून पाच फुटावर थांबलं आणि फिरून आलेल्या रस्त्याकडे बघत परत पॉंऽऽग पॉंऽऽग आवाज करू लागले. सांबर पुढील पाय आपटताना आता आम्हाला दिसत होतं. बहुतेक ते दुसऱ्यांना व आम्हाला धोक्याचा इशारा देत असावं. क्षणभर वाटलं या सांबराचा मागोवा घेत जर वाघोबा येथे आलेत तर! आमच्या तंबूचं गबाळे व्हायला वेळ लागणार नाही. परंतु, आमच्या व सांबराच्या सुदैवाने तसं काही घडलं नाही (तंबूसमोर तरी). थोडावेळ ओरडून ते परत फिरलं व ओरडत ओरडत लांब निघून गेलं. जंगलात परत नीरव शांतता परतली. रातकिड्यांचा कर्कश आवाज परत जाणवायला लागला, त्यापेक्षाही आमच्या छातीतली धडधड आणि जलद चालणाऱ्या श्वासोच्छ्वासाचा आवाजच जोराने येत असावा.

बऱ्याच वेळाने अंग टाकलं. झोप जरी पार उडाली होती तरी दिवसभराच्या थकव्यामुळे व सांबराच्या विचारात केव्हा निद्राधीन झालो ते कळलेच नाही. सकाळच्या शांत प्रहरी जाग आली. नुकतेच उजाडायला लागलं होतं. चंद्राचं मोठ्ठ बिंब डोंगराआड जात होतं. सकाळी चहा घेत गप्पा मारताना गणपतरावांना रात्रीचा अनुभव सांगितला तेव्हा त्यांनीही त्या गोष्टीला दुजोरा दिला. नंतर रात्रीची शिल्लक राहिलेली खिचडी पोटात ढकलून सगळी आयुधे म्हणजे कॅमेरे, दुर्बिणी गळ्यात अडकवून आम्ही गडगेच्या कुंडाचा रस्ता धरला.

कुंडाचा मार्ग विश्रामगृहाच्या बाजूने जाणाऱ्या हरिसाल मार्गावर आहे. मागे उल्लेखित पूल ओलांडल्यानंतर जेव्हा तुम्ही डावीकडे वळता तेथे तुम्हाला रस्त्याच्या कडेला दोन मंदिरे दिसतील. त्यातील एकाच्या बाहेर शंकराचं त्रिशूळ व बाजूनं बेलाचं झाड आहे. थोडे पुढे सरकलात तर कुण्या एका निसर्गप्रेमी प्रसिद्धिपराङ्मुख कवीने या परिसरावर लिहिलेल्या सुंदर व समर्पक कवितेचा फलक दिसेल-

'हिरवे हिरवे रान पसरले
डोंगर माळांनी अणू वेढले
त्यात उभे हे कुंड चिमुकले
नयनी बघता भान हरपले.'

देवळाच्या मागच्या दरडीवरून कुंडाकडे एक सरळ खोल पायवाट जाते. नवख्यांना मात्र या पायवाटेवरून उभ्या उभ्याने उतरणे अशक्य! खडकाच्या खोबणीत

पाय रोवून, हाताने खडक धरून खाली उतरताना कसरत करावी लागते. या खडतर उतरणीनंतर मात्र डावीकडे बघितल्यावर कुंडाचे रमणीय दृश्य दिसते. कुंडावरील खडकावर प्रवाहाच्या वेगवान गतीमुळे गोलसर खोल झऱ्या पडल्या आहेत. या मार्गाने फिरत येत गडगेचा फेसाळ प्रवाह दहा फुटावरून कुंडात पडतो. तिन्ही बाजूंनी १० फूट उंचीच्या 'C' च्या आकाराच्या उभ्या कड्या व मध्ये ६० फूट व्यासाचे शांत कुंड आणि या सौंदर्यात भर म्हणजे कुंडाच्या मागच्या बाजूला बेलकुंड पुलाची बुलंद दरवाजासारखी दिसणारी भव्य कमान.

कुंडातील थंडगार पाण्यात स्नान केल्यावर आम्ही प्रवाहाच्या खालच्या दिशेने जाऊ लागलो. पुढे हा प्रवाह जवळपास दहा-पंधरा फूट उंचीच्या कड्यावरून परत खाली कोसळतो. कड्याचा उभा भाग खूप गुळगुळीत वाटला. बघतो तर काय...! दोन-तीन इंच लांबीचे तीस-चाळीस मासे खडकाला चिकटून हळूहळू वर रेंगताना दिसले. प्रवाहातून उलट्या दिशेने उड्या मारताना खूप मासे पाहिलेत परंतु दरडीवरून रेंगणारे प्रथमच पाहत होतो. माशाला पाय नसतात, तरी ते निसरड्या दरडीला कसे धरून ठेवत असतील, याचे आकलन आम्हाला झाले नाही. मासा पकडून बघायची इच्छा झाली, परंतु दरडीमुळे त्याच्यापर्यंत हात पोहोचत नव्हते. पाण्याशिवाय राहणारा म्हणजे अँफीबियन प्रकारातला जलचर असावा असे वाटले. एकतर तो शरीरातून निघणाऱ्या चिकट स्रावाने खडकांना चिकटत असावा, किंवा त्याला पालीच्या तळव्याक्षम असा अवयव असावा. तो मासा कोणत्या जातीचा होता ते कळले नाही. या कड्यानंतर चांगली दाट झाडी सुरू होते. मेळघाट हे तर पक्ष्यांचं नंदनवनच. नवीन नवीन पक्षी आढळल्याच्या नोंदी येथून सतत येत असतात. रानपिंगळा (फॉरेस्ट ऑउलेट) याचा नामशेष पक्ष्यात उल्लेख आलेला आहे. त्यामुळे बेलकुंडच्या विशिष्ट पर्यावरणात हा दुर्मिळ रानपिंगळा शोधण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करायचे ठरले. या शोधात नदीच्या काठाकाठाने खोल जंगलात शिरलो. एका झाडावर सर्पगरुडाने (क्रेस्टेड सर्पंट ईगल) दर्शन दिले. भरपूर भटकंती झाली, परंतु या रानपिंगळ्याने आजही हुलकावणी दिली. थकल्याभागल्यावर विश्रामगृहाला परत आलो.

आज खानसामाने चविष्ट जेवण दिले. त्यावर यथेच्छ ताव मारल्यावर थोडी पेंगायची इच्छा झाली. परंतु, आमचा डाव दमाहेने पार उधळून लावला आणि दुपारचे तीन वाजताच्या भर उन्हात आम्हाला जंगलभ्रमंती करावयास भाग पाडले.

आतापर्यंत सुखी संसारातील सहचाऱ्याप्रमाणे सोबत-सोबत चालणारा रस्ता व गडगा नदी, बेलकुंडनंतर मात्र अचानक एखाद्या वादग्रस्त दाम्पत्याप्रमाणे एकमेकांना छेद द्यायला सुरुवात करतात. उजवीकडून वाहणारी नदी, कधी डावीकडे तर कधी उजवीकडे आपला मार्ग बदलायला लागते. नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूने गगनचुंबी डोंगर आणि वरपर्यंत उंचच उंच झाडांनी साकारलेले घनदाट जंगल पसरलेले आहे. काही झाडांच्या खोडावर अस्वलाने नखे साफ करण्याच्या निमित्ताने किंवा वर लटकलेल्या मधमाश्यांच्या पोळ्याच्या ताब्यासाठी (!) मारलेल्या खुणा, तर कुठे एकाच झाडावर विविध पक्ष्यांच्या अनेक आरक्षित ढोली. या निसर्गसौंदर्याची मजा लुटत आम्ही चार कि.मी. अंतर केव्हा कापले ते कळलेच नाही. पुढे रस्ता एका डोंगराच्या हेअर पिनच्या आकाराच्या दरीतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळतो. येथवर आम्ही पोहोचत नाही तोच अकस्मात आभाळ भरून आले आणि जोराचा चक्रवाती पाऊस सुरू झाला. नुकतीच रखरखत्या उन्हात तापलेली घामट अंगे सुखावून गेली. आता थंड वारे जोरात वाहायला लागले आणि त्या गारव्याने शरीरात हुडहुडी भरू लागली. तो मेघाचा आनंद काही वेळच राहिला. आता आम्ही पूर्ण ओलेचिंब झालो होतो, परंतु हा पाऊस थांबायचे नाव घेईना. एक तास पावसाचे थैमान सुरू होते आणि पाऊस जसा एकाएकी आला तसाच अकस्मात थांबला. आम्ही परतीचा प्रवास सुरू केला. अंगात ऊब येण्याकरिता आता चालण्याऐवजी धावू लागलो. थोडे अंतर धावत नाही तोच समोर धावणारा एकदम थांबला व ओठावर तर्जनी ठेवून आम्हाला शांत राहायची खूण केली. पुढे काही तरी असावे, हे समजायला आम्हाला वेळ लागला नाही. आम्ही हळूहळू त्या ठिकाणी जमा झालो. नदीच्या खोल पात्रात जंगलात शंभरएक फुटावर त्यांनी दाखवलेल्या दिशेने जे काही बघितले त्याने आम्ही स्तंभित झालो. एक आडदांड नर रानगवा, ज्याला एकुल म्हणतात, मस्तपणे चरत होता. नुकत्याच आलेल्या पावसाने त्याचे शरीर मस्त चकाकत होते. खाण्याच्या तंद्रीत तो हळूहळू आमच्या दिशेने येत होता. साठएक फूट आल्यावर त्याचे अचानक आमच्याकडे लक्ष गेले आणि पाण्यात भिजलेल्या, विसकटलेल्या केसांच्या मूर्ती बघून तो गोंधळला आणि क्षणात मागे फिरून अत्यंत जोराने उधळत समोरील उंच डोंगरावर चढून गेला. एवढ्या मोठ्या, एक-दीड टन वजनाच्या, धुडाच्या या अत्यंत चपळ हालचाली आणि क्षणात वेग घेण्याची

क्षमता रेस मधे धावणाऱ्या घोड्यालाही लाजविणारी होती. रानगवा बघता बघता रानात दिसेनासा झाला. आम्ही अचंबित मनाने परतीचा मार्ग धरला. गडगेला आता चांगलाच पूर आला होता. तिचं स्वच्छ असणारं पाणी आता गढूळ झालं होतं. तिचे छोटेछोटे धबधबे दिसेनासे झाले होते. परंतु, सभोवतालच्या पाण्यात निर्माण केलेल्या तांडवातून आपले अस्तित्व दर्शवित होते. जेव्हा बेलकुंडच्या पुलाजवळ पोहोचलो, त्या खालून वाहणाऱ्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहाचे रौद्र रूप, जोम आणि कर्णभेदी आवाजांचे वर्णन शब्दापलीकडले आहे. वाटलं, चिमुकली गडगा जणू यौवनाच्या मस्तीत आली आहे. विश्रामगृहाला पोहोचता पोहोचता चांगलंच अंधारून आलं होतं. निरभ्र व स्वच्छ आकाशात आता पावसाचे कुठलेही चिन्ह नव्हते. रात्रीला थंडी जाणवायला लागली होती. अशा या वातावरणात शेकोटीभोवती बसून गप्पा मारायची मजा काही औरच असते. त्या सुखद उबेत जेवणाची वेळ केव्हा झाली हे कळलेच नाही. जेवतानाच दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम ठरला आणि रेस्ट हाऊसच्या दक्षिणेकडील भागात पक्षी-निरीक्षण करायचे ठरवले.

विश्रामगृहाच्या मागे असलेल्या डोंगराच्या काठा-काठाने जाणाऱ्या रानवाटेने सकाळची भ्रमंती सुरू केली. जाताना टकाचोर, स्पॉटेड मुनिया व टेलर बर्ड या पक्ष्यांचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. रस्ता बराच अवघड व कालच्या पावसामुळे निसरडा झाला होता. या पायवाटेच्या दोन्ही बाजूने तीन-चार फूट उंच गवत वाढलेलं होतं व बरचसं वाटेवर लोळत होतं. अशा वेळी डोंगरवाटेच्या चढावावर व उतारावर विशेष काळजी घ्यावी लागते. कारण उभं गवत जेव्हा ओल्या रस्त्यावर पडतं तेव्हा तो मार्ग अधिकच निसरडा होतो. हळूहळू तोल सांभाळीत चालताना, अचानक एका हसण्याच्या आवाजाने आमचे लक्ष वेधून घेतले. पद्माकर हळूच म्हणाला, "अरे, हा तर सोनपाठी सुतार (गोल्डन बॅक उडपेकर) पक्ष्याचा आवाज आहे." सगळ्या दुर्बिणी डोळ्याला लागल्या व निरीक्षण सुरू झाले. पन्नास साठ फूट अंतरावरील शिंदीच्या एका झाडाच्या खोडावर स्वारी भक्ष्य शोधतांना दिसली. पिवळसर सोनेरी पाठ व डोक्यावर डौलदार लाल रंगाचा तुरा असलेला हा मोहक पक्षी झाडाच्या खोडावर कधी सरळ जात नाही, तर त्याभोवती फिरत फिरत वर चढतो, या पक्ष्याचे रूप डोळ्यात साठवल्यावर आम्ही पुढे सरकलो. झाडीतून थोडाथोडा प्रकाश दिसायला लागला आणि अस्पष्ट




सोनपाठी सूतार



रानवेड्यांचा क्षणभर विसावा



बेलकुंडचा धबधबा



कपारी कपारीवरून कोसळणारी नदी (बेलकुंड)

असा पाणी पडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. आम्ही थोडे अचंबितच झालो. अशा कोरड्या दिवशी या नाल्याला कसा पूर आला असेल? थोडे पुढे चालून गेल्यावर झाडी व गवत संपले आणि समोर एक काळा कडेवजा किनारा दिसला. आम्ही उभे होतो तेथून उतार संपल्याबरोबर काळेशार असे ओढ्याचे खडकाळ पात्र दृष्टिक्षेपात आले व त्यामधून एक छोटा प्रवाह हिंदोळल्या घेत वाहताना दिसला. प्रवाहाच्या दिशेने पुढे बघतो तर काय, तो नाला शंभर फुटावर एका खाईत दिसेनासा झाला होता! तेव्हा आम्हाला उमगले की, काही वेळापूर्वी ऐकलेला आवाज हा नाल्याच्या पुरामुळे नसून एखाद्या धबधब्यामुळे असावा. आम्हाला हे सगळंच अनपेक्षित होतं. आम्ही त्या लुप्त झालेल्या प्रवाहाकडे चालायला लागलो. पुढे जाण्याचा मार्ग कड्यामुळे तुटला होता. कारण ही धबधब्याची दरड त्या दोन्ही डोंगराच्या मध्ये होती. पुढे जायचा मार्ग डोंगरावर २०-२५ फूट चढून शोधून काढला. ती दरड उतरताना वाटेतले मोठमोठे दगड, त्यातून पाझरणारे झरे, वेडीवाकडी झाडे, मधेच खुरटी झुडपे यातून उतरताना आमची चांगलीच तारांबळ उडत होती. एका हातात तीन-चार फूट लांबीची काठी व एकमेकांचा हात (तसेच जीव मुठीत) धरीत आम्ही ती दरड कशीतरी उतरायला लागलो. आता धबधब्याची बाजू दिसत होती. ते सौंदर्य बघून आम्ही मंत्रमुग्ध झालो. भानावर आल्यावर एका दृश्याने अकस्मात आमचे लक्ष वेधून घेतले. त्या दरडीच्या चार-पाच फूट खाली एक लांबच लांब पाच फूट खोल कपार दिसली. त्या कपारीत आणि धबधब्याच्या नेमकं मागे शेंदूर लावलेले दगड दिसले. आम्ही त्या देवाचं दर्शन घेण्यासाठी जाताना व येताना निसरड्या खडकावर पाय ठेवत, कोसळणाऱ्या पाण्याच्या सौंदर्याचा आनंद घेत इंच इंच लढलो. आणि गंमत म्हणजे, त्याच कपारीमध्ये काही काळापूर्वी एक वाघीण व्याली होती, ही माहिती जेव्हा सायंकाळी विश्रामगृहाला पोहोचल्यानंतर आम्हाला कळली तेव्हा आमची काय स्थिती झाली असेल याची कल्पना करा. दर्शन झाल्यावर आम्ही त्या दरडीवरून हळूहळू उतरत कुंडाजवळ पोहोचलो. आता धबधबा अगदी समोर होता. धबधब्याचे ते इतके सुंदर दृश्य बघितल्यावर आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. त्या धबधब्याचा स्रोत तीस फूट उंचीवरून एका पन्नास फूट व्यासाच्या गोल आकाराच्या कुंडात समर्पित होत होता. पाण्याच्या आघाताने त्या कुंडातील पाणी फेसाळत होतं. वाटलं, या एवढ्या अजस्र कढईत दुध तर उकळत नाही ना? आता नाल्याने

आपला मार्ग कुंडाच्या पश्चिमेकडून काढून आपला पुढचा प्रवास सुरू केला. कुंडाच्या काठावरील पाणी इतके स्वच्छ होते की तळ दिसत होता. पाण्याच्या पृष्ठभागावर शेकडोंनी वाटर बॅग विहार करताना दिसले. पाण्यावर व तळात त्यांच्या जलद जलक्रीडा बघण्यासारख्या होत्या. ते एवढ्या संख्येने असूनसुद्धा अपघाताविना त्यांचे अविरत चाललेले जलतरण बघून आम्ही मुग्ध झालो. अर्ध्या इंचापेक्षाही लांबीने लहान असणाऱ्या ह्या किड्याचे वैशिष्ट्य असे आहे की, ते पाण्यात, पाण्यावर, जमिनीवर आणि हवेत विहार करू शकतात. ते पाण्यात शिरण्यपूर्वी श्वासोच्छ्वासासाठी हवेचा बुडबुडा नेतात. त्यांचे मागील पाय वल्ह्यासारखे चपटे असल्याने त्यांना पाण्यात तसेच पाण्यावर तेवढ्याच चपलखपणे पोहता येते. हवेत उडायला, कठीण कवचाखाली सुरक्षित ठेवलेले पंख असतात.

सकाळचे नऊ वाजले असावे, सूर्याचा उष्मा जाणवायला लागला. आम्ही पटापट कपडे काढून कुंडामध्ये येथेच्छ स्नान केले. पाणी मात्र फार गार होते. शुचिर्भूत झाल्याने अंगात नवा जोम आला. ओले कपडे खडकावर वाळत घातल्यानंतर त्या धबधब्याचे वेगवेगळ्या कोनातून छायाचित्रण केले, परंतु, वाटायचं की, निसर्गाचे हे सुंदर दृश्य हा टिचभर कॅमेरा खरंच सामावून घेईल काय? नाल्याच्या काठाकाठाने पक्षी व निसर्ग-निरीक्षण सुरू झाले. काही सातभाईचे थवे व खंड्या पक्षी सोडून विशेष काही दिसले नाही. नाल्याचा पुढचा प्रवाह फारच सौंदर्यपूर्ण आहे. प्रत्येक शंभरएक फुटावर प्रवाह गेला की, तो तीन-चार फुटावरून दुधाळ धारेने खाली कोसळतो. त्याच्या वेगामुळे खालच्या प्रवाहात खोलखोल सुंदरशी विवरं निर्माण झाली आहेत. पुढे त्याचा उड्यांचा खेळ थांबतो आणि सपाट समतल असा प्रवाह सुरू होतो. पुढील वाटचालीत नाल्याला वळण आल्यामुळे आम्हाला त्याचे पुढील पात्र दिसत नव्हते. दमाहे म्हणाला, ''पुढे कसला तरी सडल्याचा वास येतो आहे.'' तो मेलेल्या जनावराचाच वास होता, असे जाणवल्यावर आम्ही तेथेच थांबलो. आमच्या डोक्यात परवा रात्रीचा प्रसंग ताजाच होता. वाटलं, ही त्या रात्रीची शिकार तर नसेल ना? पुढे जावं की मागे जावं या द्विधा मनःस्थितीत काही वेळ उभे राहिलो. शेवटी असं ठरलं की, घोळक्यानंच हळूहळू पुढे जावं. आणि ते वळण घेत नाही तोच समोरचे दृश्य पाहून थरकाप उडाला. सांबराच्या एका बच्चाचा हाडांचा सांगाडा दिसला. बाजूच्या



एक औषधी वनस्पती 'कळलावी'



रानातील भूमका (औषधी वनस्पती)



▲ सिग्नेचर स्पायडर भक्ष्यासोबत



मयुर सिंहासन

कपारीच्या गवतावर व मातीवर घसरण्याच्या खुणा होत्या आणि त्यावर वाघाचे पगमार्क उमटलेले दिसले. क्षणभर वाटलं की, हे रात्रीच्या केविलवाण्या ओरडणाऱ्या सांबरिणीचं तर पाऊस नसेल ना! मनात थोडी कालवाकालव झाली, परंतु इथे तर जंगलचा नियम 'जीवो जीवस्य जीवनम्' लागू पडतो. अशी मनाची समजूत घालून पुढची वाटचाल सुरू केली.

आता नाला पसरट झाला होता आणि त्याच्या काठानं लहानलहान झाडे--झुडपे उगवलेली होती. या झुडपातून जाताना डॉ. मनोहरचे लक्ष एका वेलीवरील सुंदरशा फुलाकडे वळलं. ती वेल होती कळलावी या औषधी वनस्पतीची. या वनस्पतीचा उपयोग आदिवासी स्त्रिया बाळंतिणीला कळा आणण्यासाठी करतात असे कळले. हे सुंदर फूल या काट्याकोट्यात एकट एकट कुणाची बरं प्रतीक्षा करीत असेल? फुलाचे फोटो घ्यायाचा मोह अनावर झाला. अपरचर, स्पीड, लाईट वगैरेच्या सूचनांची कुमारची थट्टामस्करी सुरू होती व तरीही मनोहर एकाग्रतेने जमिनीवर बसून फुलाचे फोटो घेत होता. आम्ही इतर मंडळी बाजूला उभे होतो. तितक्यात कानाभोवती घुईघुई असा आवाज आला. आम्ही हाताने त्या किड्याला पळविणाचा प्रयत्न केला. जंगलात किडे काना-नाकात जाणे काही नवीन नाही. जेव्हा किडे असा त्रास द्यायला लागतात तेव्हा नेहमी वाटतं की, आपल्याला गायीच्या कानासारखे लांब कान असते तर बरे झाले असते. तितक्यात कुमार ओरडला, ''अरे पळा! मधमाशा.'' कॅमेरे आऊट ऑफ फोकस गेले व सगळे त्या काठावरील झाडाझुडपातून जिवाच्या आकांताने बाहेर निघण्याचा प्रयत्न करू लागले. मित्रमंडळींनी मधमाशांविषयी सांगितलेले जुने अनुभव काही फार सुखावह नव्हते. घाबरून पळापळ सुरू झाली. कल्पना करा पाच मूर्त्या नदीच्या पात्रातील दगड-धोंड्यांमधून पडू नये म्हणून वाकड्या तिकड्या धावायचा प्रयत्न करीत आहेत व त्यांच्या मागे हवाई हल्ल्याला सज्ज अशा शेकडो मधमाशा निशाना घेत आहेत. पळता पळता सगळे एकमेकांना सूचना देत होते- जसे, ''स्तब्ध थांबा'', ''झाडाची फांदी तलवारीसारखी फिरवा'' कोणत्याही सूचनेला दाद न देता मागच्या दोघांनी अचानक बायनोक्युलर व चष्म्यासहित एकाएकी पाण्यात उड्या टाकल्या. पाण्यातला आवाज ऐकताच आम्ही मागे बघितले. आता आम्हाला सोडून मधमाश्यांनी आपला मोर्चा त्यांच्याकडे (कुमार आणि पद्माकर) वळवलेला दिसला. दोघांचेही व्यक्तिमत्त्व थोडे जाडेजुडेच आणि नदीतल्या पात्रात

मात्र ९ इंचच पाणी! त्यांनी हातपाय पाण्याखाली बुडवून कसेबसे नाक दाबून पाण्याखाली डोकं बुडवलं. छाती पाण्यात बुडवण्याचा प्रयत्न मात्र सपशेल नाकाम. मधमाशांनी मोर्चा आता त्यांच्या छातीकडे वळवला. त्यांच्या छातीवरील कमड्यावर वर कमीत कमी शंभरेक माश्या बसलेल्या होत्या. ते दृश्य बघून आम्हाला राहवले नाही. आमच्या हातामध्ये झाडाच्या फांद्या होत्या. त्यांनी त्या माश्या कशाबशा उडवल्या व त्या दोघांना आमच्याबरोबर पळायला सांगितले. दोघेही घाबरलेले होते. पद्माकरचा चष्मा व बायनॉक्युलर पाण्यात वाहून गेल्याचे त्याच्या एकदम लक्षात आले व धक्का बसला. सुंदर बायनॉक्युलर व चष्मा शोधण्यासाठी त्याने केविलवाण्या व अंधुक (!) डोळ्यांनी पाण्याकडे नजर टाकली, पण, मरता क्या न करता? आमच्या मागे त्वरित धाव घेण्याखेरीज त्यांना दुसरा उपाय नव्हता. परंतु, पायदळाचे सर्व प्रयत्न हवाई हल्ल्यापुढे निरर्थक ठरले. नदीचा प्रवाह पुढे निमुळता व खोल झाला होता. आता आम्ही त्या प्रवाहात बुडू शकू असे वाटल्यावर त्यात उड्या मारल्या. झोपलेल्या स्थितीत त्या वेगवान प्रवाहात वाहून जायची चांगलीच दाट शक्यता होती आणि त्यातल्या त्यात पुढे संगमावर, जिथे हा नाला गडगेला मिळतो तिथे वीसएक फूट उंच दरड आहे. वाटलं, जर वाहत गेलो तर दरडीवरून कपाळमोक्ष व्हायला वेळ लागणार नाही. परंतु, सुदैवाने नदीत बरेच दगड असल्यामुळे त्यात पाय, हात अडवायला बराच वाव होता. पाण्याखाली दगडाला एक पाय रोवून व दुसऱ्या हाताने शेवाळलेला दगड धरून स्थिती भक्कम केली. नाक-तोंड दाबून माश्यांच्या हल्ल्यातून वाचवायला अंग पाण्याखाली बुडवलं. अर्थात श्वासासाठी अधूनमधून डोके वर व खाली करणे भाग होते. अशा हालचालीत बराच वेळ गेला असावा. कारण सूर्य आता सरळ वर दिसत होता. किलकिल्या डोळ्यांनी पाण्यावर बघतो तर काय, माश्या आक्रमक पवित्र्यात अजूनही गोल गोल फिरत होत्या. तोंडात चूळ भरून पाण्याचा फवारा उडवत व रिकाम्या हातांनी पाणी उडवून त्यांना हाकायचा केविलवाणा प्रयत्न केला. आता माशा तर पळणार नाही याची खात्री झाली. पुढे काय करावं, या विचारात एक शक्कल सुचली. ॲमेझॉनच्या खोऱ्यातील आदिवासींसारखी अंगाला माती फासून घ्यावी म्हणजे त्यांचे काटे शरीरापर्यंत पोहचणार नाहीत. अंगावर पूर्ण कपडे होते त्यामुळे फक्त चेहरा आणि मान यावरच आक्रमण होण्याची दाट शक्यता होती. म्हणून त्यावर ओल्या मातीचे भरपूर लिंपन केले. माशांना आमची दया आली

म्हणून म्हणा, की त्या कंटाळल्या म्हणून म्हणा, की आमच्या शक्कलीमुळे म्हणा, त्या हळूहळू पांगल्या. दुपारच्या प्रखर उन्हात अंगावरील माती आता वाळून कडक झाली होती. सावकाश पाण्यातून बाहेर आलो व पूर्वतयारी म्हणून हातांनासुद्धा माती चोळली व हळूहळू विश्रामगृहाचा मार्ग धरला. तेथे पोहोचल्यावर कळलं की, ज्या मित्रांनी घाबरून पळ काढला त्यांचा मधमाश्यांनी विश्रामगृहापर्यंत पाठलाग केला होता. विश्रामगृहाच्या आमच्या खोलीत एक माशी अजून उडत होती. तिच्या चिकाटीचे कौतुक वाटले. सर्व निवळल्यावर जेव्हा लक्ष एकमेकांकडे गेले तेव्हा ते रूप बघून आमचे आम्हालाच हसू आले. ओले कपडे काढून छान आंघोळ केली व प्रत्येकाच्या अंगात किती गोळ्या (!) गेल्या याची मोजणी सुरू झाली. सगळ्यात मोठा आकडा दमाहेचा. तो मोठ्ठा आकडा ऐकल्यावर त्याचे अवसान पार गळाले. मनोहरने आपले डॉक्टरी कौशल्य दाखवून त्याला त्वरित धीर दिला. कुमारच्या अंगात जाड टी शर्ट असल्यामुळे तो वाचला, परंतु त्याच्या टी शर्टातून पन्नासएक काटे निघाले.

आता सूर्य मावळतीला लागला होता. श्री. गणपत सोळंके आलेत व आमच्या अंगातील काट्यांच्या आकाराकडे बघून म्हणाले, ''नशीब, या आग्यामाशा (एक भयंकर मधमाशी) नाहीत, जर का त्या असत्या तर पंचाईत झाली असती!'' आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला.

त्या मधमाशांच्या आकस्मिक हल्ल्यामुळे आम्ही जरी तेव्हा हादरलो असू, परंतु हळूहळू आमचा धीर पूर्ववत व्हायला लागला. जंगलाचे काही नियम असतात. कदाचित नकळतपणे आम्ही ते मोडले असतील. तरी, एक आगळा अनुभव गाठीशी घातला गेला. एकंदर ही बेलकुंडची सफर बऱ्याच चित्तथरारक, पण आनंददायी घटनांनी परीपूर्ण असल्याने, त्या मधमाश्यांच्या प्रसंगाने आमचा उत्साह मुळीसुद्धा कमी झाला नाही. उलट, परत भेटीचे मनसुभे रचत या सर्व मनोवेधक घटनांची बखर चित्ती बाळगून आम्ही परतीची वाट धरली...

•••

४

# महेन्द्रीचा ठिपकेवाला

कॉलेजमधून सायंकाळी थकूनभागून घरी आल्याबरोबर टेलिफोनची घंटी टणटणली. वाटलं, नेहमीप्रमाणे कुण्या पालकाचा फोन असेल, परंतु फोनमधून एक उत्तेजित आवाज आला- ''सर, ढाण्या वाघाचा अगदी ताजा पगमार्क मिळाला. त्याचा नुकताच फोटो घेतला.'' तो आवाज डॉक्टरांचा होता. आमचे डॉक्टर म्हणजे डॉ. मनोहर खोडे. त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णाची बारीक तपासणी करण्याला ते जितके तत्पर असतात तितकेच, निसर्गाच्या सूक्ष्म हालचाली कॅमेऱ्याने टिपण्यात मातब्बर आहेत. पुन्हा आवाज आला- ''कुमारपण सोबतीला आहे.'' आमचा कुमार म्हणजे रेडिओ दुरुस्तीतील जोडाजोडीतून वेळ काढून, मोडकळीस आलेल्या पर्यावरणाची जुळवाजुळव करणारा. ''सर, महेन्द्री जंगलाच्या पैंढोनी तलावाच्या पूर्व किनाऱ्यावरील नाल्याकाठी अगदी ताजा टवटवीत आहे तो पगमार्क!''

''तुम्ही लवकर या,'' असे म्हणत त्यांनी वाक्य पूर्ण केले आणि मला अधिक चौकशीची संधी न देता, फोन बंद केला. स्वारीची इतकी घाई बघून, ती परत तलावाकाडे पळाली असावी असे वाटले. त्यांचे ते उत्तेजित शब्द अजूनही कानात घुमत होते.

वरूड तालुक्याच्या उत्तरेस, महाराष्ट्र, मध्यप्रदेश सरहद्दीवर महेन्द्रीचा जंगल परिसर आहे. त्यात वनखात्याचं एक सुंदर 'महेन्द्री वनविश्रामगृह' किंवा रेस्टहाऊस आहे. हे ठिकाण अमरावती ते पांढुर्णा मार्गावरील वरूड गावापासून अंदाजे १८ कि.मी. वर आहे. महेन्द्रीच्या जंगल परिसरात चार-पाच छोटे तलाव आहे.



पंढरीचा तलाव



आमचे आवडते ठिकाण महेंद्रीचे विश्रामगृह



उडते रंगीत करकोचे (पेन्टेड स्टॉर्क)



इंडीयन पिट्टा

तलावांसभोवती उंचच उंच झाडांनी व्यापलेल्या डोंगररांगा, तर मधील सपाट जागेवर खुरटी झुडपी गवताळ राने. अशाच डोंगरांच्या घनदाट जंगल पायथ्याशी पेंडोनी आणि पंढरी तलाव आहेत. सातपुड्याच्या रांगेपैकी एक रांग नंदूरबारपासून सुरू होते, ती येथूनच पूर्वेकडे मध्यप्रदेशातील पर्वतराईत विलीन होते. असे सांगतात की, पूर्वी या परिसरात शेकडो वाघ वावरत होते. यात काही वास्तव्य करणारे, तर काही सह्याद्रीपासून थेट सुंदरबनापर्यंत स्थलांतर करणारे. स्थलांतरासाठी उपयुक्त अशा अखंडित जंगलपट्ट्याला इंग्रजीत 'कॉरीडॉर' असे म्हणतात. जंगलातील वेगवेगळ्या ठिकाणी जेव्हा वाघांची संख्या अधिक व्हायची, तेव्हा अशाच जंगलपट्ट्यावरून ते इकडे तिकडे स्थलांतर करून पर्यावरणाचा समतोल राखीत असावेत. कदाचित आंतरप्रजननाचे दुष्परिणाम थांबवण्यासाठी निसर्गाने केलेली ही सार्थक योजना असावी.

नशिबाने पुढचा दिवस शनिवार होता. म्हटले चला, उद्या सकाळची ड्यूटी आटोपून महेन्द्रीला पळावे. आमचा मित्र पद्माकर लाड, जो आकोटला नोकरीला असतो, त्याला फोन लावून ताबडतोब येण्याचे कळवले. इलेक्ट्रिकल इंजिनीअर असणारा हा आमचा मित्र एका पायावरच काय, तर एका तारेवर ताबडतोब येण्यास तयार झाला. आणि सोबत मिलिंद पाटणकर आपले कॅमेरे घेऊन सज्ज होता. शनिवारी दुपारी गाडीत बोचके बाजके, शिधाआटा, दुर्बिणी, कॅमेरा, तंबू व इतर अत्यावश्यक सामान भरून वरूडकडे प्रयाण केले. तसा अमरावती वरूड हा प्रवास दोन तासांचाच, परंतु उत्कंठेमुळे दीड तासातच ठिकाण गाठले. प्रवासात रेस्टहाऊसच्या आरक्षणाचा प्रश्न सारखा भेडसावत होता. नेहमीच्या अनुभवावरून अनिश्चितता डोकावत होती. सरकारी जुजबी उत्तरे व सल्ले- ''साहेब मीटिंगला गेले आहेत!'' किंवा अमरावतीलाच रिझर्वेशन केले असते तर बरं झाले असते! मनात गर्दी करीत होते.

परंतु वनखात्याच्या कार्यालयात पोहचल्यावर हायसे वाटले. तेथे आमचे मित्र आधीच हजर होते. आमच्या भेटीच्या प्रयोजनाची पार्श्वभूमी समजल्यावर, वनपरीक्षेत्र अधिकारी साहेबांनी महेन्द्री रेस्टहाऊसचे एका दिवसाचे आरक्षण दिले. महेन्द्रीला पोहचेपर्यंत सायंकाळचे सहा वाजले होते. रेस्टहाऊसचा खानसामा बाजाराला गेल्यामुळे ८ वाजेपर्यंत येण्याची शक्यता नव्हती. गाडीतून तंबू काढून जंगलातच उभारला.

इतक्यात आश्चर्याचा सुखद धक्का बसला. तेथील खूप जुना वनमजूर, वयोवृद्ध शंकरराव दल्लू मरकाम जणू देवासारखा हजर झाला. ज्याचे सर्व आयुष्य या जंगलात गेले, ज्याने या जंगलाचा चप्पा चप्पा पायाखाली घातला आणि ज्याने वाघ, बकरीप्रमाणे (त्याच्या भाषेत) या जंगलात फिरताना पाहिले, अशी ती मूर्ती पाहिल्यावर आम्हा निसर्गप्रेमींना का आनंद होऊ नये? त्याची आणि आमची ही भेट बहुतेक तिसऱ्यांदा होत असावी. म्हाताऱ्या शंकरराव गोंडाने रात्री पडणाऱ्या थंडीचा कानोसा घेत इकडून तिकडून बऱ्याच काटक्या गोळा केल्या आणि शेकोटी पेटवली. आम्ही चौघे मित्र आणि तो म्हातारा गोंड, जंगलाच्या चविष्ट गोष्टी चघळत बसलो. हा गोंड म्हणजे या जंगलाचा जिवंत ज्ञानकोश! वेगवेगळ्या झाडांची, औषधी वनस्पतींची, कंदमुळांची ओळखच नव्हे, तर या वनस्पती कुठे आहेत? एवढेच काय, पण कुठले झाड कुठे उभे आहे? याची अचूक माहिती याला विचारून घ्या.

गप्पांच्या ओघातच वाघाचा विषय निघाला, हे सांगायला नकोच. त्याने सांगितलेल्या कापसाच्या गाड्या ओढणाऱ्या बैलांसोबतच्या वाघाच्या द्वंदाच्या गोष्टी आणि त्यानंतर धुरकऱ्यांची उडणारी तारांबळ. या कल्पनासृष्टीतल्याच वाटत होत्या; तसेच पांढरा साहेब एक वाघ मारण्यासाठी दहा रुपये बक्षीस देत असे, हे जेव्हा सांगितले तेव्हा त्याने व इतरांनी किती कमावले हे जरी कळले नाही, तरी त्याचे परिणाम महेन्द्री जंगलातून वाघांच्या झालेल्या उच्चाटनावरून दिसत होते. डॉक्टरांनी काल दिसलेल्या 'पगमार्क'चा विषय काढला. त्याने ताबडतोब ताडले की, हा इथे राहणारा वाघ नाही तर हा फिरतीवरचा वाघ आहे. मनाला वाईट वाटलं! जेथे कित्येक वाघ वास करायचे व कित्येक फिरतीवरचे वाघ या जंगलातून ये-जा करायचे, तेथे आता वर्षाकाठी एखादाच वाघ जावा? वाटलं, हे सर्व वाघांच्या बेछूट हत्येमुळे झाले की कॉरीडॉर मधील अनिर्बंधित जंगलतोडीमुळे झालेल्या आंतरप्रजननामुळे? सारे अनुत्तरित प्रश्न...!

बोलता बोलता, म्हाताऱ्या गोंडाने चंदनतस्करांच्या चंदनतोडीबद्दल काही भयंकर गोष्टी सांगितल्या. जनसामान्यात एक चुकीची समजूत आहे की, चंदन हे फक्त कर्नाटकातील नीलगिरी पर्वतराईतच होते. काही वर्षांपूर्वी तुम्ही जर महेन्द्री जंगलात आत-बाहेर फेरफटका मारला असता, तर शेकडो चंदनाची झाडे दिसली असती. म्हाताऱ्याने सांगितलेला प्रसंग मनाचा थरकाप उडवणारा आहे. एका

बांबूच्या साध्या काठीने जंगलाची राखण करण्याची जबाबदारी टाकलेल्या या गोंडावर जेव्हा चार-पाच बंदूक व कुऱ्हाडधारी तुटून पडतात आणि त्याला बांधून ठेवून जिवे मारण्याची धमकी देतात, तेव्हा यापेक्षा अधिक काय सांगावे? आणि त्यातल्या त्यात दुर्दैव असे की, हे जंगल मध्यप्रदेशाच्या सीमेवर असल्यामुळे हे तस्कर तिकडे पळून जातात, त्यामुळे येथील चंदनाचे पूर्ण उच्चाटन झाले असावे.

बघता बघता ८ वाजून गेले व ९ वाजायची वेळ झाली तरी खानसामा आला नव्हता. पोटात कावळे ओरडत होते. शेवटी साडेनऊला खानसामा आला. पटापट तयार होणाऱ्या खिचडीचा कार्यक्रम केला. खिचडी खाऊन होईस्तोवर ११ वाजून गेले होते. विश्रामगृहाची एकच खोली मिळाल्याने, आम्ही दोघांनी तंबूत राहावयाचे ठरविले. आता जंगलात खोलवर शिरून ढाण्या वाघ बघण्याची उत्कंठा शिगेला पोहोचली होती.


महेन्द्रीचे जंगल हे वेगळ्याच प्रकारचं जंगल आहे. येथे सागाबरोबरच इतर जातीची अनेक वृक्ष दिसतात. तृणभक्षी प्राण्यांमध्ये नीलगाय, स्पॉटेड डिअर, बार्किंग डिअर, ससे, रानडुकरे इत्यादी प्राण्यांचे वास्तव्य आहे, पण फार तुरळक. ११ वाजता पटापट गाडीत बसून गाडी गब्बर टेकडीकडे वळवली. जंगलात जाणारा रस्ता तेवढाच जंगली होता. दोन किलोमीटर गाडी जात नाही तोच, मागचे चाक पंक्चर झाले. टॉर्चच्या प्रकाशात कसेबसे चाक बदलवले. आता परत मागे जावे की पुढे जावे? याबद्दल चर्चा झाली. या घनदाट जंगलात वाघाच्या वास्तव्यात जर परत गाडी पंक्चर झाली असती तर स्टेपनी नव्हती. कदाचित वाघाला, नीलगाय, चितळं यांच्याऐवजी आमचीच मेजवानी मिळाली असती. शेवटी भीतीवर भ्रमंतीने मात केली आणि आम्ही पुढे निघालो.

रस्त्यामध्ये एक मोठा नाला लागला. जरा उंच चढ चढल्यावर येणाऱ्या त्या वळणावर दगड रचून ठेवले होते. उजवीकडे १०० फूट एकदम सरळ उंच डोंगर, तर डावीकडे २०० फूट सरळ खोल खाई. जेव्हा गाडी वळणावरच्या चढावावर संथगतीने पुढेपुढे सरकत होती, तेव्हा गाडीच्या डाव्या हेडलाईटमध्ये दोन तेजस्वी डोळे चमकले. गाडीत चुळबुळ सुरू झाली. खिडक्या पटापट बंद झाल्या. गोंधळात गाडी केव्हा बंद पडली ते समजलेच नाही. कॅमेरा आणि दुर्बिणीसाठी बॅगा चाचपणे सुरू झाले आणि समोर बघतो तर काहीच नाही! शंकाखोरांच्या मनात भुताटकीच्या कल्पना यायला वेळ लागला नसता! परंतु तो निश्चित वाघ किंवा मार्जार जातीचा

प्राणी होता हे निश्चित. एकाने विजेरी घेऊन त्या प्राण्याला खाईत शोधण्याचा मनोदय व्यक्त केला. परंतु मेजॉरिटीपुढे तो ते धाडस करू शकला नाही. बंद गाडीत स्वतःच्या हृदयाचे ठोके स्पष्ट ऐकू येत होते. पुढे जावे की नाही, या विचारात शेवटी पुढे जायचे ठरले. कारण वाटलं की हे रानमांजर वगैरे असावं. हृदयाचे ठोके पुन्हा नॉर्मल झाले. गाडी आता चांगल्याच चढावावर लागली होती. भीतीपोटी म्हणा किंवा रस्त्यामुळे म्हणा, कुमार गाडीला वेग देत नव्हता. चढाव संपायच्या अलीकडेच पुन्हा एक यू टर्न लागला आणि पुढचे वळण संपल्याबरोबरच जंगल अजूनच घनदाट झाले. उंचच उंच सागाची झाडे, जमिनीवर वाढलेली झुडपे व गवत, डाव्या वळणाच्या रस्त्याच्या उजव्या बाजूला गाडी वळत नाही. तोच हेडलाईटच्या तेजस्वी प्रकाश रस्ता सोडून जंगलात शिरला. बघतो तर काय, हेडलाईटच्या प्रकाशात दोन तेजस्वी प्रकाशमान डोळे परत चमकताना दिसले... परत कुजबुज सुरू झाली आणि गाडी त्या डोळ्यांकडे सरकली. जेमतेम ३० फुटांवर त्या डोळ्यांपासून गाडी थांबली तरीही ते डोळे हलायचे नाव घेत नव्हते! हे दृश्य बघण्यात १५ मिनिटे केव्हा निघून गेली ते कळलेच नाही. दोन डोळ्यांमधील अंतरावरून ते काय होते, ते कळत नव्हते. सगळ्यांचा धीर हळूहळू वाढत गेला. गाडीची दारे केव्हा उघडली व आम्ही केव्हा खाली उतरलो ते कळलेच नाही. आता त्या प्रकाशमान डोळ्यांवर टॉर्चचा प्रखर प्रकाशझोत टाकला गेला होता. दुर्बिणीची अॅडजेस्टमेन्ट आणि कॅमेराचा फोकस यात त्या तेजस्वी डोळ्यांचा प्राणी सुस्पष्ट करण्याची शर्यत लागली होती. आम्ही हळूहळू समोर सरकत होतो. एक चांगला क्लोजअप शॉट मिळावा म्हणून अंतर हळूहळू कमी होत वीस फुटांवर येऊन पोहचलं. समोर काय आहे, हे सांगायला दुर्बिणवाल्याला वाव नव्हता आणि कॅमेरावाला या कमी प्रकाशात फोकसची तडजोड करीत होता. एकदम गाडीतून आवाज आला ''सांभाळाऽऽऽ'' आणि दुसऱ्या क्षणी ते श्वापद पाच-सहा फूट हवेत उंच उडालेलं बघितलं. बायनॉक्युलर आणि कॅमेरा धराशायी झाले. आम्ही अकस्मात खाली बसलो आणि त्याक्षणी जे चित्र दिसले ते एवढे थरारक होते की, वाटलं ते श्वापद आमच्यावर उडी मारणार. क्षणभर वाटले की, आपला अंत जवळ आला. परंतु या उंच उडीबरोबरच आमच्या सुदैवाने, त्याने आपला रोख खाईकडे वळविला व क्षणार्धात तो लुप्त झाला. आम्ही जमिनीवर किती वेळ बसून होतो हे आम्हाला कळलेच नाही. जेव्हा गाडीतील मित्र आम्हाला हलवून



निळकंठ



गोष्टीवेल्हाळ शंकर दल्लू मरकाम श्री. दमाहेसोबत



पंढरीच्या जंगलात 'स्टोन कर्ल्यू'



पंढरीतील बिबट

उठवायला लागले तेव्हा जिवात जीव आला. धडधडत्या काळजाने व लटपटत्या पायाने गाडीत विराजमान झालो. त्या चित्राचे वर्णन असे की, जसे काही व्याघ्रासनाची मुद्रा करणारा अचानक दोन्ही हात व पाय बाजूला लांबवून हातापायाचे पंजे फैलावून, डोळे विस्फारून आणि पूर्ण तोंड वासवून दात दाखवतो अगदी तसेच. तसा तो प्राणी हवेमध्ये काही क्षण आम्हाला दिसला. त्याच्या पोटावरचे काळे-पिवळे पोकळ ठिपके व बाजूचे गर्द काळे-पिवळे ठिपके असलेले चारही पाय हवेत! जबडा उघडलेला, कुणाची गाळण उडाली नसती तरच नवल! तो हवेत उंच उडालेला असतानाच तो बिबट जातीचा प्राणी आहे, हे आम्ही ओळखले. बिबट जिवंत होते, जंगल जिवंत होते आणि आम्हीही जिवंत होतो. सर्वजण निःशब्द होते. थोड्या वेळाने धीर पूर्ववत झाल्यावर आम्हा सर्वांच्या आनंदाला पारावार राहिला नाही आणि वाटलं, बरं झालं तो वाघ नव्हता. वाटलं, बिबट असा तर वाघ कसा असेल? या कल्पनेने अंगावर काटा उभा राहिला. गाडी रेस्टहाऊसच्या रस्त्याला केव्हा वळली ते कळलेच नाही. जंगलात भ्रमंती करताना अशा अनेक गोष्टी असतात, ज्या घडताना कळतच नाही! रेस्टहाऊसवर पोहचण्यास रात्रीचे दोन वाजले होते. त्या बिबट्याचे हवेत झेप घेतानाचे दृश्य डोळ्यांपुढे अजूनही चमकत होते.

●●●

## ९

# वणवा

एप्रिल महिन्यामध्ये शाळा-महाविद्यालयांना जेव्हा सुट्ट्यांचे वेध लागतात. तेव्हा वनखात्यातर्फे वन्य प्राणी, पक्षी व व्याघ्र गणनेच्यासंदर्भात वृत्तपत्रांत निवेदने दिसू लागतात. वेगवेगळ्या पक्षी, प्राणी व निसर्ग-संरक्षण संघटना वनखात्याच्या मार्गदर्शनाखाली त्यांत उत्साहाने भाग घेतात. विदर्भवासीयांना, मुख्यत्वेकरून आम्हा अमरावतीवासीयांना, मेळघाटचे जंगल व गुगामल व्याघ्र प्रकल्प म्हणजे वरदानच! मुंबई, पुणे तसेच दक्षिण व पश्चिम महाराष्ट्रातील निसर्गप्रेमींना याबाबतीत आमचा नक्कीच हेवा वाटावा. कदाचित इतरांच्या दृष्टीने विदर्भ म्हणजे एक मागासलेले, आदिवासी क्षेत्र आणि विदर्भाचा उन्हाळा म्हणजे सहारा आणि थार वाळवंटापेक्षाही अत्यंत भीषण आहे असा गैरसमज. अशा ऐकीव भीषण परिस्थितीतही या मंडळींच्या मेळघाट जंगलभेटीतील उत्साह पाहून त्यांच्या निसर्गप्रेमाचे खरंच कौतुक करावेसे वाटते. या निसर्गप्रेमींचा थाट काही वेगळाच! अंगात टी-शर्ट, जीन पँट, पायात हंटिंग शूज, डोक्यावर कॅप, पाठीवर सॅक, एका खांद्यावर पाण्याची बाटली, गळ्यात बायनॉक्युलर आणि दुसऱ्या खांद्यावर काही माहितीवजा पुस्तके ठेवलेली बॅग आणि हवा तर डोळ्यावर काळा चष्मा! पोषाख मात्र वातावरणाशी मिळणारा म्हणजे अगदी साचेबद्ध वेष. अशा हौशी पर्यटकांसोबतच, पायात साधी वहाण, अंगात नेहमीची पँट व शर्ट. हातात तुरळक कपडे कोंबलेली प्लॅस्टिकची पिशवी, दुर्बिणीचा अट्टहास नाही, मात्र खिशात टिपणवही व डोक्यावर बांधलेला हमखास पांढरा दुपट्टा असलेली व्यक्ती पाहून त्यातील वैदर्भीय निसर्गप्रेमी कोण? हे ओळखायला वेळ लागणार नाही.

आम्हा मुंबईकरांच्या धकाधकीच्या जीवनात निसर्गाच्या सान्निध्यात शांततेचे दोन क्षण किती मोलाचे असतात, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. रोज सकाळी ५ ला उठून डोंबिवलीवरून ७.१० ची कल्याण-सीएसटी डबलफास्ट लोकल कुठल्याही परिस्थितीत चुकू न देण्याची जिवापाड धडपड. ती एकदाची पकडल्यावर ड्रायव्हरकडे तोंड असलेली खिडकीची जागा मिळाली म्हणजे स्वर्ग दोनच बोटे! मात्र ऑफिसमध्ये पोहचल्यावर आपल्या सहकाऱ्यांना आपले सकाळचे गुडलक सांगताना आम्ही आतापर्यंतची सर्व पळापळ व धडपड केव्हाच विसरून जातो. सिमेंट काँक्रिटच्या या जंगलात वर दृष्टी गेलीच तर आमच्या नशिबात येते ते घराचे छत, ऑफिसचं छत, लोकलचे छत आणि पावसाळ्यात छत्रीचे छत! बाकी उरलेल्या वेळात लोकलची वाट बघताना दोन्ही प्लॅटफॉर्ममधील जेवढे काही आकाश नजरेत येत असेल तेवढाच काय तो निसर्गाशी संबंध. इतर वेळी सकाळ व सायंकाळी पायी केलेला प्रवास, हा इतरांच्या धडकेपासून स्वतःला वाचवण्यात जातो. प्लॅटफॉर्मवरील उपाहारगृहातला वडापाव पळवणारा कावळा किंवा फोर्टवरील कबुतर याखेरीज इतर पक्षी-निरीक्षणाला वाव विरळाच. मुलाबाळांनी खूपच तगादा लावला, तर केव्हातरी बोरिवलीच्या संजय गांधी नॅशनल पार्कची एक साचेबद्ध सहल. लोकल व वाहने मिळण्यातली अनिश्चितता, बसच्या लांबचलांब रांगा, तेथल्या झुकझुक गाडीतून मुलांना सांभाळीत मारलेला एक चक्कर, पार्कमधील प्रचंड गर्दीत कुठे टेकायची जागा समजा मिळालीच, तर शेंगदाणेवाल्यांचा अविरत तगादा... अशा वातावरणात वेळ घालवताना घरी वेळेवर पोहचायची सतत काळजी. निसर्गाच्या (!) सान्निध्यात एक दोन तासांची मौज मारण्यासाठी केलेल्या सहलीला पाच-सहा तास सहज लागणार. एकदा तेथे गेल्यानंतर परत जाणे नव्हे!

व्याघ्र गणनेचा नियोजित कार्यक्रम जर रेल्वेचा क्वार्टर्ली पास संपल्यानंतर असेल, तर आमच्या आनंदाला पारावार राहत नाही. असा कपिलाषष्ठीचा योग आला की आम्ही ऑफिसमध्ये ताबडतोब रजेचा अर्ज टाकायला मोकळे! रात्रंदिवस घड्याळ्याच्या काट्यांना बांधलेले आम्ही, सहलीच्या उपक्रमासाठी सुद्धा, आमच्या अति व्यावहारिकतेमुळे म्हणा, रेल्वेच्या पासला बांधून घेतो. बाकी आमच्या अशा बांधील दिनचर्येत, जुन्या सहलीतील आठवणी लोकलच्या खडखडाटात किंवा ऑफिसच्या लंच टाईममध्ये मित्रमंडळींना ज्या चविष्ट रित्या

व दिलखुलासपणे सांगतो, जसे थंड वडापावबरोबरची लालभडक चटणी.

व्याघ्रगणनेच्या संदर्भातील वनखात्याची निवेदने जेव्हा मुंबई-पुण्याच्या वृत्तपत्रांतून येतात, तेव्हा आम्ही ठराविक मित्रमंडळी एकत्र येऊन जाण्याचे प्रयोजन करतो. पुढील कित्येक दिवस त्या सहलीचे काटेकोर नियोजन होत असते. अडचण असते ती घरच्या मंडळींची. कारण त्यांच्या वन्यप्राण्यांबद्दलच्या कल्पना वस्तुस्थितीशी विसंगत असतात. टी.व्ही.वरील सतत जाहिराती, कार्टून्स व लहान मुलांच्या गोष्टींचा पगडा घरच्या मंडळींवर एवढा जबरदस्त असतो की वाघाची मनुष्याच्या अंगावर सरळ उडी मारणे व मनुष्य हे वाघाचे नित्याचे व अत्यंत आवडीचे खाणे आहे, अशा खात्रीवजा कल्पना कायमच्या घर करून असतात. व्याघ्रगणनेला जाणे म्हणजे आत्मबलिदान. विदर्भातील अति भयंकर उन्हाळ्याच्या कल्पनेमुळे त्यांच्या चिंतेत आणखी भर पडते. अनुभवी मित्रमंडळींचे सापांच्या विषावरील उपाय, जोड्याच्या तळव्याच्या जाडीपासून थेट काठीच्या वेगवेगळ्या प्रकारापर्यंतचा सल्ला ऐकणे भाग पडते. निसर्गाला दुरावलेल्या आम्हा मुंबईकरांना, कोकणातील किंवा महाराष्ट्रातील निसर्गानी नटलेल्या गावांत घालवलेल्या बालपणाची जेव्हा आठवण येते तेव्हा राहवत नाही आणि या अनेक विरोधातून आम्ही एकदाच्या प्रवासाच्या बॅगा भरतो व या सगळ्या उपदेशांची शिदोरी घेऊन मेळघाटाकडे प्रयाण करतो...

आम्हा पुणेकरांचं मुंबईकरांपेक्षा थोडं वेगळं आहे. सह्याद्रीच्या सभोवती पसरलेलं सौंदर्य, शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा, त्यावर येणारे विविध पक्षी, परिसरातील असलेली खडकवासला व इतर धरणे, कात्रज घाट ओलांडला की दिसणारी सुंदर शेती व बागा; परंतु याच्या विपरीत एके काळी वनसंपत्तीने समृद्ध असणारे पुण्याचे हिरवेगार डोंगर, कधीकाळी मेंढ्या-बकऱ्यांनी फस्त केल्यामुळे उघडे बोडखे झालेले दिसतात. दगडधोंड्यांची टेंगुळे आलेले व पावसाच्या माऱ्यांनी चोपडे झालेले या डोंगराचे विदीर्ण रूप जेव्हा निसर्गप्रेमी पुणेकर बघतो, तेव्हा त्यावरील पक्षी व प्राणी लुप्त किंवा कुठेतरी स्थलांतरित झाले असतील, याची जाणीव होऊन आजही त्याला खंत वाटत असेल. हवामानखात्याच्या सिमला हाऊसमध्ये लॉनच्या बाजूंनी उन्हाळ्यातील घेतलेले जास्तीत जास्त उष्णतामान ३८ अंश व हिवाळ्यातील कमीतकमी उष्णतामान ४ अंश. या आरामदायी तापमानात सुखावलेला पुणेकर रस्त्यावरील वाहनांच्या जत्रेत शिरल्यावर प्रदूषणाच्या



सेमाडोह परिसर



-



झाडावरील मचान



तहानलेला गवा

प्रचंड घुरात जेव्हा त्याचा जीव कासावीस होतो, तेव्हा त्याला गतकाळातील स्वच्छ व सुंदर पुणे आठवले नाही तरच नवल! आम्हा पुणेकरांना साहित्याशिवाय अनेक छंद, जसे रॉकक्लाइंबिंग, माऊंटेनिअरींग, किल्लेभ्रमण, एअर ग्लाईडिंग, बोटिंग, तसेच पक्षी-निरीक्षण.

सिंहगडाच्या पूर्वेकडील दरीत तसेच कात्रजच्या बोगद्याकडे जाताना उजवीकडील दरीतील पक्षी-निरीक्षण करणे हा पुणेकरांचा आवडता छंद. कुठलाही पक्षी दिसल्यानंतर त्याचे संदर्भ (तो पक्षी चिमणी का असेना!) व त्यातील अत्यंत सखोल माहिती, जी बरेचदा वृत्तपत्रातून क्रमशः येते. हे सर्व छंद जोपासणाऱ्या पुणेकरांच्या निसर्गप्रेमाचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच. याउलट नाशिक व पश्चिम महाराष्ट्रातील पक्षिमित्र तसा रांगडाच. जंगली सहली या खऱ्या मनस्वी उपभोगायच्या असतात, तर माहिती, ज्ञान वगैरे या सगळ्या दुय्यम गोष्टी, अशी या रसिकांची ठाम समजूत.

असे हे विविध स्वप्नांत रंगलेले, अनेक लयीत बोलणारे, मनाच्या पंखांनी उंच गगनी लक्ष्यझेप घेणारे हे थवे जेव्हा सेमाडोहच्या वनसंकुलात जमा होतात, तेव्हा अख्ख्या मेळ्यावरच एक आगळे-वेगळे चैतन्य भरल्यासारखे वाटते.

नेहमीच्या सवयीप्रमाणे ५ वाजता जाग येऊन आम्ही मुंबईकर बेडवरून उतरून, आपल्या हातातील टॉर्चच्या मदतीने जेव्हा डॉरमेटरीबाहेर येतो तेव्हा बाहेरील सुखद गारवा आमचे भान हिरावून घेतो. मुंबईच्या घामटलेल्या चिकट शरीराऐवजी तेव्हा स्वतःच्या रेशमी कांतीची संवेदना किती सुख देत असेल. याची कल्पना इतर कुणाला करता येणार नाही. इवल्याशा सर्व सुखसोयी युक्त घरांत आत्मकेंद्रित असलेली मंडळी जेव्हा या अमर्याद पसरलेल्या वनाकडे बघते तेव्हा त्यांची दृष्टी व विचार तेवढेच विस्तीर्ण व्हायला वेळ लागत नसावा.

हळूहळू सगळी मंडळी जागी झाल्यावर, सकाळी ४ वाजल्यापासून मुंबईतील उघडलेली भैयांची शंकर विलास हॉटेल्स व तेथे मिळणाऱ्या मसाल्याच्या चहाची चव जिभेवर आठवत. जेव्हा वनसंकुलातील कँटीनवाल्याला उठवतात आणि तो हिंदीत सांगतो, "साब, आठ बजे तक दूध नहीं आयेगा।" तेव्हा इतका वेळ कसा काढावा या कल्पनेनेच गारठतात! सकाळी उठल्याबरोबर गरम चहाशिवाय कुठल्याच विधीला हात न लावणारा हा मित्र कँटिनमध्ये उभे-आडवे झोपलेले कर्मचारी व कँटीनच्या दाराला लागलेले कुलूप बघून हिरमुसतो आणि तो आपले मनगटी

घड्याळ चुपचाप खिशात ठेवून बंधमुक्त होतो. अनिश्चितता हे जीवनाचं खरं गमक आहे, याचे त्याला चिक्कार पूर्वानुभव असतात. सायंकाळची टिटवाळा जेव्हा घाटकोपर स्टेशनावर अनिश्चित काळासाठी उभी राहते, तेव्हा पुढे रेल्वेच्या तारा तुटल्यात, सिग्नल सिस्टीम खराब झाली, की विक्रोळीला गाड्यांची टक्कर झाली, या सर्व अनिश्चिततेमध्ये उद्या सकाळची व्ही.टी. फास्ट कशी पकडायची, याचे नियोजन करण्याची त्याला सवय झालेली असते.

चहा-नाश्त्याच्या क्यूत सुद्धा प्रामाणिकपणे व शिस्तीत उभा राहणारा मुंबईकर जेव्हा बसच्या दोन फुटी दारातून पन्नास लोकांनी एकदम झुंबड करून बसमध्ये शिरण्याचा केलेला प्रयत्न बघतो तेव्हा त्याला धक्का बसला नाही तरच नवल! क्यूमधील ओळखीच्या मित्रासोबत बोलताना किती शिताफीने आम्ही क्यूमध्ये सामील होतो, मग तो क्यू लग्नातील का असेना, ते कसब मुंबईकरांनी खचीतच घेण्यासारखे आहे.

सेमाडोहला एक खुलं सुंदर ऑडिटोरियम आहे. तेथे खुर्च्या, बाकड्यांना वाव नाही. सिमेंटमधेच घोटलेल्या डोंगराच्या नैसर्गिक उतारावर आरामात बसण्याइतपत रुंद पायरीवजा हे ऑडिटोरियम तिन्ही बाजूंनी मोकळं तर समोर म्हणजे खालच्या पातळीवर एक छोटंस सुंदर स्टेज. स्टेजच्या मागे भिंत व डोक्यावर एक छत. या ठिकाणाहून पक्षी, वन्यप्राणी व जंगलचा राजा वाघ यांची गणना शास्त्रशुद्ध पद्धतीने कशी करायची असते, याचे मार्गदर्शन वगैरे वनाधिकारी करतात. नाश्ता चहा झाल्यानंतर सगळी मंडळी ऑडिटोरियमकडे रवाना होते तेव्हा काही मंडळी बायनोक्युलर व पाण्याची बॅग आणण्याची दक्षता घ्यायला विसरत नाही आणि पुढील बाक (फ्रंट रो) आरक्षित कोण करीत असतील, हे सांगायला नकोच. आपली टिपणवही, पेन्सिल व संदर्भीय पुस्तके या लवाजम्यात बसलेली ही मंडळी अत्यंत तन्मयतेने व उत्सुकतेने वन अधिकाऱ्यांची भाषणे व मार्गदर्शन ऐकत असतात. त्यांचं गांभीर्य व एकाग्रता बघून आम्हालाच लाज वाटायला लागते. त्यातील काही मंडळी अधूनमधून उजवीकडे डावीकडे बघत असते, कदाचित एखादा वाघ दिसला तर ती संधी हुकायला नको! वन अधिकाऱ्याने मागील गणनेचे इतिवृत्त सांगितल्यावर अगदी छान पद्धतीने सगळे मेळघाट जंगल हे छोट्या छोट्या बिटांमध्ये कसं विभागलं गेलं आहे हे जेव्हा सांगितलं, तेव्हा एका प्रेक्षकाने, बिटाच्या सीमा या चुन्याने आखलेल्या आहेत काय? असा निरागस प्रश्न विचारला. वन अधिकारी उत्तम शिक्षक असावा. पृथ्वीचे अक्षांश आणि रेखांश जसे वास्तविक

परिस्थितीत खोदलेले किंवा चुन्याने मारलेल्या रेषा नसतात, असे सुचवल्यावर आमच्या मित्राचे शंकानिरसन झाले.

नंतर विशिष्ट बिटांमध्ये पक्षी, तृणभक्षी वा मांसाहारी प्राणी बघितल्यावर त्यांची संख्या, प्रकार, तो किंवा ते पळत असतील तर त्यांची जाण्याची दिशा व त्याहीपेक्षा या निरीक्षणाची नक्की वेळ नोंदवणे किती महत्त्वाचे आहे हे मार्गदर्शनात विदित केले. यामुळे त्याच प्राण्यांची दुसऱ्या बिटातील गटाने जर नोंदणी केली असेल तर पुनर्मोज लक्षात येते. वाघगणनेला तर विशेष प्राधान्य असते. बिबट्याच्या व वाघाच्या पाऊलखुणांतील व आकारातील फरक काय? जर पगमार्क दिसला तर तो मिटू नये म्हणून त्याभोवती दगडाची आरास कशी करावी, अस्वलाचे व माणसाच्या पाऊलखुणांतील साधर्म्य, झाडाच्या खोडावरील अस्वलाच्या, बिबट्याच्या व वाघांच्या नखांच्या खुणांमधील फरक, वेगवेगळे वॉटरहोल्स व त्याचे जंगली नाव, संभाव्य वाघांची निवासस्थाने, पाऊलखुणांचे प्लॅस्टर कास्ट कसे बनवायचे याबद्दल माहिती (त्याचा अनुक्रम नंबर व तारीख) इत्यादी नवीन व मनोरंजक माहिती ऐकल्यावर सर्वांचा उत्साह वाढला नाही तरच नवल!

दिवसा पायी निरीक्षण व रात्री मचाणावर बसणे अशी कार्यक्रमाची आखणी असते. जंगलचे काही नियम अभिप्रेत आहेत व त्याला जुळवून घेतले तर जंगलाची मर्यादा योग्य रीत्या सांभाळता येते. जसे, कपड्याचा रंग भडक नसावा तर वनाच्या रंगाशी सुसंगत असावा, डोक्याला सुगंधी तेल लावू नये, अंगावर पावडर ओतू नये म्हणजे कुठलाही उग्र वास येणार नाही. सिगारेट, पान व तंबाखूवर पूर्ण बंदी, प्रत्येकाजवळ स्वतःचा स्वतंत्र प्यायच्या पाण्याचा मुबलक साठा, पायात न घसरणारे जोडे, एखादी काठी, टिपणवही, पेन्सिल आणि भूक लागलीच तर थोडासा चॉकलेट-बिस्किटचा साठा. मात्र चॉकलेट आणि बिस्किटांचे आवरण जंगलात न फेकता खिशात टाकणे वगैरे वगैरे. इतक्या गोष्टी लक्षात ठेवून वेगवेगळ्या बिटांसाठी मंडळीचे विभाजन होते. हे विभाजन कसे असावे, यांत वेगवेगळे प्रकार आहेत. मूलभूत उद्देश मात्र एकच की, जेणेकरून, वेगवेगळ्या मंडळींनी एकत्र येऊन आपापल्या भिन्न भिन्न अनुभवांची देवाण-घेवाण करीत वन निरीक्षण करावे व वैयक्तिक संबंधांना व भावनांना फारसे महत्त्व नसावे. काहींच्या मते मुले-मुली, मित्र-मित्र, किंवा पती-पत्नी वेगवेगळ्या गटात असावेत. यासर्व प्रकारात मात्र नवरा-बायकोच्या विभक्तीमुळे, मित्र-मैत्रिणींच्या विरहामुळे किंवा मित्र-मित्रांच्या

संभावित ताटातुटीमुळे रुसवे-फुगवे होतात व त्यातून बरेच मजेदार प्रसंग उद्भवतात. एका गटातली पत्नी जेव्हा दुसऱ्या गटातल्या पतीच्या काळजीमुळे, सर्वांसमक्ष त्याला सावधगिरीच्या सूचना देते त्याक्षणी लहान बालकाप्रमाणे संबोधला गेलेला पती, खजीलतेने आपल्या बिटातील सहकाऱ्यांचे मिस्कील चेहरे बघतो तेव्हा त्याला तेथून सरळ डॉरमेटरीमध्ये जाऊन लपावे असे वाटले नाही तरच नवल! अशा छोट्या छोट्या गटाच्या, गटनायकाची नियुक्ती झाल्यावर एका अनुभवी वनरक्षकासोबत सगळे गट जंगलात चौफेर विखुरतात. वेगवेगळ्या गटातील बोलण्याचे आवाज जेव्हा ऐकू यायचे थांबतात तेव्हा एकाकीपणा जाणवायला लागतो. आता सूर्य बराच वर आला होता, जंगल बरंच तापलं होतं, पूर्वनियोजित रस्त्याने वनरक्षक व त्यामागे आम्ही अशी पदयात्रा सुरू झाली. अजून जंगलाचा घनदाट भाग सुरू व्हायचा होता. एकाएकी वनरक्षक थांबला व रस्त्याच्या मातीवरील उमटलेल्या पाऊलखुणा दाखवू लागला. उत्सुकतेपायी आम्ही त्या पगमार्कभोवती गोळा झालो. हा पगमार्क जवळजवळ सहा इंच मोठा व त्यावरच एक छोटा पगमार्क होता. त्याचे वैशिष्ट्ये म्हणजे तो प्राणी आपल्या पुढील पायाच्या मोठ्या पंज्यावर मागील पायाचे लहान पंजे टाकीत चालत असावा.या वनरक्षकाने सांगितलेल्या माहितीवरून तो एक पट्टेवाल्या तडसाचा (स्ट्राईप्ड हायना) होता हे निश्चित झाले. इतर प्राण्यांच्या पुढील आणि मागील पगमार्कमध्ये इतकी जास्त विसंगती नसते. पुढे थोडे चालून गेल्यावर त्याने रस्त्यावरून तीन-एक इंच लांबीची काळसर विष्ठा उचलली ती वाळलेली असावी व त्यावर बरेच भुरकट केस चिकटलेले दिसले, आम्ही कुतूहलाने बघत असताना त्याने ती विष्ठा तोडली व त्यातून एक अख्खा दात बाहेर निघाला. त्यावर वनरक्षकाने सांगितले की, या तडसाने एखाद्या माकडावर मेजवानी मारलेली असावी.

तडस या प्राण्याचा जबडा अत्यंत मजबूत असून तो कठिणातील कठीण हाडे म्हणजे कवटीसुद्धा फोडू शकतो. खाण्याच्या बाबतीत कुठलेच चोचले न करता सर्वच फस्त करतो. पुढे फिरताना मोर, तित्तर पक्ष्यांच्या तसेच बार्किंग डीअर व मोठ्या सांबराचे पगमार्क बघायला मिळाले. पगमार्क हे रस्त्याच्या धुळीत, नदी-नाल्याच्या बारीक वाळूत तसेच पाणवठ्याच्या चिखलात दिसत असल्याने तेथे सावधगिरीने न चालल्यास प्राण्यांच्या महत्त्वाच्या खुणा नाहीशा होण्याची शक्यता असते. आता हळूहळू जंगल दाट होत होते. त्यात प्रवेश करत नाही तोच

एका पक्ष्याच्या आवाजाचा आक्रांत ऐकला. आवाजावरून तो सातभाई पक्ष्याचा थवा असावा असे वाटले. आवाजाच्या थोडे जवळ जात नाही तोच आम्ही सर्व एकाएकी थांबलो. बघतो तर काय, वर पाठीवर पडलेल्या एका सातभाई पक्ष्यावर एक बहिरी ससाणा आरूढ झालेला! त्याने आपले डोके आमच्याकडे वळवले, त्याची ती तीक्ष्ण घाटदार चोच व भेदक डोळे बघून भीती वाटली नाही तरच नवल! आमचा सुगावा लागल्याबरोबर एका पायाने चालत तर दुसऱ्या पायाने त्या पक्ष्याला ओढीत तो ससाणा जवळच्या झुडपात अदृश्य झाला आणि काही क्षणातच त्याचे ओरडणे थांबले व वाटले, स्वारी मेजवानीत गुंतली असणार. सातभाईच्या थव्याचा आक्रांत मात्र अविरत सुरू होता. बहिरी ससाणा हा घारीपेक्षा लहान, परंतु एक देखणा व रुबाबदार शिकारी पक्षी आहे. त्याच्या पायांची लांबच लांब नखे अशा लहान पक्ष्यांच्या हृदयाचा भेद करायला पुरेशी असतात. या प्रसंगाचे अवलोकन करीत आम्ही पुढे सरकलो. समोर एक कोरडा ओढा लागला. परिसरात गारवा जाणवत होता. ओढ्याच्या काठाने प्रचंड अर्जुन वृक्ष वाढलेले दिसले. त्यांची आडवी-तिडवी मुळे ओढ्यात शिरलेली होती. अर्जुन झाडाच्या वरील फांद्यांवर कमीतकमी १० ते १२ मधाची भली मोठी पोळी टांगलेली दिसली. जणू एखादे संकुलच! झाडाच्या खोडावर नखांनी ओरबाडल्याच्या अनेक खुणा दिसल्या. अर्जुनाच्या आंतर सालीचा लालसर रंग या काळसर खोडावर उठून दिसत होता. नखाच्या खुणांच्या आकारावरून, दोन नखांतील अंतरावरून व खोलीवरून त्या प्राण्याची जात ओळखता येते. खुणा झाडाच्या बऱ्याच वरपर्यंत दिसल्यावर त्या अस्वलानेच केल्या असतील, असे वनरक्षकाने सांगितले. अस्वलाला मध अत्यंत प्रिय. त्यासाठी ते कुठलाही धोका पत्करण्यास तयार होते. नाल्याच्याच काठाने एक डोंगर बराच वर चढलेला होता, त्यावरील झाडांवरील नुकतीच उगवलेली हिरवी पिवळसर कोवळी वसंतातील पालवी नयनांना सुखावीत होती. एका उंच झाडाच्या साठेक फूट उंचीवर पीऽऽई पीऽऽई अशा लयबद्ध आवाजाने आमचे लक्ष वेधून घेतले.

दुर्बिणी डोळ्याला लागल्या आणि बघतो तर काय, एक मोठा सर्पगरुड वर झाडावर बसलेला दिसला, तो आपल्या प्रियेला साद घालीत असावा. हवेचा एक झोत आला आणि झाडाची फांदी हलू लागली आणि राजाच्या डोक्यावरील तुरा दिमाखात हलू लागला. फारच विलोभनीय दृश्य. त्याची पिवळी घाटदार

चोच, बसण्याची ऐट व रुबाबदार भेदक डोळे हे बघितल्यानंतर त्याला उगाचच मेळघाटातील 'पक्ष्यांचा राजा' म्हणत नाही हे पटले. आमच्या बिटाच्या सीमा कदाचित संपल्या असतील, कारण पुढून काही आवाज ऐकू आले. आम्ही तिकडे जायला लागलो. एका छोट्या टेकडीवरून उतरत नाही तोच जंगल विरळ झालेले दिसले व पुढे जंगलातून गोल वळणारा जीपचा रस्ता दिसला. त्या रस्त्याच्या एके ठिकाणी दुसरा गट एका वर्तुळात खाली वाकून निरीक्षण करताना दिसला. त्यांच्या हालचालीवरून तो बराच उल्हसित असल्यासारखा वाटला. आम्ही त्या उतारावरून धावतपळत त्यांना गाठले. एका मोठ्या नर वाघाचा पगमार्क (पायठसा) त्या रस्त्यावरील नरम धुळीवर उमटलेला होता. त्याचे मोजमाप झाल्यावर वनरक्षकाने प्लॅस्टरकास्ट घेतला. प्लॅस्टरकास्ट कसा घ्यावा हे बघायला मिळाले. सूर्य बराच वर आला होता. बाटलीतील पाण्याने तळ गाठला होता. सकाळच्या नाश्त्याचा लवलेशही राहिला नव्हता. आता सपाटून भूक लागली होती आणि आम्ही सर्व परतीच्या प्रवासाला वळणार, तोच एका वनरक्षकाच्या हाकेने आमचे लक्ष वेधले. तो आम्हाला सपाट १००' बाय १००' जागा दाखवत होता.

त्या जागेत खुरट्या गवताखेरीज काहीच उगवले नव्हते. जागेच्या मध्ये एक काळसर असा ढीग व त्याभोवती काही कुठल्या तरी प्राण्याच्या गोलगोल फिरल्याच्या खुणा दिसल्या. आमची उत्कंठा शिगेला पोहोचली होती की, प्राण्याच्या विष्ठेचे ढीग लावून ठेवण्याचा हा काय प्रकार! या वनरक्षकाने खुलासा केला की, सांबर, नीलगाय आणि तत्सम तृणभक्षी प्राणी एका विशिष्ट ठिकाणी विष्ठा करतात. त्याला मखर म्हणतात आणि त्या गोलसदृश जागेला लोळण असे म्हणतात. कळपातले प्राणी जेव्हा खाण्यासाठी किंवा कुठला धोका दिसल्यावर विखुरतात तेव्हा या मखरीचा वासच त्यांना परत येण्यास मदत करतो, तिथेच ते जमतात, बागडतात व आराम करतात. ही माहिती आम्हाला फारच मजेशीर वाटली. थकून भागून कॅम्पवर पोहचल्यावर आपले ताट, वाटी, चमचा घेऊन क्यूमध्ये उभे राहिलो. भूक सपाटून लागली होती. साधे, पण सुंदर जेवण मिळाले. आरामासाठी एका वृक्षाच्या छायेत लवंडलो, पाय आवाज करीत होते, परंतु केव्हा डुलकी लागली कळलेच नाही.

निशाचर प्राण्याची गणना व अवलोकन पौर्णिमेच्या प्रकाशात चांगले होते. त्यामुळे प्राणिगणनेचा कार्यक्रम हा शक्यतोवर पौर्णिमेच्या दिवशी घेण्यात येतो.

निशाचर प्राण्यांची गणना करताना आपला सुगावा लागू नये तसेच त्यांना त्रास होऊ नये यासाठी प्राणी-निरीक्षण हे मचाणावर किंवा लपणगृहात बसून करतात. या दोन्हीच्या रचनेमध्ये जरी मूलभूत फरक असला तरी ही दोन्हीही ठिकाणे पाणवठा, नैसर्गिक पाणवठा, नाल्यातील पाण्याचे डबके किंवा हँडपंपनी भरलेल्या पाण्याच्या टाक्याजवळ उभारलेले असतात. यातील लपणगृहाचा एक प्रकार म्हणजे दगडविटांनी बांधलेली एक छोटी खोली, कडी असलेले एक लोखंडी दार व भिंतीवर जाळीवजा उघडी खिडकी, तर दुसऱ्या नवीन प्रकारात पूर्ण लपण हे लोखंडाचे व सर्व बाजूंनी जाळी लावलेले असते. निरीक्षक मंडळी सूर्य मावळतीला लागल्याबरोबर या खोलीत आपल्याला कोंडून घेतात. खोलीत जमिनीवर वापरून वापरून बारीक मातीचा थर जमलेला असतो. बसायला एखादा लाकडी ओंडका ठेवलेला समजा मिळालाच तर नशीब चांगले समजावे. समोरील जाळीवजा खिडकी ही नजरेच्या पातळीच्या थोडी खाली असते जेणेकरून पाणवठ्यावरील दृश्य योग्य रीतीने दिसावे. लपणमध्ये सोबतीला केव्हा केव्हा सरडे, पाली, तर मुंग्या मात्र सदैव असतात. बाकी आत शिरताना खोली पूर्णतः पाहूनच आत शिरावे, कारण वर्षभरात कधीकधीच वापरल्या जाणाऱ्या या खोलीत साप व अजगराचे वास्तव्य असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु आजपावेतोवर कुठलीही दुःखद घटना झाल्याचे ऐकीवात नाही.

दुसरे निरीक्षणाचे ठिकाण म्हणजे मचाण. मचाण ही झाडांवर बनवलेली असते. हे बहुतेकांना माहिती आहे, परंतु मचाण एक सुशोभित सर्व सुखसोयीयुक्त ट्री हाऊस आहे, अशी कल्पना कुणा सुज्ञाने करू नये. चांगली मचाण बनवण्यासाठी योग्य झाड हवे, परंतु पाणवठ्याच्या जागा मर्यादित असल्याने त्या झाडांतून मचाणासाठी लागणाऱ्या झाडाची निवड फार चातुर्याने करावी लागते. झाडाला पाणवठ्याकडील भागाकडे १० ते १५ फूट उंचीवर किमान दोन तरी फांद्या असाव्या लागतात. त्यावर आडवे-उभे बांबू, वरून तट्ट्याचे छत व अटकाव म्हणून एक--दोन आडवे बांधलेले बांबू, रानटी वेलींनी घट्ट बांधले की झाली मचाण तयार. अशा मचाणी अनुभवी वनकर्मचारी आधीच बांधून ठेवतात. कडक मचाणीवर १२ तास काढायचे म्हणजे शरीराचे बसण्याचे ठिकाण बधिर व्हायला वेळ लागत नाही. अशा ठिकाणी बसण्यासाठी हवा तर एखादा स्पंजचा तुकडा घेऊन जावा. जमिनीवरून मचाण चढणे म्हणजे एक गिर्यारोहणाचाच प्रकार. एखाद्याचे नशीब

चांगले असेल तर चांगली दोन दोन फुटांवर पाय असलेली शिडी मिळेल, नाहीतर केव्हातरीच्या म्हाताऱ्या शिडीतून उरलेले दोन-तीन तिरपे बांबूच नशिबात येतात. अशाही शिडीवरून भराभर वर चढताना, वनकर्मचारी कोरकूंचं कसब खरंच वाखाणण्यासारखं असतं. पण, आम्हा शहरवासीयांना खालून चार हातांनी कुणीतरी ढकलायला व वरून चार हातांनी कुणीतरी ओढायला लागतात.

परंतु, अशाही दमछाकीतून वर गेल्यावर मात्र समोरील पाणवठा, त्याच्या अवतीभोवतीचे निसर्गसौंदर्य पाहिल्यावर थकवा कुठेतरी पळून जातो. मचाणीवर मुंग्यांची साथ सदैव असते, पण बिचाऱ्या आम्हाला कधीच चावल्या नाहीत. एखादा हवेचा झोत आल्यावर झाड हलते, बांबूचा कुरकुर आवाज येतो व आपण झोपाळ्यात बसल्याची मजा येते. ज्या पाणवठ्याच्या बाजूंनी योग्य झाडे नसतात, तेथे चार उंच उभ्या लाकडांवर किंवा लोखंडी पाईपवर एक खोली बनवतात व वर जाण्यासाठी लाकडाचा जीना बसवतात. पण, अशा मचाणी केवळ व्हीआयपींसाठी. या कृत्रिम मचाणापेक्षा झाडावरील नैसर्गिक मचाणावर राहण्याची मजा काही औरच असते. पाणवठे जंगलात दूरवर व खोलवर पसरले असल्याने वनखात्याच्या सौजन्याने जीपने किंवा तत्सम वाहनाने ते आपल्याला सायंकाळी मचाणीजवळ सोडून देतात व सकाळी घ्यायला येतात. म्हणजे एकदा मचाणावर बसलो की, कमीत कमी १२ तासतरी बाह्य जगाशी संपर्क नसतो. सोबत पाण्याचा भरपूर साठा, खायला थोडे फराळाचे सामान, चांगली विजेरी, जमलेच तर बसायला स्पंजची उशी आणि नितांत गरजेचे म्हणजे भरपूर संयम या गोष्टी आवश्यक आहेत. मचाणावर हळू आवाजाने फुसफुसणे तर सोडाच, पण मोठ्या हालचाली करणे निषिद्ध असते.

एकाच ठिकाणी, एकाग्रतेत बसणे म्हणजे बारा तासांची समाधी लावणेच होय. आम्हाला खोल जंगलात एकाकी असे मचाण मिळाले. हे मचाण सेमाडोहपासून उत्तरेकडे १० कि.मी. अंतरावर होते. याचे एकंदरीत वर्णन म्हणजे, एका हँडपंपाजवळ, सिमेंटचे एका मोठ्या तव्याच्या आकाराचे उथळ टाके, हँडपंपापासून टाक्यापर्यंत एक सिमेंटची नाली. या पाणवठ्यामागे एक डेरेदार आंब्याचे झाड व त्यामागे चार-पाच आंब्याची झाडे, झाडांच्या उत्तरेला तिसेक फुटांवर एक प्रचंड बुंध्याचे मोहाचे झाड व त्यावर सालींनी, वेलींनी बांधलेले लाकूड-बांबूचे मचाण. बांबूवर एक छान विणलेला जाडसर तट्टा, वर तत्समच

छत. त्यालाच लागून काही दात पडलेली भोवडी शिडी. पूर्वेकडून जाणारा रस्ता, त्याच्या पलीकडे १००-२०० फूट उंचीचे डोंगर, पश्चिमेकडे तसाच दुसरा डोंगर, उत्तरेकडे हळुवार चढत गेलेले माळरान आणि सगळीकडे वाकलेले गवत व त्यावर वाकलेल्या पानांचा थर.

मचाण जमिनीपासून १५-२० फुटावर असावे. तेथून पाणवठा छान दिसत होता व इतर वनक्षेत्र चांगले दृष्टिक्षेपात येत होते. आपापल्या योग्य जागा निवडल्यावर एकाग्रतेने जंगलातून येणारे विविध आवाज ऐकायला सुरुवात केली. सूर्य मावळला होता. मोरांचा केकावा, कुक्कु श्राइकचे आवाज हळूहळू कमी होत जंगल शांत झालं. रातकिड्यांनी आता जंगलाचा ताबा घेतला होता. सोबत रातव्यांचे आवाज सुरू झाले. त्यातले आम्ही टिक टिक शब्द मोजले ते प्रत्येक वेळेस १३ च होत होते. ते संपले की परत त्या आवाजाची सांगता ट्रिक ट्रिक ट्रिक टिरीक टीक ने होत होती. प्रत्येक वेळेस १३ च का देत होता? ते कळले नाही.

चंद्र पाणवठ्याकडील झाडाकडून वर येत होता. जंगल आता अंधुक अंधुक दिसायला लागलं, परंतु झाडांच्या सावलीमुळे पाणवठा मात्र अंधारातच होता. जंगलनिरीक्षणात असाच काही काळ निघून गेला. नंतर अचानक काहीतरी जळल्याचा वास यायला लागला. रस्त्यापलीकडे डोंगरावरून हळूहळू धुराचे लोट येतांना दिसले. काहीवेळानंतर अनपेक्षितपणे मचाणीवर उष्मा जाणवायला लागला. तेव्हा तो वणवा आहे हे समजायला वेळ लागला नाही, परंतु तो डोंगराच्या पलीकडील उतारावर असल्यामुळे त्याच्या ज्वाला मात्र दिसत नव्हत्या. आम्ही मचाणीवर, जंगलात सगळीकडे वाळलेला पालापाचोळा व गवत, सकाळपर्यंत कुठल्याही मदतीची अपेक्षा नाही... आणि यात वणवा जर आमच्या झाडापर्यंत पोहोचला तर त्यावरील मचाणीचे 'लाक्षागृह' व्हायला व आमची आहुती पडायला वेळ लागला नसता. परंतु कुठलाच उपाय नसल्याने येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवली व आमचे निरीक्षण पूर्ववत सुरू ठेवले.

उत्तरेकडील गवताळ माळरानातून पाने व काटक्या मोडल्याचा आवाज यायला लागला. कुठलीतरी एक आकृती मचाणाच्या दिशेने येत आहे असे चंद्राच्या मंद प्रकाशात बायनॉक्युलरमधून दिसले. आम्ही सर्व सावध झालो. स्वतःच्या श्वासोच्छ्वासाचा आवाज येऊ लागला. ती आकृती त्या माळरानातच बराच वेळ रेंगाळतांना दिसली आणि अचानक कशामुळे का होईना ती आकृती

वेगाने मचाणाच्या दिशेने धावायला लागली. आमच्या दुर्बिणी त्यावरच रोखल्या होत्या. ते एक मोठे अस्वल निघाले. त्याचा आकार बघून आम्ही सगळे अवाक् झालो. ते चार पायांवर धावत असल्याने त्याच्या पाठीवरील दोन्ही बाजूचे लांब लांब केस पाठीवरून दोन्हीकडे भांग काढल्यागत दिसत होते व डुलकत्या चालीवर लयबद्ध उडत होते. दुर्दैवाने ते पाणवठ्यावर न येता सरळच आंब्याच्या झाडाकडे निघून गेले. त्याच्या या जलद प्रतिक्रियेला कदाचित वणवा कारणीभूत असावा. आता रात्रीचा एक वाजला होता. वणवा समोरच्या डोंगरामागून जळत येत त्याच्या शिखरावर पोहोचून आमच्याकडील उतरणीला लागला होता. आता उत्तरेकडील उतरणीवरील पानांवरून परत कुणी प्राणी चालल्याचा आवाज यायला लागला आणि आम्ही वणवा विसरलो. हळूहळू तो प्राणी आमच्या मोहाच्या झाडापासून तिसेक एक फुटावर स्थिरावला. बघतो तर तो एक विशाल गवा होता. त्याची तुकतुकीत अणकुचीदार शिंगे चंद्रप्रकाशात चमकत होती. त्याचे पांढरे मोजे घातलेले पाय, पाठीवरचे मोठे वशिंड, त्याचे अत्यंत प्रभावी भारदस्त रूप! तो एक मस्तवाल नर रानगवा (बायसन) होता.

जरी आमच्या मचाणीवर सगळीकडे नीरव शांतता होती, पण अकस्मात गव्याने वर मान वळवली. आमच्या दिशेकडे उंच मान करून व कान टवकारून संशयाने बघू लागला. कदाचित त्याच्या तीक्ष्ण घ्राणेन्द्रियांना आमचा वास आला असावा. आम्हा क्षुल्लक प्राण्यांकडे दुर्लक्ष करून की, त्याला लागलेल्या अतीव तृष्णेमुळे म्हणा, तो आता हळूहळू पाण्याच्या टाक्याकडे जाऊ लागला. आमच्या अस्तित्वाची चाहूल लागल्यामुळे तो अत्यंत काळजीपूर्वक एकेक पाऊल पुढे टाकत होता व अत्यंत मंदगतीने त्याची वाटचाल सुरू होती. पाणी पिणे म्हणजे वन्यप्राण्यांना जंगलात नेहमीच एक मोठे आव्हान असते. त्यातल्या त्यात भर उन्हाळ्यात जेव्हा मोजकीच ठिकाणे उपलब्ध असल्या कारणाने प्राण्यांना पाणी प्यायला जाणे म्हणजे मृत्यूला आमंत्रणच वाटत असावे. वणवा आता बराच खाली सरकला होता. उतारावर बांबूची अनेक बेटे उभी होती. वणवा त्यांना आता आपल्या विळख्यात घेणार होता. गव्याचे पाणवठ्याकडे अतिमंद सरकणे सुरू होते. तो पाण्याला तोंड लावणार तेवढ्यात त्याने मान उंचावून मचाणाकडे परत एकदा बघितले व काही क्षणानंतर पाणी पिल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. दिवसभराची तहान शमवायला बराच वेळ लागत असावा. अकस्मात मोठे मोठे



बोजड अस्वल



वणवा



''वाचलो आम्ही''



धारातीर्थी पडलेला वृक्ष

बॉम्ब फुटल्याचा किंवा बंदुकीतून फैरी झाडल्याचा आवाज आला. आम्ही घाबरलो. क्षणभर आम्हाला काहीच कळेना. बघतोतर अर्धी तहान ठेवून तो गवा चौखूर उधळला व आंब्यापलीकडील जंगलात विलीन झाला. आवाजाचे गूढ रहस्य अजून उलगडलं नव्हतं. वाटलं चोरटे शिकारी (पोचर्स) असावेत. त्यांचं धाडस बघून चीड आली. बंदुकीच्या फैरींची संख्या वाढतीला लागलेली बघून आम्ही विस्मयचकित झालो. पेटलेल्या वणव्याकडे लक्ष गेलं तेव्हा ती प्रचंड बांबूची बेटे धडाधड पेटलेली दिसत होती आणि एकदम लक्षात आलं की, मघापासून येणारे आवाज हे बंदुकीच्या फैरींचे नसून आगीमुळे जळताना फुटलेल्या बांबूतून येत होते. आम्हाला एकदम हायसं वाटलं व तशा परिस्थितीसुद्धा हसू आवरले नाही.

आता वणव्याने बराच वेग घेतला होता. कारण रस्त्यापलीकडील जागेत फारशी झाडे नव्हती, वाळलेले गवत मात्र भरपूर होते. वणव्याची ओळ रस्त्यापलीकडील गवताला येऊन भिडली व सर्वत्र धूरच पसरला. आम्ही चांगलेच घाबरलो होतो. जीव मुठीत घेऊन वणव्याचे तांडव बघत होतो. काय करावे सुचेना!

सकाळचे फक्त पाचच वाजले होते व आम्हाला वाचवण्यासाठी गाडी आलीच तरी तिला अजून ३ तास अवकाश होता. रस्त्यावर केवळ मातीच होती. सुदैवाने त्यावर गवत वगैरे नसल्यामुळे वणवा रस्ता पार करू शकला नाही. जर तो रस्ता पार करू शकला असता तर हे लिहायला आम्ही आज नसतो. हे भयनाट्य संपल्यासारखे वाटले. चंद्र आता मावळतीला लागला होता व पूर्वेकडून संधिप्रकाश दिसायला लागला होता. टेकडीवर शंभरेक फूट उंचीचे एक प्रचंड झाड वणव्याच्या लपेटीत आल्याचे दिसत होते. एक वटवृक्ष त्या झाडाच्या खोडाचा आधार घेऊन आपला जीव सांभाळत होता. आता वणव्याने त्या प्रचंड वृक्षाला पूर्ण घेरले. बघता बघता त्या वृक्षाच्या बुंध्याने पेट घेतला व एक प्रचंड आरोळी देत तो धराशायी झाला. सूर्य क्षितिजावर यायला सुरुवात झाली, आम्ही सर्व पटापटा मचाणीवरून खाली उतरलो. रस्त्यापलीकडील राखेतून त्या वृक्षाकडे वाटचाल सुरू केली. इथे आम्हाला उल्लेख करावासा वाटतो की, वाळलेले गवत पटकन जळून त्याची राख होते व त्यामुळे जमीन फारशी तापत नाही. जळलेल्या झाडाभोवतालची जमीन मात्र चांगलीच तापलेली असते. एका गोष्टीने आमचे लक्ष वेधून घेतले. एक लाल किडा झाडाजवळील मातीच्या भेगेतून वर येताना

दिसला, अगदी सहीसलामत व शाबूत होता. निरीक्षणावरून तो एक बिटल जातीचा किडा असावा. ज्या वणव्याला बघून आमचा जीव टांगणीला लागला होता, तो सगळा वणवा अंगावर घेऊनही तो जिवंत राहिला हे बघून निसर्गाची किमया अगाध आहे, हे पटायला वेळ लागला नाही.

डोंगरावर उतारावर हळूहळू चढत आम्ही त्या वृक्षमहीकडे पोहोचलो. एवढ्या प्रचंड वृक्षाचा अगदी आमच्या डोळ्यासमोर आगीने घेतलेला बळी पाहून वाईट वाटले. आजतोवर त्या झाडाचा आधार घेऊन वाढणाऱ्या वटवृक्षाचापण आसरा गेला व त्यासोबत त्याचेही अस्तित्व संपुष्टात आले होते... एवढा प्रचंड बुंध्याचा वृक्ष वणव्यात इतक्या लवकर कसा धराशायी झाला याचे कारण, जेव्हा प्रत्यक्ष आम्ही बुंधा बघितला तेव्हा कळले. त्या वृक्षाच्या बुंध्याचा व्यास जरी तिनेक फूट होता तरी तो आतून पूर्ण पोकळ होता. त्या पोकळीत दोन माणसे आरामात झोपू शकली असती. काही छायाचित्रण घेतल्यानंतर आम्ही परत मचाणाकडे वाटचालीस सुरुवात केली. त्या वेळी आंब्याच्या झाडावर एक व्हाईट बेलीड ड्रोंगाने दर्शन दिले. वर बघतो तर काय, एका उंच निष्पर्ण झाडाच्या टोकावर सकाळची उन्हं घेत गोल्डन ओरीयल (कांचन) दिसला. सकाळच्या सोनेरी किरणांत हा कांचन खूपच उजळून गेला होता. सकाळचे आठ वाजले होते, आम्हाला परत नेणारी गाडी अजून आली नव्हती. हापसीवर जाऊन पाणी प्यालो आणि वाहनाची वाट पाहत थांबलो. डोळ्यात रात्रीची झोप हजेरी देत होती, परंतु रात्रीच्या चित्तथरारक प्रसंगासमोर त्याची काय तमा!

व्याघ्रगणनेत वाघाचे एकदा तरी दर्शन व्हावे, अशी सर्व निसर्गप्रेमींची इच्छा नसली तरच नवल! परंतु जरी आजतोवर वनाचा राजा आमच्यासमोर प्रत्यक्ष प्रकटला नाही, तरीपण केवळ आपल्या पाऊलखुणातच आम्हा सर्वांना दर्शन देऊन समाधानी केले, जसे भरताला श्रीरामाच्या पादुकांमुळे. साडे-आठ वाजून गेले होते. विझलेल्या वणव्याच्या बाजूने ठेवलेल्या सामानाच्या ढिगाऱ्यावर बसण्याखेरीज कुठलाच उपाय नव्हता. एकदाची वनखात्याची गाडी आली, पुण्या--मुंबईच्या मंडळीने ती आधीच तोंडापर्यंत भरली होती. आमचा धुळी-राखीने सजलेला अवतार पाहून गाडीत थोडा विस्मय व चांगलीच खसखस पिकली. मुंबईचं सहृदय सौजन्य जागृत झालं. गाडीचं तोंड त्वरित थोडं मोकळं झालं आणि त्यात आम्ही सामावलो, लोकलच्या तीनच्या बाकड्यावर चौथा दाटीदाटीने

बसून घेतांना त्याच्या नजरेत परोपकाराची भावना चाटूनही आत नाही तशाच भावनेत. गाडीच्या खडखडाटात एकमेकांचे बोलणे फार जरी ऐकू येत नसले, तरी आमच्या अवतारावरून आम्ही कुठल्या दिव्यातून पार पडलो हे जाणायला त्यांना वेळ लागला नाही. तशाही दाटादुटीत मुंबई-पुणेकरांनी काही बिस्किटे व सँडविचेस प्रेमाने व ममतेने देऊ केली. या मुंबईच्या सागरात स्वतःच्या नाकापलीकडे विचार न करणारे असा गैरसमज असलेली ती मंडळी, त्यांनी त्यांच्या मनाच्या कप्प्यात किती प्रेम व उदारता साठवलेली असते याचे दर्शन दिले. सेमाडोहला उतरल्यावर माहितीचे आदान-प्रदान करण्याची एकच गर्दी झाली. टिपणांचे आदान-प्रदान झाले व व्याघ्र नसले तरी बरेच वाकदर्शन झाले.

जंगलाचे आगळे-वेगळे अनुभव मायमराठीच्या अनेक बोलीत जेव्हा उत्साहाच्या भरात कानावर येतात, तेव्हा सगळं वातावरण कसं संगीतमय होऊन जातं. या निमित्तानं का होईना एकत्र जमलेली लेकरे बघून ती माउली नक्कीच गहिवरली असेल. त्या नादात बाकीचे श्रम, नैराश्य व झोप याचे विस्मरण होते. तृप्तीच्या तारा छेडल्या जातात व पुढल्या वर्षी परत भेटू या, अशा भाबड्या आशेतून आश्वासने देत प्रेमाने हस्तांदोलन होतात व आम्ही पांगतो.

●●●

## ६

# शोध रानपिंगळ्याचा

दारावरच्या टक् टक्ने झोप चाळवली गेली. कुस पालटून फेरत परत झोपण्याचा प्रयत्न केला. टक् टक्चा आवाज परत वाढला. कान शुद्धीवर आले, परंतु डोळे अजून झोपेतच होते. नजर वर गेली. अस्पष्ट अशी छपराची आकृती दिसायला लागली. नेहमीच्या बेडरूमच्या दृश्यापेक्षा हे काही वेगळंच दिसत होतं. क्षणभर वाटलं आपण कुठे आहोत? टक् टक्चा आवाज परत वाढला. ''एक रॅप्टर (गरुड जातीचे शिकारी पक्षी) झाडावर बसलाय्.'' बाहेरून आवाज आला. कालचे तापलेले उन्ह, गरम झोंबणाऱ्या झळा आणि सर्व शरीराला प्रचंड गचके देणाऱ्या रस्त्यावरील आठ तासांचा प्रवास संपवून, विश्रामगृहाचा ठावठिकाणा शोधून आणि शेवटी कशातरी शिदोऱ्या पोटात लोटून थकल्याभागल्या शरीरांनी आम्ही केव्हा निद्राधीन झालो ते कळलंच नव्हतं. त्या आवाजामुळे काल दुपारच्या भर उन्हात आम्ही सगळ्या मंडळींनी प्रवास सुरू केल्यानंतरचे हेच ते गंतव्य स्थान असं चित्र थकलेल्या मनावर हळूहळू स्पष्ट व्हायला लागलं. शरीरासोबत मन भानावर आलं आणि आपण मेळघाटातील चौराकुंडच्या वनविश्रामगृहात मुक्कामाला आहोत, ते लक्षात आलं. कालच्या प्रवासाच्या अंतिम टप्प्यात त्या खडबडीत रस्त्यावर रात्रीच्या अधुंक प्रकाशात पूर्वसूचित जागी जेव्हा कुठलीच वास्तू दिसली नाही, तेव्हा या दाट जंगलातून परत वापस कुठे जावं आणि समजा परत जायचं ठरवलंच तर परतीचा मार्ग सापडेल काय? अशा विचारांनी अस्वस्थ झालो होतो. परंतु, अशाप्रसंगी एखादा धीराचा मित्र समोर न आला तरच नवल! ''चला, अजून पुढे जाऊन बघूया.'' एकाने सुचवले. आणि खरच अर्धाएक कि.मी. गेल्यावर अस्पष्ट

अशी गावाची रूपरेषा दिसायला लागली. तरसाच्या भीतीने जशी बावरावी तशी केकाटणारी काही उपेक्षित कुत्री सोडून सगळीकडे सगळं काही शांत शांत होतं. कुठल्या घरावर थाप मारावी आणि इतक्या रात्री काय प्रतिक्रिया होईल, या भीतिपोटी मन पुढे जायला धजत नव्हते. शेवटी थोडे बरे दिसणाऱ्या घरावर थाप माऱण्याचे नाइलाजाने ठरवावे लागले. परंतु सुदैवाने ते घर एका वनरक्षकाचेच निघाले. आम्ही आमच्या आरक्षणाची माहिती सांगितल्यावर आणि चौकीदाराबद्दल चौकशी केल्यावर घरातील इसम म्हणाला, "काय फालतू!", आणि आम्हाला विस्मयाचा धक्काच बसला. आठ तासांच्या खाचखळग्यांच्या प्रवासानंतर आमच्या चौकशीवर त्याची ही प्रतिक्रिया ऐकल्यावर आम्हाला थोडा रागच आला. मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात आमच्या चेहऱ्यावरचे विस्मयित भाव बघून त्याने सविस्तरपणे सांगितले- "चौरकुंडच्या रेस्टहाऊसचा चौकीदार याचे नाव 'फालतू' आहे." हे ऐकल्यावर आमच्या थकलेल्या चेहऱ्यावर मिस्कील हसू उमटले. आपसात थोडी खसखस पिकली. कारण मनात विचार आले की, इतक्या रात्रीला हे फालतू नावाचं प्रकरण खरंच फालतू निघालं तर? चांगलीच फजिती होणार व या जंगलात जमिनीवरच झोपायची पाळी येणार. उदास मनाने वनरक्षकाने सांगितल्याप्रमाणे त्याचं घर शोधून काढलं आणि बघतो तर काय, ते एक अत्यंत उत्साही व तत्पर असं व्यक्तिमत्त्व निघालं. चौकशीत आपलं आगळं-वेगळं नाव 'फालतू' अगदी सहजरीत्या सांगायला तो थोडाही अडखळला नाही की लाजला नाही. आमची परिस्थिती पाहून त्याने वनविश्रामगृहात राहण्याची झटपट व्यवस्था केली. त्याच मूळ नाव 'फालत' म्हणजे फळणारा की 'फलित' म्हणजे 'फळ,' असे विचार डोक्यात सतत फिरत होते. टकटकीच्या आवाजानंतर विचारचक्र थांबलं. दार उघडल्यावर कालची वामनमूर्ती बिना दुधाचा चहा घेऊन आत आली. त्याच्याच मागून आमची चौकडी आत शिरली. सकाळच्या प्रहरी कडवट गुळाच्या चहाची गोडी सगळ्या थकव्यावर मात करून गेली. इतक्या पहाटे चहा बनवून आणणाऱ्या या वामनमूर्तीचे नाव त्याच्या जन्मदात्यांनी 'फालतू' च्या ऐवजी 'अफलातून' ठेवलं असतं तर जास्त संयुक्तिक ठरलं असतं, असे उगाच वाटले.

झटपट सर्व कार्यक्रम आटोपून आणि गळ्यात बायनॉक्युलर अडकवल्यावर जेव्हा वनविश्रामगृहाच्या पडवीत पाय टाकला, तेव्हा ते समोरचे दृश्य बघून आपण स्वर्गात तर नाहीना! अशी क्षणभर कल्पना चाटून गेली. तांबडं फुटण्याच्या पूर्वीची

वेळ, समोर उंच सातपुड्याच्या लांबचलांब पर्वतरांगा, मध्ये आदिवासींची शेतं, चार बलदंड खुट्यांवर उभारलेली छपरीवजा शेतघरं, छपरीच्या समोर विझत चाललेल्या शेकोट्या (आग) बघितल्यावर ती घरं म्हणजे बहुधा शेतीचं राखण करणाऱ्या कोरकूंच्या बेडरूम असाव्यात. उजवीकडील पायवाटेवरून येणाऱ्या खिन... खिन... अशा लयबद्ध संगीतमय आवाजाने अचानक लक्ष वेधून घेतलं. बघतो तर काय, आठ-दहा आदिवासी बायकांची ओळ पाण्याने भरलेल्या घागरी डोक्यावरून घेत गावाकडे जाताना दिसली. तो आवाज बहुधा त्यांच्या पायातील चांदीचे तोडे (कडे) एकमेकावर आपटून येत असावा. आता तांबडं फुटायला लागलं, तो रॅप्टर ज्या दिशेने उडाला ते झाड कुमारने दाखवले. आम्ही एकाग्रचित्ताने त्या दिशेने वाटचाल सुरू केली. त्याला शोधण्यानिमित्त आमची पावले इतकी हळुवार पडत होती की, एखादा साप जरी पायाखाली आला असता तरी बिचारा चावला नसता. समोर एक जुनं मोठं झाड दिसलं. ते पन्नासेक फूट उंच असावं. त्याच्या शेंड्यावर आमचं 'लक्ष्य' बसलेलं दिसलं. पक्षी सूर्योदय झाल्याशिवाय आणि त्याच्या उष्णतेत आपलं शरीर तापविल्याशिवाय पूर्ण कार्यक्षम होत नाहीत. सूर्याच्या उबेमुळे त्यांच्या पचनक्रिया जास्त कार्यक्षम होतात. त्यामुळे कदाचित ते सूर्योदयाची वाट पाहत असावे. आणि खरंच आजच्या सूर्याच्या पहिल्या किरणाचं स्वागत त्यानेच केलं! आमच्या दुर्बिणी 'लक्ष्या'चा भेद करायला लागल्या. नक्की कुठला गरुड आहे, याबद्दल नेहमीप्रमाणे तर्क-वितर्क सुरू झाले. पटापट पुस्तके बाहेर आली आणि शोधक्रियेला सुरुवात झाली. शेवटी आमचे गरुडतज्ज्ञ श्री. कुमार पाटील व पक्षितज्ज्ञ श्री. पद्माकर लाड यांच्यात शेवटी एकदाची सहमती झाली, आणि तो शॉर्टटोड ईगल (नागन्त) जातीच्या गरुडाचा बच्चा आहे हे निश्चित झालें. वयाबरोबर गरुड पक्ष्याच्या पंखांच्या रंगठेवणीत अतिशय बदल घडत असतात. त्यामुळे त्याची जात व वर्ग ओळखणे हे नेहमीच विवादित असते. त्याचे फोटो टिपल्यावर समाधानाने वनविश्रामगृहाकडे वाटचाल सुरू केली. रात्रीला भुताटलेल्या व उबडखाबड दिसणाऱ्या वास्तूचं स्वरूप सकाळच्या कोवळ्या प्रकाशात सूर्यदेवाने पालटून टाकलं होतं. ते दोन खोल्यांचं व समोर छानशी पडवी असं सुंदरसं वनविश्रामगृह. सभोवती अधूनमधून तुटलेल्या बांबूंच्या कुंपणाने त्याचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी केलेला केविलवाणा प्रयत्न म्हणजे जसे फाटक्या चोळी-लुगड्याने एखाद्या आदिवासी तरुणीचा अंग



विश्रामगृह



रानातील कुरण


अरण्यगर्भ



दूर्मिळ रानपिंगळा



छायाचित्र काढताना लेखक

अरण्यगर्भ

झाकण्याचा प्रयत्न. अंगणात भूतकाळात केव्हातरी कुण्या एखाद्या रसिक फॉरेस्ट ऑफिसरने बाग लावण्याच्या उत्साही प्रयत्नांचे वर्तमानातील खंडार जरी दिसत असले, तरी निसर्गाच्या बागाईतदाराने जोपासलेलं सौंदर्य मात्र अबाधित होतं. छान डेरेदार मोठमोठ्या झाडांनी वेढलेल्या या परिसराची शोभा अवर्णनीय होती.

डॉ. खोडेची चुळबुळ सुरू झाली. आमचे डॉक्टर म्हणजे सदा आनंदी. गळ्यात निकॉनचा कॅमेरा, त्यांच्याशी घसट करणारी ती दुर्बीण, हातामध्ये झूम लेन्स असणारी बॅग. या परिधानात जरी हे व्यक्तिमत्त्व जड दिसत असले, तरी कार्यक्षमतेत त्याचा आवेश कुणा तरुणालाही लाजवणारा असतो. "चला, लवकर निघा, नाही तर तो फॉरेस्ट आऊलेट (रानपिंगळा) दिसणार नाही." असा फालतूचा नांदा सुरू झाला. 'फालतू' हे ऑल इन वन असे व्यक्तिमत्त्व वाटले. जंगलाच्या खाणाखुणा पक्ष्यांचा रहिवास याची इत्थंभूत माहिती ठेवणारा इथला एकमेव कोरकू असावा. गाडीत फटाफट सामान कोंबले गेले व गाडी सुरू करणार तेव्हा ती रिकामी व हलकी भासायला लागली. बघतो तर काय, आमचे ज्ञानेश्वर दमाहे कुठेतरी लुप्त झालेले. थोडा वैताग आला, परंतु ही त्यांची नेहमीचीच सवय. कुणाची नजर फिरत नाही तोच एवढे जाडे व्यक्तिमत्त्व क्षणात येथे तर क्षणात तेथे असे कसे गायब होते हे गूढच आहे. 'फालतू'चा तगादा सुरू होता. अशा घाईच्या वेळेस त्यांच्या अनुपस्थितीमुळे मात्र सगळे वैतागले होते. शेवटी नाल्याकडून डुलत डुलत दुर्बीण लटकवून 'मूर्ती' येतांना दिसली. आम्ही सगळे ओरडण्याआधीच 'झाडावर अस्वलीच्या ताज्या ओरबडलेल्या खुणा दिसल्या. चला बघायला"
"तुम्ही तर नाही ना केल्या?" आम्ही थोडे वैतागूनच विचारले.

आमच्या मंडळीत दमाहे ही एक आगळी वेगळीच व्यक्ती आहे. कुठल्याही जंगल निरीक्षणाच्या मोहिमेचा यांचा स्वतःचाच एक स्वतंत्र व गावावेगळा असा उद्देश असतो तर बाकी सर्व दुय्यम. परंतु म्हणा काही, त्यांच्या या स्वतंत्र अजेंड्यापायी आम्हाला जंगल भटकंतीत नवीन नवीन बघायला मिळते व शोध लागतात.

या मोहिमेतील रानपिंगळ्याचे (फॉरेस्ट आऊलेट) वास्तव्य रेस्टहाऊसपासून पूर्वदिशेला चार-पाच कि. मी. अंतराव होते. हा रानपिंगळा फक्त भारतातच आढळायचा आणि पुस्तकातील माहितीनुसार, १८८५ पासून लुप्त झाल्याच्या नोंदी आहेत. १९०५ साली मात्र एका इंग्रज व्यक्तीने याला परत पाहिल्याचे नमूद

केले आणि पेंढा भरलेला पक्षी लंडनच्या म्युझियमला भेटही केला. त्या काळात एवढा दुर्मिळ पक्षी म्युझियमला दिल्यामुळे त्यांची वारेमाप स्तुती झाली व खूप प्रसिद्धीही मिळाली. परंतु, नंतर असे कळले की तो रानपिंगळा नसून ते एक वेगळ्याच प्रकारचे घुबड होते. त्या महाशयाने नेहमी आढळणाऱ्या पिंगळ्याला बेमालूमपणे पंख खोचून त्याला रानपिंगळासदृश बनविले होते. नंतर काय झाले ते कळले नाही. परंतु खऱ्या रानपिंगळ्याचे परत दर्शन व्हायला १९९८ हे वर्ष उगवाव लागलं. पामेला रासमुसन या पक्षीअभ्यासक अमेरिकन स्त्रीने नंदूरबार जवळ या पक्ष्याला परत बघितल्याच्या व छायाचित्रणही केल्याच्या नोंदी आल्यात. नंदूरबार हे गाव सातपुडा पर्वतरांगेच्या अतिपश्चिमेकडील सह्याद्रीजवळचे टोक. जुन्या माहितीप्रमाणे हा पक्षी सातपुडा पर्वतात तापीच्या खोऱ्यात आढळल्याच्या नोंदी होत्या. १९९२ पासून आम्हा पक्षीमित्रांना नवीन नवीन पक्षी बघण्याचा, ओळखण्याचा व नोंदी घेण्याचा छंद लागला होता. अनेकदा बोलण्याच्या ओघात गुलाबी डोक्याचे बदक, जॉर्डन कोर्सर तसेच रानपिंगळ्याबाबत चर्चा होत असायची. त्यामुळे हा पक्षी अमरावती जिल्ह्यातसुद्धा असू शकेल, ही आमची धारणा होती. अशा अनेक शोधमोहिमेपैकी महेन्द्री जंगलातील मोहीम सांगावीशी वाटते.

आमचे मित्र व पक्षितज्ज्ञ प्रा. किशोर रिठे यांच्या सांगण्यावरून असे कळले की, रानपिंगळा महेन्द्री जंगलात दिसला. त्याने काढलेला फोटो बघितल्यावर आमच्या उत्साहाला पारावार राहिला नाही. आम्ही मंडळींनी तिकडे कूच केले, आणि तेथील महेन्द्रीच्या रेस्टहाऊसवर मुक्कामी राहिलो. आणि पहा, जो पक्षी १८८५ ला नामशेष झाल्याच्या नोंदी होत्या तो रेस्टहाऊससमोरील बेलाच्या झाडावर सहज बसलेला आढळला. तसल्याच प्रकारच्या व आकाराच्या नेहमी दिसणाऱ्या पिंगळ्याच्या स्पॉटेड आऊलेट व जंगल आऊलेट या आणखी दोन जाती आहेत, पण त्यापेक्षा ही स्वारी जरा वेगळीच दिसत होती. कॅमेरा आणि झूम लेन्सेस वापरून फोटो घेतले आणि व्हिडीओ कॅमेऱ्याने चांगले तीस मिनिटांचे छायाचित्रण केले. रानपिंगळा जेव्हा लुप्त झाल्याचे ज्या काळात घोषित झाले, त्या वेळी भारतामध्ये फोटोग्राफी नवीनच होती आणि पक्ष्यांचे फोटो काढणे अधिकच दुर्लभ. या सर्व कारणांमुळे या पक्ष्याचे जिवंत छायाचित्र उपलब्ध नसल्याने चित्रकाराने रंगकुंचल्याने काढलेले चित्रच काय ते उपलब्ध. ते किती जिवंतपणे काढले असावे, हे तो

चित्रकारच जाणो. त्यामुळे थोडा वेगळा दिसणारा हा पक्षी म्हणजे रानपिंगळाच आहे, अशी आमची खात्री पटली व त्यामुळे पुढे मजेशीर गोष्ट घडली.

जगामध्ये नामशेष झालेल्या पक्ष्यांचे संशोधन व नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या पक्ष्यांना वाचविण्याकरिता काही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यात केवळ घुबडासाठी वाहून घेतलेली एक संस्था कॅनडा या देशात कार्यरत आहे. त्या संस्थेच्या पक्षिमित्रांसोबत आम्ही इंटरनेट माध्यमाद्वारे माहितीचे आदानप्रदान केले व त्यांचे मत मागवले. आम्ही काढलेली व्हिडीओ फिल्म बघितल्यावर त्यांनीही हा पक्षी रानपिंगळाच असावा, असे कळविल्यावर आम्ही खूप आनंदलो. पण काय, सहा महिने होत नाही तोच पामेला रासमुसन यांनी रानपिंगळ्याचे छायाचित्र प्रसिद्ध केले. ते छायाचित्र आम्हाला दिसलेल्या रानपिंगळ्यापेक्षा थोडे वेगळे होते आणि आमचा भ्रमनिरास झाला. वरील सर्व आठवणी आता परत ताज्या झाल्या व त्यावर संवाद करीत आम्ही चौराकुंडाच्या 'त्या' ठिकाणी केव्हा पोहोचलो कळलेच नाही. ज्या परिसरात आम्ही निरीक्षण करणार होतो ती एक चार-पाच एकराची, दोन फूट उंचीचे गवत, रायमुनियाची झुडपे, बोरी आणि अनेक काटेरी वनस्पतीने व्यापलेली सपाट जागा, तिच्या पूर्वेकडे दाट झाडीचे उंच डोंगर, उत्तरेकडे रस्ता व शेते, दक्षिणेकडे सागाच्या उंचच उंच झाडांचे जंगल आणि वर सागाच्या झाडांचे वीस फूट सरळ उभे बुंधे आणि त्यावर एकमेकात गुंतलेल्या झाडांच्या पानांचे छत्रीवजा आच्छादन.

आमचे एक पक्षिमित्र राजू कसबे हे या क्षेत्रातील जाणते म्हणून प्रसिद्ध आहेत आणि त्यांनी आम्हाला या सहलीवर निघण्यापूर्वी त्यांनी बनवलेली रानपिंगळ्याच्या आवाजाची ध्वनिफीत दिली होती. हा रानघुबड आमंत्रणावरून येणारा पाहुणा नव्हता हे आम्हाला माहीत होतं. आम्ही त्या टेकडीच्या पायथ्याशी त्या जंगलाच्या मधोमध कुमार पाटलाला टेपरेकॉर्डर घेऊन बसवले. पाटलाच्या पूर्व-पश्चिम दिशेला दोन-तीनशे फुटावर डॉक्टर ट्रायपॉडवर झूम कॅमेरा लावून बसले. मी व लाड उत्तर-पश्चिम दिशेला व्हिडीओ कॅमेरा घेऊन बसलो आणि कुमारने ध्वनिफीत चालू केली. जंगल तसं शांतच होतं आणि टेपरेकॉर्डरमधून निघणाऱ्या कूऽऽकु.... कूऽऽकु... या आवाजाने सर्व जंगल भरून गेलं. पाच ते सहा मिनिटे गेली असतील, इतक्यात फालतूने इशारा केला व सांगितले- "डॉक्टर साहेब, तुमच्या डोक्यावरील झाडाच्या फांदीवर घुबड बसला आहे." डॉक्टरची

त्रेघातिरपीट उडाली. कारण ट्रायपॉडवरून अगदी डोक्यावरचा फोटो काढणे अशक्य असते. काट्यागोट्याची पर्वा न करता, डॉक्टर पाठीवर तसेच झोपले, ट्रायपॉड पोटावर आडवा विसावला आणि कॅमेरा डोळ्याला लागला. डॉक्टरांनी पंचविसेक फोटो काढले तेही एका मिनिटात, परंतु त्यांना ते एक युग गेल्यासारखे वाटल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही मात्र शांत मनाने व्हिडीओ शूटिंग घेत होतो. आम्हाला पंधरा मिनिटे त्या पक्ष्याचे दर्शन होत नाही तोच दुसरा पक्षी त्याच्यासोबत येऊन बसला. त्यात नर कुठला व मादी कुठली 'नरो वा कुंजरोवा?' आमच्या दृष्टीने त्याला महत्त्व नव्हते. या पक्ष्याचे डोके साध्या पिंगळ्यापेक्षा थोडे चपटे असून डोक्यामागील पिसे तपकिरी आढळली. छातीवरील पिसे जास्त पांढरी व पिंजलेल्या कापसासारखी दिसलीत आणि त्याचा आवाजही अगदी वेगळा होता. हा पक्षी महेन्द्रीत पाहिलेल्या पक्ष्यापेक्षा निश्चितच वेगळा वाटला. जगातील एका दुर्मिळ जातीच्या पक्ष्याचे दर्शन झाले, या आनंदात आम्ही रेस्टहाऊसला परतलो. इतका हा दुर्मिळ पक्षी मेळघाटात असावा आणि म्हणून याला 'मेळघाटचा अनमोल ठेवा' का म्हणू नये ?

भूतकाळातील पक्षिधुरंधरांच्या वक्तव्यावरून आम्हाला नेहमीच असे वाटत असे की, दुर्मिळ पक्ष्याच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस पायपीट करावी लागते, पण या रानघुबडाच्या बाबतीत आतापर्यंत आमचं नशीबच फालतू! परंतु, आज मात्र कित्येक वर्षांच्या परिश्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. फालतूच्या मार्गदर्शनाने दिनों का काम घंटोंमे तसेच घंटो का काम जसे मिनटो में झाले. तीन दिवसांची मोहीम एका दिवसात अकस्मात संपली आणि पुढील दोन दिवस काय करावे, हा यक्ष प्रश्न पुढे आला. पुढील मोहिमेची आखणी सुरू झाली व २० कि.मी. वरील रंगुबेलीला जायचे ठरले.

•••

७

# रंगुबेलीचा रंगदार

चौराकुंडची रानपिंगळा शोधमोहिम तीन दिवसांऐवजी अकस्मात एका दिवसात संपली आणि पुढील दोन दिवस काय करावे? हा यक्ष प्रश्न पुढे आला. तापी नदीच्या काठावरील घनदाट जंगलात रंगुबेलीला पुरातन रेस्टहाऊस आहे, तेही चौराकुंडपासून केवळ अठरा ते वीस कि.मी. वर. असे फालतूने सांगितले तेव्हा तेथे जाण्याचा विचार सर्वांनाच आवडला. चौराकुंड येथून तिकडे जाणारी वाट घनदाट अरण्यातून जाते. ही जुनी बैलगाडीची वाट, केव्हा केव्हा जंगल मालाची ट्रॅक्टर, ट्रकने ने-आण करण्यासाठीही वापरतात. नशीब बलवत्तर, चौराकुंडवरूनच रंगुबेलीच्या रेस्टहाऊसचे आरक्षण करता आले व त्याच वाटेने रंगुबेलीला जायचे निश्चित झाले. तडाकफडकी तिकडच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. सामानाची कोंबाकोंब सुरू करणार तर आढळले की दमाहे परत गायब! बराच वेळ वाट बघितल्यावर ते न आल्यामुळे आम्ही घाबरलो आणि शंका आणि की, हा चिकित्सक माणूस परत त्या अस्वलींने ओरबाडलेल्या मोहाच्या झाडाकडे तर गेला नाही ना? अस्वलीला सर्वच जंगलवासी घाबरतात. वाघसुद्धा क्वचितच तिच्या वाटेला जातो. शंका आली की अशा तीक्ष्ण दात व पंजाच्या अजस्त्र घुडाने दमाहेवर आपली नखे अजून तीक्ष्ण तर करून घेतली नाही ना! आम्ही जोरजोराने आवाज देण्यास सुरुवात केली तेव्हा ही मूर्ती त्याच नाल्यातून कार्यक्रम आटोपून येताना दिसली व जिवात जीव आला.

रंगुबेलीचा हा रस्ता अत्यंत उबडखाबड, दगडांनी भरलेला आणि अनेक जंगली नाल्यांना छेद करून जाणारा. जेव्हा वाहतूक नसते तेव्हा रस्त्यावर पुरुषभर गवत उगवलेले असते. या सर्व कारणांमुळे रस्ता जरा दुर्गमच. हळूहळू मार्ग आक्रमित

आमची आगेकूच सुरू झाली आणि त्यात सायंकाळचे साडेपाच कसे वाजले ते कळलेच नाही. आता रंगुबेली हाकेच्या अंतरावर होती. पुढे एक कोरडा नाला लागला. मोठ्या दगडांमध्ये उंचच उंच गवत वाढले होते आणि यापुढे गाडी जाणे अशक्य आहे याची जाणीव आम्हाला झाली. सूर्य आता लवकरच मावळणार होता. रंगुबेलीच्या ध्यासाचा घास, वाढलेल्या घासाने (गवत) पळवून लावण्याची शक्यता वाढली. गाडी थांबली, विचारविनिमय झाला. परत फिरलो तर आल्यामार्गे चौराकुंड आणि नंतर हरिसाल-धारणी-बैरागड मार्गे रंगुबेली म्हणजे तब्बल ऐंशी कि.मी.चा फेरा होता व या रस्त्याने रंगुबेलीला कुठल्याही परिस्थितीत जायचेच होते. शेवटी एकमताने निर्णय घेतला व परत फिरून दुसऱ्या मार्गाने प्रवास सुरू केला. रस्ता बरा असल्याने हरिसाल ते बैरागडचा प्रवास हा चांगला व लवकर झाला. बैरागडला पोहोचल्यावर आमचे मित्र डॉ. रवी कोल्हे यांची चौकशी केली, परंतु ते तिथे नव्हते म्हणून अधिक वेळ न घालवता पुढचा प्रवास सुरू केला. बैरागड ते रंगुबेली अंतर केवळ १३ कि.मी., परंतु पुढच्या रस्त्याची स्थिती अत्यंत दयनीय आणि चिंताजनक होती. एकंदर परिस्थिती फार उत्तेजनात्मक नव्हती त्यामुळे प्रवासाचा थकवा जाणवायला लागला. पुढे कुटंगा नावाचे एक छोटेसे गाव लागले. चहा मिळेल या आशेने गाडी थांबवली. तेथे अत्यंत पडक्या अवस्थेत चहाची एक टपरी दिसली. त्याचा मालक केवळ धोतरात. चहाची मागणी केल्यावर "दूध संपल्यामुळे चहा मिळणार नाही," असे अत्यंत खेदात उत्तर मिळाले. शेकड्यांनी गोधन असणाऱ्या या मेळघाटात चहापुरतंही दूध मिळू नये हा केवढा दैवदुर्विलास. थकवा तर खूप आला होता. त्यामुळे त्याला बिनादुधाचाच चहा करायला सांगितले. तो कडवट गोड चहा प्यायल्यावर इतरांनी बाजूला टपरीवर पानाचा बार उडवला व आम्ही पुढील मार्गाला लागलो. हा मार्ग म्हणजे सडकेच्या कुठल्याही परिभाषेत न बसणारा. कल्पना करा, दोन समांतर खोलगट चर व त्यामध्ये मोकळ्या गिट्टीचा चांगला उंच उभट भाग. चरांच्या दोन्हीही बाजूने उंचच उंच उभट मोकळ्या गिट्टीच्या ओळी. हेडलाईटच्या प्रकाशात हे दृश्य बघितल्यावर गाडीची इंधन टाकी, चेंबर आणि टायर कसे वाचवावेत हा मोठा प्रश्न पडला. शेवटी ठरले की ड्रायव्हिंग करणारा सोडून इतर सर्वांनी खाली उतरून पायी चालावे व चुकामुक होऊ नये म्हणून एक कि.मी. गाडी गेली की ती थांबवून चालकाने आमची वाट पाहावी. शेवटी असा आमचा टप्प्याटप्प्याने प्रवास सुरू झाला.

ड्रायव्हिंगवर कुमार बसला होता. सहाव्या वर्गात असताना कार चालविण्याचा अनुभव असलेल्या कुमारने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गाडी शाबूत ठेवण्यासाठी त्याने काय काय कसरती केल्या असतील ते तोच जाणे. अंतराचे गणित केव्हाच विसरलो, पण पाय बोलत होते. शेवटी जेव्हा एकदाचे कसेबसे एका टेकडावर पोहोचलो आणि समोर मिणमिणते दिवे दिसायला लागले तेव्हा कुठे हायसे वाटले.

चुतर्थीचा दिवस असावा. चंद्र पुढील डोंगररांगेतून हळूहळू वर येत होता. रंगुबेलीच्या रेस्टहाऊसचा रस्ता आम्हाला माहीत नव्हता आणि गाव पूर्ण झोपी गेलेलं वाटत होतं. रात्रपण बरीच झाली होती. आता काळजी वाटायला लागली. सुदैवाने एका बैलगाडीचा आवाज ऐकू आला. विचारल्यावर त्याने रंगुबेलीच्या वनरक्षकाचे घर दाखवले आणि वनरक्षकाच्या सोबतीने एकदाचे रंगुबेलीचे ते रेस्टहाऊस गाठले. सर्वांचा जीव भांड्यात पडला. रेस्टहाऊसचा रस्ता चोपड्या खडकावरून एक मोठे वळण घेत एका कोरड्या नाल्यातून जातो. पुढील रस्ता उबडखाबड व सरळ चढाईचा आहे. चंद्र आता बराच वर आला होता. अर्धा कि.मी. घनदाट जंगलातून गेल्यावर चंद्राच्या प्रकाशात उजव्या बाजूला रेस्टहाऊसच्या रूपरेषा दिसल्या आणि आम्ही आत वळलो. चंद्राच्या प्रकाशात त्या दीडशे वर्षे जुन्या रेस्टहाऊसचं वेगळंच सौंदर्य बघून थकवा पार पळाला. ५०-६० फूट लांब व ३५-४० फूट रुंद असे चौकोनीवजा रेस्टहाऊस, मंगलोरी कौलाने शाकारलेलं होतं आणि सर्व बाजूंनी छान मोकळी जागा. भूतकाळातील अनेक पांथस्थांच्या आठवणी पोटात घेऊन सभोवतालच्या तारेच्या कुंपणाच्या आत अजूनही ते उभं होतं.

रेस्टहाऊसमध्ये खानसामा किंवा अशी कुठलीही मदत नाही. पाण्याचीसुद्धा सोय नाही, हे तेथे पोहोचल्यावर जेव्हा कळलं तेव्हा अर्धे अवसान गळाले. आता खाण्यापिण्याचा प्रश्न, यक्ष म्हणून उभा राहिला. सुदैवाने वनरक्षकाने पाण्याची विहीर दाखवण्याची तयारी दाखवली. पाण्यासाठी आम्ही गाडीमध्ये ३५-३५ लिटरचे कॅन नेहमीच ठेवतो. रेस्टहाऊसपासून जवळजवळ दोन कि.मी. अंतरावर विहीर आहे. वनरक्षकाबरोबर दमाहे, कुमार गाडी घेऊन पाणी आणायला गेले व आम्ही हुश्श करीत रेस्टहाऊसच्या पायऱ्यांवर बसलो. थोड्या गप्पा मारत नाही तोच मनोहर ओरडला, ‘‘अरे, साऽऽऽप’’ आम्ही पायऱ्यांवरून ताडदिशी समोरच्या अंगणात उडी मारली. बघतो तर काय, पाच-सहा फूट लांबीचा काळाशार नाग

भिंतीच्या काठाने आम्ही ज्या पायरीवर बसलो होतो तिकडे येताना दिसला. एवढी मोठी लाट बघून हृदयाचे ठोके एकदम वाढले आणि अंगात थोडे कंपन झाल्याचा भास झाला. परंतु, प्रसंगावधान राखून आम्ही पायाने जमीन आपटायला सुरुवात केली. सापाला आमचं अस्तित्व कळलं असावं. कारण त्याने लागलीच टर्न मारून बीळ गाठले व क्षणार्धात स्वारी लुप्त झाली. आता ते बीळ म्हणजे रेस्टहाऊसच्या पायाच्या दोन दगडांमधील जेमतेम अर्धा इंचाची भेग. त्या छोट्या फटीतून एवढे मोठे धूड कसे आत शिरले व कसे आत सामावले, हे एक कोडेच आहे.

जेथे रात्र काढायची आहे त्याच रेस्टहाऊसमध्ये नागोबांचे आधीच आरक्षण आणि निवास आहे, या कल्पनेनं आम्ही घाबरलो नसतो तरच नवल! परत त्या पायरीवर बसायचे धैर्य झाले नाही. तब्बल एका तासाने गाडी पाणी घेऊन आली आणि सोबत दोन गोंड मजूरसुद्धा आणलेले पाहून जीव भांड्यात पडला. वनरक्षकाला कौतुकाने धन्यवाद दिलेत. जेव्हा रेस्टहाऊस उघडले आणि मेणबत्तीच्या प्रकाशात आत पाहिले. तेव्हा तेथील एकंदर परिस्थिती पाहिल्यानंतर आम्ही सर्व चांगलेच हादरलो. आमच्या प्रतिक्रिया हेरून वनरक्षक थोडा हिरमुसला व हळूच म्हणाला की, "गेल्या दोनेक वर्षांपासून येथे रात्रीला कुणीही मुक्कामाला व झोपायला आले नाही." आम्ही भुताखेतावर जरी विश्वास ठेवत नसलो, तरी बालपणाच्या संस्कारामुळे थोडी धाकधूक जरी वाटली तरी वस्तुस्थिती कळल्यावर सद्यःपरिस्थितीत कुणालाही दोष देणे योग्य ठरले नसते. गोंड मजुरांनी त्वरित साफसफाई करून, आमच्या नेहमीच्या खिचडीकरिता सरपण गोळा करून आणले. रेस्टहाऊसच्या खोलीत दोनच छोटे लोखंडी पलंग होते आणि आम्ही पाच. बघितलेल्या सापाची आठवण ताजीच होती! तेव्हा राहिलेल्यांनी रूममध्येच टेन्ट लावून त्यात झोपण्याचे ठरवले. बाहेर जंगलचा गारवा व झुळझुळ वाहणाऱ्या शीतल वाऱ्यामुळे प्रवासाचा शीण केव्हाच निघून गेला. आश्चर्य म्हणजे रेस्टहाऊसच्या बाहेरच्या रस्त्यावर रात्री उशिरापर्यंत अधूनमधून आदिवासींच्या बैलगाड्या जा-ये करीत होत्या, त्यामुळे झोप चाळवली जात होती. कदाचित ते बाजार आटोपून परत येत असावेत. दुसऱ्या दिवशी तापीच्या खोऱ्यात पक्षीनिरीक्षणाचा बेत होता, त्याची आखणी करता करता नंतर झोप केव्हा लागली ते कळलेच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळीच उठलो. थकवा पार पळाला होता. बाहेर आल्यावर रेस्टहाऊसचे खरे सौंदर्य बघायला मिळाले आणि इंग्रज अधिकारी मेळघाटातीलच काय, पण भारतातील कुठल्याही जंगलातील रेस्टहाऊसच्या जागेची निवड किती बारकाईने करीत असत त्याचे कौतुक वाटले. रेस्टहाऊसच्या मागे वेगवेगळ्या वृक्षांनी भरलेली एक उंच टेकडी, उत्तर आणि पूर्वेकडे पन्नास फूट खालून वळून जाणारा नाला आणि दक्षिणेकडे बैलगाडीचा रस्ता. एकंदर फारच छान आखणी होती. या सर्व निसर्गसौंदर्याचा आनंद घेत चहाचा बेत केला. जंगलामध्ये सकाळच्या चहाचा कार्यक्रम म्हणजे एक वेगळीच बाब असते. सकाळच्या गुलाबी थंडीत पेटलेल्या काटक्यांवर एखादे जुनाट खोड आणि त्यावर बॅलन्सिंग स्टोनप्रमाणे बसलले चहाचे भांडे. यावर तयार केलेल्या चहाला, चहाइतकाच प्रभावी असलेला धुराचा स्वाद. चहा पिताना कप किंवा पेल्याचे मोजमाप नसते तर तृप्त होईस्तोवर चहाचे कप आणि गप्पा. जेव्हा उन्हाचे चटके लागतात तेव्हाच उठावंसं वाटतं.

गेल्या चोवीस तासांतील सतत धावपळीमुळे सर्व अंग धुळीने माखले होते, त्यामुळे सकाळीच तापी नदीत आंघोळ करायचा बेत आखला. भारतातील नर्मदा इत्यादी मोठ्या पश्चिमवाहिन्या नद्यांमध्ये तापी नदीचा समावेश होतो. ही तापी नदी पूर्वेला मुलताई (मूलतापी?) येथून उगम पावून, सातपुड्याच्या खोऱ्यातून वाहत जाऊन पश्चिमेकडे अरबी समुद्राला मिळते.

सकाळचे दहा वाजले होते. तापी नदीचे विस्तीर्ण पात्र बघितले. दोन्ही बाजूचे काठ तीसेक फूट उंच असावेत. पात्रात उतरल्यावर पाण्याचा खळखळ आवाज लक्ष वेधून घेत होता. हे खळखळणारे पात्र पूर्वेकडील तीन डोंगरांमध्ये एका विस्तीर्ण अशा डोहात विसावले होते. त्या संथ पाण्यावर पडलेल्या सूर्यकिरणांत, कोळ्यांच्या नावा व डोंगे जणू रुपेरी पडद्यावर चितारलेले दिसत होते. आम्ही तापीच्या पवित्र, नितळ, स्वच्छ पाण्याचा आनंद घेत शुचिर्भूत झालो. किनाऱ्यावर दक्षिण बाजूला चार-पाच आदिवासींचा घोळका पूजापाठ करताना दिसला. सगळ्यांनी नुकतीच आंघोळ केल्यासारखी दिसत होती. त्यात एक साठीतली कोरकू (गोंड) स्त्री, तिचे सगळे केस ओले व मोकळे सोडलेले होते. तिच्या कपाळावरील मोठ्या कुंकवावरून ती एक पुजारीन (भूमका) असावी असे वाटले. उत्सुकतेने आम्ही त्यांच्या थोडे जवळ गेलो. शुद्ध हिंदी भाषेतून ती स्त्री सर्वांना तत्त्वज्ञान सांगत होती. तिचे स्पष्ट, शुद्ध उच्चार व प्रभावी भाषा व

विचार ऐकून आम्ही अवाक् झालो.

इतक्यात डॉक्टर ओरडले, "सर, वाघाचा पगमार्क!" आम्ही तिकडे धावत गेलो आणि नदीच्या पात्राशेजारी काठावर वाघाचा एक चांगला मोठा व स्पष्ट पगमार्क दिसला. पगमार्क ९ ते १० इंच रुंद एका नराचा होता. निरीक्षणावरून, तो दोन-तीन दिवस जुना असावा. तापीचे कोरडे पात्र दोनशे फूट पसरलं होतं. तीस फूट उंच काठ आणि त्या पलीकडे मेळघाटातील दाट जंगल होते. ही परिस्थिती वाघाच्या अस्तित्वाला अनुकूल असेल, यात मुळीच शंका नव्हती. ताबडतोब ठरले की , रात्री या पात्रात मुक्कामाला राहायचे. कोळ्याजवळं वाघाबद्दल चौकशी केली असता त्याने दुजोरा दिला. बोलताना त्यांच्याजवळ 'बाम' जातीचे मासे दिसले व मोह आवरला नाही. दुपट्ट्यात मासे बांधून रेस्टहाऊसला पोहोचलो. आमच्या गोंडड्याला त्यांच्याच पद्धतीने मास्यांची भाजी करायला सांगितले. भाजीचा असलेला वेगळा स्वाद व सपाटून लागेलली भूक, त्यात त्या माशांचा केव्हा फन्ना उडाला ते कळलेच नाही. थोडी वामकुक्षी झाल्यावर दुपारी चार वाजता तापी नदीतील रात्रीच्या मुक्कामाची तयारी सुरू केली. बाजूच्या जंगलातून काटक्या गोळा करून आणल्या व त्या गाडीच्या कॅरीअरवर टाकणार इतक्यात दक्षिण दिशेकडून माकडाचे खोकलण्याचे (खॅक-खॅक-खॅर-खॅर- खॅक) आवाज ऐकू येऊ लागले आणि आम्ही क्षणभर थांबलो व कानोसा घ्यायला लागलो. जंगलात अनेक भ्रमंत्या केल्यामुळे जंगली प्राण्यांची व पक्ष्यांची भाषा थोडी कळत होती. धोका जाणल्यावर माकडाचा हुप्या, आपण जसे घशात अडकल्यावर खाकतो तसा आवाज करतो. माकडे जेव्हा जंगली श्वापदे बघतात तेव्हा, त्या श्वापदाला घाबरवण्यासाठी तसेच इतरांना सावधगिरीचे इशारे देण्याकरिता असे आवाज काढतात. फांद्यांवरून मारलेल्या व पानांच्या सळसळीचे आवाज जवळजवळ दोन-तीनशे फुटावरून येत असावेत.

सकाळी बघितलेला पगमार्क व आता जवळून येणारे माकडांचे आवाज, मनात एक चित्र बनवून गेले. कदाचित तेथे काही घटना घडत असावी, या कल्पनेने त्या दिशेने जायला लागलो. आवाज त्या बैलगाडीच्या रस्त्याच्या डावीकडील खाईकडून येत असावा. त्या खाईकडे वळत नाही तोच, आवाज चांगलाच मोठ्याने व स्पष्ट येऊ लागला. बैलगाडीच्या रस्त्याच्या उजवीकडे शंभर फूट उंच दरड होती, त्यावर अनेक झाडे, झुडपे वाढली होती. आम्ही खाईतील त्या झाडापासून



रंगूबेलीच्या विश्रामगृहात सकाळचा चहा घेताना



सुभग (आयओरा)



जंगलात संकटाची सूचना देणारा कपी



रंगूबेलीचा बिबट

शंभरेक फुटावर पोहोचलो असू. ते सागाचे झाड साठेक फूट उंच असावे आणि त्यावर वानरांची एक टोळी आपल्या चिल्यापिल्याबरोबर अत्यंत भेदरलेल्या अवस्थेत दिसली. ओरडणारा हुप्प्या ३० फुटावरील आडव्या फांदीवर बसला होता. आमचे हे निरीक्षण सुरू असतानाच एकदम समोर काही पडल्याचा धप्प असा आवाज आला आणि बघतो तर काय, एक मोठा बिबट अगदी समोर! हातात काहीच नाही, पायात केवळ चपला आणि क्षणभर विचार आला, या रंगदाराने आताच त्याच्या चुकलेल्या वानरांच्या मेजवानीला, चुकल्यामुळे वैतागून आम्हा नरांचा सहज रीत्या मिळणारा घास घेण्याचे ठरवले तर काय करावे? आम्ही जागच्या जागीच गोठलो. अॅड्रीनलीन सगळ्या शरीरात पसरले, हृदयाचे ठोके वाढले, आम्ही एकदम स्तब्ध झालो.

स्वारी थांबली. रागाने की तुच्छतेने, आमच्याकडे बघितले व क्षणार्धात समोरील उंच कपार दोन-तीन उड्यांमध्ये लांघून ती डोंगर माथ्यावर गेली. तिथून तिने परत आमच्याकडे दृष्टिक्षेप टाकला. आम्ही अजून जागीच खिळून होतो. माकडांचे ओरडणे अजून वाढले. दुसऱ्या क्षणी बिबट आमच्या दृष्टिआड झाला आणि आश्चर्य असे की, आतापर्यंत झाडाला खिळून असलेला हुप्प्या आणि त्याचे कुटुंब ताबडतोब झाडावरून उतरले व बिबट गेलेल्या कपारीवरील झाडावर चढले. तेथून परत इशाऱ्याचे आवाज देत त्याचा पाठलाग करायला लागले. आम्हाला भानावर यायला बराच वेळ लागला. 'रुद्रप्रयागचा नरभक्षक' ही जीम कार्बेटने लिहिलेली गोष्ट क्षणार्धात स्मृतिपटलाला चाटून गेली. ते भयनाट्य संपल्यावर आम्ही भानावर आलो. मेळघाटात इतक्या अनपेक्षितपणे व इतक्या जवळून एका रंगदार बिबट्याचे दर्शन घडले, यावर विश्वास बसेना. या अनपेक्षित घडलेल्या घटनेचा आनंद शब्दांकित करणे कठीण आहे. नाचत, उड्या मारत आम्ही रेस्टहाऊसकडे पळत गेलो. कुणीच बोलत नव्हते तर नुसते ओरडत होते, जशी माकडाच्या टोळीशी स्पर्धा! आणि शेवटी तोंडातून वाक्य निघून गेले, "अजि म्या बिबट देखीला."

सर्व मंडळी अतिशय आनंदात होती. बिबट दर्शनाने, उत्साहाला उधाण आले होते. तापी नदीच्या पात्रात रात्रीच्या मुक्कामात वाघोबा दिसण्याची शक्यता व आशा होती. रात्रीच्या मुक्कामाकरिता लागणाऱ्या सामानाची भरभार गाडीत करायला सर्वांचे हात जलदगतीने चालत होते, सर्वात शेवटी कॅमेरे, दुर्बिणी,

फोकसलाईट, व्हिडीओ कॅमेरा तपासून ठीकठाक असल्याची खात्री झाल्यावर सर्व मंडळी गाडीत बसली. सूर्य मावळतीला गेला होता. संधिप्रकाशाचे रूपांतर हळूहळू अंधारात होत होते. कुमारने ड्रायव्हिंग सीट सांभाळली. ज्या ठिकाणी आम्हाला वाघाचा पगमार्क दिसला, तापी नदीच्या त्या पात्राकडे आमची गाडी आता निघाली होती. 'चंद्र समोरील डोंगरावरून डोकावत होता. काय दिसणार होते या रात्रीच्या मुक्कामात?'

●●●

## ८

# रायपूरचा डुड्डू

पक्षीनिरीक्षणासाठी एकट्याने शांतपणे जावं की टोळीने जावं, याबद्दल बरीच मतभिन्नता आढळून येते. जसे जीम कार्बेटच्या मते, ''शिकारीला एकटेच जावे, कारण जास्त लोक असले की शिकार टिपता येत नाही.'' परंतु, पक्षीनिरीक्षणाच्या संदर्भात आमच्या मते ठराविक सवंगडी असणे केव्हाही चांगले. दुर्बिणीतून दूरची प्रतिमा जवळ दिसते, परंतु तिच्या आवाक्यात पूर्ण जंगल कधीच येत नाही. जितके डोळे जास्त, तितके पक्षी दृष्टीस पडण्याची शक्यता जास्त. जरी जंगलात पक्षी अंगठ्याच्या आकारापासून तीन फूट उंचीपर्यंत आढळतात, तरी त्यातील बहुतेक लहान आकाराचे, वातावरणातील रंग-आकारात मिसळून गेलेले व अति चंचल असतात. त्यांच्या जेवणाच्या वेळा विशिष्ट, बसण्याची झाडे विशिष्ट आणि मुक्कामाचे वातावरणही विशिष्ट! त्याचे पोट व आतडी छोटी असल्याने त्यांना रोज सकाळी सपाटून भूक लागलेली असते व त्यांचे खाद्य पाणवठ्यावर जास्त मिळत असल्याने पक्षी बघायचे असतील, तर सकाळची वेळ व एखाद्या नदीचे पात्र हे उत्तम ठिकाण. हे झाले दिनचर पक्ष्यांच्या बाबतीत, तर निशाचर पक्ष्यांबाबत नियम वेगळे, तसे निशाचर पक्षी शोधणे जरा अवघडच. दिवसा शोधून ठेवलेल्या ढोलीवर रात्री नजर ठेवून, त्याचे रात्रीच्या अंधारातून येणारे विशिष्ट आवाज व त्याची लकब, त्याच्या ढोबळ हालचाली इत्यादी निरीक्षणांवरून वेध घ्यावे लागतात आणि त्यात नशिबाचा वाटा भक्कम. यांच्या ठावठिकाणाच्या जागी आधीच सर्व तयारी करून त्यांच्या हालचालीचा अंदाज घेऊन प्रखर विजेरीच्या मदतीने निरीक्षण करावे लागते. अर्थात सायंकाळी किंवा सकाळच्या संधिप्रकाशात तसेच पौर्णिमेच्या प्रकाशात हे निशाचर पक्षी दिसण्याची शक्यता नक्कीच वाढते. छोटे पक्षी आपल्या लोभस आकाराने व सुंदर रंगमिश्रणाने जसे

भक्ष हिरावून घेतात; तसेच गरुडासारखे मोठे पक्षी त्याच्या ऐट दिमाखाने जागीच खिळवून टाकतात. दिनचर पक्ष्यांचा राजा गरुड या शिकारी पक्षी (Raptor, बर्ड ऑफ प्रे)-वर्गात अनेक रंगांचे व आकारांचे म्हणजे लहान कावळ्याच्या आकारापासून गिधाडाच्या आकारापर्यंत पक्षी आढळतात. या पक्ष्यांचा रुबाब व भक्ष्यावर झपटण्याची विलक्षण पद्धत आम्हा पक्षिमित्रांना नेहमीच आकर्षित करते. तसाच किंबहुना त्यापेक्षा किंचित जास्त वैशिष्ट्ये असलेला, अत्यंत गूढमय, निशाचर पक्ष्यांचा राजा घुबड बघायला आवडतो. सहज न दिसणारा, भुवया असलेले चेहऱ्यासमोरील बटबटीत मानवसदृश्य डोळे बऱ्याच लोकांचा थरकाप उडवतात. अशा आगळ्यावेगळ्या रूपामुळे घुबडांबद्दल जनसामान्यांत अनेक गैरसमज आहेत. हा जरी दिसायला एवढा भयंकर दिसत असला, तरी वास्तवात तो एक अत्यंत लाजाळू पक्षी आहे. असा हा रात्रीचा क्रियाशील पक्षी, कुण्या एका पडक्या गढीच्या अथवा खंडाऱ्याच्या छिद्रात किंवा कुण्या झाडाच्या ढोलीत, माणसांच्या तसेच कावळ्याच्या नजरा चोरीत दिवसभर चुपचाप बसून बसतो. जुन्या काळात निरीक्षणाच्या योग्य साधनांअभावी या पक्ष्याचा बरोबर अभ्यास होऊ शकला नाही. नेहमी दिसणारा घुघ्घू (ग्रेट इंडियन हॉर्न आऊल) हा तीनेक फूट उंच, तीक्ष्ण नखे असलेले पंजे, समोर मोठमोठे भेदक डोळे, डोक्यावर कान किंवा शिंगासारखी दिसणारी सरळ उंच पिसे असणारा हा निशाचर पक्षी, एखाद्या परीकथेतील राक्षसासारखा दिसतो व जनसामान्यांचा भीतीचा व तिरस्काराचा विषय बनतो.

खोल गुहेतून आल्यासारखा त्याचा मोठा व गूढ आवाज व त्याचे स्वरूप, यामुळे जादूटोणावाल्यांनी, भूत-पिशाच्चादी अमानवी शक्तींसोबत याचा संबंध लावायला मागेपुढे पाहिले नाही.त्यामुळे जादूटोण्याच्या प्रयोगात व अंधश्रद्धेपोटी अनेकदा या निरुपद्रवी व गरीब पक्ष्यांचे हकनाक बळी जातात. वस्तुतः हा पर्यावरणाचा समतोल ठेवण्यासाठी एक अत्यंत उपयोगी पक्षी आहे. याचे मुख्य भक्ष्य उंदीर आहे. एका दिवसात हा ८-१० उंदरांचा सहज फडशा पाडतो. उंदीर हे अन्नधान्याची नासाडी करणारे शेतकऱ्यांचे शत्रू आहेत. त्या उंदरांचा नायनाट करून हा शेतकऱ्यांना मदत करतो. 'शिकारी पक्षी पर्यावरण रक्षी' या न्यायाने पर्यावरणाचा समतोल बिघडवणारे अशक्त व रोगट प्राणी नष्ट करून पर्यावरणाला मदत करतो.

त्याच्या पंखांवर व पायांवर कापसासारखी आवाज निरोधक अत्यंत नरम,

छोटी छोटी विशिष्ट पीसे असतात. त्यामुळे रात्रीच्या अंधारात त्याचे उड्डाण इतके शांत असते की नाकाजवळून जरी उडाला, तरी याचा आवाज आपल्या कानांपर्यंत येणार नाही. ते केवळ आवाजाच्या अनुषंगाने सावजाचा लक्ष्यभेद करतात. घुबडांच्या अनेक जाती आहेत. प्रत्येकाचं सौंदर्य अफलातूनच! भारतात पक्षीनिरीक्षणाचा व नोंदी करण्याचा उपक्रम इंग्रजांनी जोपासला आणि तो तसा सलीम अलींसारख्या ऋषितुल्य व्यक्तींनी पुढे चालवला. तसे रात्रीचे पक्षीनिरीक्षण कठीणच. म्हणजे सर्चलाईट, इन्फ्रारेड दुर्बिणी, नाईट व्हिजन कॅमेरा इत्यादी योग्य उपकरणांशिवाय यांचे निरीक्षण म्हणजे सदैव अनिश्चितता व एक तपश्चर्या. त्यामुळे कदाचित दिनचर पक्ष्यांएवढ्या नोंदी निशाचर पक्ष्यांच्या झाल्या नसाव्यात. त्यामुळे अशा निशाचर पक्ष्यांच्या नोंदी घेणे हे पक्षिमित्रांना नेहमीच आव्हान असते.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी रानपिंगळा (फॉरेस्ट आऊलेट) सातपुडा जंगलातून विलुप्त झाल्याची ग्वाही पक्षितज्ज्ञांनी जरी दिली, तरीही महाराष्ट्र, मध्यप्रदेशातील घनदाट जंगलाने आपल्या पदरात याला सुरक्षित लपवून ठेवले असावे, अशी आमची भाबडी समजूत आणि वेडा विश्वास होता. म्हणूनच मागील काही वर्षांपासून याच्या शोधात आम्ही वणवण भटकलो. यावेळेस आमच्या मंडळीत जगप्रसिद्ध पक्षितज्ज्ञ व वाईल्ड लाईफ वार्डन प्रा. किशोर रिठे, प्रा. निशिकांत काळे, मिलिंद पाटणकर, पद्माकर लाड, डॉ. मनोहर खोडे, शिरीषकुमार पाटील व आम्ही दोघे असा आठ जणांचा गट होता. प्रा. किशोरला इंग्लंडच्या एका व्यक्तीकडून वन्यजीव संवर्धनाच्या कार्याकरिता मिळालेल्या एका सुंदर नव्या कोऱ्या करकरीत अशा जिप्सीमधून या प्रवासाला निघायचो. आमच्या अशाच एका भटकंतीत ही रायपूर-भेट. रायपूर हे गाव प्रामुख्याने कोरकू लोकांची वस्ती असलेलं, सेमाडोह या गावावरून उत्तरेस दहा-एक कि.मी. अंतरावर आहे. सेमाडोहवरून अत्यंत घनदाट जंगलातून घाट वळणाने आपण थोडे सपाट प्रदेशावर येतो तेव्हा पिकांनी भरलेली शेते दृष्टीस पडतात. थोडे दक्षिण पूर्वेकडे माखल्याचं शिखर आपल्यावर दृष्टिक्षेप टाकत असतं, तर डावीकडे छोट्या छोट्या जंगलराई नेत्रसुख देत असतात. अशा निसर्गरम्य दृश्यांचा आस्वाद घेत आम्ही रायपूरजवळ पोहचलो. तेथे वर्षातील सहा महिने कोरडा असलेला खोल नाला लागतो. त्या काठी प्रचंड वृक्षांच्या सावलीत आणि आजूबाजूच्या वनाच्या आडोशाला वनविश्रामगृहाची टुमदार इमारत दिसायला लागते. एक छान नीटनेटकी वास्तू,

वेगळा भटारखाना व सर्व्हंट क्वार्टर असं खास ब्रिटिश शैलीतील याचं स्वरूप!

वनविश्रामगृहाच्या मागील अंगणात तीन-चार सागाची झाडे दिसतील व एका बाजूला एक जुनी पडकी इमारत दिसेल. कदाचित इंग्रजांच्या भालदार, चोपदार व ऑर्डलीसाठी ही बांधलेली असावी. हे घर आता बऱ्याच भग्न अवस्थेत असून अजूनही उभे आहे.

वनविश्रामगृहाच्या मागे तोच नाला विसेक फूट खोल व पन्नासेक फूट रुंद अशा खोल घळीचे रूप धारण करतो. या घळीतून उंचच उंच झाडे वाढलेली आहेत. त्यांच्या आकारावरून शेकडो वर्षे जुनी असावीत.

सहा वाजले होते व आता अंधार पडायला लागला होता. पूर्वेकडील डोंगरातून चंद्रबिंब दिसायला लागले. रात्री सातच्या दरम्यान आम्ही वनविश्रामगृहाचा ताबा घेतला. भूक जबरदस्त लागलेली होती. येथे जेवण्याची सोय नसल्याचे माहीत असल्यामुळे सोबत ताकाचे चून, भाकरी व हिरव्या मिरच्यांचा ठेचा अशा खास वऱ्हाडी शिदोऱ्या आणल्या होत्या. रेस्टहाऊसमध्ये एका जुनाट टेबलावर (इंग्रजकालीन असावं) शिदोऱ्या उघडून आमच्या नेहमीच्या निसर्गसंरक्षण, पक्षीनिरीक्षण इत्यादीच्या गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात उद्याच्या कार्यक्रमाच्या योजना करता करता रात्रीचे १२ केव्हा वाजले कळलेच नाही. चंद्र आता डोक्यावर आला होता. त्याच्या प्रकाशात सगळं जंगल कसं छान उजळलं होतं. एका पक्ष्याच्या बुंऽऽ बू बूऽऽबा या नवख्या आवाजाने (ते घुबडच होते हे नंतर कळले) आमचं लक्ष वेधून घेतलं. हा घुत्कार नेहमीच्या घुबडांच्या आवाजापेक्षा नक्कीच वेगळा होता. बाहेर येऊन बघतो तर काय, जमिनीवरून एका पक्ष्याची सावली खोल घळीतील झाडाकडे जाताना दिसली, परंतु दुर्दैवाने त्याचे प्रत्यक्ष दर्शन झाले नाही. मात्र, त्याच्या विशिष्ट पंख रचनेवरून आणि आकारावरून ते नक्की घुबडच होतं यात शंका नव्हती. कुठलं घुबड असावं, यावर नेहमीप्रमाणे वादविवाद निर्माण झाला. ती सावली फार मोठी नसल्याने तो पक्षी घुघ्घू (ग्रेट इंडियन हॉर्न आऊल) नसून दुसरे वेगळेच घुबड असावे, या निष्कर्षापर्यंत पोहोचलो व आमची जिज्ञासा अजून वाढली.

रेस्टहाऊसची जागा मर्यादित, त्यामुळे आम्ही एवढे लोकं त्यात कसेबसे दाटीदाटीने झोपलो. रात्री मधेच झोप चाळवली. जाग कदाचित आमच्याच घोरण्याच्या प्रचंड आवाजाने आली असावी. एक विचार आला की, घोरणे हा

प्रकार आपल्या पूर्वजांकडून वारसाहक्काने मिळाला असावा. निसर्गात शारीरिक दृष्टीने मानव एक दुबळा प्राणी. त्यामुळे बिनादाराच्या गुहेत राहताना, जंगली श्वापदांना घाबरवण्यासाठी, घसा बसलेल्या सिंहाच्या आवाजासारखे घोरणे म्हणजे आदिमानवांनी स्वसंरक्षणासाठी एक नैसर्गिक प्रवृत्ती निर्माण केली असावी! परंतु, त्या छोट्या खोलीत सात जण जेव्हा अनेक सुरात घोरायला लागतात तेव्हा काय स्थिती होत असेल, याची कल्पना करावी. पण करणार काय? शेवटी थकव्यापोटी झोपेने कब्जा घेतला आणि कदाचित त्या सातांमध्ये हा आठवा आवाज मिसळला असावा. मजा म्हणजे आमच्याजवळील सेल्फ रेकॉर्डिंग ऑटोमेटिक टेपरेकॉर्डरने आमच्या सगळ्यांचे घोरणे टिपलेले होते. सकाळी जेव्हा टेप वाजवून बघितला तेव्हा आम्ही सगळेजण पोट दुखेपर्यंत हसत होतो व त्या सप्तसुरातील भयंकर आवाजातील गोंधळातून आम्ही त्या गावचे नोहे हे सांगून स्वतःला अलिप्त करीत होतो.

सकाळी जाग आल्यावर भ्रमंती सुरू झाली. किशोरची निरीक्षणशक्ती जबरदस्त व नजर अत्यंत तीक्ष्ण. जसा तो वनविश्रामगृहाच्या बाहेर पडला तसाच उत्साहात रेस्टहाऊसमध्ये परत शिरला आणि म्हणाला, ''खिडकीवर स्वीफ्टचं घरटं आहे.'' आमचे कॅमेरे, व्हिडीओ कॅमेरे पटापट बाहेर आले. आमचा मोर्चा स्वीफ्टच्या सुंदर घराचे छायचित्र घेण्यास व व्हिडीओचित्रण करण्यासाठी निघाला. चिमणीपेक्षा थोडा मोठा आकार असलेल्या या पक्ष्यांचा थवा सायंकाळच्या वेळी आकाशात उंच उडताना आपण कदाचित बघितला असाल. उडण्यात अत्यंत तरबेज असणारा हा पक्षी हजारोने कीटकांचा फडशा पाडतो. त्यात मानवी आरोग्याला हानिकारक अशा डासांचा प्रामुख्याने समावेश असल्याने, हा एक अत्यंत उपयोगी पक्षी आहे. डोंगराच्या कपारीत, नदीवरील पुलाखाली, खिडकीच्या वळचणीत हे पक्षी योग्य अशी सुरक्षित जागा निवडतात. चिखलातील ओल्या मातीत आपली लाळ विरघळून त्याच्या छान छान गोल विटा तयार करून उलट्या इगलूसारखे छानसे मातीचे घरटे बनवतात. नंतर या घरट्याला मखमली पिसांनी आतून व बाहेरून छानसे आच्छादान दिले जाते. केवळ घरट्यासाठी लागणाऱ्या मातीसाठी आणि पाणी पिण्यासाठीच काय तो जमिनीवर उतरतो अन्यथा हा सतत उडणारा पक्षी आहे. हा पक्षी हजारोंच्या थव्याने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये स्थलांतर करतो. अनेकदा इलेक्ट्रिकच्या तारांवर शेकड्यांच्या संख्येने तुम्ही हे पक्षी बघितले

असतील. या स्थलांतरित पक्ष्यांनी आपल्या गावी वीणेच्या हंगामात मुक्काम करावा म्हणून मेक्सिकोमधील रहिवाशांनी लाकडांची अनेक मजली फ्लॅट सिस्टीमवजा कृत्रिम घरटी बांधल्यांच्या नोंदी आहेत. त्यांचा असा अनुभव आहे की, जेव्हा जेव्हा हे पक्षी मुक्कामी असतात तेव्हा तेव्हा डासांचा उपद्रव कमी झालेला असतो.

रेस्टहाऊसच्या खिडकीच्या अगदी वरच्या कडेला असलेल्या घरट्याचे व त्यात ये-जा करणाऱ्या पक्ष्यांचे छायाचित्रण सुरू होते. परंतु त्या कार्यात आमच्या दमाहेंची अनुपस्थिती भासायला लागली. ही सहा फूट उंचीची धिप्पाड मूर्ती नेहमीच्या सवयीप्रमाणे कुठेतरी लुप्त झाली होती. जसा आमच्या डॉ. खोडेंना पक्ष्यांची जुनी घरटी बघण्याचा छंद तसेच आमच्या दमाहेंना झाडांच्या ढोली बघण्याचा छंद. इकडे तिकडे आमच्या शोधक नजरा जात नाही तोच रेस्टहाऊसच्या मागील नाल्याच्या घळीतून आमचे दमाहे अत्यंत घाईने येताना दिसले. ''कडेच्या झाडाच्या ढोलीत एक मोठा पक्षी बसलेला दिसतो.'' असे अति उत्साहाने सांगितल्यावर आमची ढोलीच्या निरीक्षणाची तयारी सुरू झाली.

आधी विवरण केलेल्या नाल्याच्या घळीतून शंभर फूट उंचीची दहा-बारा प्रचंड वृक्ष वाढलेली आहेत. त्यातील एका वृक्षाच्या खोडात पन्नासेक फुटावर, म्हणजे नाल्याच्या काठावरून पंचवीस फुटावर, एका मोठ्या ढोलीमध्ये एक पक्षी बसलेला दिसला. परंतु, झाडाच्या दाट छायेमुळे तो कुठल्या जातीचा आहे, हे साध्या डोळ्याने ओळखणे शक्य नव्हते. कॅमेरा, बायनॉक्युलर, व्हिडीओ कॅमेरा पटापट नवीन मोर्चाकडे निघाले. बायनॉक्युलरमधील प्रथम निरीक्षणात तो घुबड आहे हे समजल. परंतु, नेहमीच्या घुबडापेक्षा त्याची शेपटी जरा जास्तच लांब दिसल्यामुळे ते कुठल्या जातीचे असावे, यावर चर्चा सुरू झाली. असे घुबड आम्हीतरी यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. पुस्तकातील माहितीवरून व रात्री ऐकलेल्या आवाजावरून ते लहान कानाचे (शॉर्ट इयर्ड) घुबड असावं असे वाटले. ढोलीजवळ प्रकाश कमी असल्याने कॅमेरा व व्हिडीओ कॅमेऱ्यासाठी अडचणी निर्माण झाल्या. तेव्हा कुणीतरी शक्कल लढवली की रेस्टहाऊसमधील आरशाचा उपयोग करावा. काही मंडळी पटापट वनविश्रामगृहाकडे धावली व दोन मोठे आरसे घेऊन आली. ही शक्कल एकदम मस्त जमली. कारण आरशाच्या त्या कवडशात सुंदर शूटिंग घेता आलं. परंतु, दिवस असल्याने घुबडरायाने कुठलीही हालचाल करायला नकार दिल्याने शूटींग लवकरच बंद करावे लागले. परंतु, इतक्या दुर्मिळ



रायपूरचे रेस्टहाऊस



अंड्यावरील श्रृंगी घुबड



दुर्मिळ 'लघुकर्णी घूबड'



झाडाच्या ढोलीतील घूबडाचे घरटे

घुबडाचं दर्शन परत होईल की नाही या शंकेने ग्रस्त झालो. आलेली संधी वाया जाऊ नये म्हणून रात्रीला ते क्रियाशील झाल्यावर त्याचे शूटिंग घ्यायचे ठरले.

घुबड हा प्रामुख्याने उंदीर खातो व एखादी संधी मिळाल्यास कोंबडीची पिले पळवतो, हे आम्हाला माहीत होते. त्यामुळे त्याला आमिष म्हणून गावातून कोंबडीची काही पिले आणायचे ठरवलं. सुदैवाने दोन पिले मिळाली. सूर्य मावळण्याच्या आतच एक योग्य जागा पाहून तिथे पिले ठेवली. घाबरल्यामुळे म्हणा की काय, ती चिकचिक आवाज करीत एका झुडपाच्या बुंध्याशी बसून राहिली. आमच्या सोबत नेहमीच असणारा पावरफुल फोकस लाईट तयारीत ठेवला. प्रकाशाअभावी कुठलीही संधी वाया जायला नको म्हणून जिप्सी आधीच योग्य कोनातून वळवून तिचे हेडलाईट त्या पिलाच्या परिसरातील भागावर पडतील अशी ठेवली.

त्याचबरोबर घुबडाच्या आवाजाचे रेकॉर्डिंग करण्यासाठी त्या घळीच्या काठावरील झुडपावर मायक्रोफोन बांधला. एक लांब वायर वापरून रेकॉर्डिंग सुरू केले. आता हॅण्ड फोकसच्या प्रकाशात घुबडाच्या ढोलीचे निरीक्षण सुरू झाले. रात्रीचे आठ वाजले तरी घुबड ढोलीतून निघायला तयार होईना. आम्ही सगळे निराश व्हायला लागलो आणि त्यावरून, ढोलीमध्ये ती घुबडीन अंडे उबवीत असावी, असे अनुमान काढले. अशा विचारात असतानाच बाजूच्या झाडावर एकदम जलद हालचाली दिसू लागल्या. सर्चलाईटच्या प्रकाशात लाल चमकणारे दोन डोळे दिसू लागले. काय असावं? असे विचार सुरू असतानाच त्या डोळ्यांचे एका मोठ्या खारीमध्ये रूपांतर झाले. त्या प्राण्याने हवेत एक लांब उडी घेऊन हवेतच दुसरे झाड गाठले व विसावले. "अरे, ही तर उडती खार!" सगळ्यांना खूप आनंद झाला. या सर्व हालचाली इतक्या जलद झाल्या की, तिचे फोटो आम्ही घेऊ शकलो नाही. जसे भीमाशंकर हे शेकरू (मोठी खार)करिता प्रसिद्ध तसेच आपले मेळघाट उडणाऱ्या खारी (फ्लाइंग स्कीरल)करिता प्रसिद्ध आहे. हा प्राणी रात्रीच क्रियाशील होत असल्याने त्याचे दर्शन साधारणतः दुर्लभच. अशा या सुंदर दुर्लभ प्राण्याचे दर्शन झाल्याचे पाहून आम्ही थोडा वेळ घुबडाला विसरलो. इतक्यात इकडे बघतो तर काय! डोळ्याची पापणी लवत नाही तोच त्या घुबडाने कोंबडीच्या पिलावर झडप घातली आणि त्याला उचलून दुसऱ्या लांबच्या झाडावर विसावलं. तेथून आता तो बुंऽऽबा बुंऽऽ बा आवाज यायला लागला. हे

एवढे झटपट झाले की कॅमेरे व व्हिडीओ कॅमेरे गतिशून्य राहिले व इतकी चांगली संधी हुकली म्हणून हळहळ वाटली. मात्र, त्याच्या आकारावरून व पंखांच्या रचनेवरून काल रात्री बघितलेली छाया याचीच होती, याबद्दल खात्री पटली. रात्रीचे बारा वाजेपर्यंत वाट बघूनही घुबड परत न आल्याने निराशेपोटी घळीत उतरून शिल्लक राहिलेलं पिलू उचलून रेस्टहाऊसकडे प्रयाण केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र त्या घुबडाने त्या झाडावर सुंदर दर्शन दिले व बऱ्याच हालचाली केल्या. त्यामुळे त्याचे उत्तम निरीक्षण करता आले आणि हे निरीक्षण व्हिडीओ कॅमेऱ्यात बंदिस्त करण्याची संधी प्राप्त झाली. झाड सरळसोट उंच असल्याने त्या उंचीवरील ढोलीत खरंच अंडी होती की काय? हे आम्ही बघू शकलो नाही. निरीक्षणावरून, आपसातील चर्चेवरून व पुस्तकातील संदर्भावरून तो घुबड शॉर्ट इयर्ड आऊल (डुब्डू) आहे हे निश्चित झाले. याचा रंग पिवळसर असून सर्वत्र काळे पट्टेवजा ठिपके असतात. या घुबडाचे पंख निमुळते असून, शेपटीपेक्षा जरा लांब असतात. इतर घुबड सामान्यतः मान उभे करून बसतात तर हे घुबड जमिनीला समांतर बसते आणि लांबी जवळपास एक ते सव्वा फूट असते. मेळघाटात क्वचितच दिसणाऱ्या एका दुर्मिळ घुबडाचे दर्शन झाले हे कळल्यावरच सर्वांच्या आनंदाला पारावार राहिला नाही या सुंदर पक्ष्यांच्या निरीक्षणात सकाळचा वेळ कसा गेला हे कळलेच नाही व आम्ही अत्यंत आनंदात विश्रामगृहाकडे परतीचा प्रवास सुरू केला. रात्रीच्या घुबडाचे रेकॉर्डिंग केलेले बोल (अशा आवाजांना कॉल म्हणतात) ऐकायची इच्छा झाली व टेप ऐकायला सुरुवात केली. घुबडाचे डुब्डू डुब्डू असे आवाज ऐकल्यावर त्यातून इतर आवाजसुद्धा ऐकू यायला लागले. त्यात अचानक एक अत्यंत दुःखी स्त्री गळ्यातून रडण्याचा जसा आवाज काढते तसा आवाज आला व आम्ही आश्चर्यचकित झालो. कारण तेथे दोनशे फुटांच्या परिसरात कुठेही मनुष्यवस्ती नव्हती. त्या आवाजाची लय खरंच घाबरवणारी होती. भूत, चेटकिणीवर विश्वास न ठेवणारे आम्ही जरा विस्मयात पडलो. ते कोडे आम्हाला बरेच दिवस उलगडलं नाही. परंतु, अशाच एका भ्रमंतीत एका जाणत्या आदिवासीकडे या आवाजाची चौकशी केली असता त्याने जे सांगितले ते ऐकून हसूच आलं. त्याने सांगितले की, जेव्हा सांबराची मादी माजावर येते तेव्हा ती नराला आकर्षित करण्यासाठी असा आवाज काढते.

हे ऐकल्यावर एक सतत भेडसावणारे कोडे सुटले व तेव्हा कुठे आम्हाला

हायसे वाटले. जंगल एक गूढ आहे. तिथे निसर्गाने आपल्या झोळीत काय काय आणि किती रहस्ये लपवून ठेवलेली आहेत ते तोच जाणे! ती झोळी चाळवताना केव्हा, कसे व काय बाहेर येईल ते जाणायला तुम्हा-आम्हाला तीक्ष्ण पंचेंद्रियाबरोबरच नशिबाचे जबरदस्त पाठबळ लागते. या सर्वांतली अनिश्चितता, आकस्मिकता व त्यातील निर्भेळ आनंद तुम्हा-आम्हाला त्याकडे सतत ओढीत असतो.

●●●

१

# चरैवेती चरैवेती/निसर्गाचे प्रवासी

कार्तिकातील दवभिजली सकाळ होती, हुडहुडणारी थंडी! आणि आकाश निरभ्र होते, तारांगण आकाश व्यापून विरून गेलं होते, पहाटपक्ष्यांचे स्वर ऐकू येऊ लागले होते, दूर कुठेतरी सुरू असलेल्या काकड-आरतीचे सार्द स्वर ऐकू येत होते. अशा पहाटे आम्ही किल्ल्यांच्या अभ्यास सफरीवर निघालो होतो. जवळपासचेच किल्ले. एक मेळघाटातील हरिसाल जवळचा 'जिस्पी आमनेर' किल्ला, तर दुसरा होता अकोट जवळचा 'नरनाळा' किल्ला. त्याला कारणही तसेच झाले होते. नुकतेच, गड-किल्ल्यांची माहिती असलेलं एक पुस्तक प्रकाशित झालं होतं. त्यात आमच्या मित्रमंडळातील श्री. ज्ञानेश्वर दमाहे यांना काही बाबी दुर्लक्षित राहिल्या आहेत असे आढळून आले होते, कारण ते या किल्ल्यांचा अभ्यास करून आले होते. त्यांनी त्याबाबत सरांना सांगितले, लगेच सरांनी या किल्ल्यांच्या अभ्यास दौऱ्याला निघायचे ठरविले. त्याची पार्श्वभूमी कळायला आमच्या मित्रमंडळाबद्दल सांगणं आवश्यक आहे.

आमचा, अमरावतीत राहणाऱ्या पाच मित्रांचा कंपू! (तसे आमचे नागपूरचे पक्षिमित्र असूयेनं याला टोळकं म्हणतात). ग्रुपचं मुख्य सूत्र निसर्गाची आवड व निसर्गाचा अभ्यास. आमचे कर्णधार अर्थात कॅप्टन आहेत. डॉ. विजय इंगोले! हे इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रीकल विषयातले तज्ज्ञ व यंत्रविशारद. 'क्राम्प्टन' या प्रसिद्ध कंपनीचे चीफ इंजिनीअर राहिलेले. यांचं अनेक विषयांचं प्रगाढ वाचन. आम्ही केलेल्या भटकंतीच्या गोष्टी त्यांनी लिहिल्यात व त्या वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यात. तांत्रिक विषयात कठीण प्रश्न निर्माण झाल्यास ते हमखास सोडविणारे अशी यांची

ख्याती. काही वर्षांपूर्वी एका लहान मुलाच्या अंगाला ज्यांनी स्पर्श केला की त्याला विजेचा शॉक लागायचा. त्या वेळी ती बाब खूप गाजली. शेवटी इंगोले सरांनी त्याचे कोडे पत्रकारांसमोर उलगडून दाखविले.

दुसरे आहेत श्री. प्र. सु. हिरूरकर, अरण्यभ्रमंती करून त्यावर लिहिणारे प्रसिद्ध लेखक. त्यांचे लेख अनेक वृत्तपत्रांमध्ये वरचेवर प्रसिद्ध होतात. त्यांचं 'अरण्यओढ' हे पुस्तक प्रकाशित झालं आहे. आणि त्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही केला.

तिसरे आहेत श्री. ज्ञानेश्वर दमाहे, नावाजलेल्या वृत्तपत्रांमध्ये लेखन करणारे. मागे लोकमतला 'टोकरभर' व सध्या 'लोकसत्ते'ला 'खुमखुमी' हे लोकप्रिय सदर लिहिणारे. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या विनोदी कथा नियमित प्रकाशित होत असतात.

चौथे रेडिओ व संगणकतज्ज्ञ व अनेक विषयांचे वाचन असलेले श्री. शिरीषकुमार पाटील, हे खूप चिकित्सक व अभ्यासू आहेत.

अशा या विद्वान मंडळीत पक्ष्यांविषयी जुजबी माहिती असल्याच्या आधारावर प्रवेश मिळविलेली व्यक्ती म्हणजे अस्मादिक. (पद्माकर लाड.)

अनेक विषयांवर आमच्या चर्चा होतात. कुमार पाटलांच्या मनात अनेक विषयांबद्दल जे प्रश्न येतात, त्यावरून त्यांच्या अभ्यासाबद्दल व मनन-चिंतनाबद्दल नवल वाटते. त्या प्रश्नांची खुलासेवार उत्तरं, सरांकडून ऐकतांना आम्ही विस्मित होतो व आमचे ज्ञान समृद्ध होते. या चर्चेत माझी मात्र श्रवणभक्ती सुरू असते.

आमच्या चर्चेचे स्वरूप म्हणजे, आम्ही विचारलेल्या प्रश्नांना सरांनी उत्तरे द्यावी आणि सरांना स्फुरलेले विचार त्यांनी व्यक्त करावे असे असते. चर्चेच्या विषयांची व्याप्ती मात्र खूप मोठी असते. त्यात अवकाशातील रहस्यांचा भेद असतो. ग्रहताऱ्यांचा परिचय असतो. आईन्स्टाईन व इतर संशोधकांच्या सिद्धांताची सोप्या भाषेत उकल असते. जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून जीव, आत्मा, परमात्मा, पुनर्जन्म, मोक्ष याचे विवेचन असते. भगवद्‌गीता, पसायदान, ओमकार, धर्म, उपनिषदं यांचे वेगळ्या दृष्टिकोनातून परिशीलन असते. जीवनाच्या इतिकर्तव्याची मीमांसा असते. साहित्य व संगीतावर भाष्य असते.

आम्ही वरचेवर जंगलात जाऊन निसर्गाचा, पशुपक्ष्यांचा अभ्यास करतो. बहुतेक पौर्णिमा आमची कधीच चुकत नाही. आम्ही खूप फिरलो. नवेगाव,

नागझिरा, ताडोबा, भीमाशंकर, रेहकुरी, छत्तीसगडमधील बस्तरचे जंगल, कान्हाकिसली, बांधवगड आणि मेळघाट तर सतत आमच्या पायाखालीच! कितीदातरी पायपीट केली.


आम्ही इतकेवेळा फिरतो, खर्च बराच होतो. या खर्चाचा बराचसा भाग आमचे कर्णधारच उचलतात. आमच्या खर्चांचा सहभाग कसा असतो? तर-

एकदा परदेशातील एका मांसाहारी हॉटेलात एक जण जेवायला गेला. मेनूतील अनेक प्रकारच्या मांसाच्या डिशपैकी त्याने सशाच्या मांसाच्या डिशची ऑर्डर दिली. डिश आल्यावर त्याने जेवायला सुरुवात केल्यावर त्याला शंका आली. त्याने वेटरला विचारले, ''सशाच्या मांसात दुसऱ्या कशाचे मांस मिक्स केले आहे काय?'' तेव्हा वेटर उतरला, ''सध्या सशाच्या मांसाचा तुटवडा असल्यामुळे त्यात घोड्याचे मांस मिसळले आहे.'' थोडं थांबून ग्राहकाने विचारले, ''या दोन प्राण्यांचे मांस मिक्स करायचे प्रमाण किती आहे?'' वेटर उतरला, ''सारखे सारखे, सर'' ग्राहकाने पुन्हा पृच्छा केली, ''म्हणजे किती?''. वेटर नम्रपणे उतरला. ''महाशय, एका सशाबरोबर एक घोडा.''

तर खर्चाचा सहभाग सरांचा घोड्याएवढा असतो? तर आमचा सर्वांचा मिळून सशाएवढा असतो.

पंधराएक दिवसांच्या आधीची गोष्ट. दमार्हेनी लोकसत्तेच्या दिवाळी अंकात, जुन्याकाळी म्हणजे इंग्रजांच्या काळात असलेल्या ठगांवर 'कन्फेशन ऑफ ए ठग' हा अभ्यासपूर्ण लेख लिहिला. वाचकांना तो खूप आवडला. पूर्ण महाराष्ट्रातून त्यांना अनेक फोन व पत्रे आलीत. परंतु, दमार्हेच्या मनात एक खंत होती की, त्यांनी ज्या स्थळांचा शोध लावला त्याचे ते फोटो घेऊ शकले नाहीत. त्यांनी ही खंत सरांना बोलून दाखविली. तेव्हा सरांनी लगेच त्या स्थळांच्या भेटीची मोहीम आखली, आणि आम्ही परतवाड्यापासून १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या 'धावा' गावातील थडग्यांचे फोटो घेतलेत. पुढे ५-६ कि.मी. जाऊन 'चिंचठाण्या'ला रस्त्यालगतच असलेल्या 'बाबा कुंवर सय्यद'च्या सुशोभित मजारीचे चित्रीकरण केले.

हे सर्व करीपर्यंत जेवणाची वेळ होऊन गेली होती. जेवणाचे डबे सोबतच होते. एखाद्या नदीकाठी बसून जेवणाचा आनंद काही न्याराच असतो. मजारीवर मोरपंखाची चवरी ढाळणाऱ्या फकिराला विचारले, ''बाबा, पास में कही नदी



नरनाळ्या किल्ल्यावरील शार्दूल दरवाजा



चंदनखोऱ्याच्या काठावर बसवलेली नवगज तोफ



नदीचे खडकाळ पात्र



गडगा नदीच्या काठी एक दूपार

है?'' फकिराने उत्तर दिले, ''हां साब, आप थोडे आगे गये तो आपको नदी मिलेगी.''

आणि आम्ही एक-दोन कि.मी. पुढे गेल्यावर अकल्पितपणे पूर्णा नदीचे दर्शन झाले. नदीवर सध्या रहदारीचा अरुंद व ठेंगणा पूल आहे. नवीन पुलाचे काम सुरू होते. यंत्राने उंच आधारखांब उभारणे सुरू होते. सातपुडा पर्वताचाच हा भाग होता. दोन्ही बाजूंनी उंच उंच घाट असलेलं पूर्णेचं पात्र खूप मोठं होतं. पात्रात मधूनमधून मोठे खडक होते. त्यातून वाट काढीत वाहणाऱ्या प्रवाहाला लहान लहान धबधबे तयार झाले होते. आम्ही जेवणाचं विसरून नदीच्या पात्रात खूप दूरपर्यंत चालत गेलो. दोन्ही थडयांची निरनिराळी रूपे दिसत होती.

एका ठिकाणी थडीवर असलेल्या एका झाडाने खडकात मुळं खूप खोलपर्यंत पसरवली होती. झाडाचा जेवढा विस्तार जमिनीच्या वर होता त्याच्यापेक्षा जास्त विस्तार मुळांचा खडकामध्ये झाला होता. निसर्गातील घटकाची जीवन जगण्याची किती ही चिकाटी व धडपड! एवढ्या तेवढ्या कारणावरून आत्महत्या करणाऱ्या मानवाने वृक्षापासून बोध घ्यायला हवा! मध्यप्रदेशात उगम पावलेली ही अवखळ सातपुडाकन्या 'पूर्णा', महाराष्ट्रात शिरून पुढचा प्रवास करते ती 'पूर्णामाय' होऊन! दमाहेंचं काम करून आणि निसर्गाचं रूप पाहून आम्ही परतलो.

असं आहे आमचं मित्रमंडळ! सकाळी अगदी सहा वाजता आम्हा पाच जणांना घेऊन सरांची सिल्की सिल्व्हर रंगाची मारुती एस्टीम हंसी परतवाड्याकडे निघाली. सकाळचे आल्हाददायी वातावरण होते. सकाळी फिरायला जाणाऱ्यांचे जथ्थेच्या जथ्थे अगदी लांब जाईपर्यंत दिसत होते.

रस्त्यात आसेगावला वेळ जायची खोटी, कारण ही दमाहेंची सासुरवाडी. आसेगाव स्टँडवर कुणी नातेवाईक भेटले तर चहा घ्यायचा आग्रह व्हायची शक्यता. म्हणून आसेगाव क्रॉस होईपर्यंत आम्ही दमाहेंना गाडीत खिडकीजवळ काही बसू देत नाही.

दमाहेंचं व्यक्तिमत्त्व म्हणजे एक वेगळंच व्यक्तिमत्त्व! यांच्या अंगी नाना कळा... 'खुमखुमी'च्या चार ओळी अशा काही चपखल व आशयघन असतात की मन दाद देतं ''मान गये भाई!'' हे उत्तम नकलाकार. गावातील कथा-किस्से साभिनय सांगतात त्या वेळी हसून हसून पोट दुखतं. महफिलचे हिरो. कवींना काही तरी वेगळं करायची सवय असते. कुणी स्टायलिश दाढी वाढवतील, तर कुणी

झब्बा-पायजमा घालतील. तसे दमाहे, खेड्यातील शेतकरी आणि शेतमजूर जी चप्पल वापरतात तशी, टायरचं सोल असलेली चप्पल वापरतात. मग वर्गावर तास घ्यायला जायचं असो, की कुठे भाषण द्यायला जायचं असो! कष्टकऱ्यांशी सामाजिक बांधिलकी ठेवण्याचा प्रकार असावा. त्यातच पुन्हा कलाकारांना काही त्यांना शोभणारे व्यसन असतं. आपले सनईवाले 'भारतरत्न' बिस्मील्ला खान नाही का पान खायचे? तशी दमाहेंना मधूनमधून पान खायची सवय आहे, बहुतेक त्यामुळे त्यांना कवितेच्या ओळी स्फुरत असाव्यात.

सात वाजता परतवाड्याला पोहोचलो. मंडईजवळ गाडी थांबली तसे दमाहे समाधीतून जागे झाल्यासारखे उद्गारले, "कुमार एक सिग्रेट दे बरं." ही पुन्हा एक कलंदर लोकांची खासियत.

आमचे गाडीचे चक्रधर श्री. कुमार पाटील. गाडीचा काही प्रॉब्लेम झाला, दीड तासाची खोटी. सरांचे खास शैलीतील रागावणे झाले.

आमच्यातील सर्वांत उत्साही व्यक्ती म्हणजे हिरुरकर. पटकन् काहीतरी खायला घेऊन येतील आणि सर्वांना वाटतील. ट्रेकिंगच्या वेळी तर त्यांचा सर्वांना पेपरमिंट आणि लेमोनेटच्या गोळ्यांचा रतीब ठरलेलाच. जेवणं झाली की रात्री "चला सर जरा फिरून येऊ. किंवा जवळच तलाव आहे, जवळच मचाण आहे. किंवा चांदणं किती छान पडलं आहे चला फिरून येऊ." असं म्हणत मरगळलेल्या वृत्तीला ते उल्हसित करतात.

मंडईत त्यांच्यासोबत जाऊन दमाहे पेरूची अख्खी करंडीच घेऊन आले! आम्ही पुढे मार्गस्थ झालो. मी आणि दमाहे पेरूंचा फडशा पाडू लागलो. दमाहेंकडून कळलं की, आमनेरचा किल्ला हा तापी व गडगा नदीच्या संगमावर आहे. दोन नद्यांचा संगम म्हणजे एक मनोहारी दृश्य असतं. दोन नद्यांचे तट जवळजवळ येतात व जुळतात. दोन पात्रांचं एक विशाल पात्र होतं. दोन सख्यांची गळाभेट होते व एक सखी, तिने आतापर्यंत जपलेली आपली वेगळी ओळख दुसरीत विलीन करून टाकते. दोन मोठ्या नद्यांचा संगम पाहतांना आपलं मन आभाळ होतं.

मेळघाटच्या जीवनदायिनी अशा दोन मुख्य नद्या म्हणजे सिपना व गडगा. मेळघाटात प्रवास करताना या दोन नद्या अनेकदा भेटतात, कधी रस्त्याला समांतर तर कधी रस्त्याला आडव्या. त्यांची ती रूपे पाहताना मन प्रसन्न होते. काही

विश्रामगृहे या नद्यांच्या काठी वसलेली आहे. तेथे नदीच्या खळ्खळाटाचा ध्वनी वातावरण भारून टाकतो. सेमाडोह संकुलाजवळ जाताना सिपना नदीवर एक पूल लागतो. तेथे नदीचं पात्र पसरट आहे. नितळ स्वच्छ पाण्याने काठोकाठ भरून वाहणाऱ्या नदीचं रूप मनात एवढं ठसलं आहे की, ते कधीच विसरू शकणार नाही.

गडगा नदीचं वैशिष्ट्य म्हणजे तिच्या पात्रातले मोठेमोठे खडक आणि त्यांना कवेत घेऊन वाहणारी गडगा. आम्ही काही दिवसांपुर्वी मेळघाटात आलो होतो. दुपारच्या वेळी 'कोलकास' विश्रामगृहाजवळ असताना आकाश अगदी निरभ्र होतं. पण एकाएकी आकाशात ढग जमू लागले. प्रचंड काळ्या मेघांनी आकाश भरून आलं. सर्वत्र अंधारल्यासारखं झालं. सोसाट्याचा वारा सुटला आणि जंगलावर सर्रर्र आवाज करीत टपोऱ्या थेंबांची सर आली, पाहता पाहता पावसाच्या सरी दाट होऊन मुसळधार पाऊस कोसळू लागला. सर्व जंगल पावसाने झाकून गेलं. तास दीड तास असा पाऊस कोसळत होता. पावसानं जंगलाला चिंब भिजवलं. पाऊस थांबल्यावर आम्ही 'बेलकुंड'कडे पुढच्या प्रवासाला निघालो, तेव्हा सर्व लहान-मोठे ओढे भरभरून वाहत होते. रस्त्यावर पाणीच पाणी साचलं होतं. रस्त्यावरचं व ओढ्यातील पाणी उडवीत आमची गाडी जात होती. नंतर गडगा नदीचा पूल लागला. हा पूल बराच लांब आहे. नदीला पूर आला होता व ती दुथडी भरून वाहत होती. रोरावत जाणारा नदीचा प्रवाह पुलाच्या गार्ड स्टोनला धडका मारीत होता. पुलावर प्रवाहाचे पाणी पसरू लागले होते. फुफाटत सैरावैरा जाणारा तो प्रवाह असलेलं ते नदीचं उग्ररूप पाहून मनात धडकी भरत होती.

ढाकण्याचं विश्रामगृह डोलार नदीच्या काठावरच वसलेलं आहे. येथे डोलार नदीचा प्रवाह पूर्व-पश्चिम वाहतो. नदीच्या दोन्ही काठांवर मोठमोठ्या वृक्षांचं दाट जंगल आहे. विश्रामगृह उंचावर आहे. ढाकण्याला मुक्काम असला की, सायंकाळच्या वेळेला आम्ही नदीच्या पात्रातील खडकावर, खळखळ वाहणाऱ्या नदीच्या पात्रात पाय बुडवून बसतो. नदीचे व जंगलाचे रूप निरखत व पक्ष्यांचे आवाज ऐकत वेळ कसा गेला तो कळत नाही. सूर्य पश्चिम क्षितिजावर टेकला की रक्तीम आकाशाचे प्रतिबिंब पाण्यात पडून पाणी तांबूस दिसते. दोन्ही काठांवरच्या वृक्षांच्या दाटव्यात दिसणारे ते फारच विलोभनीय दृश्य असतं.

एकदा आम्ही असेच तेथे बसलो असताना बाजूच्या जंगलातून १७-१८

वर्षाची एक आदिवासी तरुणी खांद्यावर दहाबारा फुट लांबीचे एक लाकूड घेऊन आली. आमच्यापासून थोड्याच अंतरावर एक सपाट खडक होता. त्या खडकावर तिने ते लाकूड ठेवले. तिच्यासोबत सहा-सात वर्षांचा एक मुलगा व आठ आणि दहा वर्षांच्या दोन मुली होत्या. तिने कमरेच्या दुपट्ट्यात खोचलेली कुऱ्हाड काढली व त्या कुऱ्हाडीने ती ते लाकूड फोडू लागली. अगदी सहजपणे ती लाकडाचे तुकडे करू लागली. तिच्या सफाईदार हालचाली व लाकूड फोडण्याचे कौशल्य लक्षणीय होते. थोड्याच वेळात तिने त्या लाकडाच्या दोन लहान व एक मोठी मोळी केली. तिच्या सोबत आलेले तिघे तिचे भावंड असावेत. दोन लहान मोळ्या दोन मुलींच्या डोक्यावर दिल्या. मोठ्या मोळीत कुऱ्हाड खोचली, आता ती मोळी उचलणार असे वाटत असतानाच अचानक तिने आम्हाला विचारले, ''भाईसाहेब, आप लोग कहाँ से आये है?'' आम्ही उत्तरलो, ''अमरावतीसे'' ती म्हणाली, ''मै भी अमरावती में रहती हूं। वहाँ के डी.एड. कॉलेज में पढती हूं। अभी छुट्टी में यहाँ गांव में आयी हूं।'' ती बोलली. आम्ही आश्चर्यचकित झालो.आमच्यापैकी एकाने तिला विचारलं, ''बारवी कहाँ से की?'' ती उतरली, ''धारणीसे। ७० पर्सेंट मार्कस् मिले थे.''

आमच्या सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव होते. आम्ही तिला पुढील शिक्षणाच्या शुभेच्छा दिल्या. तिने मोळी उचलली व डोक्यावर घेऊन चालू लागली. तिची भावंडं तिच्या पाठोपाठ जात होती. नदीचा घाट चढतानाच्या तिच्या पाठमोऱ्या आकृतीत आम्हाला आदिवासींच्या प्रगतीचा आधारस्तंभ दिसत होता. आमच्या मनाच्या आठवणीच्या कप्प्यात हा प्रसंग कायमचा जाऊन बसला.

आम्ही धारणीला पोहोचल्यावर मध्यप्रदेशकडे जाणाऱ्या बुऱ्हाणपूर रस्त्याने १४ कि.मी. गेल्यावर धुळघाटरोड हे गाव लागले. जवळच 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावाची आश्रमशाळा लागली. तेथून उजवीकडे कच्च्या रस्त्याने ४ कि.मी. पुढे गेल्यावर 'जिल्पी आमनेर' किल्ला दिसू लागला. गाडी तेथे ठेवून लगतचे उतारावरील शेत ओलांडले व आम्ही गडगा नदीच्या पात्रात उतरलो. पात्रातील खडकांमुळे मुख्य नदीच्या प्रवाहाचे तीन वेगवेगळे प्रवाह तयार झाले होते.

नदीच्या पात्रातील खडकांवर दोन-तीन ठिकाणी गटागटांत काही आदिवासी बाया व माणसे बसली होती. प्रत्येक ठिकाणी शेकोटी (धुनी) पेटली होती व तेथे

काही पूजाअर्चा, होम सुरू होते. आम्ही ज्या पायवाटेने जात होतो त्या पायवाटेला लागूनच एक गट बसला होता. कोंबडीची दोन गोजिरवाणी पिले चिव् चिव् असा आवाज करीत त्या माणसांच्या आजूबाजूला फिरत होती. आम्ही चौकशी केल्यावर कळले की, एका माणसाचा आजार औषधोपचार करूनही बरा होत नाही. त्याची प्रकृती चांगली व्हावी म्हणून ही पूजा-अर्चा सुरू आहे. बिचारी ती गोजिरवाणी पिले त्या इसमाच्या आयुष्याला बळ मिळावं म्हणून बळी दिली जाणार होती.

नदीच्या प्रवाहात असलेल्या शेवाळलेल्या दगडांवरून तोल सांभाळत जात आम्ही गडगा नदी पार केली. नद्यांच्या संगमाच्या टोकावरच हा लहान चौकोनी आकारातील किल्ला आहे. उत्तरेकडील बाजूने तापी नदी, पश्चिम बाजूने गडगा, तर तिसऱ्या पूर्व बाजूकडून लहान माधवा नदी असून दक्षिण बाजूकडून सपाट मैदान आहे. तीन नद्यांच्या मधील त्रिकोणाकृती भागामध्ये हा किल्ला उभा आहे. किल्ल्याचे बांधकाम विटा-चुन्यामध्ये केलेले आहे. किल्ल्याच्या भिंतीची व बुरुजांची पडझड झालेली आहे. तापी नदीकडील सपाट मैदानाजवळची भिंत अजून शाबूत आहे आणि या दोन्ही भिंतींच्या कोपरावरील बुरूज अजून उभा आहे. किल्ल्याच्या आत शिरून या बुरुजावर चढून तेथून दोन्ही नदीच्या प्रवाहाचे दिसणारे दृश्य पाहायची आमची मनीषा होती, परंतु किल्ल्याभोवताल दाट काटेरी झुडपे वाढली होती. आम्ही तापी नदीच्या तटावर आलो. नदीचा विस्तीर्ण व शांत प्रवाह नजरेत भरला. तिचे धीरगंभीर रूप पाहून अंगावर रोमांच उठले.

आम्ही किल्ल्याच्या भोवताल दोन परिक्रमा केल्यात. परंतु किल्ल्याभोवताल असलेली दाट काटेरी झुडपांची तटबंदी आम्हाला अभेद्य होती. एव्हाना दुपार टळून गेली होती, सूर्य पश्चिमेकडे कलला होता. पश्चिम क्षितिजावर काळे ढग जमू लागले होते. आकाश काळवंडण्याआधी किंवा पाऊस सुरू होण्याआधी नदी ओलांडणं व परत फिरणं आवश्यक होते.

आमचा रात्रीचा मुक्काम 'तारूबांदा' वनविश्रामगृहावर होता. आम्ही विश्रामगृहाला पोहोचलो त्या वेळी सायंकाळचे सात वाजले होते. या भागातील जंगलात काही दिवसांपूर्वी एका वाघाने गवळ्यांची गुरे मारून खळबळ उडवून दिली होती. या भागात वाघाचे वास्तव्य असल्यामुळे आमच्या मनात या प्रवासात वाघ दिसण्याबद्दलची आशा पल्लवित झाली होती, पण व्यर्थ. वाघ काही दिसला नाही.

हे विश्रामगृह उंचावर आहे. विश्रामगृहाभोवतीचे उंच वृक्ष, लागूनच खोरे व त्या पलीकडे उंच पर्वताच्या रांगा असं दृश्य दिसतं.

रात्रीचे जेवणं झाल्यावर आम्ही दीड-दोन कि.मी. वर असलेल्या निरीक्षण मनोऱ्यावर (वॉचिंग टॉवर) गेलो. ही पौर्णिमेची रात्र होती. पौर्णिमेच्या रात्रीचं जंगलाच रूप म्हणजे स्वप्निल वातावरण, वृक्षांवर पडलेला पिठूर चंद्रप्रकाश, वृक्षांच्या तळाशी साकळलेल्या काळ्या गूढ सावल्या व पायवाटेवर पडलेले चंद्रप्रकाशाचे कवडसे असं अद्‌भुत व मोहमयी असतं. सकाळी जाग आली ती पक्ष्यांच्या किलबिलाटानं. वातावरणात व जंगलावर पातळ धुकं पसरलं होतं. पूर्वेकडे तांबडं फुटलं होतं. सर्वत्र दव पडलं होतं, त्यामुळे ओलसर थंडी जाणवत होती. टकाचोर पक्ष्यांचा थवा कलकलाट करीत या झाडावरून त्या झाडावर उडत जंगलात शिकारीकरिता निघाला होता. पूर्वेकडचं आकाश तेजाळलं, पर्वताची कडा चमकदार सोनेरी दिसू लागली व हळूच पर्वताआडून सूर्यबिंब वर आलं. सूर्याची किरणं धुक्याचा पडदा छेदून जमिनीवर पडू लागली. वृक्षांच्या पानांमधून येणाऱ्या सूर्याच्या किरणशलाका तेजाळून टाकत होत्या. त्यामुळे जंगलात प्रकाशाचा धूसर पडदा दिसू लागला. इतक्यात एक नवल घडलं! वृक्षांची पाने सूर्यप्रकाशामुळे चमकू लागली. पानापानांवर सूर्यकिरणाचे चमकदार दिवे लागले. वृक्षांमधून सगळीकडे दिवेच दिवे दिसू लागले. निसर्गातील हा पहाटेचा दिपोत्सव अल्पकाल दिसला. पानांवरलं दहिवर विरलं आणि हे दृश्यसुद्धा विरून गेलं.

सकाळचा चहा झाल्यावर आम्ही नरनाळा किल्ल्याकडे कूच केलं. धारणी--अकोट रस्ता बराचसा जंगलाच्या अतिसंरक्षित भागातून जातो. त्यामुळे दाट जंगल असलेले उंच उंच पर्वत व खोल दऱ्या असलेल्या दृश्याचे पट आपल्यासमोर उलगडतच आपला प्रवास होतो. या रस्त्याने वर्दळ कमी आहे. एखाद-दुसरं वाहन क्रॉस होतं. ही डांबरी सडक दाट उंच गवतातून जाते. प्रत्येक वळणानंतर कसं दृश्य दिसेल, याची उत्कंठा लागून राहते.

घाट रस्ता संपून सपाटीवर आलो म्हणजे पोपटखेडा हे गाव लागतं. तेथून मुख्य रस्ता सोडून नरनाळा किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याने वळलो. थोडे अंतर गेल्यावर सातपुड्याच्या पर्वताची एक लांबच लांब उंच कडा दिसू लागली. पंधरा-वीस मिनिटांच्या प्रवासानंतर शहानूर गाव लागलं. इथं वनखात्याचा तपासणी नाका आहे. येथून किल्ल्याची तटबंदी व बुरूज दिसू लागले.



ओहळाच्या काठी



जंगलातील वनरक्षकाची कूटी



गडगा नदीच्या पाण्यात पाय बुडवून निसर्गात रमताना



आम्ही भ्रमणवेडे जीवलग मित्र

१) डावीकडून, शिरिषकुमार पाटील, प्र.सु. हिरुरकर, श्री ज्ञानेश्वर दमाहे
श्री पद्मनाकर लाड, लेखक, डॉ. मनोहर खोडे

शहानूरपासून किल्ल्याच्या आतपर्यंत डांबरी सडक गेली आहे. या सडकेची सध्या पार दुर्दशा झाली आहे. सडकेवर जागोजागी खड्डे पडलेले आहेत व कुठे कुठे सडक तुटलेली आहे. खड्डे वाचवीत गाडी चालवताना कुमार पाटलांचं ड्रायव्हिंगचं कौशल्य पणाला लागत होतं. क्षणभर असं वाटलं की, आपण अमरावती-नागपूर हायवेनंच प्रवास करीत आहोत की काय!

सातपुडा पर्वतरांगेमध्ये दोन बाजूंनी उंच व अभेद्य कडे व इतरही बाजूंनी चढण्यास कठीण असलेल्या एका उंच, पण सपाट पठारावर, नैसर्गिक तटबंदीचा उपयोग करून हा किल्ला बांधला आहे. किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ ३९२ एकर असून, किल्ल्याची एकूण तटबंदी २४ मैल इतकी लांब आहे. या तटबंदीमध्ये एकूण ६७ बुरूज आहेत आणि लहान-मोठे असे २२ दरवाजे आहेत. किल्ल्यात पाणीपुरवठ्यासाठी एकूण २२ तलाव आहेत. किल्ल्याच्या एका बाजूने चंदनखोरे, तर, दुसऱ्या बाजूने पाताळगंगा खोरे अशी दोन खूप खोल खोरी आहेत. हा किल्ला यादवकाळात म्हणजे सातशे-आठशे वर्षांपूर्वी बांधलेला आहे.

श्री. दमाहेंनी सांगितलेल्या नरनाळा किल्ल्याच्या माहितीमुळे किल्ल्याच्या भव्यतेची कल्पना येऊन किल्ला बघायची आमची उत्कंठा वाढली. आमची गाडी ज्या रस्त्यावरून जात होती त्या रस्त्याने जुन्या काळी गज, घोडे, पालख्या जात असतील आणि वन्यप्राण्यांचा संचार असलेले जंगलही खूप दाट असेल. हा रस्ता पुढे खूपच खराब होता म्हणून कुमार पाटील एकटेच गाडी घेऊन किल्ल्यावर निघाले व आम्ही पायवाटेनं किल्ला चढू लागलो. आम्ही जस जसे वर चढत होतो तसतसा खूप मोठा भूप्रदेश दृष्टिपथात येत होता.

त्यात शेताचे लहान लहान आकार, अनेक तलाव व खूप लांबवर दिसणारी लहान लहान गावे आणि रस्त्याच्या रेषांवरून धावणारी खेळण्यातल्या सारखी वाहने दिसत होती. चंदनखोऱ्याच्या काठाने चालत आम्ही 'शहानूर' दरवाजाजवळ पोहोचलो.

किल्ल्याची तटबंदी व बुरूज हे सहाफुटी घाशीव दगड एकमेकांवर मांडून सुबक जोडणी केलेले आहे. दगडाचे बाह्य स्वरूप घासलेले व कुठेही जोडणी न दिसणारे आहे. हे दगड तटबंदीत एकमेकांवर मांडताना ते एकमेकांत कसे अडकवून ठेवलेले आहेत, ते सरांनी आमच्या निदर्शनास आणून दिले. शहानूर दरवाजा ओलांडून आम्ही महाकाली दरवाजाजवळ पोहोचलो. महाकाली दरवाजा ही

किल्ल्यावरील सर्वांत सुंदर वास्तू आहे. हा दरवाजा इमारतीसारखाच आहे व विविध नक्षीकामांनी सुशोभित केला आहे. दरवाजाच्या आत द्वारपालांच्या खोल्या आहेत. दगडी कमानी असलेल्या चावड्या आहेत. दरवाजाच्या दोन्ही बाजूंनी उंचावर सज्जे आहेत, सज्जापर्यंत पोहोचण्यासाठी पायऱ्या आहेत. महाकाली दरवाजापासून एक पायवाट किल्ल्याच्या मुख्य भागाकडे म्हणजे सक्कर तलवाच्या परिसराजवळ जाते. किल्ल्यावरील महत्त्वाच्या वास्तू तलावाच्या भोवताली उभ्या आहेत. दरबार हॉल ही सर्वांत मोठी उंच व सुस्थितीत असलेली इमारत आहे. याच इमारतीला 'अंबा महाल' व 'अंबर महाल' म्हणतात. अंबर महालाच्या डाव्या अंगाला एक सुस्थितीत असलेली मशीद आहे. अंबर महालाच्या पश्चिमेला छोट्या दगडी कमानीचे, अरुंद पण सलग खोल्या असलेले, जमिनीत उतरणारे दगडी भुयार आहे. पण आता त्याच्या तोंडावर झाडे, झुडपे वाढून ते बंद झाले आहे. अंबर महालाच्या समोर सक्कर तलावाच्या काठावर एक कबर आहे, यास 'कुत्तादेव' म्हणून ओळखले जाते. कुत्रा चावल्यास या कबरीचे दर्शन घेऊन सक्कर तलावात आंघोळ केल्यास रोगी बरा होतो, असा या परिसरामध्ये समज आहे.

सक्कर तलावाच्या पश्चिमेला जुनं बांधकाम असून ती घोडबाग नावाने प्रचलित आहे. येथून उत्तरेकडे थोडं दूरपर्यंत डांबरी सडक असून, तेथे व्याघ्र प्रकल्पाची कुटी व बिनतारेच्या संदेशयंत्रणेचा मनोरा आहे. या किल्ल्यावरचा एक महत्त्वाचा बुरूज 'तेलीया बुरूज' हा किल्ल्याच्या पश्चिमेकडे तेलीयागड दरवाजाच्या पुढे गाईल टेकडीकडे जाणाऱ्या तोंडावर आहे. तटबंदीतील एक दरवाजा शिरपूर दरवाजा, इथं उभं राहून पाहिलं की खूप खाली पश्चिमेकडे दूरवर पसरलेलं जंगल, धारगड या प्रसिद्ध शिवालयाजवळची सरळसोट उतार असलेली टेकडी, त्यावर अगदी टोकावर असलेलं शार्दूलबुवाचं मंदिर दिसतं. त्या पलीकडे सातपुडा पर्वताच्या निळाईत एकरूप झालेल्या पर्वतरांगा दिसतात. शिरपूर दरवाजापासून दरीत उतरणारी एक वाट सरळ गुल्लरघाट या गावाकडे जाते.

किल्ल्यावर एकूण तीन तोफा आहेत. त्यातली एक सर्वांत मोठी नौगज तोफ ही चंदनखोऱ्याच्या काठावरील तटबंदीवर आहे. दोन तोफा आकोट दरवाजाजवळ आहे. आकोट दरवाजाच्या चौकातून प्रवेश केल्यावर दोन तोफा दिसतात. त्यापुढे दगडात बांधलेला एक सुंदर व मजबूत बुरूज आहे. उभ्या सरळसोट कड्यावर बांधलेला हाच 'खुनी बुरूज'. कडेलोट झालेली शिक्षा या

बुरूजावरून अमलात आणली जायची. किती लोकांचा या बुरुजावरून कडेलोट झाला असेल देव जाणे!

अर्धगोलाकार असलेल्या आतील बाजूने खाली कमानी असून त्यावर टेहळणी करण्यासाठी फिरण्यायोग्य जागा आहे. बुरुजावर चढण्यासाठी अर्धगोलाच्या दोन्ही बाजूंनी पायऱ्या आहेत. दोन्ही पायऱ्यांच्या भिंतीवर मजबूत दगडात कोरलेल्या दोन आकृती आहेत. यात पहिली प्राण्याची आकृती वाघाची आहे असे समजले जाते व दुसरी आकृती 'चांदसितारा' आहे, असे समजले जाते. पण, या दोन्ही आकृतीतील बारकावे सर्वांनी लक्षात आणून देऊन पहिली आकृती सिंहाची, तर दुसरी चंद्र आणि सूर्याची आहे हे पटवून दिले. त्याचप्रमाणे तेथे असलेल्या तोफांचे मागील भाग तुटले असल्यामुळे त्या तोफा एकतर पहिल्या वापरातच निकामी झाल्या किंवा इंग्रजांनी त्या तोडून निकामी केल्या असाव्यात, असा अंदाज व्यक्त केला. किल्ल्याच्या तटबंदीतील अनेक दरवाजे सुस्थितीत आहेत. अनेक वास्तू व तलाव प्रेक्षणीय आहेत. किल्ल्यात दुर्गामाता मूर्ती, हनुमानाची मूर्ती, शिवलिंग, नाग इत्यादी शिल्पे आहेत. किल्ल्याच्या तटबंदीत काही ठिकाणी निरीक्षण झरोके आहेत. तेथे बसून किल्ल्याच्या भोवतालचे निसर्गसौंदर्य पाहता येते.

इतिहासातील पुरातन वास्तूंशी निगडित अनेक आख्यायिका प्रचलित असतात. तशाच नरनाळा किल्ल्यासंबंधी आहेत. त्यातील महत्त्वाची राणीच्या शिवभक्तीसंबंधी आहे. खूप वर्षांआधी नरनाळा किल्ल्यावर आप्पाराजा नावाचा हिंदू राजा राज्य करीत होता. या राजाची राणी निस्सीम शिवभक्त होती. आप्पाराजाच्या मृत्यूनंतर राणीने १५-२० वर्षे गडाचा कारभार सांभाळला. किल्ल्याच्या जवळच ३ कि.मी. अंतरावर सातपुडा पर्वताच्या गुहेत 'धारगड' हे प्रसिद्ध शिवालय आहे. 'धारगड'चा महादेव हे राणीचे श्रद्धास्थान होते व ती तेथे दर्शनाला जायची. श्रावणातल्या तिसऱ्या सोमवारी राणी महादेवाचे दर्शन घेतल्याशिवाय अन्न-पाण्यालाही शिवत नसे. एकदा श्रावण महिन्यातच शत्रूने नरनाळा किल्ल्याला वेढा घातला, त्यामुळे राणीला धारगडला दर्शनाला जायला अडचण निर्माण झाली. श्रावणातल्या तिसऱ्या सोमवारी राणीला दृष्टान्त झाला, त्यामध्ये ''भुयारी मार्गाने दर्शनास ये, मी तुझे रक्षण करीन!'' असे महादेवाने सांगितले. त्याप्रमाणे राणी निर्धास्तपणे दर्शनाला गेली. पूजाअर्चा करून राणी

परत येत असताना रस्त्यालगतच असलेल्या एक उंच टेकडीकडे राणीचे लक्ष गेले, तेव्हा राणीला टेकडीवर एक मोठा वाघ बसलेला दिसला. थोडे समोर आऊन राणीने टेकडीकडे मागे वळून पाहिले तेव्हा तो वाघ अदृश्य झाला होता. वाघालाच 'शार्दूल' हे नाव आहे. पुढे टेकडीवर मंदिर बांधले गेले व ती टेकडी शार्दूलबोआची टेकडी म्हणून ओळखली जाऊ लागली. तशाच किल्ल्यातील भुयारांसंबंधी आख्यायिका आहेत. महाकाली दरवाजाच्या एका सज्जातून असलेले भुयार सरळ २८ कि.मी. वर असलेल्या अकोट गावाजवळ निघते असे म्हणतात.

इंग्रजांच्या काळापासून या किल्ल्याकडे दुर्लक्ष झाले. क्रांतिकारकांनी या किल्ल्याचा वापर करू नये म्हणून इंग्रजांनी किल्ल्यावरील वास्तू उध्वस्त केल्या. काही वर्षांपासून हा किल्ला असामाजिक तत्त्वांचे आश्रयस्थान झाला होता. किल्ल्याच्या परिसरात स्थानिक लोकांची व काटेवाड्यांची गुरे चराई सुरू झाली होती व किल्ल्याला उतरती कळा लागली होती. परंतु, किल्ल्याचे नशीब फळफळले. इ. स. १९९७ मध्ये महाराष्ट्र शासनाने नरनाळा, वान व अंबाबरच्या जंगलाला अभयारण्याचा दर्जा बहाल केला. नंतर ही तिन्ही अभयारण्ये १९९९ मध्ये व्याघ्र प्रकल्पाला जोडण्यात आली. त्यामुळे नरनाळा किल्ल्याचे व परिसरचे संरक्षण झाले.

आता किल्ल्यावरील कुरणे व जंगल वाढले व ते सातपुडा पर्वतराजीतील जंगलात मिसळून गेले, त्यामुळे व किल्ल्यावरील भग्न वास्तुमुळे किल्ल्याचा परिसर मेळघाटाशी एकरूप होऊन गेला व नरनाळ्यावर वन्यप्राण्यांचा संचार वाढला. आता किल्ल्यावरील भग्न राजमहालाचा ताबा एखाद वेळी जंगलाचा राजा वाघ घेईल व एखाद्या भुयारात वाघाची राणी पिलांना जन्म देईल व किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना, नरनाळ्याचा ऐतिहासीक वारसा पाहिल्याच्या आनंदासोबत वन्यप्राण्यांचे व जंगलाच्या राजाच्या दर्शनाचासुद्धा योग येईल.

आम्ही तेलीया बुरूजावर उभे होतो. सूर्याने आपल्या किरणांचा पसारा आटोपता घेतला होता व त्याने पश्चिमेच्या डोंगराआड जाण्यासाठी प्रवास सुरू केला होता. किल्ल्यावरील गवतावर व वृक्षांवर सूर्याचे मावळतीचे हळदुलं उन्ह पडलं होतं. किल्ल्यावरील जंगलावर टेकड्यांच्या सावल्या पडल्या होत्या. शार्दूल टेकडीवरील मंदिर अस्पष्ट दिसू लागले होते.

जंगलातून सुतार पक्ष्याचा टोक् टोक् आवाज ऐकू येत होता. बुरुजालगतच्या

दरीतून सों सों करीत वारे किल्ल्यावर वाहत होते व कड्यावरील वृक्षांशी झुंजत होते. वर आकाशात एक सर्पगरुड पंख स्थिर ठेवून वाहणाऱ्या वाऱ्यावर तरंगत खाली जंगलावर नजर रोखीत दिवसाची आपली शेवटची शिकार मिळवण्याच्या प्रयत्नात होता. वातावरणात येणाऱ्या थंडीची व जंगलावर पसरणाऱ्या धुक्याची चाहूल लागली होती. हे दृश्य नजरेत साठवून आम्ही परतीची वाट धरली.

उपनिषदात एक बोधवचन आहे 'चरैवेती चरैवेती' म्हणजे चालत रहा, चालत रहा. फिरस्त्याचे पाय फुलासारखे असतात. जो बसून राहतो त्याचं दैवही बसकण मारतं. जो उभा राहतो त्याचं दैवही खडं राहतं. जो झोपून राहतो त्याचं दैवही झोपी जातं. जो चालू लागतो त्याचं दैवही चालत राहतं. म्हणून भटकत रहा!

**'फिरस्त्याला मध व औदुंबराचं मधुर फळ मिळतं,**
**त्याला सूर्याचं सौंदर्य पाहायला मिळतं,**
**फिरायचा उबग येत नाही,**
**म्हणून भटकत रहा, भटकत रहा...!'**

•••

१०

# मेळघाट अवलोकन

गेली पंधरा वर्षे सगळा मेळघाट फिरताना व्याघ्र दर्शनाअभावी नेहमीच निराशा व्हायची, मन उद्विग्न व्हायचे आणि त्यात जखमेवर मीठ म्हणजे आऊटपोस्टवर या सुंदर प्राण्याची रंगवलेली भयानक चित्र. मेळघाट वाघांसाठी जरी प्रसिद्ध असला तरी आमचीच काय, सर्वच निसर्गप्रेमींची व्याघ्र दर्शनाअभावी निराशा होते. व्याघ्रदर्शन न होण्यास बरीच कारणे असू शकतात, पण त्यातून महत्त्वाचं कारण म्हणजे तेथील उंच उंच डोंगर व त्यामध्ये असलेल्या खोल खोल दऱ्या. साध्या रस्त्याचाच काय, पण पायवाटेचासुद्धा अभाव, वाटाडे दुर्मिळ! आणखी त्यात भर म्हणजे सुरक्षित आणि अतिसुरक्षित जंगल असे वर्गीकरण व त्यामध्ये प्रवेशाचे कडक नियम व बंदी. येथील पर्यटकांचे जंगल म्हणजे जंगलातून गेलेल्या राजमार्गापासून दहा-पन्नास फूट पसरलेलं. त्यामुळे नेहमी असं वाटायचं की, येथे योग्य सोयी व जर वाटाडे उपलब्ध असते तर आमच्यासारखे अनेक निसर्गप्रेमी या अरण्यसृष्टीला पारखे झाले नसते. अशा अरण्यात निसर्गप्रेमींचा अभाव, अपुरे व्यवस्थापन यामुळं या जंगलात अवैध शिकारीला ऊत आला, ही काही आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट नाही. हजारो वाघांचे वास्तव्य असणाऱ्या या जंगलात आता वाघांची संख्या दोन अंकी झाली आहे आणि अशा उदासीनतेमुळं ती एका अंकावर यायला काहीच वेळ लागणार नाही. ऐन मध्य जंगलात लोकांची गावं, त्यांची स्वतःची शेकडो व बाहेरील नातेवाईकांकडून आणलेली हजारो गुरे या जंगलात मुक्तपणे संचार करताना दिसतात. त्यामुळे हरीण, सांबर, भेकर, चितळ व रानडुक्कर अशा तृणभक्षी वन्यप्राण्यांची उपासमार होते. एकतर ते भुकेनं मरतात,

त्यांचे प्रजनन योग्य रीतीने होत नाही किंवा ते इतरत्र स्थलांतर करतात. सद्यःस्थितील त्याची कारणे ही वाढत आहेत. पूर्वी निसर्गाने ठरवलेल्या नियमात हे प्राणी परिस्थितिनुरूप रुळले होते व एक समतोल राखला जात होता. सगळे जंगल बाराही महिने जिवंत राहत होते. स्वातंत्र्योत्तर काळातील विकासकार्यात जागोजागी धरणे, बांध बांधली गेलीत. त्या पाण्यावर शेतकरी बारमाही पिके घेऊ लागला व सगळा शेतमाळ पावसाळ्यातच काय, पण हिवाळ्या, उन्हाळ्यात हिरवागार दिसू लागला. त्याचे फायदेपण झालेत. पण, अशी धरणे जेव्हा पर्वताच्या पायथ्याशी होऊ लागली तेव्हा नैसर्गिकपणे त्या हिरव्या चाऱ्याच्या लालचीने ते डोंगरवासी तृणभक्षक वाळलेलं जंगल सोडून पायथ्याकडे स्थलांतर करू लागले. जानेवारीनंतर स्थलांतराचे प्रमाण खूपच वाढते.

त्यामुळे शेतकऱ्याची ओरड वाढली. त्यामुळे त्याहीपेक्षा विपरीत गोष्ट घडली ती ही की, जंगलातले मांसभक्षी प्राणी आपल्या नैसर्गिक खाद्याला मुकले व त्यामुळे त्यांचं अस्तित्व धोक्यात आलं. दक्षिण महाराष्ट्राचं उदाहरण घेतलं तर मांसभक्षी प्राणी सह्याद्रीच्या जंगलात राहायचे. परंतु, जंगलतोडीमुळे तो भाग वैराण होत गेला व तिकडे भीमा, कृष्णा, कोयना, प्रवरा इत्यादी नद्यांवर धरणे बांधली गेलीत, शेतीला ओलिताकरिता पाणी मिळाले. शेतकरी शेतात ऊस लावू लागले व उसाच्या बारमाही पिकांमुळे तृणभक्षी वन्य प्राणी तिकडे आकर्षिले गेले. त्यांनी स्थलांतर केले व भक्ष्यासोबत बिबटसदृश मांसभक्षी प्राणीसुद्धा आता ऊसमळ्यात दिसायला लागले. त्यामुळे लोकांची ओरड वाढली व वनखात्याला त्या मांसभक्षी प्राण्याला जेरबंद करून दुसरीकडे जंगलात त्याचे स्थलांतर करविणे, हे काम करावे लागत आहे व तो त्यांच्या चिंतेचा विषय झाला आहे. हीच परिस्थिती ताडोबा-अंधारी अभयारण्यात वाघाच्या बाबतीत आढळत आहे. मनुष्य आणि वाघाचा संघर्ष वाढताना दिसत आहे. वाघ आता योग्य खाद्याअभावी नरभक्षक होत आहेत. मेळघाटात तसे व्हायला फार दिवस लागणार नाहीत. खाद्याचा अभाव व अवैध शिकारी या दुहेरी माऱ्यापुढे वाघ किती दिवस तग धरून राहील? तो मृगेंद्र बेडकं, उंदीर खायला विवश होत आहे. या क्षुल्लक खाद्यावर तो मस्तवाल प्राणी खरंच कसा जिवंत राहील? हे सुज्ञाला सांगायची गरज नाही.

भारतातील वेगवेगळ्या अरण्यात रहाणारे वाघ हे वाघाच्या जनुकांचा मोठा साठा (जीन पूल) आहे. पूर्वी भारतवर्षातील सर्व अरण्ये एकमेकांना वनाच्या

रस्त्याने (कॉरीडोर) जोडली होती. वाघामधे मादी ही सामान्यतः स्थायी असते व नर हा भटक्या वृत्तीचा असतो. एका नराला त्याच्या क्षेत्रात दुसऱ्या नराचे वास्तव्य सहन होत नाही, त्यामुळे त्यांचा आपसात संघर्ष होतो व त्या लढाईत बरेचदा वाघ मरतात. पूर्वी जंगलाला जोडणारे असे कॉरीडॉर होते, त्यामुळे नर वाघ इतरत्र स्थलांतर करायचे. त्यामुळे वाघांमध्ये आंतरप्रजनन होत नव्हते, परंतु जंगलतोडीमुळे कॉरीडोर नष्ट झालेत त्यामुळे वाघांचे आंतरप्रजननाचे प्रमाण वाढले. या प्रजातीला आता कितीही संरक्षण दिले, तरी ही दुःखद बाब त्यांना समूळ नष्ट करण्यास कारणीभूत होऊ शकते. वाघांची कमी झालेली संख्या व त्यांचे होत असलेले आंतरप्रजनन, वाघांची संख्या कमी होऊन ती एका विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी झाली की ते नैसर्गिकरीत्या नष्ट होऊ शकतात. आपल्याकडील वाघांच्या सेन्ससचे आकडे पाहिले की आपल्याकडे अशी परिस्थिती आली की काय, अशी शंका वाटायला लागते. तेव्हा जंगलाच्या या राजाचे पुनरुज्जीवन करायचे झाल्यास काय उपाय असावा, हा प्रश्न येतो. यात सरकारी योजना कुठवर तग धरू शकतील. पण, प्रत्येक अडचणीवर काही ना काही उपाय असतात, परंतु ते सर्वसामान्य उपायापेक्षा वेगळे. वरील समस्येवर उपाय म्हणजे नैसर्गिकता व कृत्रिमता याचे समतोल व्यवस्थापन. जसे आफ्रिकेतील जंगलांचे खासगीकरण. आफ्रिकेच्या जंगलात वाघ आहेत काय? या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे, पण काही संस्था तेथे वाघांचे कृत्रिमरीत्या प्रजनन करून वाघांच्या संख्येत वाढ करत आहे. असा प्रयोग आपल्या मेळघाटात यशस्वी होईल काय? तर शास्त्रोक्त पद्धतीने व योग्य नियोजनाने हे शक्य आहे असे वाटते. पण, ते सरकारी नियंत्रणापेक्षा खाजगी नियंत्रणात करणे संयुक्तिक राहील. सुनियंत्रित नैसर्गिक वातावरणामध्ये केनियातील अभयारण्याला जगातील अनेक खाजगी वन्यप्रेमी हे तेथील वन्यप्राण्यांच्या विकासाला हातभार लावतात, त्याप्रमाणे आपल्याकडेसुद्धा अशी अनेक मंडळी योग्य शासकीय उदारीकरणामुळे मदत करायला पुढे येतील, अशी शक्यता आहे. यात शासकीय नियमात बदल करावे लागतील पण शेवटी वाघ मोठा की नियम, हे सद्यःस्थितीत योग्य रीतीने समजणे जास्त संयुक्तिक आहे.


वाघांचे खाद्य म्हणजे तृणभक्षक प्राणी यांच्या अस्तित्वाचा विचार केला तर असे लक्षात येते की, मेळघाटाच्या आतील राखीव अरण्यात उन्हाळ्यातसुद्धा तुम्हाला कंबर कंबर उंचीचे वाळलेले गवत दिसेल. याला कारण म्हणजे रानात




सिमेलवरील विसंगती



तुर्रेबाज रानकोंबडा



मेळघाटातील मोर



विशाल कोळी (जायंट स्पायडर)

मुबलक तृणभक्षकांचा अभाव. यांच्या कोसळलेल्या संख्येला कारण म्हणजे सालोगणती खाद्यासाठी, कताळीसाठी व शिंगांसाठी अवैध शिकार आणि त्यामुळे वाघसदृश मांसाहारी प्राण्यांची उपासमार आणि ऱ्हास. दैवदुर्विलास की तिकडे सखल भागात शेतकऱ्याच्या तोंडचा घास पळविणारे चितळांचे मोठमोठे कळप तर येथे म्हणजे सश्यांचासुद्धा अभाव! तो बिचारा वाघ, बेडूक-उंदरावर किती दिवस तग धरून राहणार! आफ्रिकेतील जंगलात जसे अशा तृणभक्षकांना शास्त्रोक्त पद्धतीने पकडून त्यांचे जंगलात स्थलांतर करतात तसेच आपल्याकडे सखल भागात असलेल्या चितळांना व इतर तृणभक्षकांना पकडून त्यांना जंगलात नेऊन सोडले, तर दोहोंचेही प्रश्न सुटू शकतील असे वाटते; आणि मानवी हस्तक्षेपाने असंतुलित झालेले अरण्य बऱ्याच प्रमाणात संतुलित होऊ शकेल.

असा प्रश्न मनात येऊ शकतो की, हे तृणभक्षक प्राणी काय फक्त गवताऐवजी उन्हाळ्यात वसंतातील हिरवी पाने व फळांवर जिवंत राहू शकतात, तर त्यांना स्थलांतराची गरज काय? हा युक्तिवाद नैसर्गिकरीत्या वाढलेल्या व अस्पर्श वनाबाबतीत खरा आहे. हजारो वर्षांपासून चाकोरीबद्ध पर्यावरणात त्यांची समतोल वाढ होते हे निश्चितच. परंतु, योजनाबद्ध रीतीने नैसर्गिक झाडे तोडून त्या ठिकाणी सरकारी खजिन्याला भरपूर उत्पन्न देणारा साग लावण्यात आला. या सागरूप वनाचा इतिहास फार जुना नाही. गेल्या दोनशे वर्षांपासून मेळघाट्यातील रूपवनी जंगल सागवानी झालं. या सागांचे गुण त्याच्या खोडाशिवाय कुठेच दिसत नाही. त्याची पाने कुठलाही प्राणी खात नाही. त्याच्या चोपड्या खोडावर माकडेसुद्धा चढत नाही. त्याच्या वाळलेल्या पानांच्या ढिगातून गवताचा कोंबसुद्धा उगवत नाही. अशा चाकोरीबद्ध वृक्षात कोणता तृणभक्षक वावरेल? अशा अनेक हस्तक्षेपामुळे एके काळीच्या समृद्ध मेळघाटच्या ऱ्हासाची अनेक कारणे देता येतील. त्यावर पहिला उपाय म्हणजे एकतर तोडलेल्या सागाचे ठिकाणी परत साग लावू नये, तर त्याऐवजी जंगली फळझाडे लावावी.

मेळघाटीतल जंगलात मोठ्या संख्येत चरणाऱ्या गायी पाहिल्यावर साहजिकच कुणाला वाटेल की येथे दुधाची गंगा वाहत असेल, येथील लोक धष्टपुष्ट असतील. पण हाय! येथे चहालासुद्धा दूध मिळत नाही. कुपोषण दरवर्षी डोकं वर काढतं. तेव्हा साहजिकच एक प्रश्न येतो की, इतकं गोधन असताना अशी परिस्थिती का यावी? मग आम्ही सगळ्यांनी याची शहानिशा करण्याचे

ठरविले व अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या. पठारावरील नातेवाईकांची भाकड गुरे केवळ जिवंत ठेवण्यासाठी येथील रहिवाशांना संगोपनासाठी देतात आणि आपली म्हणून नोंदणी करतात. येथील कोणतीही गाय पेलाभरसुद्धा दूध देत नाही. कारण तिची सर्व शक्ती डोंगरकपारी चढण्याफिरण्यात जाते. प्रलोभनापायी यातली कित्येक गुरे एक्सपोर्टसाठी विकल्या जातात.

एक अजून मनोवेधक बाब झाडे व वनस्पतीबद्दल. आपल्याला माहीतच असेल की, आपणा सगळ्या प्राण्यांना लागणारी ऊर्जा ही वनस्पती, तृण इत्यादीपासून मिळते आणि त्याकरिता लागणारी ऊर्जा ही सूर्याकडून मिळते. या माध्यमातून मिळणारी ऊर्जा ही कर्बाच्या वेगवेगळ्या प्रकारातून आपण घेतो व कार्बनडायऑक्साईडच्या स्वरूपात बाहेर टाकतो. झाडे ही सूर्याची ऊर्जा व पाणी या माध्यमातून कार्बनडायऑक्साईडचे कर्बात रूपांतर करतात व त्यातून त्यांची वाढ होते. त्यातून मुक्त झालेला प्राणवायू आपल्याला परत मिळतो. परंतु, वनस्पतीची केवळ कर्बाच्या माध्यमातून वाढ होत नाही, तर तिला अनेक खनिजे लागतात. सूर्यप्रकाश तर रोजच असतो तसेच पाणी ऋतुचक्रानंतर परत परत उपलब्ध होत असते, पण या जमिनीतून उपलब्ध होणाऱ्या खनिजाचं काय? समतोल पर्यावरणात ही सगळी खनिजे पानाच्या, सालीच्या तसेच गुरांच्या व वन्यप्राण्यांच्या मलमूत्रातून जमिनीला परत मिळतात. पण आम्हा मानवाची हावरट दृष्टी बघा, रानात पडलेल्या गुरांच्या शेणीसुद्धा उचलून नेतात तसेच वाळलेली झाडं, पाने घेऊन जातात. यातून बनलेली खते पठारावरील शेतकऱ्यांना विकतात व अशा प्रकारे जंगलातील खनिजाच्या खजिन्याची लूट होत आहे. या अविरत खनिजाच्या ऱ्हासापायी जंगलातल्या मोठमोठ्या कुरणांची जागा आता खुरट्या गवताने घेतलेली दिसत आहे. यावर उपाय म्हणजे ऱ्हास केलेल्या दौलतीची परतफेड करण्यासाठी तेथील गुरांचे मलमूत्र-खत नेण्यास बंदी घालावी. शास्त्रोक्त पद्धतीने तेथील जमिनीच्या मातीचे परीक्षण करून योग्य ती खनिजे योग्य त्या ठिकाणी पसरवावीत.

मेळघाटचे पुनरूज्जीवन करायचे असेल तर शास्त्रोक्त पद्धतीने सर्व मेळघाट सर्व पर्यटकांना व शास्त्रज्ञांना, निरीक्षकांना उपलब्ध करावा. त्यांच्या संशोधनाचा, भटकंतीचा, निरीक्षणाचा लाभ मेळघाटाला तर होईलच तसेच अवैध शिकारीलासुद्धा आळा बसू शकेल. शासनाने मेळघाटातील काही गावे इतरत्र



मेळघाटातील नर चितळ



माकड कुटुंब



मुंग्यांचा किल्ला



वाघाचे दुर्मिळ छायाचित्र

वसविण्याचे ठरविले हे स्वागतार्थ आहे, तरीपण परतवाडा ते धारणी हा मार्ग सर्व जड व्यावसायिक वाहनांसाठी पूर्णतः बंद करावा व त्याऐवजी अकोट मार्गे मेळघाटला वळसा घालून धारणीपर्यंत रस्ता बांधावा.

हजारो वर्षांपूर्वी आदिमानवाने भारतवर्षात पाऊल टाकले तेव्हापासून भारतीय संस्कृतीची सुरुवात झाली. सातपुडा व विंध्यपर्वतात आढळलेल्या शैलाश्रयातील चित्रांवरून हे ज्ञात झाले की, अश्मयुगात या आदिमानवांचे वास्तव्य तापी व नर्मदा नदीच्या खोऱ्यामध्ये विंध्य व सातपुड्याच्या आत मुख्यत्वे झाले. त्या गुहेत राहणाऱ्या आदिमानवांचे स्थलांतर भारतात इतर भागात जसे दक्षिणेकडे व मध्यभारतात झाले. कालांतराने आदिमानवातून आदिवासींच्या अनेक जमाती निर्माण झाल्या व त्यांची संस्कृती काही विशिष्ट परिसरामध्येच उदयास आली. या जमातीमध्ये गोंड, कोरकू, भिल्ल, महार, संथाल, कमार इत्यादी येतात, पण जुन्यात जुनी आदिवासी जमात म्हणजे गोंड, कोरकू! या सातपुड्याच्या परिसरातच स्थायिक झाल्या. त्यात मुख्यत्वे कोरकू आदिवासींचा उल्लेख करता येईल. मेळघाट व आजूबाजूच्या परिसरात ही आदिवासी जमात वास करीत आहे, त्यामुळे या जमातीचा इतिहास जुना आहे. मुबलक पाण्याची उपलब्धता, जंगलातील वृक्ष-वनस्पतीपासून व वन्य प्राण्यांच्या शिकारीतून मिळणारा पुरेसा आहार, कोणत्याही विवंचना व भीतीपासून मुक्त, त्यामुळे हा कोरकू समतोल पर्यावरणाचाच एक घटक झाला. अशी या आदिवासींची वृत्ती अगदी जगावेगळी झाली. या जमातीचा स्वभाव सालस, निःस्वार्थी, निष्पाप व शांतताप्रिय असा झाला व मी बरा व माझे बरे, अशी यांची वृत्ती झाली. कालांतराने राजपूत, गवळी, मुस्लीम आणि नंतर इंग्रजांच्या मेळघाटात झालेल्या अतिक्रमणामुळे त्यांच्या स्वभावात थोडा बदल झाला, पण मूळ वृत्ती अजूनही कायम आहे. नवीन संस्कृतीचा प्रभाव व सरकार दरबारकडून त्यांच्या तथाकथित विकासाकरिता दिल्या गेलेल्या प्रलोभनांमुळे त्यांच्यात कुठे कुठे धूर्त, स्वार्थी व संधिसाधू वृत्ती आढळू लागली आहे.

तसा हा भटका आदिवासी, याची माझे माझे ही वृत्ती कधीच नव्हती, जसे जागेची मालकी, शेतीची मालकी, इतकेच काय, तर काही जमात स्वतःच्या बायकोची मालकीही मानत नव्हत्या! म्हणजे कुणी याची बायको पळवून न्यायचा (असे प्रकार आजही घडतात) तेव्हा खंत व दुःख करीत न बसता हा सरळ दुसऱ्या

लग्नाच्या तयारीला लागायचा. त्यामुळे यांच्यात व इतर वन्यप्राण्यांच्या वृत्तीमध्ये बरंचसं साम्य दिसून यायचं, तर दुसऱ्या-तिसऱ्या वर्षी मुलं व्हायची आणि तिथे दोन किंवा तीन अपत्य अशा बंधनाला थारा नसायचा. भलेही मग दहा-बारा अपत्यांतून एखादं दुसरंच जगायचं. कारण बालमृत्यूचे प्रमाण भयंकर होतं, त्यामुळे त्यांच्यातील जनसंख्यावाढ मर्यादित राहायची. झालेलं मूल आईच्या दुधाविना दिवस दिवसभर उपाशी राहायचं. कारण ओल्या बाळंतिणीलासुद्धा संसाराच्या अनेक गरजा भागवण्याकरिता घराबाहेर पडावं लागायचं व वणवण भटकावं लागायचं. दहा-पंधरा घरं असलेल्या त्या गावात एकटी-दुकटीच म्हातारी असायची. कारण सर्वसामान्यतः येथील खडतर जीवन पद्धतीमुळे माणसाचं आयुष्य ४०-५० व्या वर्षीच संपायचं. स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत या आदिवासींचं जीवन असंच सुरू होतं व मेळघाटातील आदिवासींच्या लोकसंख्यावाढीचा आलेख स्तब्धच होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात विकासाची, प्रगतीची चक्रं हळूहळू थोड्या थोडक्या प्रमाणात का होईना पण फिरू लागली. त्यात आरोग्य खात्याच्या अनेक योजना आल्यात व त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले व आदिवासींचे सरासरी आयुष्यमान वाढत गेले आणि जनसंख्या वाढायला लागली. कारण कुटुंब नियोजनाची माहिती नसलेल्या आदिवासींच्या कुटुंबात पूर्वीप्रमाणेच मुलं जन्मतच होती. औषधोपचारामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले व त्याचप्रमाणे प्रसूतीनंतर नवजात अर्भक, मातांचा मृत्युदरही रोडावला. या जनसंख्यावाढीमुळे मेळघाटाच्या पोषण व्यवस्थेवरील दबाव वाढला व बालकुपोषणाची नवीन गंभीर समस्या निर्माण झाली. कारण एक-दोन अपत्यांना सांभाळणारा आदिवासी एवढ्या मोठ्या संसाराला सांभाळण्यास असमर्थ होता. अनेक अपत्यांचा बालपणी होणारा मृत्यू अंगवळणी पडलेल्या आदिवासीला, ते मृत्यू नैसर्गिक असल्यामुळे, त्याचं त्या बाबतीत मन भावनाशून्य झालं होतं, व आजही काही प्रमाणात त्याची हीच वृत्ती दिसून येते.

आम्ही संस्कृतीत वाढलेले बाप्ये आपल्या रक्ताच्या नात्याशी खूप निगडित असतो. त्याची अनेक कारणे आहेत. एकतर आपली माझे-माझे ही वृत्ती तसेच आपल्या मालमत्तेला वारस असावा ही आपली धडपड, अनिश्चित भविष्याबद्दल भीती अशा अनेक कारणांमुळे आपण खूप भावनाप्रधान झालेलो आहोत. पण, तो आदिवासी मात्र या सगळ्या भौतिक भावनांपलीकडे गेलेला आहे. आजही


कुपोषित मुलासाठी वाटलेला पौष्टिक आहार, त्या मुलाच्या आईवडिलांनी फस्त केल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे कुपोषणावर मात करण्यासाठी केवळ पौष्टिक आहार वाटणे पुरेसे नाही, तर त्याच्या मूळ कारणाची मीमांसा करणे जरुरीचे आहे. तो एक सुजाण शहरी नागरिक आहे, ही भावना बाजूला ठेवून त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा व आपल्या अद्ययावत संस्कृतीचा कसा मेळ घालावा, याचे चिंतन झाले पाहिजे आणि त्याचे कुटुंब कसे मर्यादित ठेवता येईल याची उपाययोजना करावयास पाहिजे. त्याचप्रमाणे तो या अरण्याच्या पर्यावरणाचा एक मुख्य घटक आहे. यावरून मांसभक्षी, तृणभक्षी, वृक्षवेली व तेथील आदिवासी यांना जगण्यासाठी व अस्तित्वासाठी योग्य ते स्वातंत्र्य व हस्तक्षेपविरहित संरक्षण असावे, हे विसरून चालणार नाही.

•••

११

# दुर्मिळ वटवाघूळ

अमरावतीच्या पूर्वेस पसरलेले पोहरा मालखेडचे जंगल. या जंगलाचा गॅझिटीयरमध्ये प्रामुख्याने उल्लेख आढळून येतो आणि आश्चर्य म्हणजे वाघ असल्याचाही उल्लेख आहे. या जंगलात फिरताना एकटं-दुकटं पडकं घर आढळून येतं. कदाचित वनखात्यातील कर्मचाऱ्यांच्या किंवा एखाद्या रखवालदारासाठी ही ओबडधोबड घरं बांधली असावीत. या जंगलातील एका प्रवासात असंच एक पडकं घर आम्हाला आढळलं. तशी आमची अशा वास्तूमध्ये फारशी रुची नसते, परंतु या घराजवळून जाताना कर्कश चीऽऽ ची चीऽऽ अशा आवाजाने आमचे लक्ष वेधले व आम्ही आत शिरण्याचे धाडस केले. तेथे दगड-विटा-माती सर्वत्र विखुरली होती. त्यात विंचवासोबतच एखादा भुजंग असण्याचीही दाट शक्यता होती. एकंदरीत परिस्थिती पाहता या पडीक घराला कित्येक दशकांत कुणाचे पाय लागले नसावे. ची ची आवाज एका अंधाऱ्या कोपऱ्याकडून येत होता. एका उग्र अशा दर्पाने तेथील वातावरण व्यापले होते. त्या कोपऱ्याकडे बघतो तर काय शेकड्यावर वटवाघूळ भिंतीवर आणि छतावर चिकटलेली दिसली व जागेसाठीच्या आपसातील चढाओढीमुळे त्यांच्या अस्पष्ट हालचाली दिसू लागल्या. आमचे कॅमेरे सज्ज झाले व आम्ही त्यांची छायाचित्रे काढायला सुरुवात केली. आमच्या या हालचालीमुळे ती थोडी घाबरली व इकडे तिकडे सैरावैरा उडू लागली. या गोंधळात एका वटवाघुळाने आमच्या मित्राच्या छातीवर चक्क धडक मारली व प्रसादपण दिला. आमच्या उपस्थितीमुळे त्यांना त्रास होतो आहे, हे दिसल्यावर आम्ही तेथून हळूच काढता पाय घेतला.



इंदला तलाव



दूर्मिळ इंडीयन फाल्स व्हॅम्पायरची कॉलनी



▲ शिक्रा भक्ष्याच्या प्रतिक्षेत



▲ पांढऱ्या मानेचा करकोचा

आमच्या चर्चेत आम्हाला असं वाटलं की, ही संध्याकाळी उडणारी व डास खाणारी वटवाघुळं- Indian pipisrelle (Coromandra) असतील, परंतु पुढे फोटो डेव्हलप केल्यावर व एन्लार्ज केल्यानंतर ती इंडियन फाल्स व्हेम्पायर (Indian False Vampire) किंवा Common Yellow Bat असल्याचे आढळले. त्यात मुख्य म्हणजे त्याच्या कानाची विशिष्ट रचना Book of Indian Animals by S. H. Prater व नाकाच्या विशिष्ट रचनेवरून ती Magaderna Lyra (Indian False Vampire) असावी.

हे वटवाघूळ फारसे दिसत नाही व आम्हाला त्याची एक मोठी कॉलनी या ठिकाणी आढळली. या वटवाघुळाचं वैशिष्ट्य म्हणजे हा इतर किड्या-उंदरांबरोबर पाण्यातील मासे-सुद्धा खातो. ही माहिती वाचल्यावर आम्हाला या पडक्या घराजवळील तलाव आठवला व एक नवीन वटवाघूळ बघितल्याचा आनंद झाला. कालांतराने तेथे गेल्यावर ते घर जमीनदोस्त झाल्याचे आढळले व तेथील विटा, दगड गायब झाल्याचे आढळले. अशा एका सुंदर दुर्मिळ वटवाघुळाचं आश्रयस्थान माणसाच्या हावेपोटी नष्ट झालं होतं व ती बिचारी वटवाघुळं कुठे बरं गेली असतील, या विचाराने मनाची चलबिचल झाली.

**लांडोर (Peacock Hen)** : अरण्य भटकंतीत केव्हा, कुठे व कसे प्रसंग येतील ते सांगता येत नाही. मोर हा आपला राष्ट्रीय पक्षी आहे व राजस्थान-गुजरातच्या काही भागात हा मानववस्तीमधे स्वैर संचार करतो. परंतु, मध्य व दक्षिण भारतात शिकारीमुळे म्हणा किंवा औदासीन्यामुळे हा प्राणी जंगलात उघड्यावर क्वचितच दिसतो व मानवी चाहूल लागताच घाबरून पळून जातो. आमच्या, झुडपी जंगलाच्या पावसातील एका प्रवासात अकस्मात पुढे एक सुंदर मोरणी आपल्या ५-६ पिलांसमवेत दिसली. आम्हाला बघून तिने एकाएकी आपली मान फुगवली, पिलं जमिनीवर दबकली, आम्ही स्तब्ध उभे राहिलो व तिला कुटुंबासमवेत कॅमेऱ्यात बंदिस्त केले. तिच्या फुगलेल्या मानेत व डोळ्यांत एक ऐट होती, एक आदेश होता व एक गर्व होता. आम्ही पुढे न जाण्याचे ठरविले व काही वेळात ती अनुपम वनविहारिणी लुप्त झाली. तिच्या डोळ्यातील सौंदर्य व मानेतील ऐट याचा विचार करीत आम्ही पुढचा मार्ग धरला.

**सोनपाठी सुतार (Woodpecker )** : सकाळच्या साखरझोपेत एका हसण्यावारी आवाजामुळे तुम्ही जागे झालात तर घाबरू नका. आजूबाजूच्या

वृक्षवेलींच्या खोडावर नजर टाका. तुम्ही नशीबवान असाल तर सोनेरी पंखांचा, पांढऱ्या पाठीचा व लाल मुकुटधारी एक पक्षी आढळेल, तो म्हणजे व्हाईट नेक्ड वुडपेकर, हा बरेचदा आपल्या पिलावळींबरोबर झाडाच्या खोडात किडे शोधताना दिसतो. याचा लांब असा आवाज जंगलातील कानाकोपऱ्यातून ऐकायला मिळतो.

**सुभग (Ivora) :** सहज न दिसणारा, अत्यंत चंचल व गोड वेगवेगळे आवाज काढणारा चिमणीच्या आकाराचा पक्षी, झाडाच्या पानाफुलांत शोधणे म्हणजे दुरापास्त व याचा फोटो मिळणे म्हणजे आव्हानच. हा एक अत्यंत लाजाळू पक्षी आहे. फुलापानांतील रस व किडे हा खातो. याचे सुंदर रंग व पंखावरील वेगवेगळ्या छटा मनाला मोहून सोडतात. याची मादी थोडी फिक्कट असते, नर बाकी सुंदर असतो. अशाच एका पहाटेच्या कोवळ्या उन्हात एका निष्पर्ण झाडावर याला कॅमेऱ्याने टिपला.

**मलबारी धनेश (Malbar pied Hornbill) :** आम्हा पक्षिनिरीक्षकांना बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (B. N. H. S.) म्हणजे काशी. त्यांचे आयकॉन हॉर्नबिल आहे. त्यामुळे या सुंदर पक्ष्याबद्दल सुरुवातीपासूनच कौतुहल होते. तसा ग्रे हॉर्नबिल बघायची संधी तीन-चारदा आल्यात, परंतु त्यापेक्षाही सुरेख मलबार पाईड हॉर्नबिल नशिबी आले नव्हते. हा पक्षी मुख्यत्वे करून सह्याद्रीच्या पर्वतराईपासून थेट निलगिरीपर्यंत दिसतो, असा अनेक ठिकाणी उल्लेख आहे. आमच्या भीमाशंकरच्या प्रवासात याचा भरपूर शोध घेतला पण अपयशच आलं. आमचे उत्साही पक्षिमित्र श्री. राजू कसंबे यांनी एकदा फोन करून कळवले की, या पक्ष्याची एक जोडी कोलकासच्या नदी पात्रातील झाडावर आढळते म्हणून. हे ऐकल्यावरसुद्धा आश्चर्य वाटले. पण राजूच्या बातम्या खऱ्या असतात याची खात्री होती. पक्ष्यांचे स्थलांतर व इतर स्वभावामुळे त्यांच्या दिसण्यात नेहमी अनिश्चितता असते. तरी आम्ही मंडळींनी कोलकासला जाण्याचा निर्णय घेतला व तेथील रात्रीच्या मुक्कामानंतर भल्या पहाटे सर्व आयुधांनी युक्त अशी शोधमोहीम सुरू केली. दिवसभराच्या उन्हातान्हाच्या भटकंतीत या राजशाही पक्ष्याचे दर्शनच काय, पण मागमूससुद्धा लागला नाही. निराश होऊन परतीचा मार्ग अवलंबिला. पुढे असे झाले की, डब्डूच्या शोधाच्या रायपूरच्या वास्तव्यात एकदा भल्या पहाटे भटकंती सुरू केली. रायपूर ते सेमाडोह ह्या मार्गावर दोन किलोमीटर अंतर चालून आल्यावर एकाएकी समोरील एका गर्द झाडावरून एक लांबचलांब मोठ्या चोचीचा पक्षी उडाला व

समोरील एका सागाच्या झाडाच्या फांदीवर बसला. मेळघाटामध्ये गरुड पक्ष्याव्यतिरिक्त इतके मोठे पक्षी क्वचितच दिसतात, त्यामुळे एक कुतूहल निर्माण होते. आमच्या दुर्बिणी सरसावल्या व त्या पक्ष्याचा वेध घ्यायला लागल्या, त्या निरीक्षणात आम्हाला विस्मयरूपी आनंदाचा सुखद धक्का बसला. तो पक्षी म्हणजे मलबार पाईड हॉर्नबिल होता. याची काळी पाठ, पिवळ्या रंगाची मोठी चोच व त्यावर खंजिरासारखे एक शिंग, खाली एक लांबकाळे शेपूट, सुंदर पांढरे पोट असे रूप असलेल्या या दिमाखदार पक्ष्याचे दर्शन झाले. आम्ही फोटो काढले व दुसऱ्या क्षणी हा जंगलात लुप्त झाला. जणूकाही आपले मेळघाटातील आहे की नाही, या संभ्रमातील अस्तित्वाची निश्चिती सांगण्यासाठी आला आहे, असे वाटले व याच्या या गोड दर्शनाच्या स्मृतीत आम्ही पुढील वाटचाल करू लागलो.

**नवरंग :** मोसमी वाऱ्याची चाहूल आकाशातील ढगा-वाऱ्याबरोबर चातकाच्या आवाजाने होते अन् याच वाऱ्याबरोबर एक अतिशय सुंदर पक्षी आपल्या अप्रतिम रंगवैशिष्ट्याने दाट रानात आपले अस्तित्व दर्शवीत असतो. हा लाजरा, तोटक्या शेपटाचा, निसर्गाने अनेक रंगांची उधळण केलेला पक्षी म्हणजे इंडियन पिट्टा (नवरंग). साध्या डोळ्यांनी याचे नवही रंग शोधून काढा, परंतु याच्या इतर अगणित रंगांची व्याख्याच नाही. असा हा इंडियन पिट्टा. अशा सुंदर पक्ष्याचं दुरापास्त दर्शन म्हणजे एक मेजवानीच. अशाच एका मोहिमेत याने आपल्या सौंदर्याने आम्हा सर्वांना नेत्रसुखाची मेजवानी दिली.

**शिक्रा (Shikra) :** सकाळच्या प्रहरी बुलबुलाच्या चिवचिवाटाने, सातभाईच्या कलकलाटाने व गोड आवाजाच्या मैनेच्या कर्कश आवाजाने जर तुम्हाला जाग आली असेल, तर समजावं की पक्ष्यांना काहीतरी धोका आहे. इतर प्राण्यांपेक्षा पक्ष्यांना जास्त ऊर्जा लागते, त्यामुळे ते सतत भुकेलेले असतात व त्यातल्या त्यात रात्रीच्या उपासानंतर त्यांच्या पोटात आगच उसळलेली असते, त्यामुळे अन्नाच्या शोधात पक्ष्यांच्या हालचाली परिसीमेपर्यंत पोचलेल्या असतात. पक्षी-निरीक्षणासाठी हा अत्यंत उत्तम काळ. अन्नाच्या शोधात त्यांच्या जलद हालचाली म्हणजे डोळ्यांना एक मेजवानीच आणि पक्ष्यांवर उदरनिर्वाह करणाऱ्या शिकारी पक्ष्यांचीसुद्धा भल्या पहाटे त्यांच्यावर करडी नजर. अशा पक्ष्यांमध्ये बहिरी ससाणा, शिक्रा, क्रेस्टल या पक्ष्यांसोबत गरुड, बझार्ड यांचाही उल्लेख करावासा वाटतो. अशाच एका पहाटे पक्ष्यांचा कोलाहल ऐकला. जसा कोलाहल ऐकला

तसे हात कॅमेऱ्याकडे गेले व एका फांदीवर एक मस्तवाल शिक्रा बसलेला दिसला, तर आकाशी एक दुसरा शिक्रा उडताना दिसला. काही वेळ न गमवता पहिला कॅमेऱ्यात टिपला व दुर्बिणीने उडत्या ससाण्याचे निरीक्षण सुरू केले आणि बघतो तर काय, समोरील फांदीवर बसलेल्या ससाण्याने उड्डाण भरून त्या आकाशातील ससाण्यावर आक्रमण केलं. काही वेळ एक विस्मयकारी झटपट दिसली व दुसऱ्याच क्षणी पंजात पंजा फसवून एका हेलिकॉप्टरच्या पात्याप्रमाणे ते द्वय जमिनीकडे यायला लागले. जमिनीवर पडणार त्याक्षणी वर असलेल्या ससाण्याने एका झाडाच्या फांदीचा आधार घेतला व एका पायाने फांदी घट्ट धरून ठेवली, दुसऱ्या पायात दुसरा ससाणा घाबरलेल्या परिस्थितीत लटकत होता. सुदैवाने तेही चित्र टिपण्याचा अवसर मिळाला. चित्रातील फांदीवर असलेल्या ससाण्याच्या डोळ्यातील भाव एक गुर्मी दाखवतो, तर दुसऱ्या लटकलेल्या ससाण्याचे भाव भीती दाखवितात.

**पांढऱ्या मानेचा करकोचा (White neck stork) :** अमरावती जिल्ह्यातील तळ्यामळ्यावर पांढऱ्या मानेचा व भलीमोठी चोच असणारा एक पक्षी बाराही महिने तुम्हाला दिसेल. अशाच एकाकी काठावर बसलेला पक्षी बघून एक उदासी येते. एखाद्या रिटायर माणसासारखे यांचे वागणे. आमच्या पक्षी-निरीक्षणात हा क्वचितच पाण्यात काठावर खाताना दिसला की वाटायचे हा रात्री खात असेल. तसा हा लाजाळू पक्षी कॅमेऱ्यात येणे दुरापास्त, त्यामुळे आजतोवर याचे निरीक्षण केवळ दुर्बिणीतूनच व्हायचे. बाकी एका प्रवासात आमचं नशीब फळलं व रस्त्याकाठच्या एका डबक्यात स्वारी भक्ष्य खातांना दिसली. आम्ही चारचाकीत असल्यामुळे साहेब बिचकले नाहीत व आपले कार्य निर्विघ्नपणे सुरू ठेवले. त्या क्षणाचा आम्ही पुरेपूर फायदा उठवला व या सुंदर पक्ष्याला कॅमेऱ्यात बंदिस्त केलं.

•••

१२

# वाघाच्या नंदनवनात

वाघासाठी प्रसिद्ध असलेल्या मेळघाटात एखादं भेकर, सांबरही दिसत नसल्यामुळे नेहमीच निराशा होत होती. परंतु आशेला काही अंत नसतो. पंधरा वर्षं अख्खा मेळघाट पायी तुडवल्यावरसुद्धा जेव्हा तीच पुनरावृत्ती व्हावी तेव्हा वाटलं की, तू नही तो और सही! असो आम्हा मित्रांच्या स्वच्छंद भ्रमंतीला नियोजित पर्यटन फारसं भावत नव्हतं. तरी केवळ या जंगलाच्या राजाला नैसर्गिक वातावरणात बघण्याची ओढ कमी होत नव्हती. आपल्या नेहमीच्या तत्त्वांना मुरड घालून मध्यप्रदेशातील प्रसिद्ध कान्हा, बांधवगड व्याघ्र अधिवासांना भेट देण्याचे ठरले. नियोजित प्रवासाच्या पूर्वतयारीनंतर आम्ही मंडळी अमरावती ते नागपूर त्यानंतर जबलपूर रस्त्यावर शिवणी मार्गे आधी कान्हा व्याघ्र अभयारण्य व नंतर जवळच्या मार्गाने प्रथम फोसील पार्कला पोहचलो व तो बघून तब्बल आठ तासांच्या प्रवासानंतर सायंकाळी पाच वाजता बांधवगडातील हॉटेलमध्ये पोहचलो. जिवाश्म पार्कच्या भेटीमुळे बांधवगडातील नियोजित जंगलभ्रमंतीला मुकल्याचं जाणवलं व वाईट वाटलं.

येथे मध्यप्रदेशाच्या पर्यटन विभागाने जेवण्याची व राहण्याची उत्तम व्यवस्था केली आहे. येथे देशीच काय, परदेशी प्रवाशांची खूप वर्दळ असते. तेथील रस्ते, राहण्याची ठिकाणे, खाण्याच्या सुविधा व एक शिस्तप्रिय वातावरण बघितल्यानंतर मध्यप्रदेशाचा पर्यटन विभाग व या सर्व गोष्टी काटेकोर पाळणारे तेथील कर्मचारी बघितल्यावर त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच. हॉटेल व्यवस्थापनाने आमच्याकरिता जिप्सीची सोय केली व सकाळीच पाच वाजता सर्व तयारीनिशी हजर राहायला सांगितले. जानेवारी महिना होता. थंडी तिच्या न्यूनतम तापमानावर

होती. त्यामुळे तिच्यातून निभाव लागण्यासाठी काय तयारी करावी याची चर्चा झाली व उनी स्वेटर, त्यावर जॅकेट व डोक्याला कानटोपी या आवरणांनिशी आम्ही सकाळी पाचला पाच मिनिटे कमी असताना हॉटेलच्या प्रांगणात तयारीनिशी हजर झालो. एक सुखद आश्चर्य म्हणजे बरोबर पाच वाजता एका जिप्सी आम्हासमोर उभी राहिली! एका हसतमुख चालकाने आमचे स्वागत केले व हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी आमच्या न्याहारीचे डबे आणून दिले. आम्ही त्याचा आनंदाने स्वीकार केला व जिप्सीत विराजमान झालो. ही जिप्सी उघडी असून या पर्यटनासाठी खास बनवून घेतलेली असते. म्हणजे ड्रायव्हरच्या मागे दीड फूट उंचीचा एक बाक व काही अंतरावर दोन फूट उंचीचे बाक, प्रत्येक बाकावर तीन प्रवासी मोकळे बसू शकतात, सातवी सीट मात्र कुणाची आहे हे आम्हाला माहीत नव्हते. आमचे कॅमेरे, व्हिडीओ कॅमेरे, बायनॉक्युलर यांच्या आवरासावरीत वेळ जात आहे हे बघितल्यावर चालकाने जरा घाई करण्याची सूचना केली व ५.१५ ला आमची जिप्सी बांधवगडातील पार्कच्या गेटवर हजर झाली.

या पर्यटनस्थळाचे मुख्य द्वार हे बरोबर सहाला उघडते, पण साडेपाच वाजता तेथे पोहचल्यावर आमच्या पुढे रांगेत चार अन्य जिप्सी उभ्या होत्या. तेव्हा हॉटेल व्यवस्थापकाने ५ वाजता तयार राहायची सूचना व जिप्सीचालकाने केलेली घाई याचा उलगडा झाला. तेथे रीतसर आमची नावे, गावे, सोबत असलेली उपकरणे व प्रवेश व इतर निधी जमा करण्यात पंधरा मिनिटांचा काळ गेला आणि मागे बघतो तर या पंधरा मिनिटांत जिप्सीची रांग लागली होती. या रांगेत आधी असण्याचे काय फायदे असतात याची कारणे पुढे विदित केली आहेत. तेव्हा मात्र आम्हाला माहिती नव्हती. त्यांच्या नियमाप्रमाणे एका अधिकृत वाटाड्याची आमच्यासाठी नियुक्ती झाली व तो सातव्या रिकाम्या सीटवर बसला व ती सातवी सीट कुणाकरिता आहे, याचा उलगडा झाला. चालकाने आम्हा सर्वांना पाय झाकण्याकरिता उबदार ब्लँकेट दिले तेव्हा जरा विचित्रच वाटले. जंगलातील थंडीचा फटका आम्हाला अजून बसायचा होता. बरोबर सहाच्या ठोक्याला मुख्य प्रवेशद्वार उघडले व एका मागोमाग एक जिप्सी अभयारण्यात प्रवेश करू लागल्या. हिवाळ्यातील सहा वाजताच्या अंधारात जंगलातील झुडपांच्या फक्त बाह्यरेषा दिसत होत्या व उष्णतामान एकदम कमी होत आहे असे भासायला लागले. कारण त्यांनी पुरवलेल्या ब्लँकेट मधूनसुद्धा पायाला थंडी भासत होती. एका विशिष्ट रानमार्गाने जिप्सी



कान्हाकिसलीच्या जंगलातील धूक्याच्या अवगूंठणातील पहाट



हत्तीवरून वाघ बघताना



चार वाघांचे दूर्मिळ छायाचित्र



चितळांचा कळप

पळत होत्या व तब्बल जंगलामध्ये कुठेतरी एका ठिकाणी आमची जिप्सी थांबली. तेथे वनकर्मचाऱ्यांच्या बऱ्याच हालचाली दिसत होत्या. तेथील जंगलभ्रमंतीत असे फार कडक नियम नाहीत, पण जे सोपे नियम आहेत ते पर्यावरणास पोषक आहेत. जसे सिगरेट पिण्यावर बंदी, कुठलेही प्लॅस्टिक आवरण जंगलात टाकू नये, असतील तर जिप्सीमध्ये टाकावीत. नियोजित ठिकाणे सोडून पर्यटकांनी कुठल्याही परिस्थितीत जिप्सी खाली उतरू नये. उतरण्याची मुभा फक्त त्या गाईडला होती व तेही एखादे प्लॅस्टिक किंवा पर्यावरणाला धोका असणारी वस्तू आजूबाजूला दिसली तर ती उचलून जिप्सीत ठेवायची. याचा अर्थ असाच की, या संरक्षित अरण्यात वन्यप्राण्यांच्या ठशां शिवाय कुणाचेच ठसे दिसणार नाहीत. ही किती मनाला उल्हसित करणारी बाब आहे. येथील वन्यप्राण्यांच्या ठिकाणाबद्दल त्यांच्या पद्धती खूप विचारपूर्ण आहेत. येथील संरक्षित अरण्यात फक्त दोनच वाहने चालतात एक म्हणजे जिप्सी व दुसरा म्हणजे हत्ती जिप्सीचा ड्रायव्हर बदलू शकतो, पण हत्तीचा माहूत नाही. येथील हत्ती व माहूत यांचे सख्य व सोबत ही जीवन-मरणापर्यंत अबाधित असते.

भल्या पहाटे उठून हे माहूत जंगलात भ्रमंती सुरू करतात. कुठल्याही वन्यप्राण्याला (यात वाघसुद्धा सामील आहे) त्रास होणार नाही याची काळजी घेतात. महत्त्वाचे प्राणी जेथे कुठे असतील त्याचे बिनतारी संदेश मुख्यालयाला देतात. वेगवेगळ्या माहुतांच्या माहितीआधारे ही माहिती अभयारण्याबाहेरील मुख्यालयाला सकाळी सात वाजण्यापूर्वी कळवण्यात येते. माहूत व हत्ती, शोधलेल्या प्राण्याच्या जवळपास उभे असतात, इथे एक महत्त्वाची गोष्ट उद्धृत करावीशी वाटते, काही लोकांमध्ये असा गैरसमज आहे की, येथील माहूत हत्तीच्या मदतीने वाघांना एका विशिष्ट ठिकाणी बंदिस्त (ट्रॅप) करतात जेणेकरून लोकांना वाघ दिसणे हुकुमी व्हावेत, बघण्यास सोयीस्कर व्हावे. आमच्या अनुभवाने व अभ्यासाने ही बाब पूर्णतः चुकीची आहे हे लक्षात आले, हे पुढील प्रसंगावरून ध्यानात येईल.

ज्या ठिकाणी आमची जिप्सी थांबली ते अभयारण्याच्या आतील कार्यालय होते. त्या ठिकाणी ब्रेकफास्टच्या न्याहारीची सोय, नैसर्गिकविधी व काही मंडळींना धूम्रपान इत्यादी करण्याची मुभा असते. तेथे गेल्यावर वनाधिकारी, वाटाडे व वाहनचालकांना तेव्हा वाघ साईटिंग झाले की नाही व झाले असल्यास कुठल्या

बिटमध्ये आहे याची माहिती देतो. वाघाचे ठिकाण कळवल्याबरोबर त्या ठिकाणी पोहचण्यासाठी वाहनचालकांची खरी चढाओढ सुरू होते व सर्वात जवळील रस्त्याने (त्यांच्या माहितीप्रमाणे) तेथे कसे पोहचायचे याची जिद्द दिसून येते. इथे सांगावेसे वाटते, या वाघासाठी प्रसिद्ध असलेल्या अभयारण्यात रोजच वाघाचे साइटिंग होते असे नाही. बऱ्याच पर्यटकांना निराशाच झेलावी लागते. नैसर्गिक वातावरणात वाघ दिसणे या खेरीज दुसरी मोठी गोष्ट नाही. नाउमेद पर्यटक कित्येक दिवस ठाण मांडून बसलेले असतात, याची आम्हाला माहिती मिळाली. आज आम्ही नशिबवान होतो. आमच्या वाहनचालकाने परत नोंदणी केली. नंतर आमचा वाहनचालक त्याला कळलेल्या ठिकाणाकडे जिप्सी पळवू लागला. अर्थात तेथे जिप्सीचा वेग २० ते २५ कि.मी.पेक्षा कमीच ठेवावा लागतो. या प्रवासात वाहनचालक मंडळींचे आपसात खूप सहकार्य असते हे आढळून आले. उशिरा निघालेल्या इतर जिप्सी जेव्हा समोरून जवळ यायच्या तेव्हा आमचा वाहनचालक हमखास वेग कमी करून त्यांना वाघाच्या साईटिंगची सूचना देत होता- रांगेत चालणाऱ्या मुंग्या जशा एकमेकांना तोंड लावून माहिती आदानप्रदान करतात तशा! काही वेळाने आमची जिप्सी एका रस्त्याकाठच्या दाट झाडीजवळ थांबली. आमच्या पुढे एक रिकामी जिप्सी उभी होती म्हणजे आम्ही तेथील पहिले दर्शनार्थी नव्हतो. एक भीतियुक्त आशेपायी आम्ही सभोवताली पाहिले, पण तेथे वाघच काय, त्याचे नखसुद्धा दिसले नाही. मात्र एक मस्तवाल हत्तीण उभी होती, तिच्या पाठीवर एक हौदा बांधला होता व तिच्या मानेवर हौद्याच्या बाहेर एक माहूत आरूढ होता. आम्ही पोहोचल्याबरोबर पायाच्या अंगठ्याने हत्तिणीच्या कानाखाली खुणा करून व तोंडाने त्यांची सांकेतिक भाषा बोलून त्याने त्या विशाल हत्तिणीला आमच्या जिप्सीच्या बाजूने उभे केले. (येथेसुद्धा पर्यटकांना जमिनीवर पाऊल ठेवता येत नाही.) एकमेकांच्या मदतीने हौद्याचा आधार घेत घाबरत घाबरत आम्ही कसेबसे हौद्यात विराजमान झालो. हा हौदा म्हणजे वरून उघडा असलेला उलट्या खाटेसमान दिसतो. त्यात दोन दोन पाठमोरे बसलेले चार पर्यटक बसू शकतात. आम्ही आमचे कॅमेरे (स्थिर) व व्हिडीओ कॅमेरे घेऊन उत्सुकतेपोटी इकडे तिकडे नजर फिरवू लागलो, परंतु काही दिसले नाही. सगळे विराजमान झाल्यावर माहुताने सांकेतिक भाषेत हत्तिणीला काही सांगितले व पायाच्या टाकेने बोटाने कुठल्या अज्ञात स्थळी जाण्यास सांगितले. हत्तीवरून फिरण्याचा हा तसा पहिलाच प्रसंग



एकांडा सांबर



चितळ बापबेटे



बारसिंगा (मादी)



बारसिंगा (नर)

होता. हत्तीने चालायला सुरुवात केल्याबरोबर हौदा थोडे हिंदोळके घ्यायला लागला. आम्ही त्याला घट्ट धरून स्वतःला स्थिर करण्याचा प्रयत्न करीत होतो. सकाळचे ७.३० वाजले होते. सूर्य पूर्वदिशेतून डोंगर माथ्यावरून वर आला होता. त्याची सोनेरी किरणं सकाळच्या धुक्याला छेदत आम्हा सर्वांना थोडी ऊब देत होती. आमची हत्तीण पश्चिम दिशेला जात होती आणि आम्ही पूर्वेकडील अपूर्व सौंदर्य डोळ्यात साठवत होतो.

इतक्यात माहुताची 'निचे झुको' अशी सूचना आली आणि आम्ही झटपट खाली वाकलो. नाहीतर बांबूवनातील बांबूने आम्हाला चांगले ओरबाडले असते. आमच्या मनातील उत्सुकता वाढत होती. कारण अजून वाघाचा कुठेही मागमूस नव्हता. काही वेळ अशा गर्द झाडीतून, उंच-सखल भागातून, दगड-धोंड्यांतून चढत-उतरत आमचा प्रवास संपला आणि समोर खूप मोठे गवताचे कुरण दिसले. ते पिवळे गवत सकाळच्या सोनेरी किरणांत न्हाऊन निघालेले व त्याचे अप्रतिम सौंदर्य कल्पनातीत होते. हत्ती एकदम थांबला. त्या माहुतानं आम्हाला विशिष्ट दिशेने खूण केली. त्या गवती कुरणात एक वाळलेलं प्रचंड झाड आडवं पडलं होतं आणि तेथील वातावरणाशी अजून डोळे सरावले नव्हते. त्या झाडाच्या खालच्या बाजूने हालचाल दिसली आणि आमच्या दुर्बिणी तिकडे रोखल्या गेल्या आणि त्यातून दिसलेल्या दृश्याने आम्ही विस्मयचकित झालो. बघतो तर काय, त्या प्रचंड वृक्षाच्या खोडावर तीन मोठे वाघ सूर्यकिरणांची ऊब घेत पहुडले होते आणि चवथा वाघ खालून त्या खोडावर चढण्याचा प्रयत्न करत होता. तसे ते वाघ आमच्यापासून दोनशे फुटावरच असतील, तरीपण त्यांच्या कातडीचा रंग काळे पट्टे त्या खोडाच्या रंगाशी एवढे मेळ खाऊन होते की, एकदम तेथे वाघ बसले आहेत ते समजणे कठीण! असे म्हणतात, जरी तुम्हाला वाघ दिसत नसला तरी वाघ तुम्हाला सतत पाहत असतो. निसर्गाची संरक्षक रंगलीला किती परिणामकारक असते ते ध्यानात आले. खालील चवथ्या वाघाचे वर येण्याचे प्रयत्न सुरूच होते. परंतु, त्याच्या प्रयत्नाच्या अपयशाला वरील बसलेला एक वाघ कारणीभूत होता. जेव्हा जेव्हा तो वर येण्याचा प्रयत्न करायचा तेव्हा वाघ त्याला पंजाने खाली पाडायचा. कदाचित ते खेळत असतील किंवा वरील वाघ आपले वर्चस्व दाखवीत असेल. सरतेशेवटी त्याच्या परवानगीनेच तो वर येऊ शकला व निमूटपणे त्या झाडावर खाली मान घालून बसला. हे सगळं घडायला

दहाएक मिनिटे लागली असतील. आम्ही त्या मृगेंद्राच्या लीला अवलोकन करत होतो व अधूनमधून त्याचे फोटो घेणे व व्हिडीओ रेकॉर्डींग करणे चालू होते. माहुताने हत्ती हळूहळू त्या वाघापासून १०० फुटावर नेऊन उभा केला. आता आम्ही उघड्या डोळ्यांनी त्या सुंदर मस्तवाल प्राण्याचं सौंदर्य निरखू शकत होतो. पंधरा-वीस मिनिटे थांबल्यावर हळूच हत्ती मागे फिरला व पूर्व ठिकाणी जायला लागला. आमची जायची इच्छा होईना, परंतु उपाय नव्हता. असे मस्तवाल चार वाघ सकाळच्या उन्हामध्ये बसलेले म्हणजे छायाचित्रकाराला एक पर्वणीच. असा प्रसंग परत येणे नाही आणि आपण त्याचा आस्वाद घेतला, मन तृप्त झाले. झाडीत जाईपर्यंत आमच्या नजरा त्या वाघांवरून ढळल्या नाहीत. शेवटी ते दृश्य फांद्या पानांमागे अदृश्य झाले व आम्ही जिप्सीवरून जसे चढलो तसेच उतरलो. आम्ही तेथे बसलो असताना अनेक जिप्सी पर्यटकांना घेऊन आल्या, परंतु हत्तींची संख्या मर्यादित असल्याने त्यांना तिष्ठत बसावे लागले. साहजिकच त्यांच्याबरोबर माहितीची देवाणघेवाण झाली. काही तरुण मंडळी एकदम उत्साहात आली, तर अनेक बापडे घाबरून गेले. कदाचित एकाच वाघाला माणूस एवढा घाबरतो आणि चार वाघांपुढे त्यांची काय मजाल असे त्यांना वाटले असावे. त्यांचा हा भीतियुक्त प्रतिसाद पाहून आम्हाला त्यांची कीव आली. काही वेळाने काही तरुण मंडळी व्याघ्र दर्शनाला गेली व लवकरच परत आली. ते बघून आम्हाला आश्चर्य वाटलं. जवळ आल्यावर त्यांचे माहुताबरोबरचे वाद ऐकायला आले व हसू आले. 'उनको चार बाघ बताये और हमको एक भी नहीं, ये सरासर ज्यादती है।'' माहूत मात्र बिचारा त्यांना प्रेमाने समजावून सांगत होता, ''साब ये जंगल के बाघ है, सर्कस या चिडियाघर के नहीं, वे जंगल के राजा है। घुमते फिरते है जैसे आये थे वैसे चले गये, अपने हिसाब से घुमते है।'' त्यांची निराशा बघून आता आमच्या डोळ्यात लख्ख प्रकाश पडला. हिवाळ्यात एवढ्या सकाळी उठणे, गेटवर पहिला नंबर लावण्याचा प्रयत्न करणे आणि वाघाच्या ठिकाणी आधी पोहोचणे याचा बोध झाला. आम्हाला पंधरा मिनिटे जरी उशीर झाला असता, तर त्या तरुण मंडळींची जागा आम्ही घेतली असती, यात शंका नाही. व्याघ्रदर्शन हे पूर्वनियोजित नसते, तर इंग्रजी म्हणीप्रमाणे 'You must be present at right place and right time.' व्याघ्रदर्शनाच्या उत्सुकतेपायी आम्ही थोडे ढेपाळलो होतो, परंतु आमच्या वाहनचालकाचा उत्साह काही वेगळाच सकाळचे ८.३० वाजले होते.

●●●



भक्ष्याच्या शोधात कोल्हे कुटुंब



भक्ष्यामागे धावणारे रानकुत्रे


अरण्यगर्भ



दूर्मिळ पांढऱ्या पाठीच्या गिधाडाची जोडी



दूर्मिळ 'ग्रे लॅग गूज'

१३

# बस्तरच्या निबिड अरण्यात

वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांवरून असे निदर्शनास येते की, छत्तीसगड राज्य आता नक्षलग्रस्त राज्य झाले आहे. तेथील जंगलात आणि आदिवासींच्या गावात नक्षलवाद्यांचा मुक्त संचार आहे. अपहरण आणि नंतर मारून टाकणे नित्याचेच झाले आहे. सर्वत्र भयाचे साम्राज्य आहे व मृत्यूचे तांडव आहे. अशा परिस्थितीत कुणीही पर्यटक तिकडे जायची हिंमत करू शकत नाही. काही वर्षाआधी एक काळ असा होता की, पर्यटक मुक्तपणे बस्तरमधील निसर्गरम्य अभयारण्यांना व राष्ट्रीय उद्यानां भेटी देऊन निसर्गाचा अनुभव घेत होते. आम्ही घेतलेल्या अशा अनुभवांची ही कथा...

सप्टेंबर महिन्यातील शेवटचा रविवार... दुपारी दोन-अडीच वेळ... आमची 'जिप्सी' मध्यप्रदेशातील भिलाई, रायपूर ओलांडून बस्तर जिल्ह्यातील कांकेरच्या दिशेने वेगाने जात होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूने उत्कृष्ट रीतीने जपलेले वनक्षेत्र दिसू लागले. आतापर्यंत जाणवत असलेला उष्मा एकदम कमी झाला व थंड हवेने शरीर व मन उल्हसित झाले.

रस्त्याच्या दुतर्फा निरनिराळ्या वृक्षांचे दाट रोपवनांचे पट्टे होते. रस्त्याच्या कडेने असलेल्या वृक्षांनी रस्त्यावर कमानी केल्या होत्या. अनेक ठिकाणी 'वनउपज सहकारी संस्थेचे' फलक लागले होते. रोपवनाच्या कडला 'बांस रोपवन', 'चरगाहा रोपवन', 'अर्जुन रोपवन', 'मिश्र रोपवन' असे आकर्षक नामफलक लागले होते. मधूनच धानाची शेते व त्या शेतामधून खळखळ वाहणारे पाण्याचे प्रवाह दिसत होते. त्या प्रवाहातच कोळी, काही ठिकाणी मासे पकडत होते. वनाच्या

संवर्धनासंबंधी घोषवाक्य असलेले फलक नजर वेधून घेत होते. त्यातील एक तरल बोधवाक्य सहज मनात शिरलं, ते होतं-

**'धरती माता करे पुकार, पेड लगाकर करे शृंगार!'**

असा हा जंगल व शेतांचा लपंडाव करीत झालेला रमणीय प्रवासाचा टप्पा संपला व आम्ही कांकेरला पोहोचलो. तेव्हा दिवसभराचा प्रवास आटोपून थकलेभागले सूर्यबिंब कांकेरशेजारी असलेल्या डोंगरावर टेकले होते.

आम्ही अंदाजे सहाशे कि.मी. चा प्रवास करून कांकेरला पोहोचलो होतो. आमचा हा अभ्यासगट, प्रा. किशोर रिठे यांच्या नेतृत्वात व डॉ. व्ही. टी. इंगोले यांच्या मार्गदर्शनात मध्यप्रदेशातील बस्तर जिल्ह्यामधील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांना भेटी देऊन तेथील समस्यांची पाहणी करायला जात होता. या गटात इतर सहकारी होते, वरूडचे डॉ. मनोहर खोडे, श्री. शिरीषकुमार पाटील आणि मी (पदमाकर लाड) नागपूरचे श्री. कुंदन हाते, अंजनगावसुर्जीचे श्री. मिलिंद पाटणकर हे होते.

आम्ही बस्तर जिल्ह्यातील 'सितानदी अभयारण्य', 'उदन्ती अभयारण्य', 'कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यान' व 'इंद्रावती अभयारण्याला भेटी देणार होतो.

वन्यप्राण्यांची शिकार, अवैध जंगलतोड, पाळीव गुरांची वनक्षेत्रात चराई, जंगलाला लागणाऱ्या आगी व वनातील अतिक्रमणे या बाबींची पाहणी करायची होती. त्याकरिता आम्हाला त्या क्षेत्रातील वनाधिकारी व वनकर्मचाऱ्यांच्या मुलाखती घ्यायच्या होत्या. ज्या पोलिस अधिकाऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या घटना उजेडात आणल्या होत्या व आरोपींवर कारवाई केली होती, त्यांच्या भेटी घ्यायच्या होत्या. आदिवासींशी संवाद साधणे, प्रत्यक्ष जंगलाची पाहणी करणे, छायाचित्रे व व्हिडीओ. शूटींग घेणे असे कामाचे स्वरूप होते.

एका आठवड्यात हे काम करायचे असल्यामुळे आम्ही दिवसा भेटी, मुलाखती, प्रवास व रात्री प्रवास करून उत्तर रात्री मुक्कामाच्या ठिकाणी जाणे व सकाळी पुन्हा कामाला सुरुवात करणे असा आराखडा ठरवला होता. यामुळे रात्रीला जंगलातील प्रवास व पेट्रोलिंग आपोआपच होणार होते. रोजचा प्रवास खूप होणार असल्यामुळे प्रा. किशोर रिठे, डॉ. व्ही.टी. इंगोले व शिरीषकुमार पाटील आळीपाळीने ड्रायव्हिंग करणार होते.

## दुर्गम निबिड बस्तर

मध्यप्रदेशातील (आता छत्तीसगड राज्यातील) बस्तर जिल्हा म्हणजे महाराष्ट्र व ओरिसा राज्यांच्या सीमांच्या मध्ये शिरलेला मध्यप्रदेशाचा (छत्तीसगडचा) दक्षिणेकडील चिंचोळा भाग. हा वनप्रदेश विस्ताराने केरळ राज्याच्या विस्तारापेक्षा मोठा आहे. या डोंगराळ भागातून महानदी व इंद्रावती या मोठ्या नद्या उगम पावतात. या भागात उष्णप्रदेशीय पानझडी वनांमध्ये असणाऱ्या तेंदू, साल, साग, अर्जुन, मोह, चंदन, बांबू या वृक्षांशिवाय इतर अनेक प्रकारचे वृक्ष व वनस्पती आहेत तेंदू पानाच्या व्यवसायातच अनेक लोकांची उदरनिर्वाहाची सोय होते.

हा भाग पूर्वी फार दुर्गम व निबिड होता. अनेक ठिकाणी सरपटत म्हणजे दंडवत घालत जावे लागायचे म्हणून याला 'दंडकारण्य' म्हणत! पौराणिक ग्रंथ रामायणातसुद्धा या भागाच्या उल्लेख आहे. राम वनवासात असताना त्यांच्या वास्तव्याने हा भाग पावन झाला आहे. त्या घटनांच्या खुणा, नावाच्या किंवा चालीरीतीच्या स्वरूपात दिसतात. 'सीतानदी' सीयावह पहाड' ही अशीच काही नावे आहेत.

या क्षेत्रातील काही वनग्रामांमध्ये, सिमेंट, विटांच्या पक्क्या चौथऱ्यावर सिमेंट-वाळूत बांधलेला रावणाचा पूर्णाकृती पुतळा असतो. दसऱ्याला रावणाचे दहन केले जाते. त्या दिवशी वेगळा कापडी पुतळा उभारून त्याचे दहन तर करतातच, परंतु त्या आधी गावातील लोक, बाया-मुले या सिमेंटच्या पुतळ्याला झाडांच्या फांद्यांनी, झाडूंनी मनसोक्त झोडपून काढतात व सीतामैयाचे हरण केल्याबद्दल आपला रोष व्यक्त करतात. सीतामैयाने ढाळलेल्या अश्रूंचीच सीतानदी आहे, असा इकडच्या आदिवासींचा समज आहे.

कांकेर हे डोंगराच्या पायथ्याशी वसलेले एक टुमदार, स्वच्छ शहर. शहराच्या वस्तीतून वाहणाऱ्या नदीने शहराचा एक भाग वेगळा झालाय. येथे वनखात्याचे मोठे कार्यालय व टिंबर डेपो आहे. शहराच्या वस्तीपासून काही अंतरावर एक प्रशस्त व सुशोभित केलेले वन विश्रामभवन आहे.

ज्या डोंगराच्या पायथ्याशी हे शहर वसलेले आहे, त्या डोंगरावर प्रचंड आकाराच्या शिला व विशालकाय गोल दगड आहेत. एकमेकांना आधार देत उभ्या असलेल्या या दगड-शिलांमध्ये काही ठिकाणी शिल्पासारखे मनोवेधक आकार तयार झाले आहेत. या डोंगराला जर भूकंपाचा धक्का बसला आणि हे

प्रचंड आकाराचे दगड शहराकडे गडगडत निघाले तर या शहराचे काय होईल? असा विचार मनाला स्पर्शून गेला.

## गूढरम्य सीतानदी अभयारण्य

वन विश्रामभवनात मुक्काम करून व सकाळी तेथील वनाधिकाऱ्यांची मुलाखत आटोपून आम्ही सीतानदी अभयारण्याचा रस्ता धरला. डांबरी रस्ता सोडून कच्च्या रस्त्याला लागलो.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी धानाची हिरवी शेती क्षितिजापर्यंत पसरली होती. शेतामध्ये कोठे लहान लहान तलाव तर कोठे वहाते पाणी असे दृश्य दिसत होते. एका उंच झाडावर वीस-पंचवीस उघड्या चोचेचे करकोचे (ओपन बिल स्टॉर्क) बसलेले दिसले. बहुतेक या तलावात शिंपले जास्त असावेत.

निसर्गाने या ओपन बिल स्टॉर्कला शिंपले खाण्याकरिता जन्माला घातले की काय, असे वाटते. कारण या करकोच्याच्या लांब चोचेला मध्यभागी फट असते आणि या अडकित्त्यात हा करकोचा शिंपले धरून फोडतो व त्यातील जीव खातो.

हिरव्या धानाच्या शेतात काही ठिकाणी जांभळ्या रंगाच्या धानाची शेती पाहून आम्हाला नवल वाटले. कारण गर्द जांभळ्या वनस्पती आम्ही प्रथमच पाहत होतो. छत्तीसगढमध्ये होणारी ही 'बावना नंदकेसर' नावाची धानाची जात आहे.

छत्तीसगडातील डोंगर रांगापैकी 'सियावह' डोंगरातून (येथेच रामायणात उल्लेखिलेल्या शृंग ऋषीचा आश्रम होता) महानदी उगम पावते व डोंगरातील इतर नद्यांची वेणी आपल्या प्रवाहात गुंफत सखल भागात येते. तेथे धरण बांधून नदीला अडविले आहे व पाण्याचा मोठा साठा तयार झाला आहे. या दुधवा धरणाच्या दरवाजामधून पाण्याचे लोंढे वेगाने बाहेर येतात व सर्वत्र तुषार उडवत खाली रूंद कालव्यात घो-घो आवाज करीत कोसळतात आणि ते खदखदणारे पाणी सळसळत वेगाने वाहू लागते. इथून नदीचा सखल भागाचा प्रवास सुरू होतो.

आम्ही आमचा प्रवास संपवून सीतानदी अभयारण्याच्या विश्रामगृहात पाय ठेवला तेव्हा सकाळचे तीन वाजले होते.

सीतानदी अभयारण्याचं विश्रामगृह म्हणजे दोन मोठे शयनकक्ष, मध्ये हॉल व समोर व्हरांडा असलेली जुन्या बांधणीची ब्रिटिशकालीन आकर्षक वास्तू! ही वास्तू उंच दाट वृक्षांच्या जंगलाने वेढली आहे. विश्रामगृहापासून काही अंतरावरून सीतानदी वाहते. या वास्तूच्या परिसरात गूढ शांतता असल्याचं जाणवतं. हे नैसर्गिक वातावरण बिघडू नये म्हणून येथे वीज आणलेलीच नाही! कंदिलाच्या मंद प्रकाशात

व्हरांड्यात किंवा लॉनवर बसून रात्रीच्या शांततेचा अनुभव घेणं, हासुद्धा एक सुखद अनुभव आहे. सत्तर वर्षांपासून सांभाळून ठेवलेल्या या विश्रामगृहातील व्हिजिट बुकातील रंजक नोंदी, येथे येऊन गेलेल्या इंग्रज व भारतीय अधिकाऱ्यांना या शांततेचा अनुभव आल्याचं दर्शवितात. या अभयारण्याचा मूळ उद्देश ह्या जंगलातील वृक्ष वनस्पतीचे संरक्षण व संवर्धन करणे हा आहे. येथे दुर्मिळ अशा वनस्पतीचे जतन केले जाते. येथे खूप जुने वृक्ष-महावृक्ष पाहायला मिळतात. अशा वृक्षांच्या बुंध्यांना करवतीच्या दात्याच्या आकाराच्या समांतर अशा रेषा येतात.

या जंगलात असलेल्या 'मोयान' वृक्षाची पाने पळसाच्या पानांसारखीच, पण आकाराने मोठी आहेत. या पानांच्या पत्रावळ्या करतात. या भागातील लोक ही पाने तोडून व बाजारात विकून आपला चरितार्थ चालवतात. या जंगलात मिळणारा पांढरा कंद आदिवासी लोक आपल्या आहारात वापरतात. म्हणून की काय, इकडे कुपोषण नाही.

परंतु इकडेसुद्धा गुरांचे कळप जंगलात चरतात. झाडांना 'गर्डलिंग' करून वाळवले जाते. सरळ उंच वाढलेल्या झाडाच्या बुंध्यात मधमाश्यांनी केलेलं पोळं मिळविण्याकरिता अख्ख झाड तोडून जमिनीवर आडवं केलं जातं. कऱ्याच्या झाडाची साल नदीच्या पाण्यात टाकल्यामुळे, पाण्यातील मासे मरतात म्हणून मासे मिळवण्याकरिता तोसुद्धा प्रयोग केला जातो.

भेकराला (बारकिंग डीअर) इकडे कोटरू हे नाव आहे. हे कोटरू इकडच्या अजगराचं आवडतं भक्ष्य! वाघ, बिबट्यांसारखे वन्य प्राणी इकडेही कमी झाले आहेत. अस्वलं मात्र दिसतात. ते कधी कधी माणसावर हल्ला करून जखमीसुद्धा करतात. दोन आदिवासी तरुण जंगलातील रस्त्याने जात होते. इतक्यात समोरून अडीच-तीन फूट उंचीच, कपाळावर पांढरा चांदवा असलेलं एक अस्वल चवताळून त्यांच्या अंगावर आलं. दोघेही उंच झाडाकडे धावले, एक जण सरसर झाडावर चढला, दुसरा चढणार इतक्यात अस्वलाने मागून त्याच्यावर हल्ला केला व आपल्या तीक्ष्ण नखांनी पाठीवर, कमरेवर, मानेवर ओरबाडणे सुरू केले. आता आपली काही धडगत नाही, हे समजून तो तरुण मेल्यासारखा जमिनीवर पडून राहिला. अस्वलाने त्यानंतर त्याच्या कपाळावर ओरबाडले व त्याचा राग शांत झाला म्हणून की काय, ते निघून गेले.

सोबत्यान त्याला 'नगरी'च्या दवाखान्यात नेलं व त्याचे प्राण वाचले. ही

घटना तीन-चार वर्षांआधीची. त्या तरुणाने आम्हाला पाठ व कंबर दाखवली तेव्हा त्याच्या पाठीवर जखमांच्या व्रणांची नक्षी दिसली.

जंगलाच्या मध्यभागी एका उंच खडकावर पंचवीस-तीस फूट उंचीचे लोखंडी टेहळणी टॉवर आहे. त्या टॉवरवर चढून पाहिलं तेव्हा भोवताली दूर क्षितिजापर्यंत पसरलेलं जंगल दिसतं. वृक्षांच्या पानांच्या मैफिलीत हिरव्या रंगाच्या अनेक छटा दिसतात.

## विशालकाय रानरेड्यांचे उदन्ती अभयारण्य

मैनपूर या तालुक्याच्या गावापासून जवळचं असलेलं उदन्ती वनभैसा अभयारण्य! हे महाकाय अशा रानरेड्यांचे संरक्षित क्षेत्र. रानरेडे आणि रानगवे एकाच अभयारण्यात पाहायला मिळतात, असे हे एकमेव अभयारण्य असावे! दोनशे पन्नास चौरस कि.मी. क्षेत्र असलेल्या या अभयारण्यात अनेक तृणभक्षी प्राणी व सोळा वाघसुद्धा आहेत.

रानरेडे हे कळपाने राहतात. जंगली म्हशीच्या कळपात साडेपाच-सहा फूट उंचीचा मस्तवाला रानरेडा व त्याच्या डोळ्यात असलेली ती मारकी झाक पाहिल्यावर मनात भीतीने धडकी भरते. सकाळच्या कोवळ्या उन्हात व दुपारी उन्हं कलल्यावर हे गवतात चरतात व दुपारच्या वेळी दाट गवतामध्ये बसून राहतात किंवा तलावाच्या किंवा नदीच्या पाण्यात डुंबत असतात.

रानरेड्याने नाकपुड्या फुगवून जोरजोराने श्वास बाहेर सोडायला सुरवात करून पायाखालची जमीन पायाने बडवायला सुरुवात केली की, जवळपास असलेला एकटा दुकटा वनकर्मचारी आपला जीव वाचवण्यासाठी झाडावर चढून बसतो. कारण, त्या बिघडलेल्या रानरेड्याचा अंगावर धावून यायच्या आधीचा हा पवित्रा असतो. त्या मानाने रानगवे शांत व गंभीर असतात.

या अभयारण्याला दोन बाजूने लागून ओरिसा राज्याची सीमा आहे. त्यामुळे सीमेलगतच्या भागातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा या अभयारण्याच्या क्षेत्रात उपद्रव आहे. हे लोक जंगलात आगी लावतात व वन्यप्राण्यांची शिकार करतात.

या भागात कमार जमातीचे लोक आहेत. हे 'तीरकमटा' बाळगतात व त्याने वन्यप्राण्यांची शिकार करतात. वनकर्मचाऱ्याने अटकाव करायचा प्रयत्न केल्यास त्यावर बाण चालवायला ते मागेपुढे पाहत नाहीत. काही दिवसाआधीच एका कर्मचाऱ्याच्या पायावर बाण मारून त्याला जखमी केल्याची घटना घडली होती.

कमार कुटुंबातील एका माणसाने आम्हाला त्याचे तीर चालवायचे कसब दाखविले. पन्नास-साठ फुटांवरील जमिनीत पक्क्या गाडलेल्या लाकडी खांबावर त्याने बाण मारला. तेव्हा त्या बाणाच्या माराने तो खांब थरारला व त्या बाणाचे लोखंडी पाते एक इंचभर त्या खांबात घुसले. वन्यप्राण्याच्या वर्मी लागलेल्या एकाच बाणाने त्याचा मृत्यू ओढवू शकतो.

अभयारण्याला लागून असलेल्या गावातील पाळीव गाई-म्हशीचे कळप अभयारण्याच्या क्षेत्रात चरायला जातात. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडते, पाळीव गुरांना होणारे रोग अभयारण्यातील वन्यप्राण्यांमध्ये पसरू शकतात. म्हणून वनाधिकाऱ्यांना खूप खबरदारी घ्यावी लागते.

अभयारण्याच्या क्षेत्रात असलेले अपुरे रस्ते, सोयी-सवलतींचा अभाव, विकासाकरिता असलेला तुटपुंजा निधी व स्वसंरक्षणाची नसलेली सोय या अडचणीतून मार्ग काढून वनाधिकारी व वनकर्मचारी आपल्या परीने अभयारण्याचे व त्यातील वन्यप्राण्यांचे संरक्षण करायचा प्रयत्न करतात.

कांकेर-जगदलपूर राज्य महामार्गावर वसलेले एक गाव केशकाल! रस्त्याला लागूनच पोलिस स्टेशन आहे. तेथील फौजदार श्री. आर. डी. भारद्वाज यांना भेटायची खूप उत्कंठा होती. कारण त्यांनी आतापर्यंत वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या अनेक घटना उघडकीस आणल्या होत्या व अनेक शिकाऱ्यांना जेरबंद केल्याचे कळले होते. भेटल्यावर मात्र आश्चर्य वाटले. कारण आम्ही खूप प्रभावी व जरब बसवणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना केली होती, पण हा तर एखाद्या श्रीमंत घरातील पोरसवदा तरुण दिसत होता!

परंतु, जेव्हा त्यांनी शिकार झालेल्या वन्यप्राण्यांची कातडी जप्त करताना व आरोपीला अटक करण्याच्या घटनांची माहिती सांगितली तेव्हा त्यांच्या धाडसाची, मेहनतीची व आयोजनातील बुद्धिमत्तेची जाणीव झाली.

विज्ञानाची पदवी 'गोल्डमेडल'सहीत मिळवलेल्या या तरुणाने काही दिवस प्राध्यापकी केली. परंतु, मुळात धाडसी प्रवृत्ती असलेल्या व काहीतरी आगळे- -वेगळे करायची इच्छा असलेल्या या तरुणाने पोलिस सेवेत प्रवेश घेतला व प्रशिक्षणातसुद्धा आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून व उत्कृष्ट नेमबाजीचे प्रदर्शन करून बारा बोअरची बंदूक पुरस्कारात मिळवली!

केशकालच्या सहा महिन्यांच्या कार्यकाळातच त्यांनी एकूण बारा शिकारीच्या घटना उघडकीला आणल्या, एका वाघाची, दोन अस्वली व नऊ बिबट्यांची

कातडी जप्त केली व एकूण चौदा शिकाऱ्यांना अटक केली.

हे काम करायला त्यांनी अत्यंत विश्वासू खबरे आपल्या कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेर पेरले, आपल्या सहकाऱ्यांचे मनोबल वाढविले, धाडसी व प्रसंगी प्राणाची पर्वा न करणारे कर्मचारी मोहिमेत आपल्या सोबत ठेवले आणि आपल्या पोलिस स्टेशनचे दैनंदिन काम व्यवस्थित ठेवून व आपल्या कार्यक्षेत्रात कायदा आणि सुव्यवस्था चोख ठेवून त्यांनी या मोहिमा राबवल्या. अनेक वेळा त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना वेषांतर करून जावे लागले.

त्यांच्या या कामात त्यांच्या वरिष्ठांनी, पोलिस अधीक्षकांनी खूप मदत केली, त्यांची पाठ थोपटली व रिवॉर्ड दिलेत. त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊनसुद्धा मोहिमा राबवायची मोकळीक त्यांना दिली.

आम्ही ज्या दिवशी त्यांची भेट घेतली त्याच्या आधल्या रात्री सुद्धा ते रात्रभर शिकाऱ्यांच्या मागावर होते.

या शिवाय ते जनतेमध्ये वन्यप्राण्यांच्या शिकारीविरुद्ध जागृती निर्माण करायचा प्रयत्न करतात. त्यांच्या बोलण्यातून, त्यांचा कार्याप्रती जिव्हाळा व कळकळ पाहून समोरचा माणूस प्रभावित होतो.


ह्या जप्ती व अटकेनंतरसुद्धा त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अटक केलेल्या आरोपींना त्यांचे 'गॉडफॉदर' लगेच जामिनावर मोकळे करतात. त्यांचा बचाव करायला नावाजलेले वकील उभे राहतात. हितसंबंध दुखावल्यामुळे अनेक शत्रू निर्माण होतात व त्यांना बदनाम करायला अनेक कटकारस्थाने करतात. अनेक वनाधिकारी व वनकर्मचारी त्यांना सहकार्य करायला उदासीन असतात.

एवढ्या समस्या असूनही या तरुणाचा उत्साह व उमेद थोडीसुद्धा कमी झाली नाही. त्यांचा निरोप घेताना मनात विचार आला. 'असे एकदोन भारद्वाज आमच्या मेळघाटात व नवेगावात असते तर...?'

## दृष्ट लागलेले राष्ट्रीय उद्यान 'कांगेर व्हॅली'

कांगेर राष्ट्रीय उद्यानाच्या विश्रामगृहात आम्हाला सकाळी जाग आली तेव्हा क्षितिजावर नुकतेच सूर्याचे आगमन झाले होते. रात्री आम्ही आलो तेव्हा अंधारात व दाट धुक्यात जंगल हरवून गेले होते. आता सूर्यकिरणांनी अंधाराचे जाळे फिटले होते व धुक्याच्या पडदा हळूहळू विरळ होऊ लागला होता.

जंगलातील वृक्ष-वेलींवर कोवळी सूर्यकिरणे पडली होती. झाडांच्या पानांमधून अनेक प्रकाशशलाका धुक्यात मिसळून जमिनीवर आल्या होत्या.



छत्तीसगड मोहीमेत आम्ही मित्र



कांगेर नदीचे दृश्य



धानकूटीच्या यंत्रासोबत बस्तरच्या आदीवासी स्त्रिया



फरश्यांनी शाकारलेले 'महारा' आदीवासीचे घर

वृक्षावृक्षांमधून अनेक रुपेरी जाळ्या दिसत होत्या. दोन वृक्षांना धरून जंगली कोळ्यांनी जाळी विणली होती व त्या जाळ्यांच्या मधोमध माणीक-मोत्यांनी मढविलेले ते कोळी विसावले होते. ती जाळी सूर्यप्रकाशाने चमकत होती.

या डोंगराळ भागातून कांगेर नदी वाहते. नदीच्या वेगवान प्रवाहामुळे खोल व रुंद घळ निर्माण झाली आहे. या घळीने जंगलाचे दोन लांब पट्टे निर्माण झाले आहेत. ह्या दोनशे चौरस कि.मी. क्षेत्रात हे राष्ट्रीय उद्यान विस्तारलेले आहे. नदीला अनेक ठिकाणी धबधबे आहेत. त्याचा धोऽधोऽधो असा आवाज येत राहतो.

येथील हवेत आर्द्रता आहे. म्हणून वृक्ष-वेली, वनस्पतींनी भरलेल्या निसर्गाचे रूप नयनरम्य असे आहे. जमिनीवर वृक्षांना अनेक वेली वेढलेल्या असतात व त्यावरील नवपुष्पे विविध रंगांची पखरण करतात.

या राष्ट्रीय उद्यानात आठ वाघ, अनेक बिबट व इतर प्राणी आहेत. तृणभक्षी प्राणी कमी आहेत, मात्र भेकर मोठ्या संख्येने आहेत.

येथील खडक ठिसूळ असल्यामुळे पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाने जमिनीत खोल विवरे तयार झाली आहेत व ती खोलवर जाऊन जमिनीला समांतर जाऊन त्याच्या गुंफा निर्माण झाल्या आहेत. पन्नास-साठ फूट लांबीच्या गुंफा आहेत. यात अनेक ठिकाणी सुंदर शिल्पे आहेत. यातील कोटंबसर, दंडक व कैलास गुंफा प्रेक्षणीय आहेत.

या जंगलात साल व साग वृक्ष जास्त प्रमाणात आहेत. अनेक औषधी वनस्पती येथे उगवतात. असे हे सुंदर राष्ट्रीय उद्यान समस्यांनी ग्रस्त आहे. येथील जंगलात संघटितपणे अतिक्रमण केले जाते. अनेक बाहेरचे लोक येऊन रिकाम्या वनजमिनीवर जबरदस्तीने कब्जा करतात. वनाधिकाऱ्यांनी वनकर्मचाऱ्यांनी विरोध केला तर त्यांच्यावर हल्ला करतात. वनाची रिकामी जागा राहू देता येत नाही. वनकर्मचारी रिकाम्या जागेवर रोपे लावायला जातात, त्यालासुद्धा लोक विरोध करतात. वनाधिकाऱ्यांनी, कारवाई केल्यास राजकारणी लोक हस्तक्षेप करतात.

उन्हाळ्यात लोकांना काम नसल्यामुळे, लोक संघटितपणे शिकार करतात. त्यासाठी जंगलाला आगी लावण्यात येतात.

या राष्ट्रीय उद्यानाचे तरुण वनाधिकारी मात्र, आपण या समस्यांवर निश्चितपणे मात करू, असे आत्मविश्वासाने सांगत होते.

इकडे लहान-लहान वनग्रामे आहेत. आदिवासी धान, कुटकी, मका व ज्वारीची पिके घेतात. साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. सणाला पशुंचा बळी

देण्याची प्रथा आहे. काही आदिवासी उंदीर खातात. त्या भाजीचा रस्सा खाल्ल्यामुळे आजारी पडत, नाही अशी समजूत आहे.

काही गावात 'ओम शांती' संप्रदायच्या लोकांनी आदिवासींमध्ये सुधारणा घडवून आणल्या आहेत. काही कुटुंबांचा कायापालट केला आहे. शिकारीवर जगणारे हे लोक आता शाकाहारी झाले आहेत. त्यांचा जीवनक्रम बदलला आहे. ते गावातच शाळा चालवितात. त्यांचा बराचसा वेळ ईश्वरपूजनात जातो. जंगलात आगी लागल्यास ते विझवतात व जंगलाचे संवर्धन करायला मदत करतात. लोकांमध्ये जागृती निर्माण करतात.

## प्रवासातील काही रोमांचक अनुभव

१) कांकेरवरून आम्ही सीतानदी अभयारण्याकडे जायला निघालो होतो. रस्ता खूपच खाचखळग्यांचा होता. त्यात पुन्हा आम्ही रस्ता चुकलो. त्यामुळे आम्हाला अभयारण्याच्या रस्त्याने लागणारे एक गाव 'नगरी' येथे पोहोचायला रात्रीचे साडेनऊ वाजले. एखादे हॉटेल शोधून तेथे जेवण घेणे आवश्यक होते कारण पुढे रस्त्याने कोणतेच गाव लागणार नव्हते. एक खानावळ दिसली, तेथे जाऊन आम्ही बसलो व जेवणाची ऑर्डर दिली. तेथे गावातील तीन-चार इसम बसले होते, ते आमच्याकडे संशयाने पाहू लागले. आमचे जीन्ससारखे कपडे, दाढीचे खुंट, आमच्याजवळील कॅमेरे आणि बायनॉक्युलर, आमचे अनोळखी चेहरे आणि आम्ही रात्रीला आलेलो, त्यामुळे त्यांना आम्ही नक्षलवादी आहो की काय? अशी शंका आली होती. हॉटेल मालकासोबत ते हळू आवाजात खलबत करू लागले. आम्हाला त्याची जाणीव झाली. त्यांच्या मनातील संशय दूर करणे आवश्यक होते, नाहीतर आम्ही उगीच अडचणीत आलो असतो व पुढील प्रवासात खोळंबा झाला असता. आमच्या ग्रुपमधील श्री. शिरीषकुमार पाटील म्हणजे कुणाशीही आत्मविश्वासाने संवाद साधण्यात कुशल असं व्यक्तिमत्त्व! कुमार पाटलांनी आमच्याबद्दल व आमच्या कामाबद्दल त्यांना माहिती दिली व त्यांच्या मनातील संशय फिटला. त्यानंतर आम्ही येथेच्छ जेवण केले व पुढील प्रवासाला निघालो...

२) रात्री दीड-दोनची वेळ. आम्ही सीतानदी अभयारण्यातून कांकेरकडे जात होतो. कुमार पाटील गाडी चालवत होते व गाडीतील इतर सर्व प्रवासी झोपेचा बॅकलॉग भरून काढीत होते.

इतक्यात गाडीला झटका बसला व गाडी थांबली. धक्क्याने सर्व जण जागे

होऊन, भांबावून, काय झाले ते पाहू लागले. तेव्हा कुमार पाटील 'रिऽऽछ, रिऽऽछ' असे दबक्या स्वरात ओरडत होते व त्यांच्या बाजूची खिडकीची कांच वर घेत होते. नंतर त्यांच्याकडून कळले की, आताच एक भलेमोठे अस्वल रस्त्यांच्या डावीकडून उजवीकडे रस्ता ओलांडून बाजूच्या जंगलात गेले आहे. आम्ही त्यांनी दाखविलेल्या दिशेकडे पाहू लागलो, पण अंधारात काही दिसले नाही.

आम्ही काय करावं? या संभ्रमात असतानाच रस्त्याच्या बाजूच्या अंधारातून ते अस्वलाचं धूड गाडीपासून पंचवीस-तीस फुटावर रस्त्यावर आलं व रस्ता ओलांडू लागलं. त्याच्यासोबत त्याची दोन पिलंही होती.

तीन-साडेतीन फूट उंचीचे ते केसाळ व लठ्ठ अस्वल रस्ता ओलांडून जाईपर्यंत जीव मुठीत घेऊन, काहीही आवाज न करता आम्ही त्याच्याकडे पाहत होतो.

आमची मुळीच दखल न घेता आपल्या पिलांना 'कव्हर' करीत लगबगीने झुलत झुलत रस्ता ओलांडून बाजूच्या जंगलात शिरून अंधारात दिसेनासं झालं. अस्वल व त्याच्या पिलांच्या दर्शनाने आम्ही स्तंभित झालो...

३) रात्रीच्या वेळी डांबरी रस्त्याने गाडी वेगाने जात होती. हेडलाईटचा प्रकाश, रस्ता व जंगल उजळीत वेगाने समोर-समोर जात होता व जंगल झर झर मागे पडत होते. आमच्या नजरा उजळलेल्या जंगलावरून फिरत होत्या. इतक्यात समोर रस्त्यावर एक कुत्रं मरून पडलेलं दिसलं. हे नेहमीचे दृश्य म्हणून आम्ही दुर्लक्ष केले. त्या कुत्र्याला ओलांडून गाडी पुढे गेली व थोड्या अंतरावर जाऊन एकदम थांबली. श्री. रिठे गाडी मागे वळवू लागले. कशाला उगीच हे गाडी वळवतात? असे आम्हाला वाटले. त्यांनी गाडी वळवली व थोडी जवळ आणून हेडलाईटचा प्रकाश कुत्र्यावर स्थिर केला. आम्ही सर्व जण त्या कुत्र्याला पाहायला गेलो, पाहतो तो काय आश्चर्य! ते रानकुत्रे होते. संघटितपणे वाघाचीसुद्धा शिकार करणारी ही रानकुत्री जंगलात सहसा दिसत नाहीत. आम्हाला ते अपघातात मेलेले रानकुत्रे जवळून बघायला मिळाले.

४) रात्री आठ-साडेआठची वेळ. आम्ही कांगेर व्हॅलीकडच्या पुढील प्रवासाला निघालो होतो. नुकतेच एक वनग्राम मागे टाकून दीड-दोन कि.मी. वर गेले असू रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी दाट जंगल होते. आमच्या गाडीच्या हेडलाईटच्या प्रकाशात रस्ता व जंगल उजळून जात होते. इतक्यात एक इसम डोक्यावर टोपले घेऊन जाताना दिसला. अशा अपरात्री जंगलात निर्जन ठिकाणी हा काय घेऊन चालला असेल असा प्रश्न आमच्या मनात आला. गाडी थोडी समोर नेऊन थांबवली

व त्या इसमाला जवळ बोलावले. कमरेला धोतर, अंगात बंडी व डोक्याला पागोटे असलेला तो इसम जवळ आला. त्याला टोपलीत काय आहे? ते विचारले. त्याने टोपली खाली ठेवली व वरचे कापड बाजूला केले. टोपलीत दोन नैवद्य होते, एका गडव्यात पाणी होते व कणकेचे दोन दिवे होते. ती पितृमोक्ष अमावास्येची रात्र होती व तो त्याच्या वडिलाच्या दफन केलेल्या जागेवर 'घास' घेऊन जात होता. ते पाहून आम्ही गलबलला, अंतर्मुख झालो व पुढे निघालो....

५) कांगेर व्हॅलीच्या विश्रामगृहाजवळ जाताना उंच गवतातून व दाट धुक्यातून आमची गाडी जात होती. ५-६ फुटा वरील काही दिसत नव्हते. विश्रामगृहाला पोहोचलो तेव्हा रात्रीचे दोन वाजले होत. विश्रामगृहाला कुलूप होते. विश्रामगृहाच्या बाजूला असलेल्या सर्व्हंटस् क्वार्टरमधे पाहिले तेव्हा तेथे एक इसम बसलेला दिसला. त्याच्याकडे चौकशी केली तेव्हा त्याने सांगितले की, खानसामा त्याच्या घरी राहतो, त्याच्याकडे किल्ली आहे. त्याचे घर काही अंतरावर आहे. त्या माणसाचे बोलणे तुटक तुटक व रहस्यमय होते. मी व कुमार पाटील, त्याला सोबत घेऊन खानसामाच्या घराकडे निघालो. उंच गवतातून गेलीली अरुंद पायवाट, दाट धुके, आम्ही जात होतो त्या दिशेने येणारा नदीच्या खळखळाटाचा व धबधब्याचा आवाज अशा वातावरणात त्या माणसाच्या मागून आम्ही जात होतो. आमच्याजवळील विजेरीचा प्रकाश धुकं छेदू शकत नव्हता. आम्ही चालत जात होतो पण ते ठिकाण काही येत नव्हते. त्या माणसाला थांबून विचारले तर तो थांबत होता ओठातल्या ओठात काही पुटपुटत होता व पुन्हा पुढे चालत होता व नदीच्या धबधब्याचा आवाज जवळजवळ येत होता.

आमच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. गावाकडे ऐकलेल्या भुताच्या व चकव्याच्या गोष्टी आठवल्या. त्यातल्या त्यात ती अमावास्येची रात्र होती. आमचे मन भयग्रस्त झाले. तशा थंडीतही अंगाला घाम फुटला, आम्ही जीव मुठीत घेऊन त्याच्या मागून चालू लागलो. वाटत होते, हा आपल्याला धबधब्याच्या काठावर तर घेऊन जाणार नाही ना! पण शेवटी एकदाचे ते घर आले व आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला...

६) कांगेर व्हॅलीजवळील एका आदिवासी गावाला भेट दिली. पंधरा-वीस घरांचं खेडं. मजूर व शेतकरी बहुसंख्येनं असलेलं ते गाव. एका घराजवळून जातांना त्या घरातून लयबद्ध व मंजूळ पण वेगळाच आवाज ऐकू येत होता. आमची उत्सुकता चाळवली आणि तो कशाचा आवाज आहे हे पाहण्याकरीता गेलो.



बस्तरच्या 'माडीया' गोंडाचे घर



'कमारा' आदीवासीचे कुटुंब



वनवासींचा लाकडाचा देव



रानहळदीचे फुल

घर बरंच मोठं होतं व अंगणाला लागून असलेल्या पडवीत धान कुटायचे काम सुरू होते. दोन स्त्रिया तेथे घरीच बनवलेल्या एका यंत्रावर काम करीत होत्या. त्यातूनच हा लयबद्ध आवाज येत होता.

आपल्याकडे खेड्यात कांडण करण्याकरिता उखळ असतं. त्या उखळात कांडण करायचे धान्य टाकून घरातील स्त्री मुसळाने हाताने धान्य कुटते. कधी उजव्या हाताने, कधी डाव्या हाताने, मधून मधून डावा, उजवा असा हात बदलवत राहते, या कांडण प्रकारात हात लवकर थकतात.

वर उल्लेख केलेल्या यंत्रात एक लांब धनुकली पडवीच्या वरच्या आढ्याला (तुळईला) टांगली होती. त्या धनुकलीला एक काठी बांधली होती, ती जमिनीला समांतर होती. त्या काठीच्या एका टोकाला जड मुसळ बांधले होते व मुसळाच्या खाली जमिनीत उखळ होते. काठीचे दुसरे टोक एक तरुणी दोन्ही हातांनी धरून खाली ओढत होती त्या वेळी मुसळ वर जायचे व त्या तरुणीने हात ढिले सोडून काठीवरचा दाब काढला की, ते मुसळ वजनाने उखळात जाऊन पडायचे. उखळाजवळ धान्य सावरायला एक स्त्री बसली होती. त्या यंत्राच्या हालचालीतूनच पुईंग पुईंग असा मंजूळ लयबद्ध आवाज येत होता. त्या आवाजाने त्या काम करणाऱ्या स्त्रिया रमून जात होतया. आम्ही कितीतरी वेळ तो आवाज ऐकत थांबलो...

७) एक वनग्रामात जाताना गाडी लांबवर ठेवून पायी जावे लागले. रस्त्याने एक नदी लागली. नदीतील कंबरभर पाण्यातून वाट काढत आम्ही नदीच्या दुसऱ्या तीरावर पोहोचलो. वनग्रामातील स्त्रिया नदीवरच स्नान करीत होत्या व कपडे धूत होत्या. आम्ही घाट चढून वर गेलो, तेव्हा घाटावर एका बाजूला एक आदिवासी तरूणी आंघोळीनंतर ओला झालेला डोक्याचा केशकलाप वाळवीत होती. तिने कमरेला एकच वस्त्र गुंडाळलेले होते व बाकीचे सर्व शरीर अनावृत होते. तिचे तारुण्यसुलभ शरीरसौष्ठव व कांती इतकी मनोवेधक होती की, खजुराहो लेण्यातील अप्सरेची एखादी मूर्ती सजीव होऊन अवतरली की काय, असे वाटत होते. त्या अरण्यकन्यकेच्या डोईचे आले केस सुकविताना होणाऱ्या लयबद्ध अंगविक्षेपाने बघणाऱ्याचे मन घायाळ होऊ शकले असते, पण तिच्या निर्भय व निर्मळ अंतःकरणाची साक्ष पटून तसा विचारसुद्धा मनाला शिवत नव्हता. निसर्गातील वातावरण प्रदूषणमुक्त असते आणि त्याच्या सतत सान्निध्यात रहाणाऱ्यांची मनेसुद्धा निर्मळ असतात, याची साक्ष पटली होती...

८) आमच्या प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात अम्ही इंद्रावती अभयारण्याकडे निघालो होतो. आम्हाला निघतानाच सांगण्यात आले की, तिकडे नक्षलवादी सक्रिय असल्यामुळे आम्हाला तेथे कदाचित जाता येणार नाही. बिजापूरच्या कार्यालयातून आम्हाला परवानगी घ्यायची होती. वीसएक कि.मी. वर ते गाव होते.

रस्त्याने दोन माणसे सायकलवर डबलसीट जाताना दिसली. त्यांनी आम्हाला थांबविले व बिजापूरपर्यंत एका माणसाला लिफ्ट देण्याबद्दल विनंती केली. आम्ही त्याला बिजापूरपर्यंत नेले नंतर तो उतरून गेला. त्या प्रवासात तो आमचे आपसात चाललेले संभाषण ऐकत होता. वनविभागाच्या कार्यालयाने पुढे जायची परवानगी आम्हाला दिली नाही. आम्ही परत निघालो. आमच्यासोबत प्रवास करणारा इसम कदाचित नक्षलवाद्यांचा खबऱ्या असावा, असे आम्हाला सांगण्यात आले...

९) रात्रीची आठची वेळ. गावातून बासरीचे सूर ऐकू येऊ लागले व त्याच्या साथीला डफाचा आवाज येऊ लागला. बासरीच्या सुराने व डफाच्या आवाजाने एक ताल धरला होता. दोन्ही आवाज एकमेकांत मिसळून एक लय निर्माण झाली होती. या लयबद्ध स्वरांनी वातावरण भरून गेले होते. आदिवासींचा कोणतातरी सण होता, म्हणूनच गावात बासरी व डफ वाजत होता.

इतक्यात रस्त्याने लांबून या संगीताच्या तालावर म्हटल्या जाणाऱ्या गाण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. आदिवासी तरुणींचा-मुलींचा एक जत्था रस्त्याने येत होता. व त्यांच्याच गाण्याचा हा आवाज होता. आदिवासी तरुणी नटून थटून निरनिराळे परंपरागत अलंकार घालून नाचत, गाणी म्हणत होत्या. त्यांच्या गाण्याचा आवाज बासरी व डफाच्या स्वरात मिसळला होता. त्यांचे पदन्यास त्या तालावर होत होते. कृष्णाच्या बासरीने व्याकूळ होऊन, गोपी मधुवनाकडे रासक्रीडेकरिता निघाल्या की काय, असे वाटत होत.

इंग्रजीत एक सुभाषित आहे 'Coming events cast their shadows before!' (कमिंग इव्हेंटस् कास्ट देअर सॅडोज बिफोर!). आम्हाला आमच्या प्रवासात पुढे आलेल्या नक्षलवादाची चुणूक जाणवली होती. आम्ही तो प्रवास केला होता, पण आता मात्र होणे नाही.

•••

# १४

# अरण्यगर्भ

वसुंधरेचा निसर्गातील एक अनमोल ठेवा म्हणजे वने, अरण्ये! भारतातील वनांचा विचार करायचा म्हणजे आपण उत्तरेकडून सुरुवात केली, तर उत्तरेला असलेला नगाधिराज हिमालय, त्याची बर्फाच्छादित शिखरे व त्यातून उगम पावलेल्या यमुना, भागीरथी, अलकनंदा, मंदाकिनी या नद्या आणि त्यांच्या काठी पर्वताच्या उतरणीवर असलेली घनदाट वने. या अतिउंच पर्वतीय प्रदेशात तापमान कमी राहते. त्यामानाने पावसाचे प्रमाण जास्त राहते. सुमारे १२० सें.मी. पेक्षा अधिक पावसाच्या उंच पर्वतीय भागात ही समशीतोष्ण वने आहेत. सुमारे १००० मीटर ते २००० मीटर उंचीपर्यंत पाईन, स्प्रुप व देवदार हे वृक्ष आहेत. ३००० मीटरपेक्षा उंच भागात फर, पॉपलर, बर्च, मॅपल या वृक्षांचा समावेश आहे. ही वने घनदाट आहेत. या वनात अक्रोड, सफरचंद, चेरी यासारख्या फळांची झाडेही आहेत. हा प्रदेश उत्तरांचल आणि इतर राज्यात येतो.

ऋषिमुनींची तपोभूमी म्हणून हा प्रदेश प्रसिद्ध आहे. या प्रदेशात हिमालयाच्या कुशीत अनेक तीर्थक्षेत्र आहेत. यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ, हेमकुंड लोकपाल, नंदादेवी व कैलास मानस सरोवर अशी तीर्थक्षेत्रे आहेत. ही सर्व समुद्रसपाटीपासून ३००० मीटर उंचीच्या वरच आहेत. यातील नंदादेवी हे क्षेत्र सुमारे ८००० मीटर उंचीवर आहे. हिमालयातील या क्षेत्रांचा प्रवास अतिकठीणतम व भयावह असूनसुद्धा भारतातील सर्वच भागातून यात्रेकरूंचे जत्थे आपल्या प्राणाची पर्वा न करता हजारो वर्षांपासून या तीर्थक्षेत्राचा प्रवास करतात व देवदर्शनासोबत हिमालयातील वनाच्या सौंदर्याचा अनुभव घेतात.

हिमालयाच्य पायथ्याशी उष्णप्रदेशीय सदाहरित वने आहेत. ८०० मीटर

पेक्षा जास्त उंचीवरील प्रदेश व २५० सें.मी. किंवा त्यावरील पर्जन्य प्रदेश व पाण्याची कायम उपलब्धता असलेल्या प्रदेशात ही सदाहरित वने वाढतात. आसाम टेकड्यांच्या प्रदेशात, पश्चिमघाट व पूर्वघाट यांच्या उतारावर व अंदमान निकोबार बेटात ही वने आहेत. या वनात महोगनी, रोजवूड, एबनी, रबर, शिसव, साल, बांबू इत्यादी वृक्ष आढळतात.

यानंतरच्या वनाचा प्रकार म्हणजे उष्णप्रदेशीय पानझडीची वने. सुमारे २०० सें.मी. पर्यंत पाऊस पडणाऱ्या भागात ही रुंद पानांची वने वाढतात. कोरड्या ऋतूत आर्द्रता कमी होऊ लागल्यावर हे वृक्ष बाष्पीभवन कमी व्हावे म्हणून पाने गाळतात व उष्ण कोरड्या हवेत टिकून राहतात. या वनामध्ये साल, साग, पळस, अर्जुन, मोह, पिंपळ, चंदन, बांबू इत्यादी झाडे आढळतात. मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, महाराष्ट्र या राज्यात अशी वने आहेत.

७५ सें.मी. पेक्षा कमी पावसाच्या प्रदेशात झुडपी व काटेरी वने येतात. कमी पावसामुळे येथील वृक्ष उंच वाढू शकत नाही, त्यांना अरुंद व लहान आकाराची पाने असतात तसेच काटेरी असतात. विविध प्रकारच्या बाभळी, निवडुंग, इतर काटेरी झुडपे, खुरटे गवत विरळ स्वरूपात आढळतात. जमिनीवर वनस्पतीचे सलग आवरण नसते. कच्छ, सौराष्ट्राचा काही भाग, राजस्थान, पंजाब, हरयाणा आणि महाराष्ट्राच्या कमी पर्जनाच्या प्रदेशात अशी वने आहेत.

भारताला खूप मोठा लांबच लांब समुद्रकिनारा आहे, समुद्र काठची वने त्या भागात आहेत. समुद्रकिनाऱ्याच्या वरील दलदलीच्या प्रदेशात आणि त्रिभुज प्रदेशात ही वने आढळतात. ही वने दाट असतात व त्यांच्यातील काही वृक्षांची उंची ३० मीटरपर्यंत असते. गंगेच्या त्रिभुज प्रदेशातील वनांमधे सुंद्री वृक्षांची संख्या अधिक असल्याने हा प्रदेश 'सुंदरबन' म्हणून ओळखला जातो. ही वने प्रामुख्याने पं. बंगाल, ओरिसा, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या राज्यांच्या किनारी प्रदेशात वाढतात.

असं हे भारतातील वनवैभव बर्फाच्छादीत पर्वतापासून ते वाळुकामय प्रदेशापर्यंत व समुद्रकिनाऱ्यांपर्यंत त्यांच्या इतर घटकासहित जसे भौगोलिक सौंदर्य, पर्वत, दऱ्या, नद्या, वन्यप्राणी, पक्षी, फुलपाखरे, कृमी-कीटक आणि आदिवासींनी समृद्ध असलेलं या अरण्यांची विविध ऋतूतील विविध रूपे किती पाहू अन् किती नाहीसं होऊन जातं. त्यातली अल्पांशाने काही जरी पाहू म्हटली तर एक जन्म सुद्धा पुरणार नाही. आम्ही मित्रांनी अनेक अरण्यांची विविध ऋतूत भटकंती केली व

वसुंधरेचा हा सौंदर्यठेवा डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवला. पण, यात एक खंत मात्र कायम होती ती म्हणजे, आम्ही आतापर्यंत नीलगिरी पर्वत शृंखलेची (जी केरळ, तामिळनाडू व कर्नाटक राज्यात पसरली आहे.) मुकुटमनी असलेली सायलेंट व्हॅलीला भेट न दिल्याची. सॉयलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान केरळमधे आहे. सायलेंट व्हॅलीचं विशेष आकर्षण मनामधे होतं. कारण बाकीच्या सर्व वनांमध्ये माणसाचा शिरकाव झाला. त्याच्या हस्तक्षेपामुळे अरण्याच्या मूळ रुपात स्थित्यंतरे झालीत. पण सायलेंट व्हॅली त्या क्षेत्राच्या अति दुर्गम घडणीमुळे माणसाच्या स्पर्शापासून मुक्त राहिली. अस्पर्श, अनाघ्रात अशा त्या अरण्यक्षेत्राने त्याच्या निर्मितीपासून म्हणजे अंदाजे ५ कोटी वर्षांपासून आपलं कुंवारपण जपलं आहे. अशी ही सायलेंट व्हॅली आहे तरी कशी, याबद्दल आमच्या मनात उत्कंठा होती व केव्हा तरी या राष्ट्रीय उद्यानाला भेट द्यावी, अशी इच्छा उराशी जपली होती. त्या तीव्र इच्छाशक्तीनेच की काय आम्हाला एका परिषदेला केरळला जाण्याचा योग आला आणि या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन आम्ही सायलेंट व्हॅलीकडे प्रयाण केले.

केरळ राज्याचा १/४ भाग अभयारण्यांनी आणि राष्ट्रीय उद्यानांनी व्यापलेला आहे. यात दोन राष्ट्रीय उद्याने, बारा वन्यप्राणी अभयारण्ये, एक व्याघ्र अभयारण्य आहे. दोन राष्ट्रीय उद्यानांपैकी एक सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान होय. सुमारे ९० चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेला कोअरभाग व १४० चौ.कि.मी. असलेला बफर भाग असलेले हे राष्ट्रीय उद्यान नीलगिरी पर्वताच्या दक्षिण-पश्चिम भूभागात पश्चिम घाटाच्या उत्तरेकडील उतारावर वसलेलं आहे. या भागात पावसाचे सरासरी प्रमाण १०,००० मि.मी. एवढे आहे. या राष्ट्रीय उद्यानात ७५ ते ८० टक्के क्षेत्रावर घनदाट जंगल व २० टक्के क्षेत्रावर गवताळ प्रदेश म्हणजे कुरणे आहेत. २०० कि.मि. रुंद अशी तामिळनाडू- केरळ राज्याची सीमा हे सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानाचे वरच टोक होय. सायलेंट व्हॅलीचे सर्वात उंच असलेले शिखर म्हणजे Anguinda Hills हे समुद्रसपाटीपासून २३८३ मी. उंच आहे. दुसरे उंच टोक म्हणजे सिसपारा पास (खिड) होय. अत्यंत अवघड चढण असल्यामुळे अत्यंत धाडसी व चिकाटी असलेले लोकच इकडे येऊन सायलेंट व्हॅलीच्या अतिदुर्गम भागात प्रवेश करायचा प्रयत्न करतात पण त्यांना ते शक्य होत नाही. म्हणून या भागातील वृक्ष- वनस्पती अस्पर्श व अज्ञात आहे.

रॉबर्ट वॅट हे एक सर्जन, पण वनस्पति शास्त्रज्ञ झाले. ते पहिले परदेशी वनस्पति

शास्त्रज्ञ १९ व्या शतकाच्या मध्यात या अद्भुत व समृद्ध अशा जंगलात आले. त्यांनी संशोधन करून सात नवीन प्रजातींचा शोध लावला आणि १२२ वनस्पतींच्या शोधाचे श्रेय त्यांच्याकडे जाते. पण अतिदुर्गम भागात कुणी जाऊ न शकल्यामुळे या अरण्यात किती प्रजाती आणि वनस्पती अज्ञात असतील, ते त्या निसर्गालाच माहिती.

सायलेंट व्हॅलीतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे कुंथी नदी. ही सदावाहिनी आहे. राष्ट्रीय उद्यानाच्या उत्तरेकडील सैरंध्री (की सह्याद्री) पर्वतातून २२०० मी. उंचीवरून ही उगम पावते व तेथून पर्वतकड्यावरून उड्या घेत, खोल दरीतून वाहत येत पूर्ण व्हॅलीच्या लांबीने दक्षिणेकडे वाहत जाते आणि शेवटी भरतपुझा नदीला मिळते. या प्रवासात अनेक नद्या कुंथीला येऊन मिळतात. कुंथीच्या प्रवाहाचे पाणी हे मानवाला अजून अज्ञात असलेल्या वृक्ष-वनस्पतींच्या स्पर्शाने भारीत झालेलं असत.

नीलगिरी पर्वतात वसलेले 'मुक्कई' वनग्राम हे सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानाचे कार्यालयाचे ठिकाण. कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मनस्वी सहकार्यामुळे आम्ही येथील पदभ्रमणाच्या व मुक्कामाच्या उपक्रमाबाबत आश्वस्त झालो. आम्ही तीन दिवस सायलेंट व्हॅलीत पदभ्रमण करणार होतो व नंतर कोझीकोड्याहून मंगला एक्सप्रेसने परतीचा प्रवास करणार होतो.

आम्ही आरक्षित केलेले विश्रामगृह उंच वृक्षाच्या दाटव्यात लपून गेले होते. विश्रामगृहाच्या प्रशस्त गॅलरीतून समोरचे दिसत असलेले दृश्य रमणीय होते. समोर बाग होती व त्यापलीकडे खळखळ वाहणाऱ्या भवानी नदीचे पात्र होते. वृक्षांमधून पक्ष्यांचा कलरव सुरू होता. या भागातील काही नवीन पक्षी दिसतील या उत्कंठेने आम्ही कॅमेरे व बायनॉक्युलर सावरले आणि दोन नवीन पक्ष्यांचे दर्शन आम्हाला घडले. एक पहाडी मैना (Mill Myna) तिला आम्ही अनेक वर्षांपासून शोधत होतो व दुसरा ब्रांझ रंगाचा कोतवाल (Branze Droago) आमचा येथे येण्याचा श्रीगणेशा झाला होता. येथील वनकर्मचाऱ्यांनी पदभ्रमणासंबंधी काही सूचना दिल्या. एक म्हणजे येथे केव्हाही खूप जोराचा पाऊस येऊ शकतो आणि दुसरी म्हणजे या सदाहरित पर्जन्य अरण्यात जमीन ओलसर राहत असल्यामुळे येथे जमिनीवर सर्वत्र लिचेस म्हणजे जळवा आहेत, चालतांना त्या तुमच्या पायांना झोंबून तुमचे रक्त शोषू शकतात. व पाय रक्तबंबाळ होऊ शकतात म्हणून पायांना व बुटांना तंबाखूची




भारताच्या नकाशावर 'सायलेंट व्हॅली'



सायलेंट व्हॅलीचे प्रवेशद्वार



जळू



सायलेंट व्हॅलीतील 'कोरकूवा' आदीवासीचे गाव

भुकटी लावणे आवश्यक असते. तंबाखूच्या वासाने त्या जवळ येत नाही. नाहीतर त्या सॉक्सला छिद्र करून पायाच्या त्वचेला दंश करून चिकटतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता आटोपून सामान सोबत घेऊन आम्ही जीपनं गाईडसोबत राष्ट्रीय उद्यानाच्या एकमेव गेटमधून सायलेंट व्हॅलीत प्रवेश केला. त्या वेळी आकाश स्वच्छ होते, वातावरणात थंडी होती. वनस्पतीचा मिश्र गंध वातावरणात सर्वत्र पसरलेला होता. जमिनीवर सर्वत्र दाट वनस्पती पसरली होती, रस्त्यावरचे दगडसुद्धा वनस्पतींनी वेढले होते. वृक्षांचे दाट जंगल होते. एका वृक्षाजवळून जाताना गाइडने जीप थांबवली व त्या झाडावर पानोळ्यात बसलेला एक प्राणी दाखविला. हे 'लायन टेल्ड मॅकॅव' म्हणजे सिंहासारखी शेपटी असलेले माकड होते. या माकडाला गालापासून कानशिलापर्यंत सिंहाच्या आयाळीसारखी आयाळ होती. आयाळीचा रंग बदामी भुरा होता व याची शेपटी सिंहाच्या शेपटी सारखी होती, याचे डोळे लाजाळू होते व त्यात भित्रेपणाची छटा होती. याच्या चमकदार काळ्या रंगामुळे या सदाहरित सावल्याच्या जंगलात याचं अस्तित्व लपून जातं. पुढे गेल्यावर गाईडने आम्हाला रस्त्याच्या कडेला असलेले एक झाड दाखविले व त्याची फळे दाखवली. या झाडाचे नाव मुलंजका होते व त्या झाडाची छोट्या फणसासारखी फळे लायनटेल्ड माकडाचे आवडीचे खाद्य आहे आणि हा वृक्ष याच अरण्यात आहे. वृक्षांवर अनेक प्रकारची आर्किड दिसत होती. जमिनीतूनसुद्धा ऑर्किडस् उफाळून आल्या होत्या. जमिनीवर अनेक ठिकाणी फुलपाखरांच्या थव्यांनी गर्दी केली होती. त्यात ब्ल्यूबॉटल, व्हाईट फॅन्सी, येलो फॅन्सी अशा विविध जातीची फुलपाखरे होती. पुढे पर्वताच्या उतरणीवर १०-१२ घरांचे एक खेडे दिसले, हे 'कोस्वरा' या आदिवासी जमातीच गाव होत. या अरण्यात काही आदिवासी जमातींचं वास्तव्य आहे. अगदी खूप उंच असलेल्या सिसपारा पर्वतावरसुद्धा 'तोडा' या आदिवासींचं मूळ निवासस्थान आहे. रस्त्यावर पडलेल्या हत्ताच्या शेणातून कुत्र्याच्या छत्र्या डोकावल्या होत्या. रस्त्यावरील पानांचा थर उचकटला तेव्हा दाभणच्या जाडीच्या अनेक जळवा तेथे वळवळत होत्या. सायलेंट व्हॅलीचे हे अरण्य जसे वनस्पतींची खाण आहे, तसे जिवजंतूचे आगरसुद्धा आहे. येथे १०७ प्रकारची ऑर्कीडस् आहे, १०० प्रकारची फर्नस आहेत, २०० प्रकारच्या लिव्हरवर्ट आणि ७५ प्रकारच्या जळवा आहेत, १२ प्रकारचे मासे आहेत. त्यात २ नवीन शोधलेल्या जाती आहेत, २५ प्रकारचे

साप आहेत त्यात किंगकोब्रासुद्धा आहेत. हत्ती, सिंहाची शेपटी असलेले माकड, नीलगिरी लंगूर, कॉमन लंगुर, नीलगिरी थार, वाघ, बिबट, अस्वल, रानगवा, रानकुत्रे आहेत. आम्ही दुसऱ्या दिवशी पदभ्रमण करून जाणार होतो, त्या ठिकाणाचं नाव होतं 'कुचिपुरा' म्हणजे कीटकांचा पहाड. आता आम्ही एक अजस्त्र व उंच अशा लोखंडी निरीक्षण मनोऱ्याजवळ आलो. हे टॉवर जवळपास मायक्रोवेव्ह टॉवरच्या उंचीएवढे होते. हे तीन मजली आहे. पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर बंदिस्त केबीन व त्याला काचेच्या खिडक्या आहेत. तेथे ऊनपावसापासून बचाव करीत भोवतालचे रम्य दृश्य पाहता येते. सर्वात वर एक प्रशस्त कठडा आहे व त्याला रेलिंग लावलेले आहे. टॉवरभोवती त्याचे जंगली हत्तींपासून रक्षण व्हावे म्हणून खंदक खोदला आहे. प्रत्येक मजल्यावरून भोवतालचे सौंदर्य वेगवेगळे दिसते. आम्ही जेव्हा सर्वात वरच्या मजल्यावर पोहोचलो तेव्हा वेगाने वाहणारे वारे अंगाला झोंबत होते. भोवताल नजर टाकली तेव्हा पाचूंनी मढवलेले उंचच उंच पर्वत पसरले होते. त्या पर्वतातून कोसळणाऱ्या अनेक लहान मोठ्या प्रवाहाच्या रुपेरी रेषा दिसत होत्या. खोल दरीतून वाहत जाणाऱ्या नद्यांचे प्रवाह म्हणजे चमकदार चांदीचे लोट वाहत आहेत असा भास होत होता. पर्वतावरील जंगलाच्या हिरव्या रंगांच्या विविध छटा डोळ्यांचे पारणे फेडत होत्या. श्यामधवल रंगांचे ढगांचे पुंजके लडिवाळपणे पर्वताच्या अंगाखांद्यावर खेळत होते आणि या सर्व दृश्यावर गूढ शांतता विलसत होती. त्या शांततेने आमची मने भारली. या प्रदेशाला 'सायलेंट व्हॅली' का म्हणतात हे कळून आले. निसर्गाचं हे सत्यं- शिवं- सुंदरम् असं रूप किती तरी वेळ अनुभवत होतो.

टॉवरजवळच काही अंतरावर वनकर्मचाऱ्यांची दोन घरे होती, बाजूलाच राष्ट्रीय उद्यानाचे संग्रहालय होते आणि जवळच एक आऊटहाऊस होते. प्रत्येक वास्तूभोवती खंदक खोदले होते. संग्रहालयात सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानाचा नकाशा, आतापर्यंत शोधलेले प्राणी, पक्षी, फुलपाखरे, कृमीकीटक व विविध वनस्पती यांची छायाचित्रे होती. छायाचित्रात दाखवलेल्या अवघड वाटा व अतिदुर्गम भाग पाहूनच छातीत धडकी भरत होती.

त्या ठिकाणापासून खोलवर तीन कि.मी. अंतरावर व्हॅली आहे व त्या व्हॅलीतून एक नदी वाहते, तिकडे आमचे पाय वळले. दरीतून वाहणाऱ्या नदीचे पात्र विस्तृत होते. दोन्ही बाजूंनी दोन टेकड्या होत्या. त्या टेकड्यांना जोडणारा नदीवरील



शेकरू (जायंट स्पायडर)



फूलपाखरांचा थवा



सिंहपूच्छ कपी (लॉयन टेल्ड मॅकॅव)



मूलकूंजाचे फळ

झुलता पूल होता, तो जवळपास ८०० फूट लांब होता. गाईड सांगत होता की नदीच्या वरच्या बाजूला पाऊस पडला की, नदीला पूर येतो व तो पूर कधी कधी पुलापर्यंतसुद्धा वाढतो. पुलाच्या पलीकडे टेकडीवर अवघड पायवाट होती, चालताना पाय घसरला किंवा तोल गेला तर सरळ नदीत पडून कपाळमोक्ष व्हायचा. पण, त्या अवघड रस्त्याने हत्ती जातो, हे गाईडकडून ऐकल्यावर एवढ्या अवजड देहाचा प्राणी या अवघड वाटेने कसा जात असेल याचे आश्चर्य वाटले.

त्या रात्री आम्ही म्युझियमजवळच्या आऊटहाउसमध्ये मुक्काम केला. त्या अद्भुत जंगलातल्या सान्निध्यातली ती रात्र स्वप्नवत होती. दुसऱ्या दिवशी पहाट उगवली ती धुक्याचा पडदा लेवूनच. सूर्य वर आला व तो पडदा विरला आणि निसर्ग सोनेरी रूपाने नटला.

आम्ही भरभर आमचा सकाळचा नाश्ता संपवला व शिदोरी घेऊन लांबच्या ट्रेकला निघालो. आमच्या सोबतचे मजूर आमचे बरेचसे सामान घेऊन चालत होते. पहाडाच्या घाट रस्त्याने चालताना आमचा वेग बराच कमी झाला. आम्ही चढून जात असलेली पर्वतशृंखला हिरव्याकंच दाट वनराजीने नटली होती. आम्ही मधून मधून थांबून ती वृक्षवेलींची नक्षी बघत होतो आणि डोळ्यात साठवत होतो. आम्ही पर्वताची चढण चढून गेलो आणि आमच्यासमोर लाल- पिवळ्या अशा सुंदर रंगांनी नटलेले फुलांचे ताटवे पसरलेले दिसले. त्या ताटव्यांना गूढतेचं एक वलय भासत होतं. त्या फुलांनी आमच्या मनावर मोहिनी घातली. पुढे गेल्यावर कुरणाचा एक पट्टा लागला, दाट गवतातून आमची वाट गेली होती. गवतावर अनेक पक्षी भिरभिरत होते. आमच्या चालण्याने गवतात लपलेले पक्षी बुजून फर्रर्र करीत उडत होते.

आकाशात एक गरुड तरळत होता, तो आपल्या तीक्ष्ण नजरेने जमिनीवरील शिकार शोधत होता. एका खुरखुटलेल्या झाडाच्या बेचक्यात ऑर्किडची सुंदर गुलाबी फुले लक्ष वेधून घेत होती. आता आम्ही एका दरीतील उतरणीच्या रस्त्याला लागलो आणि वाट उंच व दाट वृक्षांमधून जात होती. सूर्याची किरणे वनस्पतींच्या पाणोळ्यातून जमिनीवर यायचा वृथा प्रयत्न करीत होती. त्यामुळे ते दृश्य अद्भुत असं भासत होतं. एक सांबर कुठूनतरी रस्त्यावर आलं अन् आम्हाला पाहून घाईत अरण्यात लुप्त झालं. एका झाडावरून जायंट स्क्विरल किंचाळत होती. वृक्षांमधून एक पक्षी उडत येऊन बाजूच्या झाडावर बसला. हा मोठा भृंगराज (ग्रेटर रॅकेट


टेल्ड ड्रोंगो) होता. आपल्या महाराष्ट्राकडील जंगलात भृंगराज आहे. या मोठ्या भृंगराजाला डोक्यावर तुरे असतात. हे पश्चिम घाटातच दिसतात.

सूर्य ज्या वेळी माथ्यावर आला तेव्हा स्वच्छ पाण्याच्या एका ओढ्याजवळ जो एका खडकावर कोसळत होता, तेथे आम्ही टेकलो, जेवण घेतले व थंड पाण्याने तहान भागवली. आम्ही विश्रांती घेत असताना शेजारच्या उंच वृक्षावर बसलेले ४-५ नीलगिरी लंगूर आमच्याकडे कुतूहलाने पाहत होते. थोडी विश्रांती घेऊन आम्ही पुढे निघालो. आता आमचा रस्ता दाट वृक्ष- वनस्पतींनी तयार झालेल्या बोगद्यातून जात होता. या रस्त्याने जाताना आकाशाचे क्वचितच दर्शन होत होते. या भागात वन्यप्राणी विपुल असले तरी दृष्टीस पडणे अशक्य होते. कारण वृक्षांची तटबंदी एवढी दाट होती की, ते दिसणे शक्य नव्हते, पण त्यांचे पग्मार्कस् व विष्ठा दिसत होती. त्यावरून त्यांचे अस्तित्व जाणवत होते. वृक्षाच्या पानासारखा आकार असलेला एक बेडूक रस्त्याच्या बाजूने पानवळीत एकरूप झालेला दिसला.

आता आम्हाला नदीच्या पात्रापात्राने जायचे होते, दोन्ही तीरावर उंच वृक्ष व दाट वनस्पती होत्या. रानतंबाखाची झुडपे दिसली, हवेच्या झुळकीने त्याची पाने हलत असताना एखादा नाग फणा काढून डोलत असल्याचा भास होत होता. पक्ष्यांच्या पिसासारखी पाने असलेल्या झाडाने आमचे लक्ष वेधून घेतले. आमचा प्रवास सुरू असतांना सर्वत्र सावल्या पडल्या. आकाशाकडे पाहिले तेव्हा दिसले की अक्राळविक्राळ आकार असलेले काळे ढग वेगाने आकाश व्यापत होते. आमचे कॅमेरे, बायनॉक्युलर पावसापासून वाचवण्याची धडपड सुरू झाली. म्हणता म्हणता काळ्याकुट्ट ढगांनी आकाश भरले व जोराचा पाऊस सुरू झाला. मुसळधार पाऊस. आमच्या डोळ्यासमोर पावसाच्या धारांचा पडदा तयार झाला. थोड्याच वेळात आम्ही चिंब ओले झालो, चालताना धडपडायला लागलो, चालणे कठीण झाले. रस्त्याच्या बाजूला थोडे थांबलो, थोड्याच वेळात आजूबाजूच्या घळींमधून पाण्याचे प्रवाह फूत्कार करीत खाली उतरू लागले व आमच्या पायावरून वाहू लागले. आमचा पुढचा प्रवासाचा टप्पा अर्ध्यापेक्षा जास्त शिल्लक होता आणि आणखी काही प्रवास नदीपात्रातून होता, नदीला केव्हाही पूर यायची शक्यता होती. त्यामुळे गाईडने परत जायचा निर्णय घेतला आणि निसर्गाचे हे रौद्र रूप अनुभवत आम्ही परतीचा प्रवास सुरू केला. अतिशय खडतर असा हा प्रवास



आकाशात शिरलेले वॉचिंग टॉवर



डोंगराच्या मेळात लेखक



पर्वतावर रेंगाळणारे ढग



कुंथी नदीचे एक दृश्य

करून आम्ही काल रात्रीच्या मुक्कामावर पोहोचलो. पूर्ण परतीच्या प्रवासभर पाऊस आम्हाला झोडपत होता. फक्त मधून मधून त्याची तीव्रता कमी व्हायची. परतीच्या प्रवासात पायावर काहीतरी वळवळत असल्याची जाणीव होत होती व अजूनही ती कायम होती.

सायंकाळी आम्ही परत पोहोचलो. तेथे आमचा कालचा जीप ड्रायव्हर आमच्यासाठी वनाधिकाऱ्याचा निरोप घेऊन हजर होता. त्यांनी कळवले होते की, परवा पासून लागोपाठ दोन दिवस राजकीय पक्षांनी काही कारणामुळे केरळ बंदचे आयोजन केले आहे, तेव्हा आम्हाला जर परतीचा प्रवास ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे करायचा असेल तर उद्या सकाळीच कोझीकोड्याला जायला निघावे लागेल. आम्ही विचारविनिमय केला तेव्हा परत जाण्याशिवाय पर्याय नव्हता सर्व सामान जीपमध्ये टाकले, ओल्या अंगाने जीपमध्ये बसलो व नाइलाजाने जड अंतःकरणाने सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानाचा निरोप घेतला.

मुक्कईच्या रेस्टहाऊसला जाऊन ओले कपडे, बूट, सॉक्स काढले तेव्हा प्रत्येकाच्या पायांना जळवा चिकटलेल्या दिसल्या. त्या रक्त शोषून घेत होत्या. बाकीच्यांच्या पायांना ५-६ जळवा होत्या, पण माझ्या पायांना बऱ्याच वरपर्यंत १०-१२ जळवा रक्त शोषत होत्या. जळू ओढून काढली, पण तसे करताना तेथे जखम होऊ लागली व जखमेतून भळभळ रक्त येऊ लागले व पाय रक्तबंबाळ होऊ लागले. ते पाहून वनकर्मचाऱ्याने अगरबत्तीचा एक जुडगा पेटवून आणला. जळवा काढताना तिला पेटत्या अगरबत्तीच्या चटका दिला की तोंड उघडते व ती ओढून काढताना जखम होत नाही. आमचे हे अगरबत्ती ऑपरेशन बराच वेळ चालले. माझ्या पायांना जास्त जळवा लागलेल्या पाहून वनकर्मचाऱ्याने मला विचारले, ‘‘सर, आपका ब्लड ग्रुप ‘O’ है क्या?’’ तो प्रश्न ऐकून मला आश्चर्य वाटले कारण खरेच माझा ब्लड ग्रुप ओ पॉझिटिव्ह आहे. एकंदरीत, जळवांना रक्ताचा ओ ग्रुप आवडीचा आहे असे वाटते.

रात्री बिछान्यावर अंग टाकल्यावर सायलेंट व्हॅलीबद्दलचे विचार मनात गर्दी करू लागले. इथला प्रतिकूल निसर्ग, अवघड भीतिप्रद रस्ते, विषारी जीवजंतू यावर मात करून सायलेंट व्हॅलीच्या अंतरंगात फिरणे व शोध घेणे किती कठीण आहे. आम्ही जाणार होतो तो ‘कुचिपुरा’ म्हणजे कीटकांचा पहाड कसा असेल?

आणि कसे असेल ते अस्पर्श आणि अनाघ्रात असे क्षेत्र? मानवाच्या संसर्गापासून मुक्त (अस्पर्श) असलेले ते क्षेत्र कसे असेल? काय काय स्थित्यंतरे तेथे घडत असतील, कशा नवीन प्रजाती व वनस्पती तयार झाल्या असतील आणि होत असतील? निसर्ग आपली निर्मिती व संहार घडवून आणत असेल काय? त्या क्षेत्राचा त्या क्षेत्राच्या बाहेर असलेल्या भूभागावर व अरण्यावर काय परिणाम होत असेल? पक्ष्यांना या सरहद्दीचं बंधन नाही, त्यांच्या आवागमनाने तेथील काही जीवजंतू बाहेरच्या क्षेत्रात येऊन वाढत असतील. त्या क्षेत्रातून वाहत येणाऱ्या पाण्यातून तिथले काही जीवतंतू, वनस्पतींची बीजे बाहेरच्या क्षेत्रात येऊन रुजत असतील, वाढत असतील. आम्ही पाहिलेला पानवळीतील बेडूक, मुलबंकाचे झाड, लायननटेल्ड मॅकॉव ही त्याचीच तर उदाहरणे नसतील. आतापर्यंत त्या क्षेत्राच्या बाहेर शोधलेल्या नवीन प्रजाती व वनस्पती म्हणजे त्या अरण्यगर्भाच्या सान्निध्याचा तर परिणाम नसेल आणि एवढ्या नवीन शोधलेल्या प्रजाती व वनस्पती बाहेर आहेत तर आत किती भांडार असेल, विचार करता करताच निद्राधीन झालो. रात्री झोपेत स्वप्नं पडली ती अरण्यगर्भाचीच, पण तीसुद्धा अरण्यगर्भाप्रमाणे गूढच होती.

सकाळी सायलेंट व्हॅलीचा निरोप घेताना निसर्गाला मनोमन प्रार्थना केली की, वसुंधरेच्या मर्मबंधातील अरण्यगर्भाची ही ठेव अशीच सुरक्षित राहू दे!


•••



नदीवरील झूलता पूल



सायलेंट व्हॅलीच्या सभोवतालचे निळे डोंगर



किटकाच्या पहाडाकडे जाणारा निसरडा रस्ता



फुललेली आर्किड



जंगली सरडा (Forest Calotis)




ग्रीन ग्रास हॉपर



करवीची फुले




अमलताश




## डॉ.व्हि.टी.इंगोले

बी.ई, एम.टेक, पीएच.डी., फेलो आय.ई.टी.ई.,
फेलो आय.ई. सिनिअर मेंबर, आय.ई.ई.ई.(यु.एस.ए.)
प्राचार्य, प्रा. राम मेघे ईन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी
अँड रिसर्च,अमरावती

E-mail- vijayingole@hotmail.com Website - www.quest4all.or


**ऋचा प्रकाशन**

९, गजानन नगर, नागपूर-१५
फोन : ०७१२-२२५१८७८